# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/२०२०** **दिनांक १९.१२.२०२०**

**स्थळ- web based Microsoft team या ॲपव्दारे** **वेळ- दु. १२.०० वाजता**

**मा. उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दि.१९.१२.२०२० रोजी दुपारी १२.०० web based Microsoft team या ॲपव्दारे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२६२४/२०२०, दि.११.१२.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदरहु शनिवार दि.१९.१२.२०२० रोजी दुपारी १२.०० web based Microsoft team या ॲपव्दारे सुरु करण्यात आली.**

**या सभेस web based Microsoft team या ॲपव्दारे खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

१. **मा. न्या. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

२. **मा.श्री. कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

३. **मा.श्री.भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती**

४. **मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

**सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.**
**त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.**

---

**विषय नं.०१** **दि.११.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५३६** **दि. ११.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.४६४- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रातील श्री. व्ही. कन्नन, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना दरमहा रुपये १८०००/- एकत्रित माधनावर ४ दिवसांचा ब्रेक देवून दि.०९/११/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

**त्याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**निर्णय क्र.४६४- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रातील श्री. व्ही. कन्नन, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना दरमहा रुपये १८०००/- एकत्रित माधनावर ४ दिवसांचा ब्रेक देवून दि.०७/११/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**२. विषय नं.७८-** सन २०२०-२१ या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) ई-निविदा प्रक्रियाबाबत.

**निर्णय क्र.५३०-** यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने दि. ०१.०१.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान,

साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचेशी निम्नतम दराबाबत चर्चा / वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चीत करुन संबधीतास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- साईबाबा भक्तनिवासस्थान)

**त्याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**सदर विषयावरील चर्चा सायं.४.०० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

**(कार्यवाही- साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.०२** **संस्थानचे उपलब्ध अग्निशमन वाहन (मिनी टेंडर) रेस्क्यु टेंडर बनविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये साईबाबा संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे सध्या ०१ वॉटर बाउझर ,०१ फोम टेंडर, ०१ मिनी टेंडर, ०१ फायर बाईक अशी ०४ वाहने कार्यरत आहे. सन २०१५ मध्ये हैद्राबाद येथील HETRO कंपनीने मिनी टेंडर अग्निशमन वाहन श्री साईबाबा संस्थानकरीता देणगी स्वरुपात दिलेले आहे. सदर वाहनामध्ये ३५० लि.पाणी व ५० लि. फोम उपलब्ध असते. संस्थानचे ज्या परिसरामध्ये मोठी अग्निशमन वाहने जागे अभावी जात नाही अशा गर्दी व अरुंद ठिकाणी मिनी टेंडर अग्निशमन वाहनाचा वापर केला जातो. सदर वाहनामध्ये सध्या ०१ वाहन चालक , ०१ फायरमन असे दोनच व्यक्ती प्रवास करु शकतात. सदर देणगी आलेल्या वाहनामध्ये ड्रायव्हर कॅबीनचे मागील बाजूस रेसक्यु साहित्य ठेवणेकामी बॉडी बिल्डींगमध्ये कमी उंचीचे कपाट बनविणेत आलेले आहे. सदर कपाटास सध्या दरवाजे नसुन फक्त खिडक्या आहे हया खिडक्या अरुंद व छोटया असलेमुळे एमर्जन्सी साहित्य काढणेसाठी अडचण निर्माण होते तसेच संस्थान परिसर व इतर ठिकाणी रेस्क्यु कॉल आलेस जास्त कर्मचारी जाणेची आवश्यकता असल्यास सध्या मोठी अग्निशमन वाहने घेवून जावे लागते. संस्थानचा वाढता परिसर , उत्सव कालावधी तसेच इतर ठिकाणी आपत्कालीन प्रसंग उदभवल्यास संस्थानला ०१ रेसक्यु व्हॅनची आवश्यकता आहे. सदर वाहनाचे बॉडी बिल्डींगमध्ये आवश्यक बदल केल्यास क्रु कॅबीनसह आवश्यक साहित्य ठेवून त्याचा एमर्जन्सी रेस्क्यु टेंडर म्हणून वापर करता येईल. फायर विभाग व वाहन विभाग संयुक्तरित्या चर्चा करुन फायर विभागाचे मागणीनुसार मिनी टेंडर वाहनाचे सध्याचे बॉडीमध्ये खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

१. बॉडी बिल्डींची आवश्यकतेनुसार उंची वाढविणे तसेच दोनही बाजुने कर्मचारी यांचे जाणेकरीता फॅब्रीकेशन दरवाजे बसविणे.

२. कर्मचारी यांचेकरीता बसणेकरीता बाक व सदरचे बाकाचे खालील रिकामे जागेत एमर्जन्सी साहित्य सुरक्षित ठेवणेकामी कप्पा तयार करणे.

३. क्रु- कॅबीनकरीता समोरचे बाजूने व्हीजन ग्लास बसविणे.

४. क्रु- कॅबीनमध्ये रेस्क्यु साहित्य सुरक्षित ठेवणेकामी इतर आवश्यक बदल जसे हुकस , लाईट व इतर.

५. मागील बाजूस फायर इंजिनकरीता रोलिंग शटर.

**विभागाचा अभिप्राय -** संस्थानकडे देणगी स्वरुपात आलेली मिनी टेंडरचे बॉडीमध्ये आवश्यक बदल करुन सध्याचे कपाटाचे जागेवर ०३ कर्मचारी यांचेकरीता क्रु कॅबीन तसेच रेसक्यु साहीत्य ठेवणेसाठी व्यवस्था करता येईल जेणेकरुन आपत्कालीन प्रसंगी सदर वाहनाचा रेसक्यु टेंडर म्हणून पुर्ण क्षमतेने वापर करणे शक्य होईल. भविष्यात संस्थानकरीता भविष्यात स्वंतत्र रेस्क्यु वाहन खरेदी करणेची आवश्यकता भासणार नाही. संस्थानचे सर्व वाहनांचे बॉडी बिल्डींगची कामे वाहन विभागामार्फत केली जातात सदरचे वाहन हे वाहन विभागाचे डेडस्टॉकला असलेमुळे मिनी टेंडर अग्निशमन वाहनाचे बॉडी बिल्डींगचे काम हे वाहन विभागामार्फत विहित पध्दतीने करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता सदर प्रस्तावावर मा.प्र.अ., मा.उप.मुख्य का.अ. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांबाबत स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सुचना / निर्देश | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०१ | **मा. प्रशासकिय अधिकारी सो.**<br>मिनी टेंडरच्या रचनेत बदल करतांना प्रथम वाहन | सदर वाहनाचे टेक्नीकल स्पेसीफीकेशन बाबत फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत वाहनाचे बॉडी बांधणीने काम करणारे सोलापुर येथील |

| | | |
|---|---|---|
| | विभागाकडून टेक्नीकल स्पेसीफीकेशन व खर्च तपासून नोट ठेवणे योग्य वाटते. | व्ही.पी. फायर सर्व्हीसेस यांचे कडून सदर वाहनाचे बॉडीबाधनीचे नविन डिझाईन तसेच अंदाजे खर्चाबाबब कोटेशन घेतलेले आहे.<br>**खर्च कोटेशन** –<br>**अ**. आहे त्या (सध्याचे) बॉडीमध्ये दुरुस्ती/बदल खर्च रु.९०,०००/- जीएसटी १६,२००/- **एकूण १,०६,२००/-**<br>**ब**. संपुर्ण नविन बॉडी रु.१,६८,०००/- जीएसटी रु.३०,२४०/- **एकूण रु.१,९८,२४०/-** खर्चा बाबत कोटेशन प्राप्त झालेले आहेत. |
| ०२ | **मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी सो.**<br>१.वाहनात बदल करावयाचे आहे काय काही बदल करावयाचे असल्यास आर.टी.ओ.कडून परवानगी घ्यावी लागेल काय.<br>२.अ बाबत अभिप्राय (मीनी टेंडरच्या रचनेत बदल करतांना प्रथम वाहन विभागाकडून टेक्नीकल स्पेसीफीकेशन व खर्च तपासून नोट ठेवणे योग्य वाटते.) | १. सध्याचे मिनी टेंडर अग्निशमन वाहनाचे फायर सिस्टीम मध्ये कोणताही बदल होनार नाही **फक्त** फायर युनिट व चालक कॅबीन मधील रिकाम्या जागेचा उपयोग क्रु- कॅबीन व रेस्क्यू साहीत्य ठेवणे कामी होणार आहे **तसेच** सदर वाहनाचा वापर रेस्क्यू टेंडर म्हणून झालेस संस्थानला नविन रेस्क्यू वाहन खरेदी, कर्मचारी व इंधन बचत यामुळे आर्थीक फायदाच होईल.<br>२.वरील प्रमाणे (अ.नं. ०१ चे स्पष्टीकरण) |
| ०३ | **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो.**<br>वाहनाचा उपयोग फायर व्हेईकल म्हणून करावयाचा असल्यास महाराष्ट्र शासनाचे फायर सेफ्टी विभागाचे स्टष्ट मत लागेल. | सदरचे मिनीटेंडर वाहन सध्या फायर व्हेईकल म्हणून वापरात आहे. विषयांकित बदलामुळे सदर वाहन संस्थान व परीसरातील रेस्क्यू घटनांसाठी वापरता येईल तसेच क्रु- बसणेसाठी तसेच रेस्क्यू साहीत्यांसाठी जागा होईल तसेच सदर वाहनाचा वापर रेस्क्यू टेंडर म्हणून झालेस संस्थानला नविन रेस्क्यू वाहन खरेदी, कर्मचारी व इंधन बचत होऊन आर्थीक फायदाच होईल. तसेच सदर वाहनाचे फायर सिस्टीम मध्ये कुठलाही बदल होत नसलेमुळे महाराष्ट्र शासनाचे फायर सेफ्टी विभागाचा अभिप्राय घेणेची आवश्यकता नाही. |

संस्थानचे मिनी टेंडर वाहनाचा वापर हा फायर टेंडर व रेस्क्यु टेंडर म्हणून करणेकामी व्हि.पी.फायर सर्व्हिसेस, सोलापूर यांचे प्राप्त डिझाईन व कोटेशन नुसार अंदाजे सध्या आहे त्या बॉडीमध्ये आवश्यक दुरुस्ती/ बदल केलेस खर्च रु.९०,०००/- जीएसटी १६,२००/- असा एकूण खर्च रु. १,०६,२००/- इतका खर्च कळविणेत आलेला आहे.

तसेच संपुर्ण नविन बॉडी खर्च रु.१,६८,०००/- जीएसटी रु.३०,२४०/-**एकूण रु.१,९८,२४०/-** खर्चाबाबत व्हि .पी .फायर , सोलापूर यांचे नविन रेस्क्यू टेंडर डिझाईन व दराबाबत कोटेशन प्राप्त झाले आहे.

**करीता...**

सध्या संस्थानकडे असलेले मिनी टेडरच्या बॉडीमध्ये आवश्यक दुरुस्ती / बदल केलेस खर्च रु.९०,०००/- जीएसटी रु.१६,२००/- असा एकूण अंदाजे खर्च रु.१,०६,२००/- येणार असलेबाबत व्हि.पी.फायर,सोलापूर यांनी इकडील कार्यालयांस कळविले आहे त्यांचे प्राप्त कोटेशन नुसार परीसरातील फायर बॉडी बांधनी करणारांकडून संस्थानचे वाहन विभागामार्फत कोटेशन बोलावून पुढील कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त **अ** प्रमाणे संस्थानचे सध्याचे मिनी टेंडरचा वापर फायर टेंडर व रेस्क्यू टेंडर म्हणून करणेकामी तसेच सदर कामी अंदाजे होणारे १,०६,२००/- खर्चास मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc ) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानकडे असलेले मिनी टेडरच्या बॉडीमध्ये आवश्यक दुरुस्ती/ बदल करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,०६,२००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी आर.टी.ओ. कार्यालयाच्या परवानगीची आवश्यकता असल्यास तशी ती घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- फायर अॅन्ड सेफ्टी)**

---

**विषय नं.०३** **मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे साईबाबा संस्थानचे पॅनलवर अॅडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी प्राप्त झालेले अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नियुक्ती करणेबाबत अॅड.संदिप सुधाकर देशमुख, नवी दिल्ली यांची नेमणूक करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३.०७.२०२० रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करणेत आलेला

होता. सदरचे प्रस्तावावर निर्णय घेते वेळी मा.तदर्थ समितीचे सदस्य यांनी संस्थानकरीता मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद नविन ॲडव्होकेट पॅनल तयार करणेकरीता तात्काळ संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देऊन अर्ज मागविणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार दि. १४/०७/२०२० रोजीचे मंजूर टिपणी नुसार संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते, सदरचे जाहिराती नुसार मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे कामकाज पहाणेकामी १५ अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यापैकी ४ ॲडव्होकेटने प्रोफेशनल फी घेणार नसल्याचे नमुद केले आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे कामकाज पहाणेकामी ५ अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यापैकी २ ॲडव्होकेटने फी घेणार नसल्याचे नमुद केले आहे. तथापी आता जा.नं.एसएसएस/वशी-०४/८०८/२०२० दि.०८/०८/२०२० अन्वये दि.१३.०७.२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे सभेत संमत झालेल्या निर्णयाची प्रत इकडील प्राप्त झालेली असुन त्यामध्ये ॲडव्होकेट पॅनल नियुक्तीकरीता देण्यात येणारे जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये व दि.१४/०७/२०२० रोजी देण्यात आलेल्या जाहिरातीमधील अटी व शर्ती यामध्ये बदल असल्याने दि.१४/०७/२०२० रोजी देण्यात आलेल्या जाहिरात रद्द करुन नव्याने बेबसाईटवर जाहिरात देऊन अर्ज मागविणे क्रमप्राप्त झाले.

दि.१३/०७/२०२० रोजी मा.तदर्थ समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णय क्र. ३६४ नुसार ‘‘यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड संदीप देशमुख यांचा अर्ज नस्तीबंद करण्यात येत आहे. मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने न्यायालयीन कामकाज पहाणेसाठी संस्थानचे ॲडव्होकेट पॅनल तयार करण्यासाठी इच्छुक ॲडव्होकेट यांचेकडून संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत, सदरच्या जाहिरातीमध्ये खालील अटी व शर्ती नमुद करण्यात याव्यात.

१) मा.सर्वोच्च न्यायालयातील संस्थानचे कामकाज पहाण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा. सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा २० वर्षाचा नियमित सराव असावा, तर मा. उच्च न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा. उच्च न्यायालयातील (ठरावामध्ये अनावधानाने मा. सर्वोच्च न्यायालयातील झाले आहे.) कामकाजाचा १५ वर्षाचा नियमित सराव असावा.

२) अर्जदार किंवा फर्म यांची मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली/ मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे नोंदणी झालेली असावी.

३) अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचे विरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिका-यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

४) विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयातील / मा. उच्च न्यायालयातील संस्थानच्या प्रत्येक विधायक तारखेस किती फी आकारणार अथवा प्रकरणाची एकुण फी किती आकारणार संस्थानने एखाद्या विषयाचे बाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची / फी ची अपेक्षा आहे, याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.

५) अर्जदार यांनी यापुर्वी मा. उच्च न्यायालयात संस्थानच्या विरोधात काम केलेले नसावे. तसेच सध्याही अर्जदार संस्थानचे विरोधात काम करत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही, अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.

६) संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची/कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व ॲडव्होकेट्स चा कालावधी नेमणूक तारखेपासून पुढील आदेश होई पावेतो राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या ॲडव्होकेटला संस्थानच्या सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

७) पॅनलवरील ॲडव्होकेटच्या संख्येचे बंधन राहणार नाही.

८) संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यानंतर अर्जदाराने दिलेली माहिति चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्तीनंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबंधीत बार कौन्सीलकडे / बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.

९) मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.

१०) संस्थान पॅनलवर नेमणूक होणेसाठी अर्जदार – ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.

११) संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थानला राहील. व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.

उपरोक्त ठरावा मध्ये अटी शर्ती मधील पान नं.१ मध्ये उच्च न्यायालयात कामकाज पाहाण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा. उच्च न्यायालयातील कामकाजाचा १५ वर्षाचा नियमित सराव असावा, असे अपेक्षित होते तथापी दि.१३/७/२०२०, रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६४, ठरावामध्ये मा.सर्वोच्च न्यालयातील कामकाजाचा १५ वर्षाचा नियमीत सराव असावा, असे नमुद केले होते, त्यामध्ये दि.२८/८/२०२० रोजीचे तदर्थ समितीचे सभेमध्ये दुरुस्ती होऊन मा.उच्च न्यायालय ,अशी दुरुस्ती करणेत आलेली आहे.

प्रस्तुतचे निर्णयानुसार दि. ०१/०९/२०२० रोजीचे मंजूर टिपणी नुसार संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते, सदरचे जाहिराती नुसार मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे कामकाज पहाणेकामी १५ अर्ज व मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे कामकाज पहाणेकामी ३ अर्ज ई मेल व्दारे व एक अर्ज समक्ष प्राप्त झाला आहेत, त्याबाबतची माहिती सोबत (परिशीष्ट - अ ) जोडली आहे.

तरी प्राप्त झालेल्या ॲडव्होकेटच्या अर्जांनुसार मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी अर्ज केलेल्या अर्जदारांची मुलाखत घेणेसाठी दि.५ जानेवारी,२०२१ नंतर वेळापत्रक निश्चीत करुन पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात याव्या, असे ठरले.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.०४** **सन २०२०-२१ या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) ई-निविदा प्रक्रियाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम-(१)१४/२ घ-भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे विषय नं.५४ व निर्णय क्र.२२६ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०९/२०१९ ते दि. ३१/०८/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान या तिनही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी एकत्रित अंदाजे खर्च रक्कम रु.७,२४,५२१.१८/-+रु.१,३०,४१३.८१/-(१८ % **GST)** अशी एकुण रक्कम रु.८,५४,९३५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असुन साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थानव व्दारावती भक्तनिवास या तीन विभागाकडील इमारती व परिसरात करावयाचे पेस्ट कंट्रोल (किटक नाशक औषध फवारणी) करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील विषय नं.०१ निर्णय क्र.४४८ नुसार निम्नतम दरधारक **Pest Terminators, Pune.** हे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते.समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावतीभकतनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी निम्नतम दरधारक मे. पेस्ट टर्मिनेटर्स यांचे दर प्रती चौ.फुटास रु.१.१० इतके असून मंजुर दरानुसार रक्कम रु.४,६७,४३३.०२ + **GST** १८ % रक्कम -८४,१३७.९४असे एकुण रक्कम रु.५,५१,५७०,.९६ पुर्णांकित रक्कम ५,५१,५७१/-(अक्षरी रक्कम रु. पाच लाख, एकावन्न हजार, पाचशे एकाहत्तर/-) मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्ताविक:-** श्रींच्या दशर्नासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये एकूण ९९० खोल्या, २५ हॉल व २९७ लॉकर्स असून त्याचे एकूणक्षेत्रफळ ४,२४,९३९.११ इतके आहे.

सन २०१९-२०२० करीता दि. ०१/०९/२०१९ ते दि.३१/०८/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडुन कर वगळुन दर मागविण्यात आले आहेत. त्यानुसार पात्र निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड खरेदी समितीचे दि. १४/०८/२०१९ रोजीचे सभेत उघडण्यात आले आहे. त्यामध्ये M/S.Pest Terminators, Pune यांचे निम्नतम दर रु.१.१० प्रति चौ.फुट आहेत.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४४८ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-सा.भ.नि/२३११/२०१९ दि.१४/०९/२०१९ अन्वये M/S.Pest Terminators, Pune यांना दि.०१/०९/२०१९ ते दि.३१/०८/२०२० या एक वर्ष कालावधीत साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान विभागासाठी पेस्ट कंट्रोल (किटकनाषक औषध फवारणी) करणे कामी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागातील अद्याप पावेतो दि. २५/०९/२०१९ ते दि.२०/१०/२०१९ पहीली औषध फवारणी,दि.०५/१२/२०१९ ते दि२०/१२/२०१९ दुसरी फवारणी व दि.०५/०२/२०२० ते दि.२०/०२/२०२० तिसरी फवारणी,दि. २१/०३/२०२० ते दि. २७/०३/२०२० चौथी फवारणी अशा चार औषध फवारण्या करण्यात आलेल्या आहे.

साईप्रसाद निवासस्थान अद्याप पावेतो दि.२२/१०/२०१९ ते दि.१८/१२/२०१९ पहीली औषध फवारणी, दि.१८/१२/२०१९ ते २३/१२/२०१९ दुसरी औषध फवारणी , व दि. १८/०२/२०२० ते दि.२२/०२/२०२० तिसरी औषध फवारणी अशा तिन औषध फवारण्या करण्यात आलेल्या आहे. व्दारावती भक्तनिवासस्थान अद्याप पावेतो दि.२४/९/२०१९ ते दि.०७/१०/२०१९ पहिली फवारणी व दि.२६/११/२०१९ ते दि.१८/१२/२०१९ दुसरी फवारणी,दि. ०३/०२/२०२० ते दि.१९/०३/२०२० तिसरी फवारणी अशा तिन औषध फवारण्या करण्यात आलेल्या आहे.

उर्वरीत वार्षिक साईबाबा भक्तनिवासस्थानचे दोन व साईप्रसादनिवासस्थानचे व व्दारावती भक्तनिवासस्थान प्रत्येकी तीन औषध फवारणी बाकी आहे.

सध्या कोरोना व्हायरस (covid-19) च्या पार्श्वभुमिवर दि.१७/०३/२०२० पासुन साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान या इमारती बंद असून या निवासस्थानाचे पेस्ट कंट्रोलचा कालावधी दि.३१/०८/२०२० अखेर संपुष्टात येत आहे. पुढील कालावधीची (सन २०२०/२०२१) ई-टेंडर प्रक्रीया पुर्ण होईपावेतो दरम्यानचे कालावधीत निवासस्थाने चालु झाल्यास आवश्यकतेनुसार चालू टेंडर धारकाकडून कार्यादेशामध्ये नमुद प्रती चौ.फुट रु.१.१० या दराप्रमाने निवासस्थानांना औषध फवारणी करुन घेता येईल असे मत आहे.

विभागाची मागणीः-

सध्या कोरोना व्हायरस(covid-19)च्या पार्श्वभुमिवर साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान या इमारती बंद असल्यांने सदर पुढील औषध फवारणी भक्तनिवासस्थाने चालु झाले नंतर प्रत्येकी दोन महिने कालावधी चे अतंराने औषध फवारणी करुन आहे त्याच दराने (१.१०) बील अदा करावे करता येईल, असे मत आहे.

तसेच कार्यदेशाची दि. ०१/०९/२०१९ ते दि.३१/०८/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्टकंट्रोल अखेर सपुंष्ठात येत असल्याने पुढील दि.०१/०९/२०२० ते दि.३१/८/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थानचे औषध फवारणी करणे कामी एकत्रित ई-निविदा कार्यवाही करणे आवश्यक आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान विभागासाठी पेस्ट कंट्रोल ( किटकनाषक औषध फवारणी) करणे कामी एक वर्ष कालावधीकरीता कार्यादेशातील मागील पेस्ट कंट्रोलचा प्रती चौ. फुट दर रु. १.१० पैसे असा होता . सदरचे दर जीएसटी वगळुन आहेत.

तरी सध्याचे नविन दर हे १०% महागाई वाढीव रक्कम धरण्यात येऊन सदरचे दराप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थान या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोलकामी एक वर्षाकरीता (वर्षातुन ६ फवारण्या) करणेकामी खर्चाची रक्कम (इन्स्टीमेटेड कॉस्ट) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.नं | विभाग | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या व हॉल मिळवून एकूण क्षेत्रफळ (चौरसफुटामध्ये) | फवारणीचा चौ.फुट वार्षिक दर सर्व करासह (सहा फवारणी) (जीएसटी वगळुन) रुपये पैसे | मागील सन २०१९-२०२० रक्कम (जीएसटी वगळुन) | प्रस्तावित १०% वाढीव रक्कम सन २०२०-२१ करीता (जीएटी वगळुन ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५२६ | ११ | १९८ | १,७३,२६८.०० | ०१.१० | १,९०५९४.८०/- | २,०९,६५४.२८ |
| २) | साईप्रसाद निवासस्थान | १३४ | १४ | ९९ | ४६,५५४.११ | | ५१,२०९.५२/- | ५६,३३०.४७ |
| ३) | व्दारावती निवासस्थान | ३३० | --- | --- | २,०५,११७.०० | | २,२५,६२८.७०/- | २,४८,१९१.५७ |
| | **एकूण** | **९९०** | **२५** | **२९७** | **४,२४,९३९.११** | -- -- | **४,६७,४३३.०२/-** | **५,१४,१७६.३२** |
| | | | | | | | **जीएसटी १८ % रुपये** | **९२,५५१.७३** |
| | | | | | | | **एकुण** | **६,०६,७२८.०५** |
| | | | | | | | **जीएसटी १८ % रुपये** | **१,०९,२११.०५** |
| | | | | | | | **एकुण** | **७,१५,९३९.१०** |
| | | | | | | | **एकुण पुर्णांकित रक्कम** | **७,१५,९३९.००** |
| **(अक्षरी रुपये –सात लाख, पंधरा हजार, नऊशे एकोणचाळीस मात्र )** | | | | | | | | |

उपरोक्तकामी एकुण अंदाजे रुपये ६,०६,७२८.०५+१,०९,२११.०५ (GST-१८%)=७,१५,९३९.१० एकुण पुर्णांकित रक्कम ७,१५,९३९.०० (अक्षरी रुपये–सात लाख,पंधरा हजार,नऊशे एकोणचाळीस मात्र/-) खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मतः –

१) मे. पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचा कामाचा कालावधी दि.३१/०८/२०२० अखेर संपुष्टात येत असल्यांने पुढील ई-निविदा कार्यवाही पुर्ण होईपावेतो व नविन ठेकेदार नियुक्ती करेपर्यत कार्यादेशामध्ये नमुद अटी/शर्तीस अनुसरुन प्रती चौ. फुट १.१० या दराप्रमाने दर दोन महिन्याने साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसादनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान येथील औषध फवारणी करणेस मुदतवाढ मिळणेस व येणारे बील अदा करणेस.

२) साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये एकूण ९९० खोल्या, २५ हॉल व २९७ लॉकर्स असून त्याचे एकूणक्षेत्रफळ ४.२४.९३९.११ चौ.फुटास पेस्टकंट्रोल करणेस.

३) दि.०१/०९/२०२० ते दि.३१/८/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थान औषध फवारणी करणे कामी उपरोक्त लिखीत तक्त्यात नमुद केले प्रमाणे रु.७,१५,९३९.०० (अक्षरी रुपये–सात लाख, पंधरा हजार, नऊशे एकोणचाळीस मात्र) खर्चास मान्यता मिळणेस.

४) ईडीपी मॅनेजर यांचेमार्फत महाराष्ट्र राज्याच्या www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर ई-निविदा सुचना जाहिरात व त्या संदर्भातील Document Upload करणेस.

५) माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संकेतस्थळावर ई-निविदा सुचना जाहिरात प्रसिध्द करणेस.

६) सन २०२० -२०२१ करीता ०१/०९/२०२० ते दि.३१/०८/२०२१ या एक वर्ष कालावधीकरीता जनसंपर्क विभागामार्फत शासकीय दराने एकत्रित ई-निविदा जाहिरात राज्यस्तरीय मुबंई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपुर, या शहरासह अहमदनगर जिल्हातील दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad –hoc ) समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि. ०१.०१.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या एक वर्ष कालावधीकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल किटकनाशक औषध फवारणी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७,१५,९३९/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो सदर कामाचे सध्याचे ठेकेदार मे.पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांना कार्यादेशातील नमुद अटी/शर्ती व दरानुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.०५** **श्री साई प्रसादालयाकडील दि.१२.०९.२०२० रोजीचे हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोल तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेबाबतच्या चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाचे निर्णयावरील मा.अध्यक्ष साहेब यांचे सुचनेबाबत.**

**प्रस्ताव-** वरील विषयांस अनुसरुन इकडील विभागामार्फत, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने कामावर घेवून प्रसादालयातील कामे करुन घेण्यात येत आहेत. त्यानूसार श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम व दररोज १०० वाढपी कामगार कामास लावणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानूसार, जा.एसएसएस/वशी/२३४१/२०१९ दि.१४/०९/२०१९ अन्वये,मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ ते १४/०९/२०२० या कालावधीकरीता GST वगळून दरमहा कामाची मजूरी रक्कम रु.३४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चौतीस लाख पन्नास हजार मात्र)याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहे.

त्यानूसार संदर्भिय अन्वये, इकडील विभागाने मा.तदर्थ समितीपुढे दि.१२/०९/२०२० रोजी चक्रीय पध्दतीनूसार खालीप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केलेला होता.

अ) सध्याचे हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत असल्याने, श्री साई प्रसादालयातील स्वच्छता व हाऊसकिपींग, पेस्टकंट्रोल कामाअभावी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचेच ठेकेदारमे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना तीन महिने (दि.१४/०९/२०२० पासून पुढे) अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच दरात व अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ दयावी लागेल. त्याकामी प्रती महा अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तेवीस लाख मात्र) (कोरोना-१९ कालावधीतील बीलानूसार) इतका खर्च अपेक्षीत आहे. त्यानूसार मुदतवाढ कालावधीसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

ब) सध्याचे हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत असल्यानेपुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रियाराबविणेकामी सन-२०२०-२०२१ या एकवर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.४,५५,४०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंचावन्न लाख चाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. करीता सदरचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे CA दाखल करणेस तसेच मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर मा.तदर्थ समितीने खालीलप्रमाणे शर्तीसह उपरोक्त कामासाठी वरील अ) प्रमाणे तीन महिन्यांची मुदतवाढीस मान्यता दिलेली असून याकामी नविन निविदा काढणेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानूसार कार्याही चालू झालेली आहे.**

१. सदर विषयाबाबतच्या कार्यालयीन टिपणीचे वाचन केले. तसेच सबंधीत विभागाचे प्रभारी अधीक्षक श्री विष्णू थोरात यांच्याकडून विषय समजून घेतला. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, आजही श्री साई प्रसादालयात सुमारे २००० व्यक्तिंचा स्वयंपाक केला जातो. त्यासाठी सदया आणलेल्या विषयातील हाऊसकिपींग कर्मचारी (100 वाढपी वगळता) यांना साखळी पध्दतीने (by rotation) काम दिले जाते. एखादा

कर्मचारी ज्या दिवशी हजर असतो त्यादिवसाचा पुर्ण पगार त्याला दिला जातो. यावरुन मात्र हे स्पष्ट होते की, १०० वाढपी हे सद्य स्थितीत काहीही कामाचे नाहीत. अर्थातच या सर्व बाबी या टिपणीमध्ये कुठेही नमूद नाहीत किंवा टिपणी सोबत जे अभिलेख पाठविले त्यातही कुठे नमूद नाहीत.

**खुलासा-याबाबत, कोव्हीड-१९ चे विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाचे लॉकडाऊनचे नियमानूसार व संस्थान प्रशासनाचे आदेशान्वये, श्री साई प्रसादालय हे दि.१७/०३/२०२० पासून भक्तांना प्रसादभोजनसाठी बंद करणेत आलेले आहेत. परंतू लॉकडाऊन कालावधीत आजपावेतो प्रसादालयातून गोर गरीब, भिक्षेकरुन, अंध/अपंग मुकबधीर शाळा, अनाथाश्रम, संस्थानचे श्री साईबाब व साईनाथ या दोन्ही हॉस्पीटलमधील रुग्ण, शासकीय बंदोबस्तासाठी आलेले पोलीस/अधिकारी, अत्यावश्यक सेवेतील संस्थान कर्मचारी वर्ग तसेच कोव्हीड-१९ हॉस्पीटलमधील संक्रमित रुग्ण, क्वारंटाईन केलेले व्यक्ती यांना श्री साई प्रसादालयातून माहे मार्च-२०२० ते मे-२०२० पर्यंत दररोज ४,००० ते ५००० व माहे जुलै-२०२० पासून आजपावेतो दररोज २५०० ते ३००० व्यक्तींना अल्पोपहार व प्रसादभोजन सेवा मोफत पुरविण्यात येत आहेत.**

**सध्या श्री साई प्रसादालयात स्वच्छतेची कामे सध्याचे हाऊसकिपींग ठेकेदाराकडून सुरु असून इतरही साफ-सफाईची कामे करुन घेण्यात येत आहेत. उपरोक्त ठेकेदारामार्फत १०० वाढपी कामगार वगळता हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी काम करत असलेल्या कामगारांना कोव्हीड-१९ काळात चक्रीय पध्दतीने दररोज ३५ ते ४० कामगार यांना सध्या प्रसादालयात चक्रीय पध्दतीने स्वच्छतेची कामे देण्यात येत आहे. तथापी आवश्यक तेवढी भक्तांची भोजन संख्या नसल्याने व कोव्हीडचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून वाढपी कामगार लावणेत येत नाहीत.प्रशासनाने जेव्हा कोव्हीड-१९ चे प्रादुर्भावामुळे मंदीर व त्यानुषंगिक सर्व उपक्रम बंद केले तेव्हा संस्थान सेवेतील कायम, कंत्राटी, बाहयस्त्रोतकामगार यांचे वेतनाबाबत प्रश्न उदभवला तेव्हा सामान्य प्रशासनाने मा.तदर्थ समितीकडून उपरोक्त् कामगारांना मानवतेच्या दृष्टीकोनातून वेतन देणेबाबत निर्णय घेण्यात येवून त्याबाबत प्रशासनाने जा.क्रं.एसएसएस/साप्रशा/आस्था/३३२/२०२० दि.२४ जुन,२०२० चा आदेश पारीत करुन उपरोक्त सर्व संस्थानमधील कामगारांना मानवतेच्या दृष्टीकोनातून उपासमार होवू नये म्हणून कामावर नसलेल्या कामगारांना ५० टक्के व हजेरीच्या दिवसातील पुर्ण पगार याप्रमाणे वेतन आजतागायत आदा करणेत येत आहे. त्यानूसारच प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता पेस्टकंट्रोलमधील कामगारांना कामाचे दिवशीचा पुर्णपगार व कोव्हीडचे काळातील अनुपस्थीतीस ५० टक्के वेतन आदा करणेत येत आहे. त्यानूसार सबंधीत १०० वाढपी कामगारांना वेतन आदा करणेत येत आहे.**

**आता, सदरहु हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने संदर्भिय प्रस्तुत टिपणीतील अ) व ब) नूसार इकडील विभागामार्फत दि.१२/०९/२०२० रोजी चक्रीय पध्दतीने मा.तदर्थ समितीपुढे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यास समितीने मान्यता दिलेली आहे. परंतू सदरचा प्रस्ताव हा नव्याने ई-निविदा मागविणेकामी व ई-निविदा होईपावेतो मुदतवाढ देणेबाबतचा असल्याने सद्यस्थितीत कोव्हीड-१९ चे कालावधीत १०० वाढपी कामगारांचे वेतनाबाबतची केलेली कार्यवाही टिपणीत नमूद केलेली नाही. असे सुचित केलेले आहे. परंतू यापुर्वी कधीही उपरोक्तकामी टिपण्या सादर करतांना अशा स्वरुपाची माहीती मागण्यात आली नाही त्यामुळे ती कधीही टिपणीत सादर केलेली नाही शिवाय कोव्हीड-१९ पुर्वी संपुर्ण संस्थान बंद ठेवणे अशा स्वरुपाचे प्रश्न उदभवले नसल्याने तशी आवश्यकता वाटली नाही म्हणून अनावधानाने टिपणीत तसे नमूद केले नाही.**

१. विषयाची मांडणी करतांना कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत यानंतर काय परिस्थिती असणार आहे हे स्पष्ट केलेले नाही. येथे जरुर नमूद करावेसे वाटते की, दि.१३/०७/२०२० रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री डोंगरे यांनी मंदिर खुले झाल्यास कोव्हीड-१९ चे मानकांचे पालन करुन साधारणतः ३ ते ५ हजार भक्तांना एका दिवसात दर्शन देता येवू शकते, अशी सर्व माहीती समिती सदस्यांना पुर्ण मंदिराची पाहणी करुन दाखवून देण्यात आली होती.

२. याठिकाणी १०० वाढपी यांच्या सेवेचा विचार करता जरी मंदिर सुरु झाले तरी प्रसादालय सुरु होईलच हे निश्चित नाही. तसेच प्रसादालय सुरु झाले तरी प्रसादालयात येणा-या भक्तांची संख्या पाहता सदर १०० वाढपी यांची खरेच गरज आहे का, या बाबींचा अभ्यास केलेला दिसून येत नाही.

**खुलासा- याबाबत,कोव्हीडची परिस्थितीमध्ये मंदीर सुरु झाल्यास मंदिरात किमान दररोज ५००० भक्त शिरडीत येतील तथापी पुर्वी जेव्हापासून प्रसादभोजनमोफत झाले तेव्हापासून शिर्डी व**

**परिसरातील गोर-गरीब, कामगार, शिर्डीसह पंचक्रोशीतील गांवकरी, साईभक्त प्रसादभोजन घेण्यासाठी येत असतात. त्याची संख्या सरासरी ५००० ते ८००० साधारण कालावधीत इतकी असत त्यामुळे कोव्हीड नंतर मंदिर सुरु झालेनंतर साधारण अत्यल्प गर्दीचा विचार करता १०,००० ते १५,००० भक्त, गांवकरी प्रसादभोजन घेतील असा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे प्रसादालयातील अत्यावश्यक डयुटी पॉईंट विचारात घेता, जेव्हा १०,००० साईभक्त अथवा त्यापेक्षाही जास्त भक्त आल्यास प्रसादालयातील कायम कर्मचारी वर्ग विचारात घेतला तरीही हाऊसकिपींग ठेकेदाराकडील १०० वाढपी कर्मचा-यांची आवश्यकता असते. याकामी सोबतच्या परिशिष्टात भक्तनिहाय व पॉईंटनिहाय (तीन शिफ्ट मिळून) कर्मचा-यांचा पॉईंट तक्ता सोबत सादर करीत आहोत.**

**सन-२००९ चे मंजूर आकृतीबंधानूसारच सदर कामगार आवश्यक आहेत. तदनंतर सेवानिवृत्ती, मयत, कामगारांऐवजी आम्हास कामगारही मिळाले नसून आता सन-२०२० सुरु असून साईआश्रम, ५०० रुम, व्दारावती भक्तनिवासस्थान येथेही भोजनव्यवस्था चालू झालेली आहे.**

**खुलासा- याबाबत, महाराष्ट्र शासनाचे आतापर्यंतचे अनलॉकचे अवलोकन करता, जवळजवळ मंदिरे व रेस्टॉरंट या दोनच बाबींना बंदी आहे सदर बंदी उठल्यानंतर मंदिरात येणा-या भक्तांची संख्या व भोजनासाठी येणा-या भक्तांची संख्या याचा आता सध्या तरी अंदाज बांधणे अडचणीचे व तर्कसंगत होणार नाही. असे नम्र मत आहे. तथापी पुर्वानुभव विचारात घेता साधारण १०,००० भक्त, गांवकरी प्रसादभोजन घेतील असा अंदाज आहे. परंतू प्रसादभोजन व्यवस्था मोफत असल्याने परिसरातील मजूर व गोर-गरीब लोक भोजन प्रसाद घेतील तोही परिणाम जाणवेल.**

३. सद्यस्थितीत संस्थानची आर्थिक आवक जवळपास बंदच आहे. संस्थान प्रशासन, या सर्व बाबींचा अभ्यास करुन पुढील बैठकीत या विषयावर सर्वसमावेषक अशी टिपणी सादर करेल अशी अपेक्षा आहे.

**खुलासा- याबाबत, शासनाने लॉकडाऊन सुरु केल्यापासून असे निर्देश दिलेले आहे की, कोणत्याही कामगारांचे/कर्मचा-यांची उपासमार होणार नाही याकामी कोणत्याही संस्थेने कोणत्याही कामगारास कामावरुन कमी करु नये त्यावर मेहरबान मा.तदर्थ समितीने मानवतेच्या दृष्टीकोनातून लॉकडाऊन झालेपासून संस्थानने इतर विभागातील कोणत्याही कायम, कंत्राटी, बाहयस्त्रोत कामगारांना कमी केलेले नसून त्यांना हजर असलेल्या दिवसाचे पुर्ण वेतन व हजर नसलेल्या दिवसांचे कोव्हीड-१९ लावून त्या दिवसांचे ५० टक्के वेतन आदा करीत आहोत. त्यामुळे सद्यस्थितित संस्थानची आर्थिक आवक बंद आहे. ही वस्तूस्थिती खरी आहे तरीही उदरनिर्वाहाचे साधन म्हणून मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांना आतापर्यंत वेतन आदा करण्यात येत आहे.**

**प्रस्तुत हाऊसकिपींग ठेकेदाराकडील १०० वाढपी हेही श्री साई प्रसादालयात यापुर्वीपासून सेवा देत आहेत. दि.१४/०९/२०२० पर्यंत त्यांचे कामाची मुदत संपुष्टात आलेली आहे. याकामी नविन निविदा काढण्यासाठीचा प्रस्ताव दि.०९/०६/२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे बैठकीत सादर करण्यात आला होता तेव्हापासून ते दि.२८/०८/२०२० चे सभेपर्यंत वेळोवेळी स्थगित होवून निर्णय न झाल्यामुळे सदर कामगारांबाबत मुदतवाढ देणेची वेळ उद्भवली आहे. मा.उच्च न्यायालयात CAदाखल होवून मान्यता मिळून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे नविन निविदेमध्ये १०० वाढपीबाबत सर्व समावेशक विचार होवून कामाची निकड, आवश्यकता याचा विचार होवून ते अंर्तभुत करावे किंवा कसे याबाबत अलाहिदा निर्णय घेता येईल. तुर्त हे एकत्रित निविदा असल्यामुळे हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोल यांची कामे चालू असून कोव्हीड-१९ मुळे प्रसादालय बंद असल्यामुळे आपण १०० वाढपी सध्या कामावर घेत नाहीत.**

**हाऊसकिपींग कामाची ई-निविदा होईपावेतो मा.तदर्थ समितीचे मान्यतेने सदर कामासाठी तीन महिने मुदतवाढ देण्यात आलेली असून पुढील काही काळ प्रसादभोजन व मंदीरे पुर्ववत सुरु होईपावेतो सदर १०० बाहयस्त्रोत वाढपी कामगारांना इतर कामगारांप्रमाणेच प्रशासनाचे आदेशानूसार तुर्त वेतन आदा करावे लागणार आहे. असे नम्र मत आहे.**

सध्याचे हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत असल्याने,श्री साई प्रसादालयातील स्वच्छता व हाऊसकिपींग, पेस्टकंट्रोल कामाअभावीभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीतापुढीलकालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचेच ठेकेदारमे.फोकस फॅसिलिटी ॲण्डसिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना तीन महिने (दि.१४/०९/२०२० पासून पुढे) अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेशदेईपावेतो या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच दरात

व अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ देण्यात येत असून नव्याने ई-निविदा प्रक्रियाराबविणेकामी सन-२०२०-२०२१ या एकवर्ष कालावधीसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे CA दाखल करणेत येत असून मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया सुरु करता येईल.

तरी वरीलप्रमाणे श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग,स्वच्छता व पेस्टकंट्रोलच काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने लावणेबाबतच्या चक्रीय पध्दतीचे प्रस्तावावरील वस्तूस्थिती अहवाल उपरोक्तप्रमाणे देत आहे. तरी सदरचा वस्तूस्थिती अहवाल मा.तदर्थ समिती सभेपुढे माहीतीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील दि.१२.०९.२०२० रोजीचे हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोल तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने घेणेकामी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.०६** **श्री साई प्रसादालयास सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रास्ताविक:- श्री साई प्रसादालयामध्ये सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. दैनंदिन सरासरी ४० ते ४५ हजार साईभक्त प्रसाद- भोजनाचा लाभ घेत असून प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, कडधान्य भाजी, पालेभाजी, दाळ- भात शिरा, बर्फी इ. पदार्थ दिले जातात. तसेच दररोज सकाळी ६ ते १० या वेळेत सरासरी ९ ते १० हजार अन्नपाकीटे (नाष्टापाकिटे) प्रसादालयामार्फत तयार करणेत येऊन साईभक्तांना अल्प दरामध्ये पुरविणेत येतात.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ निर्णय क्र.२० अन्वये माहे जुलै-२०१७ पासून प्रसादालयास लागणारा भाजीपाला ई-निविदा पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करून प्रसादालयास पुरवठा करणेत येतो. श्री साईबाबांच्या दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांच्या गर्दीवर प्रसाद- भोजन सेवा अवलंबून असल्यामुळे आवश्यकतेनुसार आठवडयातुन दोनदा (गुरुवार व रविवार) भाजीपाल्याची प्रसादालयामार्फत मागणी करण्यात येते व व्यापा-यांमार्फत भाजीपाला थेट प्रसादालयामध्ये पोहच करण्यात येतो.

खरेदी विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३२२३/२०१७ दि.१८/११/२०१७ अन्वये "भाजीपाला खरेदीची वार्षिक मागणी दरवर्षी प्रसादालय विभागाने ऑक्टोबर महिन्यामध्ये निश्चित करुन, त्याचा प्रस्ताव तयार करून अंदाजे Quantity व खर्चास प्रशासकीय तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता घ्यावी. मान्यतेनंतर परिपुर्ण प्रस्ताव दरवर्षी ३० नोव्हेंबरपर्यंत खरेदी विभागाकडे ई-निविदा प्रक्रियेसाठी पाठविण्याची पध्दत ठेवावी" असा कार्यालयीन आदेश पारित केलेला आहे.

श्री साई प्रसादालयास सन २०२१ –२०२२ करीता आवश्यक असणा-या भाजीपाल्याची मागणी करतांना सन २०२०-२१ मध्ये कोवीड-१९ रोगाचा प्रसार झाल्याने प्रत्यक्ष खर्च कमी दिसत असल्याने सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या तिन वर्षाचे कालावधीच्या सरासरीचा विचार केलेला आहे. तसेच त्यामध्ये १० टक्के अपेक्षीत वाढ गृहीत धरलेली असून सन २०२०-२१ चे वार्षिक मान्य सरासरी दर ग्राहय धरण्यात आलेले आहे. सदर खरेदी ही एप्रिल २०२१ पासून होणार असल्याने कोवीड-१९ च्या परिणामामुळे साई भक्तांचे गर्दीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दैनंदिन सरासरी ३० ते ३५ हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतील अपेक्षित आहे.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता श्री साई प्रसादालयासाठी लागणा-या भाजीपाल्याचा अंदाजीत खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| **अ. नं.** | **तपशिल** | **मागणी** | **सरासरी दर (क्विं.)** | **रक्कम** | **अ नं.** | **तपशिल** | **मागणी** | **सरासरी दर (क्विं.)** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्विंटल | रु. पै. | रु. पै. | | | क्विंटल | रु. पै. | रु. पै. |
| १ | बटाटा | ३००० | १६८६ | ५०५८००० | १५ | आद्रक | ३५ | २९५६ | १०३४६० |
| २ | कांदा | १८०० | १८५० | ३३३०००० | १६ | गाजर | ७ | २२८० | १५९६० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | लसूण | २५० | ६५७२ | १६४३००० | १७ | आळूपाने | २० | ७१२५ | १४२५०० |
| ४ | हिरवी मिरची | ४०० | २४३८ | ९७५२०० | १८ | शेवगा शेंगा | ३ | ६५०२ | १९५०६ |
| ५ | वांगी | ८५० | १५५३ | १३२००५० | १९ | मेथी भाजी | ४ | ३०९२ | १२३६८ |
| ६ | टोमॅटो | ४५० | १३५९ | ६११५५० | २० | काकडी | १० | १९६२ | १९६२० |
| ७ | कोथंबिर | ७० | २२१२ | १५४८४० | २१ | भेंडी | ३.५० | ४२८१ | १४९८३.५० |
| ८ | कोबी | १२०० | ८९० | १०६८००० | २२ | रताळे | १ | ५१७२ | ५१७२ |
| ९ | भोपळा | १७०० | ११०५ | १८७८५०० | २३ | बीट | ०.२५ | २०२५ | ५०६.२५ |
| १० | डांगर | ८०० | ७३४ | ५८७२०० | २४ | फ्लावर | २०० | १८३६ | ३६७२०० |
| ११ | पालक | २५० | ११५१ | २८७७५० | २५ | तोंडले | ०.५० | ४४४७ | २२२३.५० |
| १२ | कढीपत्ता | ५० | २१०० | १०५००० | २६ | गवार शेंगा | ०.३० | ६९५५ | २०८६.५० |
| १३ | लिंबू | २.५० | ४५०० | ११२५० | २७ | दोडके | ५० | ३३३७ | १६६८५० |
| १४ | सिमला मिरची | ४०० | २०४५ | ८१८००० | | | | | |
| | | | | | | | | **एकुण रक्कम रुपये-** | १८७२०७७५ |
| | | | | | | | | **पुर्णांकित रक्कम रुपये-** | १८८००००० |

मागणी:- सन २०२१-२०२२ करीता साईभक्तांना प्रसाद- भोजन सुविधा पुरविणेकामी लागणारा उपरोक्तप्रमाणे भाजीपाला खरेदी करणे आवश्यक आहे. उपरोक्त दर हे सरासरी असून त्यात चढ-उताराची शक्यता विचारात घेता रक्कम रु.१,८८,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये- एक कोटी अठ्ठयाऐंशी लाख मात्र) अपेक्षित असून सदर खरेदी कामी सन २०२१-२०२२ चे प्रसादालय बजेटमध्ये तरतूद करणेत येईल. सदरचा भाजीपाला खरेदी हा साई भक्तांच्या गर्दीवर अवलंबून असल्याने आवश्यकतेनूसार खरेदी करता येईल तसेच सदरील प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर सदरील खरेदी ही खरेदी विभागामार्फत ई-निविदेव्दारे करणेत येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईप्रसादालयाकरीता सन २०२१-२०२२ करीता आवश्यक असणारा उपरोक्त मागणीप्रमाणे भाजीपाला खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयास सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,८८,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच दि.११.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७२ अन्वये किराणा माल खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी त्यामधील हिरवा वाटाणा यासाठीचे दर अवाजवी असल्याने सदरची खरेदी रद्द करण्यात आलेली असुन आताच्या भाजीपाला खरेदीमध्ये हिरवा वाटाण्याचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.**

**याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.०७** **मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य उचलणारे (अगरबत्ती) प्रकल्पास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद- अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

प्रस्तावना- मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य उचलणारे अगरबत्ती प्रकल्पास मुदतवाढ मिळणेबाबत दिनांक ०८/१०/२०२० रोजीचे टिपणीअन्वये चक्रीय पदधतीने प्रस्ताव सादर करणेस मान्यता घेणेत

आलेली आहे त्यानुसार सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला असून त्यावर मा. अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालील बाबींची पूर्तता करणेबाबत कळविलेले आहे.

१. सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, दिनांक १३/०२/२०१९ चा जनसेवा फाउंडेशन, लोणी यांचे सोबत झालेला करार हा मूळतः दिनांक १०/१०/२०२० पर्यंत अस्तित्वात होता म्हणजेच जेव्हा तदर्थ समितीसमोर सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला (दिनांक १२/१०/२०२० रोजी) त्यादिवशी हा करार अस्तित्वात नव्हता.

खुलासा– जनसेवा फाउंडेशन, लोणी यांनी दिनांक १४/०७/२०२० रोजी अगरबत्ती प्रकल्पास मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर केलेले होते दरम्यान त्या कालावधीमध्ये इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी सुदधा मुदतवाढ द्यावी म्हणून पत्र सादर केले आहे तथापि केंद्र सरकारने संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहीर असल्याने संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी बोलाविण्यात नैसर्गिकरित्या विलंब झाला. दोन्ही उभयकार पक्षांना ११/०९/२०२० रोजी पत्र पाठवून सुनावणीसाठी बोलाविण्यात आले. दिनांक १६/०९/२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सुनावणी होऊन त्यांना लेखी स्वरुपात म्हणणे मांडणेबाबत कळविणेत आले. त्यामुळे सदर प्रकल्पाबाबतचा प्रस्ताव तदर्थ समिती समोर सादर करणेस उक्त कारणे विचारात घेता समर्थनीय आहे.

२. सोबतच्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, पूर्वी झालेल्या तीन पक्षीय करारात इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांचा सहभाग होता. मात्र नंतर ते सदर करारातून बाजूला झाले. सदर इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी, त्यांचे दिनांक २३/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये सदर कराराचे नुतनीकरण करुन सदर प्रकल्पात त्यांना पुन्हा सहभागी करुन घ्यावे, असा अर्ज दिलेला आहे. याबाबतीत प्रस्तावात कुठलीही स्पष्टता नाही, जी करणे गरजेचे आहे.

खुलासा –इकोनिर्मिती इन्फ्रासट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी दिनांक १३/०८/२०२० रोजी प्रस्तावाने पुन्हा सदर प्रकल्पात पुन्हा सहभागी करुन घ्यावे असे पत्र दिले मात्र त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे. दिनांक ३१/०७/२०१८ रोजीचे पत्रानुसार इकोनिर्मितीचे सर्व अधिकार असलेले श्री रोहीत सदाफळ सदर प्रकल्पातुन स्वेच्छेने बाहेर पडलेले आहेत व त्यांचे एक पार्टनर श्री रविंद्र देसाई यांनी सुध्दा ०९/११/२०१९ रोजी इंडेम्निटी बॉड तयार करुन आम्ही आमचे मालकीची या प्रकल्पातील मशिनरी घेऊन जात आहोत तसेच आमचे कंपनीचे अथवा साई संस्थानमधील व्यवहाराबाबत मी सदरच्या प्रकल्पातुन स्वेच्छेने बाहेर पडत आहे असे रश्मी देसाई यांचे वतीने श्री रविंद्र देसाई यांनी लिहून दिलेले आहे. त्यामुळे इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांचा या प्रकल्पाशी आता कोणताही संबंध राहीलेला नाही. त्यामुळे दिनांक १३/०२/२०१९ रोजी जनसेवा फाउंडेशन, लोणी व श्री साईबाबा संस्थान यांचेमध्ये द्विपक्षीय करारनामा करुन घेणेत आला. त्याचप्रमाणे जनसेवा फाउंडेशन, लोणी व संस्थान यांच्यामध्ये द्विपक्षीय करारनामा करुन घेणेस मान्यता असावी .

३. तदर्थ समितीचे दिनांक ०४/०३/२०२० रोजीचे सभेत निर्णय क्रं. १६९ प्रमाणे खालील निर्णय झालेला आहे -

" यावर सविस्तर चर्चा होऊन , जनसेवा फाउंडेशन महिला बचत गट यांनी अगरबत्ती उत्पादनाची विक्री करणेकामी पाकीटावर वापरलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे नाव तसेच शताब्दी कालावधीत तयार करणेत आलेला श्री साईबाबांचा फोटो असलेला लोगो कॉपीराईट रजिस्ट्रेशन करुन घेणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व सद्यस्थितीत त्याचे वापराबाबत, आर्थिक उलाढालीबाबत, शुल्काबाबत सविस्तर अहवाल तयार करणेत येऊन मा. तदर्थ (Ad-hoc) समितिसमोर सादर करणेत यावा, असे ठरले."

वरील निर्णयास अनुसरुन संस्थान प्रशासनाने पुढे काय कार्यवाही केली याबाबतीत स्पष्टता नाही.

खुलासा- श्री साईबाबांचा फोटो असलेला लोगो कॉपीराईट रजिस्ट्रेशन करुन घेणेबाबत कार्यवाही करणेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागास कळविलेले आहे. दिनांक ११/०५/२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.२६३ अन्वये पुढील प्रमाणे निर्देश देणेत आलेले आहे. Trade mark व copy right नोंदणी संदर्भात सद्यस्थितीबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे ठेवणेत यावा तसेच सदरचे काम दिल्ली येथील साईभक्त वकीलांकडून मोफत करुन घेता येईल का हे पडताळून पहावे. मा.तदर्थ समितीचे सदर निर्णयान्वये दिल्ली येथील साईभक्त वकीलांची माहिती मिळणेबाबत जनसंपर्क विभाग यांना कळविणेत आले होते त्यानुसार जनसंपर्क विभागाने असे कळविलेले आहे की "कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये, म्हणून संस्थानच्या तदर्थ समितीच्या वतीने दि. १७ मार्च २०२० रोजी श्री साईबाबा समाधी मंदिर दर्शनासाठी बंद

ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे तरी मंदिर दर्शनासाठी पूर्ववत सुरु झाल्यावर दिल्ली येथील साईभक्त शिर्डी येथे आल्यानंतर त्यांच्याशी संपर्क साधून सदरची मागणी करता येईल. सदर करारनाम्याची मुदत संपलेली आहे यानंतर आपण मुदतवाढ दिल्यास Trade mark व copy right नोंदणी करुन आपले निर्दशनास सादर करता येईल. सदर प्रकल्पातील दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०३/२०२० अखेर ची आर्थिक उलाढाल रु. १,१९,७३,१४५/- (एक कोटी एकोणाविस लाख त्र्याहत्तर हजार एकशे पंचेचाळीस) मात्र आहे. त्यापैकी अगरबत्ती विक्रीची किंमत ७३,६९,२९०/- (त्र्याहत्तर लाख एकोणसत्तर हजार दोनशे नव्वद) मात्र आहे. तर स्टेन्सील व इतर साहीत्य विक्रीची किंमत ४६,०३,८५५/- (शेहेचाळीस लाख तीन हजार आठशे पंचावन्न) मात्र आहे.

सदरचा प्रकल्प हा इकोफ्रेंडली आहे. सदर प्रकल्प हा महिला बचत गटामार्फत चालविला जातो. या बचत गटाच्या माध्यमातून या उद्योगाद्वारे विशेषकरुन समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल व मागास घटकातील साधारणपणे २०० गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करुन देत आहे असे दिसून येते त्यामुळे पूर्वी ठरल्याप्रमाणे अगरबत्ती विक्रीतून मिळणा-या विक्रीच्या १०% शुल्क संस्थानला देण्यात यावे असे यापूर्वीच्या व्यवस्थापन समितीचे मत आहे. सदर अगरबत्ती विक्रीतून मिळणा-या उत्पन्नापैकी माहे मार्च - २०१८ ते मार्च - २०२० या कालावधीत रु. १५,८४,००९/- (पंधरा लाख चौ-याऐंशी हजार नऊ) मात्र रक्कम संस्थानला जमा केलेली आहे.

शुल्काबाबत फुलांच्या निर्माल्याच्या बदल्यात जनसेवा फाउंडेशन बचत गट लोणी हे सदरहु अगरबत्ती विक्रीतून मिळणा-या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला वर्ग करतील असा व्यवस्थापन समितीचा ठराव झालेला आहे. याप्रमाणे कार्यवाही करतांना कोव्हिड -१९ मुळे मार्च - एप्रिल पासून वाढीव शुल्काचा प्रस्ताव व्यवहार्य नाही. कारण हार व फुलांचे प्रमाण नगण्य असून निर्माल्याचे परिणाम कमी असल्याने प्रकल्प बंदच आहे.

४. त्याचप्रमाणे ११/०५/२०२० च्या तदर्थ समितीच्या बैठकीतील निर्णय क्रं. २६३ प्रमाणे संबंधित विभागाला याबाबत सविस्तर प्रस्ताव देण्यास सांगण्यात आले होते.

खुलासा-दिनांक ११/०५/२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र. २६३ नुसार पुढील प्रमाणे निर्देश देणेत आलेले आहे. Trade mark व copy right नोंदणी संदर्भात सद्यस्थितीबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे ठेवणेत यावा तसेच सदरचे काम दिल्ली येथील साईभक्त वकीलांकडून मोफत करुन घेता येईल का हे पडताळून पहावे. मा. तदर्थ समितीचे सदर निर्णयान्वये दिल्ली येथील साईभक्त वकीलांची माहिती मिळणेबाबत जनसंपर्क विभाग यांना कळविणेत आले होते त्यानुसार जनसंपर्क विभागाने असे कळविलेले आहे की " कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये, म्हणून संस्थानच्या तदर्थ समितीच्या वतीने दि. १७ मार्च २०२० रोजी श्री साईबाबा समाधी मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे तरी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी पूर्ववत सुरु झाल्यानंतर दिल्ली येथील साईभक्त शिर्डी येथे आल्यानंतर त्यांच्याशी संपर्क साधून Trade mark व copy right नोंदणी बाबत पूर्तता करुन घेता येईल.

५. दिनांक १५/०७/२०२० च्या प्रशासकीय अधिकारी डॉ. आकाश किसवे यांनी बगीचा विभागाचे विभागप्रमुखांना लिहीलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, दोन्ही विभाग तदर्थ समितीच्या निर्णयाचे अनुपालन न करता एकमेकांवर कार्यवाही करण्याची जबाबदारी ढकलत आहे. दोन्ही विभागांकडून वरील दोन निर्णय झाल्यानंतर कधीही तदर्थ समिती समक्ष पुढे काय विषय ठेवावा याबाबत स्पष्टता दिसत नाही.

खुलासा- Trade mark व copy right नोंदणी मंदीर सुरु झाल्यानंतर देणगीदार वकील साईभक्त यांचेमार्फत करुन घेता येईल. संस्थानमध्ये Trade mark व copy right नोंदणीची प्रक्रिया ही माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात येते. डॉ. आकाश किसवे हे माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रशासकीय अधिकारी असल्यामुळे त्यांनी सदर माहिती कळविलेली आहे. मंदिर सुरु झाल्यानंतर सदरची कार्यवाही करता येईल.

६. दिनांक १३/०२/२०१९ चे द्विपक्षीय कराराचे कलम १२ नुसार निर्माल्यापासून बनविणेत येणारे अगरबत्ती, सुगंधी द्रव्यांचे विक्रीतून मासिक उत्पन्नाचे १०% रक्कमेत भविष्यात वाढ करण्याचा अधिकार संस्थानला राहील असे म्हटलेले आहे. मात्र त्याबाबत कुठलाही विचार झालेला दिसून येत नाही, जो संस्थानचे हिताचे विरोधात आहे.

खुलासा- जनसेवा फाउंडेशन, लोणी यांचे सदर अगरबत्ती प्रकल्पामध्ये परिसरातील साधारणतः २०० आर्थिकदृष्टया दुर्बल व मागास घटकातील महिला काम करत आहे. तसेच मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य वाया न जाता त्याचा सदुपयोग होत आहे.सध्या सर्वत्र कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्यामुळे मंदिर सुरु

झाल्यानंतर भाविकांची संख्या ही आपण मर्यादीत ठेवणार आहोत त्यामुळे निर्माल्य ही कमी प्रमाणात निघणार आहे. त्यामुळे त्यांची विक्री व उत्पादन यावर सुध्दा परिणाम होणार आहे. शुल्काबाबत फुलांच्या निर्माल्याच्या बदल्यात जनसेवा फाउंडेशन बचत गट लोणी हे सदरहु अगरबत्ती विक्रीतून मिळणा-या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला वर्ग करतील असा व्यवस्थापन समितीचा ठराव झालेला आहे. याप्रमाणे कार्यवाही करतांना कोव्हिड -१९ मुळे मार्च - एप्रिल पासून वाढीव शुल्काचा प्रस्ताव व्यवहार्य नाही. कारण हार व फुलांचे प्रमाण नगण्य असून निर्माल्याचे परिणाम कमी असल्याने प्रकल्प बंदच आहे.

त्यामुळे संस्थानला अगरबत्ती विक्रीतून मिळणा-या मासिक उत्पन्नात वाढ करणे उचित वाटत नाही. सदर योजना महिला बचत गटामार्फत राबविण्यात येते. महिला बचत गटाच्या आर्थिक सबलीकरणासाठी शासनाकडून कमी व्याजदराने भाग भांडवल उपलब्ध करुन देण्यात येते. सदर महिला बचत गटामार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल व गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे. याबाबीचा विचार करुन शुल्क वाढीबाबत निर्णय व्हावा असे मत आहे.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्तप्रमाणे दिनांक ३०/०६/२०१७ रोजी जनसेवा फाउंडेशन, लोणी व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांचा संयुक्त प्रस्ताव सादर करणेत आला त्यामध्ये जनसेवा फाउंडेशन,लोणी यांनी सदर प्रकल्प संयुक्तपणे राबविणार असलेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार दिनांक २५/०७/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ५३० नुसार सदर संयुक्त प्रकल्पास ०३ वर्षासाठीची मूदत देणेस मान्यता देणेत आलेली असून सदर अगरबत्ती विक्रीतुन मिळणा-या उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला जमा करावी तसेच सदर प्रकल्पास शासनाचे न्याय व विधी विभागाची मान्यता घ्यावी असे ठरले. दिनांक २३/०८/२०१७ रोजी सदर प्रकल्प शासनाच्या मान्यतेसाठी पाठविणेत आला असता त्यांनी सदर नाशवंत व अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे असे कळविले. दिनांक १०/१०/२०१७ रोजी जनसेवा फाउंडेशन, लोणी व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई व संस्थान यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करणेत आला. दिनांक ३१/०७/२०१८ रोजीच्या पत्रानुसार इकोनिर्मितीचे सर्व अधिकार असणारे श्री रोहीत सदाफळ सदर प्रकल्पातुन स्वेच्छेने बाहेर पडलेले आहे. त्यानंतर जनसेवा फाउंडेशनने सदर प्रकल्प पुढे चालू ठेवलेला आहे. सदरच्या कालावधीमध्ये श्री रविंद्र देसाई यांनी पत्राद्वारे मी इकोनिर्मितीचाच एक पार्टनर आहे त्यामुळे मी या प्रकल्पामध्ये सहभागी आहे. त्यामुळे इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांना मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. परंतु जनसेवा फाउंडेशन, लोणी व रविंद्र देसाई यांचेमध्ये दिनांक ०९/११/२०१९ रोजी इंडेम्निटी बॉड झालेला आहे त्यामध्ये त्यांनी ठरलेप्रमाणे आम्ही आमचे मालकीची या प्रकल्पातील मशिनरी घेऊन जात आहोत तसेच मी सदरच्या प्रकल्पामधुन स्वेच्छेने बाहेर पडत आहे असे रश्मी देसाई यांचे वतीने श्री रविंद्र देसाई यांनी लिहून दिलेले आहे त्यानुसार दिनांक १३/०२/२०१९ रोजी जनसेवा फाउंडेशन, लोणी व संस्थान यांचेमध्ये द्वीपक्षीय करारनामा करुन घेणेत आला व तो आजपर्यंत चालू आहे. तसेच अगरबत्ती विक्रीतून मिळणा-या उत्पन्नापैकी १०% रक्कम नियमित संस्थानला जमा केलेली आहे. तसेच दिनांक १३/०२/२०१९ रोजीच्या द्वीपक्षीय करारामधील अटीनुसार जनसेवा फाउंडेशन बचत गट यांचे निश्चित केलेल्या कालावधीत (०३ वर्ष) यांचे काम समाधानकारक असलेस पुढील कालावधीसाठी निर्माल्य देण्यासाठी प्राधान्याने विचार केला जाईल असे ठरलेप्रमाणे जनसेवा फाउंडेशन यांना पुढील ०३ वर्षासाठी मुदतवाढ देता येईल. तरी सदर प्रकल्पास मुदतवाढ देणेबाबतचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जनसेवा फाउंडेशन महिला बचत गट यांनी अगरबत्ती उत्पादनाची विक्री करणेकामी पाकीटावर वापरलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे नाव तसेच शताब्दी कालावधीत तयार करणेत आलेला श्री साईबाबांचा फोटो असलेला लोगो कॉपीराईट रजिस्ट्रेशन करुन घेणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. तो पर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.०८** **तिरुपती देवस्थानकडून देणगी स्वरुपात मिळणा-या गायींची संस्थानमार्फत व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम२००४मधील तरतूद-** २१(१) (ग) भक्तांना मंदीरात देवतेच्या दर्शनासाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करणेसाठी सोई व सुविधा पुरविणे.

प्रास्ताविक -तिरुपती देवस्थानाकडून देणगी स्वरुपात मिळालेल्या गायीची श्री साईबाबा संस्थानमार्फत व्यवस्था करणेकामी बगीचा, बांधकाम, पाणीपुरवठा, विद्युत, मेकॅनिकल, लेखाशाखा, संरक्षण तसेच आरोग्य विभागामार्फत संबंधित कामे करुन घेणेकामी त्यांना पत्र देणेस तसेच सदर गायीसाठी आवश्यक असणारा चारा व पेंड (खाद्य) खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. ४५,६२५/- (पंचेचाळीस हजार सहाशे पंचवीस) मात्र वार्षिक खर्चास मंजुरी मिळणेबाबत चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेस दिनांक २७/१०/२०२० रोजीचे मंजूर टिपणी अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव सादर करणेत आलेला असून त्यावर मा. अध्यक्ष , तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दिनांक २८/१०/२०२० रोजीच्या पत्राने खालील बाबींची पूर्तता करुन योग्य प्रस्ताव सादर करणेबाबत कळविलेले आहे.

सदर गायी ही तिरुमला देवस्थान, तिरुपती येथून येणार आहे. अशा परिस्थितीत तिची योग्य देखभाल , काळजी या सर्व बाबींचा उहापोह गरजेचे आहे. संस्थान गोशाळा सुरु करणार आहे काय, सद्यस्थितीत ती गाय आणल्यानंतर तिची देखभाल करण्यासाठी माहीतगार माणूस आहे काय, इ. सर्व बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान -

सदरचा विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाचा आहे.

मागणी-तिरुपती देवस्थानाकडून श्री साईबाबा संस्थानला भेट म्हणून मिळालेल्या गायीची संस्थानमार्फत व्यवस्था लेंडीबागेत असणा-या बावडीजवळ करता येईल. बगीचा विभागाकडे कार्यरत असणारे बहुतांश कर्मचारी हे ग्रामीण भागातील तसेच शेतकरी कुटुंबातून असल्याने जोडधंदा म्हणून ते पशुपालन व दुग्धव्यवसाय करत आहेत , गोपालनाबाबत त्यांना चांगली माहिती असल्याने सदर गायीची देखभाल व काळजी योग्य प्रकारे घेऊ शकतील. तसेच वैद्यकीय तपासणीबाबत परिसरातील शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदर बाबींची पूर्तता करुन घेता येईल.

सदर गायीची संस्थानमार्फत व्यवस्था करणेकामी संबंधित विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करुन घेता येईल.

| अ.नं. | विभागाचे नाव | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| ०१ | **बगीचा विभाग** | गायीसाठी चारा , खाद्य (पेंड), औषधे तसेच गायीचे संगोपणासाठी कर्मचारी नियुक्ती करणे. |
| ०२ | **बांधकाम विभाग / मेकॅनिकल विभाग** | लेंडीबागेत बावडीजवळील जागेत ०१ गायीसाठी अत्याधुनिक पदधतीच्या मुक्त गोठयाची व्यवस्था करुन देणे. चा-यासाठी गव्हाण व खाद्य स्टोअर व्यवस्था करुन देणे. |
| ०३ | **पाणीपुरवठा विभाग** | सदर गायीची स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची तसेच ड्रेनेज लाईनची व्यवस्था करणे. |
| ०४ | **विदयुत विभाग** | गायीचे शेडसाठी आवश्यक विद्युत पुरवठा जोडून देणे. फॅनची व्यवस्था करणे. |
| ०५ | **लेखाशाखा विभाग** | गायीचे शेडच्या बाहेरील बाजूस देणगी पेटी बसवून देणे. |
| ०६ | **संरक्षण विभाग** | देणगी पेटी व गायीचे संरक्षणासाठी पूर्णवेळ सुरक्षारक्षकाची नेमणूक करणे. |
| ०७ | **आरोग्य विभाग** | सदर गोठयाची नियमित साफ - सफाई करुन देणेकामी कर्मचारी व्यवस्था करणे. |

तसेच सदर गायीसाठी चा-याची व्यवस्था खालीलप्रमाणे करता येईल.

| अ.नं. | तपशिल | मागणी /प्रती दिन | अंदाजे दर / प्रति किलो | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ओला चारा (घास) | १० किलो | ०५/- | ५०/- |
| ०२ | वाळलेला चारा | ०५ किलो | ०३/- | १५/- |
| ०३ | सरकी पेंड (खुराक) | ०२ किलो | ३०/- | ६०/- |
| | | | **एकूण** | **१२५/-** |

**विभागाचा अभिप्राय-** मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे दिनांक २८/१०/२०२० रोजीचे पत्रातील सुचनेनुसार तिरुमला देवस्थान, तिरुपती यांचेकडून संस्थानला देणगी स्वरुपात मिळणा-या गायीची देखभाल व काळजी घेण्याची जबाबदारी बगीचा विभागातील कर्मचा-यांना गोपालनाबाबत माहिती असल्यामुळे त्यांना नेमून देता येईल. तसेच वैद्यकीय बाबींची पूर्तता करुन घेणेकामी शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून आवश्यक बाबींची पूर्तता करुन घेता येईल.

संस्थानला देणगीस्वरुपात मिळणा-या गायीची व्यवस्था लेंडीबागेत बावडीजवळ करता येईल. याकामी बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा, मेकॅनिकल, लेखाशाखा, संरक्षण व आरोग्य विभाग यांना त्यांचेशी संबंधीत कामे करुन घेणेकामी पत्र देता येईल. तसेच चारा व पेंड (खाद्य) खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. ४५,६२५/- (पंचेचाळीस हजार सहाशे पंचवीस) मात्र वार्षिक खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तिरुपती देवस्थानकडून देणगी स्वरुपात मिळणा-या गायींची संस्थानमार्फत उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे व्यवस्था करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४५,६२५/-मात्र वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी आवश्यक असणारे कर्मचारी सध्या उपलब्ध असणा-या कर्मचा-यांमधुन घेण्यात यावेत, त्याकरीता जादा कर्मचारी घेण्यात येऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.०९** **स्मार्ट गोशाळा प्रकल्प सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचे प्रस्तावानुसार त्यांनी गोपालन करणेकामी २५ एकर जमिनीची मागणी केलेली आहे. सदर जमिन दोन ठिकाणी विभागून मिळाली तरी चालेल. सदर जागेमध्ये ते दूध न देणा-या ४००० गायी पाळणार असून ४०० गायी (local) या दूध देणा-या पाळणार आहेत. याकामी साधारणतः रु. २५ कोटी खर्च अपेक्षित असून या खर्चाच्या १०% रक्कम रु. २.५ कोटी मात्र संस्थानने सदर प्रकल्पास करारनामा करुन कार्यवाही सुरु होतेवेळी एकरक्कमी द्यावयाची आहे. तसेच सदर प्रकल्प ०१ वर्षातच सुरु होईल. शेड उभारणी , गॅस प्लॅन्ट उभारणी तसेच इतर बाबींची पूर्तता करणेकामी आवश्यक साहित्य (नट बोल्ट फिटींग असलेमुळे) तयार असून साधारणतः २ ते ३ महिन्यात सदर प्रकल्प सुरु होईल. ३० वर्षासाठी करारनामा करुन या प्रकल्पातुन मिळणा-या उत्पन्नातुन रु. १.२५ कोटी मात्र रक्कम सदर कंपनी संस्थानला दरवर्षी देणार असलेबाबत कळविलेले आहे. या प्रकल्पाला लागणारी जमिन ही संस्थानच्याच नावावर राहणार आहे. तसेच सदर जमिनीमध्ये शेड बांधणे, गॅस टॅंक तयार करणे, चारा काढणे इ. कामे संस्थानने संमतीपत्र लिहून दिल्यानंतरच करता येतील.

सदर प्रकल्प सुरु करणेकामी येणा-या खर्चासाठी SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली ही कंपनी परदेशी कंपन्यांकडून ६ % व्याजदराने पैसे घेऊन हा प्रकल्प चालविणार असलेबाबत कळविलेले आहे. सदर प्रकल्पाबाबत SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचा Gail (India) Limited आणि Carbon clean Solutions Limited यांचेशी सामंजस्याचा करार झालेला आहे.

या प्रकल्पातील सहभागी उद्योजकांचा तपशिल खालीलप्रमाणे

१. काशी ललित, दुबई
२. SIBCS green power pvt limited कंपनीचे संचालक यांच्या पत्नी मीना नायर,
३. कॅप्टन श्री आलोक, मुंबई
४. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
५. कार्बन क्लीन कंपनीचे श्री तोष्णीवाल, लंडन

संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान- सदरचा विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाचा आहे.

**मागणी**– सदर प्रकल्प उभारणी करणेकामी येणारा खर्च खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **अंदाजे क्षेत्र** | **येणारा खर्च (कोटीमध्ये)** |
|---|---|---|---|
| १. | शेड उभारणी | ६ एकर | ७ कोटी |
| २. | गॅस प्लॅन्ट | ५ एकर | १५ कोटी |
| ३. | गोमूत्रापासून जैवनाशक तयार करणे (fermenter plant ) | - | १ कोटी |
| ४. | दूध डेअरी | २ एकर | १ कोटी |
| ५. | शेडच्या कडेने कंपाउंड वॉल तयार करणे. | - | १ कोटी |
| | | **एकूण खर्च** | **२५ कोटी** |

सदर प्रकल्पातुन मिळणारे दैनंदिन उत्पन्न खालीलप्रमाणे

| अ.नं. | उत्पन्नाचा स्त्रोत | दैनंदिन मिळणारे उत्पन्न | दर | एकूण रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १. | गॅस प्लॅन्ट | ४००० किलो | ५०/- प्रति किलो | २ लाख |
| २. | शेणखत | २०,०००किलो | १५/- प्रति किलो | ३ लाख |
| ३. | गोमुत्रापासून जैवनाशक तयार करणे | ४००० लीटर | ५०/- प्रति लिटर | २ लाख |
| ४. | दूध | ४००० लीटर | ५०/- प्रति लिटर | २ लाख |
| | | | **एकूण उत्पन्न** | **९ लाख** |

उपरोक्तप्रमाणे सदर प्रकल्पातुन दैनंदिन ९ लाखाप्रमाणे साधारणतः ३० कोटी वार्षिक उत्पन्न मिळेल.

सदर प्रकल्प चालविणेकामी येणारा वार्षिक खर्च खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशिल | येणारा खर्च (कोटीमध्ये ) |
|---|---|---|
| १. | गायींसाठी खाद्य | ७ कोटी |
| २. | देखभाल खर्च | ५ कोटी |
| ३. | व्याजदर खर्च | ५ कोटी |
| | **एकूण** | **१७ कोटी** |

संस्थानला समाधी मंदीर तसेच मंदीर परिसरातील विविध ठिकाणचे धार्मिक विधी त्याचप्रमाणे कॅन्टीन, प्रसादालय इ. विभागास खालीलप्रमाणे विविध गोष्टींची नियमित आवश्यकता असून यावर होणारा खर्च खालीलप्रमाणे

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | अंदाजे दर | होणारा अंदाज खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | गायीचे शुध्द तुप | ८६०० क्विंटल | ३४,८१२/- | २९,९३,८३,२००/- |
| २. | रानशेणी गोवरी | २,५०,००० किलो | ६.५० | १६,२५,०००/- |
| ३. | दुध | ११,००,००० लिटर | ३७.५० | ४,१२,५०,०००/- |
| | | | **एकूण खर्च रुपये** | **३४,२२,५८,२००/-** |

सदर गोशाळेचा प्रकल्प सुरु झाल्यास संस्थानचा उपरोक्त बाबींवर होणारा खर्च कमी होईल. आणि तेथे देणगी पेटी ठेवता येईल त्यामध्ये बराचसा निधी जमा होईल, सदर प्रकल्प उभारणी करावयाची झाल्यास संस्थानचा उक्त संस्थांशी सामंजस्य करार करावा लागणार आहे. तसेच गोशाळा प्रकल्प करावयाचा झालेस त्यासाठी १५ किमी परिघाचे परिसरात सुमारे २० ते ५० एकर शेतजमिन उपलब्ध करावी लागणार आहे. प्रति हेक्टरी साधारणपणे रु. ३५ ते ४५ लाख इतका खर्च येऊ शकेल. तसेच प्रकल्पाचे सुरुवातीला सुमारे रु. २.५ कोटी मूलभूत गुंतवणूक करावी लागणार असल्याची प्राथमिक निष्कर्ष आहे. सबब सदर बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असल्याने याबाबत प्रकल्प उभारणीस्तव संस्थांशी चर्चा करणे, सामंजस्य करार करणे, प्रकल्प स्थळ निश्चित करुन आवश्यक ती जागा खरेदी करणे व प्रकल्प बांधणी करणे याबाबीवर निर्णय घेणे आवश्यक आहे.

एकूणच याप्रमाणे विचार करता ४००० गायींचा हा प्रकल्प पर्यावरणपूरक , गोसंवर्धन तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत तसेच प्रतिवर्षी दूध, तूप, शेण / खांड, गोव-या यावर संस्थान ३४ ते ३५ कोटी खर्च करत आहे. व मुलभूत गुंतवणूक ही सुमारे रु. ३५ ते ४० कोटी येत असल्याने याबाबत प्रकल्प उभारण्यास्तव मान्यता घेणेकामी सादर करण्यात येत आहे.

**विभागाचा अभिप्राय-** SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचे प्रस्तावानुसार संस्थानमार्फत सदर कंपनीला २५ एकर जमिन उपलब्ध करुन देता येईल. सदर कंपनीला संस्थानमार्फत देण्यात येणारी रक्कम रु.२.५ कोटी मात्र सदर कंपनीकडून संस्थानला मिळणा-या वार्षिक रक्कम रु.१.२५ कोटी मात्र रक्कमेतुन टप्याटप्याने वर्ग करता येईल. तसेच ४००० गायींचा हा प्रकल्प सुरु केल्यास संस्थानला साधारणतः वर्षभरासाठी लागणा-या दूध, तूप तसेच गोव-या इ. बाबींवर होणारा खर्च कमी होईल. त्याचप्रमाणे परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. सदर प्रकल्पाद्वारे दरवर्षी संस्थानला रु.१.२५ कोटी मात्र उत्पन्न सुरु होईल.

तरी उपरोक्तप्रमाणे SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचे प्रस्तावानुसार त्यांना स्मार्ट गोशाळा प्रकल्प सुरु करणेकामी संस्थानमार्फत २५ एकर जागा व संस्थानला मिळणा-या वार्षिक रु. १.२५ कोटी मात्र रक्कमेतुन SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचे सदर प्रकल्पास रु. २.५ कोटी मात्र रक्कम टप्याटप्याने उपलब्ध करुन देता येतील.

SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधींशी याबाबत प्रकल्प उभारणीस्तव चर्चा करुन त्यामध्ये सामंजस्य करार करणे, प्रकल्प स्थळ निश्चित करुन आवश्यक ती जागा खरेदी करणे व प्रकल्प बांधणी करणे याबाबीवर निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad- hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५४४** **सदस्य सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, गाईंचे संवर्धन व गोशाळा चालविणे हा राष्ट्रीय उपक्रम असुन केंद्र सरकार व इतर सेवाभावी संस्था अशा प्रकारचे उपक्रम चालवित आहेत. स्मार्ट गोशाळा प्रकल्पामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, काशी ललित, दुबई, SIBCS green power pvt limited कंपनीचे संचालक यांच्या पत्नी मीना नायर, कॅप्टन श्री आलोक, मुंबई व कार्बन क्लीन कंपनीचे श्री तोष्णीवाल, लंडन यांचा समावेश असणार आहे. सदर गोशाळेसाठी संस्थान व संबधीत कंपन्या यांच्याशी प्रथमतः सामंजस्य करार व DPR तयार करुन अंतीम करार करावा लागणार आहे. SIBCS green power pvt limited, नवी दिल्ली यांचे प्रस्तावानुसार गोपालन करणेकामी २५ एकर जमिनीची मागणी केलेली असुन या प्रकल्पासाठी साधारणतः रु.२५ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये जमीनीचे किंमतीचा समावेश नाही. संस्थानने फक्त जमीन उपलब्ध करुन द्यावयाची असुन सदरची जमीन ही संस्थानच्याच नावावर राहणार आहे. तसेच प्रकल्प खर्चाच्या १० टक्के रक्कम रु.२.५ कोटी संस्थानला द्यावी लागणार आहे. या प्रकल्पातुन मिळणा-या उत्पन्नातुन रक्कम रु.१.२५ कोटी दर वर्षी सदर कंपनी संस्थानला देणार आहे. संस्थानला द्यावी लागणारी रु.२.५ कोटी रक्कम ही सदर कंपनीकडून संस्थानला दर वर्षी मिळणा-या रु.१.२५ कोटी मात्र रकमेतुन टप्प्याटप्प्याने वर्ग करता येईल. या प्रकल्पामध्ये भारतीय वंशाच्या गीर, गवळा अशा २५ ते ३० प्रकारच्या जातीपैकी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींशी चर्चा करुन चांगल्या ८ ते १० प्रकारच्या जातीच्या ५००० गाईंचे संगोपन करता येईल. याकरीता अतिरिक्त मुनष्यबळाची आवश्यकता नाही. यामाध्यमातुन संस्थानला लागणारे दुध, तुप व धुनीसाठी गोव-या उपलब्ध होतील. संस्थान दरवर्षी साधारणपणे दुध खरेदीसाठी ५ कोटी, तुप खरेदीसाठी २८ कोटी व धुणीसाठी गोव-या खरेदी करणेकामी १५ लाख रुपये खर्च करावे लागत आहेत. तसेच या प्रकल्पातुन गॅस प्लॅन्ट, शेणखत, गोमुत्रापासुन जैवनाशक तयार करणे इत्यादी उत्पन्नाचे स्त्रोत तयार होतील.**

**मा.अध्यक्षांनी खालील मत मांडले-**

**सदर प्रकल्प अव्यवहार्य आहे कारण २५ एकर जमीनीचे मुल्य संस्थानला द्यावयाचे आहे. तीस वर्षाच्या भाडेपट्टयाचे मुल्य संस्थानला मिळणार नाही. सदरचा भाडेपट्टा हा कायद्यान्वये कायम (permanent) भाडेपट्टा असल्याकारणाने जर प्रकल्प काही वर्षात बंद पडला तर संस्थानची जमीनही अडकेल व त्यातून उत्पन्नही काढता येणार नाही. प्रकल्पाच्या मालकीहक्काबाबत स्पष्टता नाही. प्रकल्प उभा करण्यासाठी उभारण्यात येणारे गॅस प्लॅन्टस्, सोलर पॅनल्स इत्यादी बाबींपासून संस्थानला मिळणा-या लाभाबाबत स्पष्टता नाही. ज्यांनी प्रकल्प प्रस्तावीत केला आहे. त्यांना असा प्रकल्प चालवण्याचा अनुभव आहे का? अशा ब-याच बाबी तसेच प्रस्ताव देणारी व्यक्ति/कंपनी हे प्रस्तावात कुठली गुंतवणूक करत आहेत, याबाबत स्पष्टता नाही. त्याच प्रमाणे प्रकल्पातुन मिळणारे दुध, तुप, धुनिसाठी लागणा-या गोव-या इत्यादी बाबी या संस्थानला फुकट मिळणार आहेत का? ही स्पष्टता नाही. वरील बाबीकरीता आणलेला प्रस्ताव माझे मते फेटाळण्यात यावा. मात्र गोशाळा सुरु करण्याबाबत माझी तत्वत: मान्यता आहे.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांचे मते गोशाळा चालविणे याबाबत तत्वत: मान्यता आहे. मात्र आणलेला प्रस्ताव हा अभ्यासपुर्ण नाही ब-याच बाबी संदिग्ध आहेत. त्यामुळे माझेतर्फे प्रस्ताव अमान्य करण्यात येतो.**

**यावर सदस्य सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगीतले की, सदरचा प्रस्ताव हा प्राथमिक मान्यतेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पासाठी सदर कंपनीबरोबर करारनामा (MOU) करावा लागणार आहे. व त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात येईल.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास सर्वानुमते तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थान कंत्राटी शिक्षकांना Covid-19, Work From Home मध्ये कालावधीत पुर्ण कार्यभार असल्याने पुर्ण वेतन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविकः- उपरोक्त संदर्भ क्र. ०१ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत शैक्षणिक संकुलाकडे कार्यरत असलेले कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांनी कंत्राटी शिक्षकांना पूर्ण वेतन मिळणेबाबत मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि. ११/०९/२०२० रोजी विनंती अर्ज केलेला आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत सर्व शैक्षणिक संकुलामधील जवळपास ३९ कंत्राटी शिक्षकांनी Work From Home ग्राह्य धरणेबाबत व ४०% वाढीसह पूर्ण वेतन किंवा समान काम समान वेतन मिळणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे विनंती अर्ज केलेला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ०३ अन्वये उपरोक्त अर्जात नमुद केलेल्या बाबींबाबत वस्तुस्थितीदर्शक आपला स्वयंस्पष्ट अभिप्राय इकडील कार्यालयास त्वरीत सादर करावा असे इकडील विभागास कळविले आहे.

देशात कोव्हीड-19 विषाणूचा प्रादुर्भाव झाल्याने दि. २१ मार्च २०२० पासून देशभरात लॉकडाऊन सुरु करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांना या विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल व श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालय तात्पुरते बंद करण्यात आले. विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्यापनाचे कामकाज सुरु करण्यात आले आहे. दरवर्षी माहे एप्रिल मध्ये शालांत वार्षिक परीक्षा घेण्यात येत असतात परंतू कोरोनाच्या संकटामुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील वार्षिक परीक्षा शासनाचे आदेशामुळे रद्द करण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे वार्षिक निकाल ऑनलाईन देण्यात आले.

उपरोक्त संदर्भ क्र.०४ अन्वये शासन परिपत्रक क्र.संकीर्ण -२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६ मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय , मुंबई -४०० ०३२ दि. २४ जुन २०२० परिपत्रक १.३ मध्ये नमुद केले आहे की, ज्या शिक्षकांची शाळमध्ये उपस्थिती अत्यावश्यक असेल अशा शिक्षकांना शाळेमध्ये बोलविण्याबाबत संबधित मुख्याध्यापकांनी/ शाळा व्यवस्थापन समितीने परिस्थितीनुरुप निर्णय घ्यावा. अशा शिक्षकांना शक्यतो आठवडयामध्ये एक किंवा दोन दिवसापेक्षा जास्त वेळा बोलवू नये तसेच एकाच दिवशी सर्व शिक्षकांना शाळेत बोलावू नये.

उपरोक्त आदेशानुसार कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शाळेकडे कार्यरत असलेले कायम व कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांनाही चक्रीय पद्धतीने आळीपाळीने आठवडयातून दोन दिवस शाळेत बोलविण्यात आले असून त्यांचेकडून अध्यापनाविषयी अनुषंगीक काम करुन घेतले आहे. सदर शिक्षक कर्मचारी हे इतर दिवशी Work from home ऑनलाईन अध्यापनाचे कामे करीत आहेत.

माहे १५ जुन २०२० पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाले आहे. शाळा चालू करणे यावर शासनाचे वतीने निर्बंध असल्याने शाळेकडे कार्यरत असलेले कायम व कंत्राटी शिक्षक यांचे कडून दि. १५.०६.२०२० पासून ऑनलाईन पद्धतीने अध्यापनाचे कामकाज सुरु करण्यात आलेले आहे. शिक्षकांनी पालकांशी संपर्क करुन व्हॉटस ॲप ग्रुप तयार करण्यात आला व ऑनलाईन अध्यापनाचे कामकाज सुरु करण्यात आलेले आहे.

शाळेकडे कार्यरत असलेले कायम आस्थापनेवरी सहा. शिक्षक कर्मचारी यांनाही चक्रीय पद्धतीने आळीपाळीने आठवडयातून दोन दिवस शाळेत बोलविण्यात येते व अनुषंगीक काम करुन घेतले जातात. सदर शिक्षक कर्मचारी हे इतर दिवशी Work from home अध्यापनाचे कामे करतात. सदर कायम कर्मचा-यांना संस्थान प्रशासनाकडून विहीत पद्धतीने १०० टक्के वेतन आदा केले जाते.

जा. नं. एसएसएस/साप्रशा/आस्था/३३२/२०२० दि. २४/०६/२०२० चे आदेशान्वये पान नं. ०२. (ड) परिच्छेद ०१ मध्ये नमूद केलेप्रमाणे या कर्मचा-यांना लागू असलेल्या किमान वेतन दरानुसार (कुशल/ अकुशल) प्रति दिन / प्रति दिवस गणना करुन वेतन आदा करणेत यावे. परंतू असे वेतन आदा करतांना, या आदेशात नमूद केलेल्या इतर बाबींस अधिन राहून, सदर कर्मचारी माहे मे, २०२० मध्ये प्रत्यक्ष जितके दिवस कामावर/ कार्यालयात/ कार्यस्थळी हजर असतील, त्या दिवसांसाठी किमान वेतन दरानुसार प्रति दिवस / प्रति दिन गणना करुन १०० टक्के वेतन आदा करणेत यावे आणि उर्वरीत ज्या दिवशी कामावर / कार्यालयात/ कार्यस्थळी हजर

नसतील (Lockdown / Covid-19 या कारणास्तव ) , त्या दिवसांसाठी किमान वेतन दरानुसार प्रति दिवस/ प्रति दिन गणना करुन देय्य असलेल्या वेतनाचे ५० टक्के वेतन आदा करणेत यावे. याकामी परिच्छेद (ड) मधील अ.नं. १० मध्ये नमूद केलेली दिवसाची गणना विचारात घेऊन माहे जुन -२०२० चे कंत्राटी बीले आदा करण्यात आलेली आहेत.

जा. नं. एसएसएस/साप्रशा/आस्था /३३२/२०२० दि. २४/०६/२०२० चे आदेशान्वये पान नं. ०२. (ड) परिच्छेद ०१ मध्ये नमूद केलेप्रमाणे माहे जुन २०२० चे वेतन अदा केले आहे. सदर कंत्राटी शिक्षक कर्मचा-यांना ऑनलाईन अध्यापनासाठी त्यांना स्वतःचे खर्चाने इंटरनेट बॅलन्स टाकावा लागतो.

खालील कंत्राटी शिक्षक कर्मचारी त्यांचेवर सोपविलेल्या जबाबदारीप्रमाणेच दैनंदिन ऑनलाईन अध्यापनाचे कामकाज करतात.

**श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालय विभागः- एकूण १३ कंत्राटी शिक्षक कर्मचारी.**

| अ.नं. | कंत्राटी शिक्षक कर्मचारी नांव | इयत्ता / वर्ग तुकडी | अध्यापनासाठी सोपविलेले विषय |
|---|---|---|---|
| १ | संजय मुरलीधर जेजूरकर | ६ वी , ७ वी | विज्ञान , भूगोल |
| २ | रेखा प्रभाकर आंधळे | ६ वी , ८ वी | इंग्रजी, गणित |
| ३ | अतुल माधवराव बोठे | ६ वी, ९ वी ,१० वी | विज्ञान, गणित |
| ४ | पराग कौतीक काकडे | ५ वी ते ८ वी | हिंदी, आय. सी. टी. |
| ५ | स्नेहल सुरेश मुळे | ८ वी ते १० वी | संस्कृत |
| ६ | शिल्पा वसंत जौक | ९ वी , १० वी | समाजशास्त्र |
| ७ | श्रद्धा बाळासाहेब कर्पे | ९ वी , १० वी | विज्ञान सेमी |
| ८ | मोहिनी दत्तात्रय भवर | ७ वी, ८ वी | गणित |
| ९ | दिपककुमार नानासाहेब चोळके | ८ वी ते १० वी | हिंदी |
| १० | दिपाली मधुकर उपासनी | ६ वी , ७ वी | मराठी , इतिहास |
| ११ | सचिन सोपानराव सालपुरे | ११ वी, १२ वी | रसायनशास्त्र |
| १२ | शारदा चांगदेव धनवटे | ११ वी, १२ वी | इंग्रजी |
| १३ | प्रमोद ज्ञानदेव गाडेकर | ११ वी, १२ वी | OC, AC. |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा कन्या विद्यामंदीर/ कनिष्ठ महाविद्यालय कडील एकूण १३ कंत्राटी शिक्षक जबाबदारीने ऑनलाईन अध्यापनाचे काम करत आहेत. उपरोक्त कंत्राटी कर्मचा-यांना प्रशासनाकडून विहित पद्धतीने पूर्ण एक महिन्याचे वेतन आदा करावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे खर्चाचा भार संस्थानला सहन करावा लागेल.

**उदा. ०१ कुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी ०१ महिन्याचा वेतनाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे**

| वेतन तपशिल | प्रतिदिन वेतन दर | एकूण दिवस | एकूण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| पूर्ण वेतन | ४३०.५४ /- | ३० दिवस | १२९१६.२० | ०१ महिना ( ३० दिवस |
| अर्ध वेतन | २१५.२७ /- | ३० दिवस | ६४५८.१० | ०१ महिना ( ३० दिवस |
| ८ दिवस कामावर हजर | ४३०.५४ /- | ०८ दिवस | ३४४४.३२ | |
| २२ दिवस कोव्हीड-१९ (अर्ध पगार) | २१५.२७ /- | २२ दिवस | ४७३५.९४ | |

०१ कुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी एका महिन्यातील उर्वरीत २२ दिवसांचा पगार देय झाल्यास एकूण रक्कम रुपये ४७३५/- ( अक्षरी रुपये चार हजार पस्तीस मात्र)

१३ कुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी एका महिन्यातील उर्वरीत २२ दिवसांचा पगार देय झाल्यास एकूण रक्कम रुपये ६१५५५/- ( अक्षरी रुपये एकसष्ट हजार पाचशे पंचावन्न मात्र) अदा करावे लागतील.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलः- एकूण २९ कंत्राटी शिक्षक कर्मचारी.

| अ.नं. | कंत्राटी शिक्षक कर्मचारी नांव | इयत्ता / वर्ग तुकडी | अध्यापनासाठी सोपविलेले विषय |
|---|---|---|---|
| ०१ | हाटकर विजय पुंजा | ६ वी , ७ वी , | हिन्दी |
| ०२ | निर्मळ विकास गणपत | ६ वी , ७ वी , | इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | म्हस्के गिताजंली भिमराज | ६ वी , ७ वी , | गणित, समाजशास्त्र, भुगोल |
| ०४ | आमकर मनोज प्रभाकर | ६ वी , ७ वी , | मराठी |
| ०५ | वाणी सुहासकुमार सुदाम | ४ थी - ड | सर्व विषय |
| ०६ | गुंजाळ आशा सुर्यभान | ४ थी - क | सर्व विषय |
| ०७ | डांगे बाबासाहेब मच्छिंद्र | ४ थी - ब | सर्व विषय |
| ०८ | नितनवरे श्रीकांत सखाहरी | ३ री – इ | सर्व विषय |
| ०९ | निर्मळ अमोल बाळासाहेब | ३ री – ड | सर्व विषय |
| १० | त्रिभुवन रेश्मा चंद्रकांत | ३ री – ब | सर्व विषय |
| ११ | कोते पूनम अमोल | २ री – ड | सर्व विषय |
| १२ | मोकळ विश्वनाथ माधव | २ री – ब | सर्व विषय |
| १३ | थोरात विश्वास भिकाजी | १ ली – ड | सर्व विषय |
| १४ | हारळे पुजा मोहन | १ ली – क | सर्व विषय |
| १५ | गायकवाड शशिकांत रखमा | १ ली – ब | सर्व विषय |
| १६ | सावळा शितल अनिल | ज्युनियर केजी. – ब | सर्व विषय (संस्थान कंत्राटी कर्म.) |
| १७ | डांगे योगिता गोरक्ष | ज्युनियर केजी. – क | सर्व विषय (संस्थान कंत्राटी कर्म.) |
| १८ | दंडवते मनिषा संजय | सिनियर केजी - ब | सर्व विषय (संस्थान कंत्राटी कर्म.) |
| १९ | लबडे उज्वला भागचंद | सिनियर केजी - अ | सर्व विषय |
| २० | येवले उज्वला नानासाहेब | सिनियर केजी - इ | सर्व विषय |
| २१ | गुंजाळ सुनिता रामभाऊ | सिनियर केजी - ड | सर्व विषय |
| २२ | थोरात वंदना आशोक | ज्युनियर केजी. – ड | सर्व विषय |
| २३ | आहेर पूनम बाबासाहेब | ज्युनियर केजी. – इ | सर्व विषय |
| २४ | कोळगे अमोल अर्जून | ८ वी , ९ वी | मराठी , भुगोल |
| २५ | गमे संदीप जगन्नाथ | ८ वी , ९ वी | विज्ञान |
| २६ | पठारे रावसाहेब विठ्ठल | ९ वी | हिंदी |
| २७ | शिंदे गोकूळ भिमराज | ८ वी , ९ वी ,१० वी | गणित |
| २८ | शिंदे संकल्पा वैभव | ९ वी | विज्ञान, भुगोल |
| २९ | कोतकर सविता राधाकिसन | ८ वी , ९ वी | इंग्रजी , इतिहास (संस्थान कंत्राटी कर्म.) |

**उदा. ०१ कुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी ०१ महिन्याचा वेतनाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे**

| वेतन तपशिल | प्रतिदिन वेतन दर | एकूण दिवस | एकूण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| पूर्ण वेतन | ४३०.५४ /- | ३० दिवस | १२९१६.२० | ०१ महिना ( ३० दिवस |
| अर्ध वेतन | २१५.२७ /- | ३० दिवस | ६४५८.१० | ०१ महिना ( ३० दिवस |
| ८ दिवस कामावर हजर | ४३०.५४ /- | ०८ दिवस | ३४४४.३२ | |
| २२ दिवस कोव्हीड-१९ (अर्ध पगार) | २१५.२७ /- | २२ दिवस | ४७३५.९४ | |

०१ कुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी एका महिन्यातील उर्वरीत २२ दिवसांचा पगार देय झाल्यास एकूण रक्कम रुपये ४७३५/- ( अक्षरी रुपये चार हजार सातशे पस्तीस मात्र ) २४ कुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी एका महिन्यातील उर्वरीत २२ दिवसांचा पगार देय झाल्यास एकूण रक्कम रुपये ११३६४०/- ( अक्षरी रुपये एक लाख तेरा हजार सहाशे चाळीस मात्र ) अदा करावे लागतील.

तसेचः-

उदा. ०१ अकुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी ०१ महिन्याचा वेतनाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| वेतन तपशिल | प्रतिदिन वेतन दर | एकूण दिवस | एकूण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| पूर्ण वेतन | ३६८.५४ /- | ३० दिवस | ११०५६ | ०१ महिना ( ३० दिवस ) |
| अर्ध वेतन | १८४.२७ /- | ३० दिवस | ५५२८.१० | ०१ महिना ( ३० दिवस ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ दिवस कामावर हजर | ३६८.५४ /- | ०८ दिवस | २९४८.३२ | |
| २२ दिवस कोव्हीड-१९ (अर्ध पगार) | १८४.२७ /- | २२ दिवस | ४०५३.९४ | |

०१ अकुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी एका महिन्यातील उर्वरीत २२ दिवसांचा पगार देय झाल्यास एकूण रक्कम रुपये ४०५४/- ( अक्षरी रुपये चार हजार चोपन्न मात्र) ०५ अकुशल कंत्राटी शिक्षक कर्मचारी एका महिन्यातील उर्वरीत २२ दिवसांचा पगार देय झाल्यास एकूण रक्कम रुपये २०२७०/- ( अक्षरी रुपये वीस हजार दोनशे सत्तर मात्र ) अदा करावे लागतील.

विभागाची मागणीः- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा कन्या विद्यामंदीर/ कनिष्ठ महाविद्यालय कडील १३ व श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील २९ असे एकूण ४२ कंत्राटी शिक्षक ऑनलाईन अध्यापनाचे काम करीत असून सदर कंत्राटी शिक्षकांना चक्रीय पद्धतीने आठवडयातून दोन दिवस असे महिनाभरात आठ दिवस कामावर बोलविण्यात येत असून हजर ०८ दिवसांचे पूर्ण वेतन दिले जाते व उर्वरीत २२ दिवसांचे Covid-19-P अशी डयुटी लावण्यात येत असून या २२ दिवसाचे संबधित कंत्राटी शिक्षक यांना अर्धे वेतन दिले जात आहे. या २२ दिवसांत कंत्राटी शिक्षक Work from home घरी राहून विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्यापनाचे काम करीत असल्याचे संबधित कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांनी विनंती अर्जाद्वारे पूर्ण वेतनाची मागणी केलेली आहे.

ज्या दिवशी कंत्राटी कर्मचारी कामावर / कार्यालयात/ कार्यस्थळी हजर नाहीत (Lockdown / Covid-19 या कारणास्तव), त्या दिवसांसाठी किमान वेतन दरानुसार प्रति दिवस / प्रति दिन गणना करुन देय्य असलेल्या वेतनाचे ५० टक्के वेतन आदा करणेत येते.

उपरोक्त एकूण ४२ कंत्राटी शिक्षक कर्मचा-यांना पूर्ण वेतन आदा करावयाचे झाल्यास प्रति महिना अंदाजे रु. २,००,०००/- ( अक्षरी रुपये दोन लाख मात्र) खर्चाचा अतिरिक्त भार संस्थानला सहन करावा लागेल.

सदरचे कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना माहे जुन २०२०, माहे जुलै २०२०, माहे ऑगस्ट २०२०, माहे सप्टेंबर २०२० या एकूण ०४ महिन्याचे कंत्राटी शिक्षकांना पूर्ण वेतन अदा करावयाचे झाल्यास अंदाजे एकूण रुपये ८,००,०००/- ( अक्षरी रुपये आठ लाख मात्र ) खर्चाचा भार संस्थानला सहन करावा लागेल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- मा. तदर्थ समितीचे दिनांक ०९ जुन, २०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये जा. नं. एसएसएस/साप्रशा/आस्था/३३२/२०२० दि. २४/०६/२०२० चे आदेशानुसार संस्थान कायम कर्मचारी, संस्थान आस्थापनेवर कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी व कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे,२०२० व माहे जुन,२०२० चे वेतन करणेत अदा करण्यात येत आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. ०६ शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ४५ / काम-९ हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग , मंत्रालय , मुंबई -४०० ०३२ दि. ३१ मार्च २०२० अन्वये सर्व खाजगी आस्थापना, कारखाने, कंपन्या, दुकाने (अत्यावश्यक सेवा आस्थापना वगळून ) इत्यादी आस्थापनांचे सर्व कामगार ( कंत्राटी, बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मवारी व कामगार ) ज्यांना कोरोना वायरस Covid-19 च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे घरी/ स्थानबद्ध राहावे लागत आहे, अशा सर्व कामगार/ कर्मचारी हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे व त्यांना संपूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत, असे नमूद करण्यात आलेले आहे.

शैक्षणिक संकुलाकडे काम करणारे कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना प्रत्यक्ष कामावर/कार्यालयात/ कार्यस्थळी हजर असतील किंवा नसतील तरी त्यानां देय होत असलेल्या किमान वेतन दरानुसार प्रति दिवस / प्रति दिन गणना करुन १०० टक्के वेतन आदा करावयाचे झाल्यास सदर कंत्राटी शिक्षकांना त्यांचे हजेरी दिवसानुसार देय होणा-या वेतनापोटी एकूण ०४ महिन्याचे कालावधीत अंदाजे एकूण रुपये ८,००,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. तसेच पुढील काळात शाळा नियमीतपणे सुरु होईपावेतो या कंत्राटी शिक्षकांची पुर्ण वेतनाची मागणी राहणार आहे.

दि. ०१.१०.२०२० रोजीचे प्रस्तावित टिपणीवर खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे.

निर्देशः- विभागाने तदर्थ समितीने वेळोवेळी पारीत केलेल्या ठरावाप्रमाणे तसेच त्यावरुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशाने वेतन अदा करण्याची कार्यवाही करावी. सदर ठराव व आदेश स्वयंस्पष्ट आहे. विभागाने एप्रिल ते जुन २०२० चे वेतन कोणत्या प्रकारे अदा केलेले आहे. तसेच विभागाचा स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव सादर करावा असे मत आहे.

खुलासाः-

१.	तदर्थ समितीने वेळोवेळी पारीत केलेल्या ठरावाप्रमाणे तसेच त्यावरुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशाने वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

२.	माहे एप्रिल २०२० चे वेतन विहित पद्धतीने अदा करण्यात आलेले आहे.

३.	माहे मे २०२० मध्ये विद्यार्थ्यांना सुट्टी असल्याने शिक्षकांनाही शाळेत बोलविण्यात आलेले नाही परंतू जा. नं. एसएसएस/साप्रशा/आस्था/३३२/२०२० दि. २४/०६/२०२० चे आदेशान्वये माहे मे, २०२० मध्ये प्रत्यक्ष जितके दिवस कामावर हजर असतील, त्या दिवसांसाठी किमान वेतन दरानुसार प्रति दिवस गणना करुन १०० टक्के वेतन आदा करणेत आले व उर्वरीत ज्या दिवशी कामावर हजर नसतील (Lockdown / Covid-19 या कारणास्तव ) , त्या दिवसांसाठी किमान वेतन दरानुसार प्रति दिवस गणना करुन देय्य असलेल्या वेतनाचे ५० टक्के वेतन आदा करणेत आलेले आहे.

४.	माहे जुन २०२० मध्येही जा. नं. एसएसएस/साप्रशा/आस्था/३३२/२०२० दि. २४/०६/२०२० चे आदेशान्वये वेतन अदा करणेत आलेले आहे.

दि. ०५/११/२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात खालीलप्रमाणे चर्चा झालेली आहे.

निर्देशः- सदरचे कंत्राटी शिक्षक हे घरी राहून ऑलनाईन अध्यापन करतात का ? सदर ऑनलाईन शिक्षणाला किती विद्यार्थी सहभागी असतात ? सदर कंत्राटी शिक्षकांचे अभ्यासाचे पर्यवेक्षण मुख्याध्यापक करतात का ?

खुलासाः- सदरचे कंत्राटी शिक्षक हे घरी राहून ऑलनाईन अध्यापन करतात , सदर ऑनलाईन शिक्षणासाठी प्राथमिक विभाग २५ ते ४० टक्के व माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग २५ ते ५० टक्के विद्यार्थी सहभागी असतात. सदर शिक्षकांच्या अध्यापनाचे पर्यवेक्षण मुख्याध्यापक हे व्हॉटसअॅप ग्रुपची पहाणी करुन तसेच शिक्षकांचे लेखी अहवाल घेऊन करतात.

तरी शासनाचे प्रत्यक्ष शाळा सुरु करण्याचे पुढील निर्देश होईपावेतो या कंत्राटी शिक्षक कर्मचा-यांना माहे १५ जुन २०२० पासून १०० टक्के पूर्ण वेतन देणेस व याकामी येणा-या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेकरीता निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.५४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल व श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी शिक्षकांनी कोव्हीड-१९ चे कालावधीत ऑनलाईन अध्यापनाचे काम केलेले असल्याने शासनाचे प्रत्यक्ष शाळा सुरु करण्याचे पुढील निर्देश होईपावेतो या कंत्राटी शिक्षक कर्मचा-यांना माहे १५ जुन २०२० पासून १०० टक्के पूर्ण वेतन अदा करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.११** **दि.०१ एप्रिल,२०१९ ते दि.३१ मार्च,२०२० अखेर/कालावधीत अनुदान दिलेले रुग्ण संख्या व अनुदान रक्कम यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः- कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रः- दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

प्रास्तविकः- उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय,उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. यास शासन मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५%

अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते. त्यास अनुसरुन दि.१ एप्रिल-२०१९ ते दि.३१ मार्च २०२० अखेर कालावधीत मंथली दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या व रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अं.नं. | महिना | लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ एप्रिल -२०१९ | ४५ | १०,९८,२५०/- | ७,००,००,०००/- |
| २ | मे -२०१९ | ५८ | १४,३४,५००/- | |
| ३ | जुन – २०१९ | ५७ | १४,०७,५००/- | |
| ४ | जुलै -२०१९ | ६४ | १५,७९,५००/- | |
| ५ | ऑगस्ट -२०१९ | ७७ | १८,९१,५००/- | |
| ६ | सप्टेंबर -२०१९ | ६४ | १५,८५,०००/- | |
| ७ | ऑक्टोंबर -२०१९ | ५१ | १२,५९,५००/- | |
| ८ | नोव्हेंबर -२०१९ | ५४ | १३,३१,५००/- | |
| ९ | डिसेंबर -२०१९ | ८५ | २१,२२,५००/- | |
| १० | जानेवारी -२०२० | ६० | १४,७६,०००/- | |
| ११ | फेब्रुवारी -२०२० | ५६ | १३,७५,०००/- | |
| १२ | ३१ मार्च -२०२० | ५५ | १३,५४,५००/- | |
| | **एकुण** | **७२६** | **१,७९,१५,२५०/-** | |

दि.१ एप्रिल-२०१९ ते दि.३१ मार्च २०२० अखेर ७२६ रुग्णांना रक्कम रु.१,७९,१५,२५०/- वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेत आलेले आहे.

त्या बाबतचा रुग्णालयनिहाय तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | रुग्ण संख्या | अनुदान रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१) | आनंदऋषीजी हार्टकेअर,अहमदनगर. | ०८ | १,९७,५००/- |
| ०२) | आनंद ऋषीजी हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर , अहमदनगर. | ११ | २,५७,५००/- |
| ०३) | आश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापुर. | १० | २,५०,०००/- |
| ०४) | बाई जेराबाई वाडिया हॉस्पीटल फॉर चिल्ड्रन, मुंबई. | ०४ | १,००,०००/- |
| ०५) | बालाजी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टिक सेंटर, मुंबई. | १३५ | ३३,५७,५००/- |
| ०६) | भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट आयुर्वेदिक हॉस्पिटल | ०३ | ७५,०००/- |
| ०७) | बॉम्बे हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०५ | १,२५,०००/- |
| ०८) | कार्डिनल ग्रेसिएस मेमोरिअल ट्रस्ट , वसई. | २१ | ५,२५,०००/- |
| ०९) | डिन बी वाय एल नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई. | ०४ | १,००,०००/- |
| १०) | डिन पी बी सी एफ के ई एम हॉस्पिटल, मुंबई | ०१ | २५,०००/- |
| ११) | दिनदयाळ मेमोरिअल हॉस्पिटल नॅशनल हार्ट इन्स्टिट्यूट, पुणे | ०१ | २५,०००/- |
| १२) | डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद. | १६ | ४,००,०००/- |
| १३) | एच जे दोशी घाटकोपर हिंदुसभा हॉस्पिटल,मुंबई | ०१ | २५,०००/- |
| १४) | होली फॅमिली हार्ट इन्स्टिट्यूट, मुंबई | ०१ | २५,०००/- |
| १५) | हॉली स्पिरीट हॉस्पिटल, मुंबई. | १४ | ३,५०,०००/- |
| १६) | जसलोक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, मुंबई . | २२ | ५,५०,०००/- |
| १७) | जहॉंगीर हॉस्पिटल , पुणे. | १३ | ३,२५,०००/- |
| १८) | के एल ई एस हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, बेळगांव, कर्नाटक. | ०१ | २५,०००/- |
| १९) | कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०५ | १,२५,०००/- |
| २०) | किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल ( के ई एम ), पुणे. | ४५ | ११,१५,०००/- |
| २१) | कोंकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट, सह्याद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, | ३६ | ९,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुणे. | | |
| २२) | कृष्णा हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, कराड. | ०८ | १,९७,५००/- |
| २३) | कृष्णामाई मेडिकल अॅन्ड रिसर्च फाऊंडेशन निकोप हॉस्पिटल, फलटण. | ०१ | २५,०००/- |
| २४) | लिलावती हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, मुंबई . | ०१ | २५,०००/- |
| २५) | महात्मा गांधी मिशन न्यु बॉम्बे हॉस्पिटल, नवी मुंबई . | ०५ | १,२५,०००/- |
| २६) | महात्मा गांधी मिशन मेडिकल सेंटर अॅन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, औरंगाबाद. | ८५ | २१,२५,०००/- |
| २७) | मुलजीभाई पटेल युरोलॉजिकल हॉस्पिटल, नदियाड, गुजरात. | ४० | १०,००,०००/- |
| २८) | नामको चॅरिटेबल ट्रस्ट कॅन्सर हॉस्पिटल, नाशिक. | ०३ | ७५,०००/- |
| २९) | नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी. | १३ | ३,१५,०००/- |
| ३०) | पी डी हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०८ | २,००,०००/- |
| ३१) | पुणा हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर पुणे. | ०९ | २,२५,०००/- |
| ३२) | आर टी भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठाण गिरीराज हॉस्पिटल, पुणे . | ०६ | १,५०,०००/- |
| ३३) | शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०१ | २५,०००/- |
| ३४) | श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, सोलापूर. | ९७ | २३,०१,०००/- |
| ३५) | श्री मार्कण्डेय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर. | ५४ | १३,०८,०००/- |
| ३६) | श्री सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल, मिरज. | २८ | ६,९३,७५०/- |
| ३७) | शुश्रुशा सिटीझन्स को-ऑप हॉस्पिटल, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| ३८) | सुराना सेठीया हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर मुंबई | ०२ | ५०,०००/- |
| ३९) | शुश्रुत मेडिकल केअर अॅन्ड रिसर्च सोसायटी हार्डीकर हॉस्पिटल, पुणे. | ०१ | २५,०००/- |
| ४०) | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई. | ०४ | ९७,५००/- |
| ४१) | विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन विवेकानंद हॉस्पिटल, लातुर. | ०१ | २५,०००/- |
| | **एकुण -** | **७२६** | **१,७९,१५,२५०/-** |

उपरोक्त रुग्णालयाचे नावे रुग्णांसाठी दिलेल्या रक्कमेपैकी रुग्णाने रुग्णालय बदलल्याने/ रुग्ण उपचारासाठी दाखल न झाल्याने/ शस्त्रक्रिया रद्द झाल्याने/ रुग्ण मयत झाल्याने/जीवनदायी अंतर्गत उपचार पुर्ण झाल्याने/ काही रक्कम उपचारासाठी वापरुन उर्वरीत रक्कम आर्थिक वर्ष दि.०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेर ३७ रुग्णांची रक्कम रु.७,१३,८६०/- मात्र संस्थानखाती जमा झालेली आहे.

प्रस्ताव:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे, दि.०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेर देण्यात आलेल्या,वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रक्कमेची व रुग्णांची परत आलेल्या रक्कमेची नोंद घेणेचा प्रस्ताव, मा. तदर्थ (Ad Hoc) समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.५४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे दि.०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या कालावधीत देण्यात आलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदान रकमेचे व रुग्णांची परत आलेल्या रकमेचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१२** **सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली लागू करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनिय २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- :- दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

प्रास्तविक:- श्री साईबाबा संस्थानने,गरीब गरजु रुग्णांना रुग्ण उपचार घेत अलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी दि.२४/०७/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१. अन्वये वैद्यकीय आर्थिक अनुदान स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते.

मा.व्यवस्थापन समिती सभा, **दि.०२/०५/२०१८** रोजीच्या सभेत, विषय नं.३७, वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील आजारांचे यादीत फेर बदल करणेबाबत विषय सादर करणेत आला होता. निर्णय क्र.३२३ **“** यावर सविस्तर चर्चा होऊन**,** वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत प्रस्तावात नमुद केले प्रमाणे १) कर्करोगासंबधी उपचार**,** शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार**,**२) रक्तासंबंधी आजार**,** (उदा.हिमोफेलिया इ.) ३) जी.बी.एस (**Gullian Barre Syndrome),** ४) कॉक्लीअर इंम्प्लांट**,** ५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, या आजारांचा समावेश करणेत यावा. तसेच सध्या देण्यात येत असलेल्या रु.२५,०००/- मात्र वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रकमेत वाढ करुन अनुदानाची रक्कम रु. ५०,०००/- मात्र करण्यात यावी. तसेच याबाबत सुधारित नियमावली तयार करुन ती मान्यतेसाठी सभेसमोर सादर करावी”, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समिती सभा, दि.०२/०५/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली तयार करुन दि.०६/०९/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आली होती. त्यावर निर्णय क्र.५५६. यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आहे.

**१) ज्या आजारांसाठी वारंवार उपचार करावे लागतात उदा. कॅन्सर इ. अशा आजारांसाठी दरवर्षी अनुदान देण्यात यावे या दुरुस्तीसह वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या सुधारित नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**२) वैद्यकीय आर्थिक अनुदानाची सुधारित नियमावली शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत यावी.**

**३) शासन मान्यतेनंतर सुधारित नियमावली लागु करणेत यावी.**

**शासनाची मान्यता मिळेपर्यंत पुर्वीच्या प्रचलित पध्दतीने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणे सुरु ठेवावे.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०९/२०१८ च्या निर्णयास अनुसरुन सदरची, वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबतची सुधारित नियमावली संदर्भ क्र.३ अन्वये, शासन मान्यतेसाठी पाठविणेत आली होती.

संदर्भ क्र.४ अन्वये, संस्थानच्या सुधारित आर्थिक नियमावलीस शासन मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव हा पुढील मुद्दे विचारात घेऊन फेर सादर करणेस शासनाने कळविले होते.

१) व्यवस्थापन समिती शिर्डी मार्फत सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत घेण्यात आलेल्या सर्व निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) प्रचलित नियमावली व सुधारित नियमावली या संदर्भातील तपशिलवार माहिती मुद्देनिहाय मूळ प्रस्तावात समाविष्ट करण्यात यावी.

३) प्रचलित नियमावलीमध्ये सुधारित नियमावली अन्वये, करण्यात आलेल्या सुधारणांबाबतची कारणमिमांसा / आवश्यकता स्पष्ट करण्यात यावी.

४) सुधारित नियमावलीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना येणा-या वित्तीय भाराबाबत माहिती देण्यात यावी

५) सुधारित नियमावलीची कागदपत्र केवळ सहपत्रे म्हणुन न जोडता सुधारित नियमावलीच्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचे अभिप्राय प्रस्तावात समाविष्ट करण्यात यावे.

६) श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक सुधारित नियमावलीत मान्यता देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीचा उल्लेख करण्यात यावा.

उपरोक्त सर्व मुदयांसह विस्तृत, परिपुर्ण व स्वंयस्पष्ट अहवाल शासनास फेर सादर करण्याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विनंती करण्यात आलेली होती.

**संदर्भ क्र.५** अन्वये, सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबतची नियमावली उपरोक्त सर्व मुदयांसह विस्तृत, परिपुर्ण व स्वंयस्पष्ट अहवाल शासनास फेर सादर करण्यात आली होती.

**आता संदर्भ क्र.६** अन्वये, शासन निर्णय – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम–२००४ मधील कलम १७ (१) व कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीचा वापर करुन श्री साईबाबा संस्थान मार्फत गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याबाबतच्या सुधारित नियमावलीला पुढील प्रमाणे मान्यता देण्यात आलेली होती.

१) **वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी देण्यात येईल**.

१) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,

२) रक्तासंबंधी आजार,

३) जी.बी.एस (Gullian Barre Sundrome),

४) कॉक्लीअर इंम्प्लांट,

५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

२) पिवळे रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख साठ हजार (१,६०,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी व केशरी रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये पंच्याऐंन्शी हजार (८५,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पन्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.

अ) रुग्णाचा / पालकाचा व्यवसाय / शेती वा नोकरी / व्यापार असेल तर रुग्णाने वा / आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.

आ) रुग्ण वा / आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पन्नाचे प्रमाण पत्र द्यावे.

ब) रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान देण्यात येईल.

**३)** अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा महानगरपालिका रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय** यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल.परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान यादीत असणे आवश्यक.

४) संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येणार नाही.

५) अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे सही, पदवी, रजिस्टेशन नंबर सह रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे

६) औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे **२५%** अगर रुपये **५०,०००/-** पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये **१५,०००/-** अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही.

७) अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने **आर.टी.जी.एस. द्वारे** पाठविण्यात येईल.

८) रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही.

९) रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण असल्यास कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही.

१०) अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालयातुन रुग्णास डिसचार्ज देणेपुर्वी अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज सादर करावा.

११) प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारांसाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु ज्या आजारांसाठी वारंवार उपचार करावे लागतात उदा.कॅन्सर इ.अशा आजारांसाठी दरवर्षी अनुदान देण्यात येईल.

१२) अनुदान मागणी अर्जासोबत पेशंटचे नाव असलेल्या रेशनकार्डची व पेशंटच्या आधारकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे.

१३) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या जिवनदायी / महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना,तत्सम योजने अंतर्गत लाभ घेणा-या रुग्णांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येणार नाही.

१४) अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्व कागदपत्राची **स्व:साक्षकिंत (Self Attested)केलेल्या प्रमाणित** प्रति लिपी असाव्यात.

१५) अनुदान प्राप्त होणा-या रुग्णालयांनी पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा त्याच रुग्णासाठी वापर करावा, रुग्ण डिसचार्ज झाला असल्यास सदरच्या रुग्णाला दिलेल्या रकमेची स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती तात्काळ संस्थानात सादर करावी. दिलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रकमेचा उपयोग त्या रुग्णासाठी न झाल्यास ती रक्कम संस्थानच्या खाती त्वरीत जमा करणे आवश्यक आहे.

१६) श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याच्या नियमावलीत रुग्णालयाचा समावेश, करावयाचा झाल्यास रुग्णालयाने खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

अ) मा. धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.

ब) ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws)

क) आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट.

ड) रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह)

ई) रुग्णालय हे धर्मादाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)

फ) रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.

ज) रुग्णालय हे धर्मादाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतलेले आहे, याबाबतचा खुलासा.

तसेच रुग्णालयाबाबतची इतर अनुषंगीक माहिती सादर करणे. ही सर्व कागदपत्रे श्री साईबाबा संस्थानच्या अनुदान विभाग व वित्त विभाग अथवा लेखाशाखा अथवा ऑडिटर यांचे कडुन तपासणी केल्यानंतर, व्यवस्थापन समितीच्या मान्येतेने रुग्णालय पॅनलवर घेणेत येईल.

सदर नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणेत यावे.

सदर योजना अंमलात आणण्याकरीता प्रत्येक वर्षी निधीची तरतुद अंदाज पत्रकात करण्यात यावी. मंजुर केलेल्या तरतुदीपेक्षा जास्त खर्च होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

सुधारीत नियमावलीमधील नियम क्र. २ मध्ये पिवळे रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख साठ हजार (१,६०,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी व केशरी रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये पंच्याऐंशी हजार (८५,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. यामुळे केसरी रेशनकार्ड धारक यांना वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा जो फायदा होणे आवश्यक होते. तो होताना दिसुन येत नसल्याने, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील नियम क्र. २ मध्ये पिवळे रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये पंच्याऐंशी हजार (८५,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी व केशरी रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख साठ हजार (१,६०,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. असा बदल करुन शासनाकडुन शुध्दीपत्रक करुन घेणेबाबत,मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४/१२/२०१९,विषय नं.७७ अन्वये, प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.५५६, यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडुन शुध्दीपत्रक करुन घेणेकामी, प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत आली.

संदर्भ क्र.८ जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२००१/२०१९, दि.०२/०१/२०२० रोजीच्या पत्राने, प्रस्ताव शासनाकडे शुध्दीपत्रक करुन घेणेकामी पाठविणेत आलेला होता.

संदर्भ क्र.९ महाराष्ट्र शासन क्रमांक-सासंवि-१०१८/१६१४/प्र.क्र.२०९/का-१६, विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई- ४०००३२. दि.०१/०२/२०२०. रोजीच्या पत्राने सुधारीत नियमावलीतील नियम क्र.२ मध्ये बदल करणेस मान्यता देणेत आलेली होती.

संदर्भ क्र.१०- सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली आर्थिक वर्ष ०१ एप्रिल २०२० पासुन लागू करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत दि.२५/०२/२०२० रोजी टिपणी सादर करणेत आली होती. सदर टिपणीवर मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदर प्रकरण तदर्थ (Ad.Hoc) समितीचे निदर्शनास आणून दिल्यानंतर मुद्दा क्र.१) सुधारीत नियमावलीप्रमाणे वैद्यकीय आर्थिक अनुदान विभागाच्या सॉफ्टवेअर मध्ये संस्थानच्या आयटी विभागामार्फत बदल करणेस.,२) सुधारीत नियमावलीची प्रत वैद्यकीय आर्थिक अनुदान विभागाच्या पॅनलवरील रुग्णालयांना पाठविणेस.३) सुधारित नियमावली व वैद्यकीय आर्थिक अनुदान विभागाच्या पॅनलवरील रुग्णालयांची यादी श्री साईबाबा संस्थानच्या वेबसाईटवर प्रसारित करणेस.याप्रमाणे कार्यवाही करणेत उचित होईल असे मत आहे. असा शेरा दिलेला होता. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी Ad.Hoc समिती समक्ष अवलोकनार्थ व कार्यवाही करता ठेवावा असे मत असा शेरा दिलेला आहे.

मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब व मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad.Hoc)समिती सभा दि.११/०५/२०२०,विषय नं.४७ अन्वये, सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.२८१. यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत सविस्तर माहितीसह प्रस्ताव मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा, तत्पुर्वी सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबतचे रेकॉर्ड सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात यावे,असे ठरले. निर्णय क्र.२८१ अन्वये दि.१३/०७/२०२० रोजी सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबतचे रेकॉर्ड सर्व सदस्यांना पुरविणेत आलेले आहे.

प्रस्ताव– शासन निर्णयानुसार सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली, अनुदान विभागाच्या सॉफ्टवेअरमध्ये आय टी विभागामार्फत बदल करुन, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली लागु करणेचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ फेर सादर

**निर्णय क्र.५४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली लागू करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१३** **श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड यांचे उपचाराकरीता वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११ विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

प्रास्तविक:- उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये, श्री प्रकाश आनंदराव गायकवाड,यांच्या तर्फे त्यांचा मुलगा श्री सचिन आनंदराव गायकवाड यांनी दि.२५/०८/२०२० रोजी अर्ज सादर करुन त्यांचे वडील श्री प्रकाश आनंदराव गायकवाड,यांचे उपचाराकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास सदर्भ क्र.२ अन्वये, शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील खालील आठ आजारांकरीता देण्यात येते.

१) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार   २) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपण व नंतरचे उपचार.
३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार   ४) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.

५) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया)　　६) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)
७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.　　८) कॉक्लीअर इम्प्लांट

श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री प्रकाश आनंदराव गायकवाड, यांच्या आजाराचा समावेश नियमावलीत आहे. परंतु उपचार घेत असलेले, मिडे पॉईन्ट हॉस्पिटल, प्रा.लि.२४१/१, न्यु डी पी रोड,औंध पुणे-४११००७ या रुग्णालयाचा समावेश नियमावलीत नसल्याने, श्री साईबाबा संस्थान मार्फत खाजगी रुग्णालयाच्या नावाने व वैयतिक नावाने अनुदान देण्यात येत नाही.

सदर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देशित केलेले आहे

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- श्री साईबाबा संस्थानच्या, वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार, रुग्णाने उपचार घेतलेले रुग्णालयचा समावेश नियमावलीत नसल्याने सदर रुग्णास वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देता येणार नाही. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३७६/(७६)-का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई दि.०५ मे २००६ मधील, नियम क्र.५ सदर योजनेच्या नियमावलीतील अटिमध्ये व्यवस्थापन समितीच्या सहमतीने सुधारणा करणेचे अधिकार शासनास आहे. एक विशेष बाब म्हणुन, श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास, मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे मान्यतेनेनंतर, शासन मान्यता घेऊन, नियमावलीनुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देता येईल. प्रस्ताव मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ फेर सादर .

**निर्णय क्र.५४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड यांना कॅन्सर आजार असुन तो संस्थान नियमावलीतील मान्यताप्राप्त आजार आहे. मात्र उपचार घेत असलेले हॉस्पिटल मान्यताप्राप्त यादीतील नाही. मात्र आजार मान्यताप्राप्त यादीतील असल्याने विशेष बाब म्हणून संस्थानमार्फत आर्थिक अनुदान रक्कम रु.२५,०००/-मात्र उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या निर्णयाचा संदर्भ इतर अशाच प्रकारच्या प्रकरणांना लागु करण्यात येऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१४** **श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

प्रास्तविक :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत, श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय ही दोन्ही रुग्णालय गरीब व गरजु रुग्णांचे उपचारासाठी चालविली जातात. श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दि.१४/०२/२०१३ पासुन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) सुरु करणेत आलेली आहे. व दि.११/०९/ २०१९ पासुन प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु करणेत आलेली आहे. श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या धर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु करणेचे निर्देश मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिलेले आहे.

संदिप विजय कुलकर्णी यांनी दि.२८/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये, श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु केल्याने संस्थानचे होणारे नुकसान टाळता येईल. कोरोणा महामारीमुळेसंस्थानचे २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात अत्यल्प उत्पन्न राहणारअसून वित्तीय तुट कमी करणेसाठी विविध उपाययोजना राबविणेत याव्यात, अनावश्यक खर्चावर मर्यादा आनण्यात याव्या त्याचाच एक भाग म्हणुन राज्य सरकारच्या व केंद्र सरकारच्या आरोग्य विमा, जीवदायी योजना व आयुष्यमान भारत योजना सुरु कराव्यात अशी विनंती केलेली आहे. सदर पत्राबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दिलेले आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये (MJPJAY) एकूण रु.१,५०,०००/- मात्र प्रति वर्षी प्रत्येक रुग्णास संरक्षण आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये (PMJAY) प्रति वर्षी एकुण रु.५,००,०००/- मात्र प्रति वर्षी प्रत्येक रुग्णास संरक्षण आहे. सदर दोन्ही योजनेचा रुग्णांना लाभ घेणेकामी पिवळे अथवा केशरी रेशनकार्ड, आधारकार्ड आणि पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेकरीता (PMJAY) स्मार्टकार्ड देखील रुग्णाकडे असल्यास सदर रुग्णाला लाभ घेता येईल. तसेच महात्मा ज्योतीबा फुले

जन आरोग्य योजना (MJPJAY) ही महाराष्ट्रामध्ये लागु आहे. सदर योजनेमध्ये ११०० आजारांचा समावेश असुन प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये (PMJAY) एकुण १३०० आजारांचा समावेश आहे. यातील ४१५ आजारावर श्री साईनाथ रुग्णालयात उपचार केले जातील.

सदर योजना ही महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील रहिवासी असणा-या लोकांकरीता सुरु केली असुन कुटुंबाचा संपुर्ण प्रिमियम राज्य सरकार दरवर्षी भरत आहे.

श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची ( सन २०१६ ते २०१९) या चार वर्षाचे ओपीडी , आयपीडी, ऑपरेशन रुग्ण संख्या व बीलात दिलेल्या सवलतीची माहीती खालीलप्रमाणे.

श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी.

| अ.नं. | वर्ष | ओपीडी रुग्ण संख्या | आयपीडी रुग्ण संख्या | ऑपरेशन रुग्ण संख्या | सवलत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१५-२०१६ | २,९४,८६४ | १२,९५० | ८२३० | ४३,६९,९१४/- |
| ०२ | २०१६-२०१७ | ३,४०,४५७ | १५,९४५ | १०९३१ | ३,१२,६३,९५८/- |
| ०३ | २०१७-२०१८ | ३,५९,३४३ | १५,७०८ | ११८०४ | ६,०७,१६,७९९/- |
| ०४ | २०१८-२०१९ | ३,८२,३५९ | १६,७५६ | १३८४२ | १३,५०,७७,५४३/- |
| **२०१५ ते २०१९** | | **१३,७७,०२३** | **६१,३५९** | **४४,८०७** | **२३,१४,२८,२१४/-** |

श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल शिर्डी .

| अ.नं. | वर्ष | ओपीडी रुग्ण संख्या | आयपीडी रुग्ण संख्या | ऑपरेशन रुग्ण संख्या | सवलत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१५-२०१६ | १,३२,९९२ | १२,४०१ | ९,६१९ | ७,००,८०,४२९/- |
| ०२ | २०१६-२०१७ | १,५९,०४८ | १३,४६६ | १०,७५७ | ७,३४,४४,१०९/- |
| ०३ | २०१७-२०१८ | १,७०,२९३ | १२,४५३ | ९,७०३ | ९,४८,३३,५५६/- |
| ०४ | २०१८-२०१९ | १,४८,७३१ | ९,९३९ | ८,५४२ | ५,७९,८१,४३०/- |
| **२०१५ ते २०१९** | | **४,७५,७०२** | **३८,६३४** | **३०,३७०** | **२६,५५,६९,७३१/-** |

श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात (सन २०१६ ते २०२०) या चार वर्षात महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेतलेली रुग्णं संख्या व शासनाकडुन प्राप्त झालेल्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | वर्ष | रुग्ण | शासनाकडुन प्राप्त रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | २०१६-२०१७ | ४,४४९ | २,७५,५०९,५०४/- |
| ०२ | २०१७-२०१८ | ४,५६७ | २९,२०,४४,८०३/- |
| ०३ | २०१८-२०१९ | ३,९३८ | २८,८२,७८,२६६/- |
| ०४ | २०१९-२०२० | ४,५१४ | २२,५७,७१,४१५/- |
| | **एकुण** | **१७,४६८** | **१,०८,१६,०३,९८८/-** |

श्री साईनाथ रक्तपेढी शिर्डी.

| अ.नं. | वर्ष | रुक्त संकलन | रक्त वितरण | सवलत |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०१६-२०१७ | ९,७५६ | १४,११९ | ३३,२७,३५०/- |
| ०२ | २०१७-२०१८ | १०,९७३ | १६,०७५ | ५३,२०,४३०/- |
| ०३ | २०१८-२०१९ | ११,७८५ | १७,१५८ | ६३,६९,०५०/- |
| ०४ | २०१९-२०२० | ११,१७२ | १७,३४९ | ६५,५९,४००/- |
| **एकुण** | | **४३,६८६** | **६४,७०१** | **२,१५,७६,२३०/-** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयापेक्षा श्री साईनाथ रुग्णालयाकडील रुग्णांची संख्या जास्त असल्याचे दिसुन येते. रुग्ण संख्येचा विचार करता, सदर योजना श्री साईनाथ रुग्णालयात कार्यान्वित करणे शक्य आहे. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ही योजना सुरु झालेस रुग्णांच्या

बीलापोटी जी रक्कम आजपर्यंत खर्ची टाकणेत येत आहे. ती रक्कम या योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडुन रुग्णालयास प्राप्त होईल.

करीता खालील गोष्टींची पुर्तता करावी लागेल.

०१) महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) चे Empanelment करणे व ऑनलाईन फॉर्म भरणे.

०२) जागेचे नियोजन – सध्या केसपेपर विभागातील जागेमध्ये सदर योजनेकरता जागेचे नियोजन करता येईल. यामध्ये समोरील बाजुस एकुण ०५ काऊंटर तयार करावे लागतील.

०१) महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) या दोन्ही योजनेच्या केसपेपर करीता ०१ काऊंटर.

०२) बीलींग करीता ०१ काऊंटर.

०३) रुग्णाचे रजिस्ट्रेशन करीता०२ काऊंटर.

०४) संस्थान कर्मचारी केसपेपर /कॅज्युलिटी केसपेपर/दुसरे विभाग (होमीओपॅथी, बालरोग, दंत इ.) करीता ०१ काऊंटर. असे एकुण पाच काऊंटर लागतील.

या काऊंटरच्या पाठीमागील बाजुस

०१) Preauthorization करीता ०१ काऊंटर ०२) बीलींग करीता ०२ काऊंटर

०३) Discharge patient करीता ०१ काऊंटर ०४) follow up patient करीता ०१ काऊंटर

०५) Return fare करीता ०१ काऊंटर असे एकुण सहा काऊंटर तयार करावे लागतील. व त्याच पाठीमागे MCO करीता एक कॅबिन व क्लार्क काऊंटर तयार करावे लागेल.

०३) मनुष्यबळ- या योजनेअंतर्गत हॉस्पिटलचे कामकाज दोन सत्रांमध्ये चालविणेसाठी Data Entry Operators, Billing Clerk, Checkers, Peon इ. नवीन कर्मचा-यांची आवश्यकता आहे. तसेच एक MCO (Medical coordinator) DOCTOR ची आवश्यकता आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु करणेकामी खालील प्रमाणे डॉक्टर व कर्मचारी लागतील.

| **अ.नं.** | **कामकाज** | **कर्मचारी व डयुटी टाईम** | **एकुण कर्मचारी** |
|---|---|---|---|
| ०१ | MCO | ०१ (General Duty ) | ०१ |
| ०२ | Clerk - mco | ०१ (General Duty ) | ०१ |
| ०३ | Preauthorization - Clerk | ०२×०३ Shift | ०६ |
| ०४ | Discharge - Clerk | ०२×०३Shift | ०६ |
| ०५ | Billing - Clerk | ०१×०३ Shift | ०३ |
| ०६ | Billing Head | ०१ (General Duty ) | ०१ |
| ०७ | Case Paper - Clerk | ०२×०३ Shift | ०६ |
| ०८ | Billing–Clerk (Investigation) | ०१×०२ Shift | ०२ |
| ०९ | Follow Up | ०१ (General Duty ) | ०१ |
| १० | Return Fare | ०१ (General Duty ) | ०१ |
| ११ | Photographer | ०१×०२ Shift | ०२ |
| १२ | Peon | ०१ (General Duty ) | ०१ |
| | | **एकुण-** | **३१** |

०४) हार्डवेअर– १० एमबीपीएस इंटरनेट लाईन तसेच एकुण सर्व काऊंटरकरीता १४ संगणक संचाची आवश्यकता आहे.

०५) स्कॅनर–ऑपरेशन थिएटर मधील फोटो स्कॅन करणे, अपलोड फॉर्म स्कॅन करणे, डिस्चार्ज कार्ड स्कॅन करणेकामी ०१ मोठे स्कॅनर आवश्यक आहे.

०६) कॅमेरा - ऑपरेशन थिएटर मधील फोटो काढणेकामी तसेच रुग्णांना घरी जाताना देणेत येणा-या Return Fare चे पैसे देताना घेणेत येणा-या फोटोकरीता एकुण १५ कॅमेरांची आवश्यकता आहे.

०७) वैद्यकीय शिबीर – सदरची योजना कार्यान्वित होऊन पुढे चालु राहणेकामी वैद्यकीय शिबीर घेणे बंधनकारक आहे. तरी सदर कामी महिन्यातुन एकदा वैद्यकीय शिबीर घेणे गरजेचे आहे.

प्रस्ताव:- वरील सर्व मुद्यांचा प्रथमदर्शनी विचार करता महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या धर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सुरु करता येईल असे नम्र मत आहे. सदरची योजना सुरु केलेमुळे श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना सवलती पोटी दिली जाणारी संस्थानची रक्कम महाराष्ट्र शासनाकडुन व केंद्र शासनाकडून मिळणेस मदत होईल,तसेच सदरची योजना कार्यान्वित करणेकामी संबंधीत विभागामार्फत (बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा, मेकॅनिकल, ईडीपी, एचआर, खरेदी इ.) संबंधी आवश्यक कामे त्या-त्या वेळी करुन घ्यावी लागतील. तरी सदरचा प्रस्ताव, मा. तदर्थ (Ad Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता महात्मा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१५** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२० ते सप्टेंबर-२०२० अखेर वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१,८९,६४,१२०/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र**–

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ रोजीच्या निर्णय क्र. ०६.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०१/११/२०१८ रोजीच्या निर्णय क्र. ६३८.

**प्रस्तावना**-श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांना मोफत उपचार पुरविण्याच्या दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालय उपरोक्त संदर्भ क्र. ०१ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे.

संदर्भ क्र. ०२ नुसार दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुणालय भरती होणा-या रुग्णांना आवश्यकते प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत.

तसेच संदर्भ क्र. ०३ नुसार श्री साईबाबा रुग्णालयातील सद्यास्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व ते उपचार, शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत. अशा उपचारांचे दर शासनाच्या दराप्रमाणे घेण्यात यावेत. तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे.

याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली. सदर निर्णयाची अंमलबजावणी दि. ०१/०१/२०१९ नुसार करण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात माहे. एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० अखेर सर्व घटकातील रुग्णांना मोफत तपासणी, शस्त्रक्रिया व औषधांवरील झालेल्या खर्च रक्कम रु. १,८९,६४,१२०/- मात्र देण्यात आलेली सवलतीचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**अंतररुग्णांवर झालेला खर्च** –

| अ.नं | महिना | एकुण रुग्ण संख्या | जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च | संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च | संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल २०२० | १९६ | ६,८१,०३८/- | १५,७२९/- | ७,२१३/- | **७,०३,९८०/-** |
| ०२ | मे २०२० | २३६ | ९,४९,७७९/- | ६७,८४८/- | ३,८३८/- | **१०,२१,४६५/-** |
| ०३ | जुन २०२० | ३३६ | १४,४७,०२१/- | ५३,८७२/- | ३९,५५२/- | **१५,४०,४४५/-** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | जुलै २०२० | ३८६ | १५,३४,०५८/- | ७६,७४४/- | ३६,८२१/- | **१६,४७,६२३/-** |
| ०५ | ऑगस्ट २०२० | ४८० | २०,१३,४०७/- | ४९,१२०/- | ८२,७३०/- | **२१,४५,२५७/-** |
| ०६ | सप्टेंबर २०२० | २६३ | ८,१७,६९७/- | ५४,०५७/- | ४४,२४८/- | **९,१६,००२/-** |
| **एकुण रक्कम रुपये** | | | | | | **७९,७४,७७२/-** |

**बाह्यरुग्णांवर झालेला खर्च -**

| अ.नं | महिना | एकुण रुग्ण संख्या | जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च | संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च | संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल २०२० | ७,४०० | २,२९,०४७/- | ४४,५८८/- | ३०,९९२/- | **३,०४,६२७/-** |
| ०२ | मे २०२० | ९,९४५ | ३,६४,९६६/- | ६३,६८७/- | ४०,००४/- | **४,६८,६५७/-** |
| ०३ | जुन २०२० | ९,९३८ | ४,६५,२९३/- | ५१,९१०/- | २९,९४०/- | **५,४७,१४३/-** |
| ०४ | जुलै २०२० | १०,७५४ | ४,९२,५४८/- | ६१,०६९/- | ४८,३१३/- | **६,०१,९३०/-** |
| ०५ | ऑगस्ट २०२० | ११,६०६ | ६,२५,३३७/- | ८५,४७९/- | ६०,७०१/- | **७,७१,५१७/-** |
| ०६ | सप्टेंबर २०२० | ८,८६१ | ५,१७,८२३/- | ८८,००७/- | ६२,६३४/- | **६,६८,४६४/-** |
| | | | | | **एकुण रक्कम रुपये** | **३३,६२,३३८/-** |

**औषधांवरील झालेला एकुण खर्च –**

| अ.नं | महिना | एकुण रुपये |
|---|---|---|
| ०१ | एप्रिल २०२० | ६,०९,३५३.३९/- |
| ०२ | मे २०२० | ८,४३,५२४.५०/- |
| ०३ | जुन २०२० | १६,४७,६४२.२९/- |
| ०४ | जुलै २०२० | २९,१०,०२२.१३/- |
| ०५ | ऑगस्ट २०२० | ८,८०,२५३.०३/- |
| ०६ | सप्टेंबर २०२० | ७,३६,२१४.८७/- |
| **एकुण रक्कम रुपये** | | **७६,२७,०१०.२१/-** |

**एकुण खर्च रक्कम विवरण –**

| अ.नं | महिना | अंतं रुग्ण संख्या | अंतंरुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये | बाह्यरुग्ण संख्या | बाह्यरुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये | औषधांवर खर्च झालेला एकुण रक्कम रुपये | एकुण रुग्ण संख्या (३+५) | एकुण रुपये (४+६+७ = ९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| ०१ | एप्रिल २०२० | १९६ | ७,०३,९८०/- | ७,४०० | ३,०४,६२७/- | ६,०९,३५३.३९/- | ७,५९६ | १६,१७,९६०.३९/- |
| ०२ | मे २०२० | २३६ | १०,२१,४६५/- | ९,९४५ | ४,६८,६५७/- | ८,४३,५२४.५०/- | १०,१८१ | २३,३३,६४६.५/- |
| ०३ | जुन २०२० | ३३६ | १५,४०,४४५/- | ९,९३८ | ५,४७,१४३/- | १६,४७,६४२.२९/- | १०,२७४ | ३७,३५,२३०.२९/- |
| ०४ | जुलै २०२० | ३८६ | १६,४७,६२३/- | १०,७५४ | ६,०१,९३०/- | २९,१०,०२२.१३/- | ११,१४० | ५१,५९,५७५.१३/- |
| ०५ | ऑगस्ट २०२० | ४८० | २१,४५,२५७/- | ११,६०६ | ७,७१,५१७/- | ८,८०,२५३.०३/- | १२,०८६ | ३७,९७,०२७.०३/- |
| ०६ | सप्टेंबर २०२० | २६३ | ९,१६,००२/- | ८,८६१ | ६,६८,४६४/- | ७,३६,२१४.८७/- | ९,१२४ | २३,२०,६८०.८७/- |
| | | | | | | **एकुण** | **६०,४०१** | **१,८९,६४,१२०.२१/-** |

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान –**

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ रोजीच्या निर्णय क्र. ०६ नुसार दि.०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुग्णालय भरती होणा-या रुग्णांना आवश्यकतेनुसार प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०१/११/२०१८ रोजी पासुन श्री साईबाबा हॉस्पीटल मधील सद्यस्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व श्री साईनाथ रुग्णालयाचे दर निश्चित झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यता आली.

प्रस्ताव- माहे एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० श्री साईनाथ रुग्णालयात एकुण रुग्ण संख्या ६०,४०१ वर रक्कम रु. १,८९,६४,१२०/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणनव्वद लाख चौसष्ट हजार एकशे वीस मात्र) इतक्या रक्कमेची वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलतीची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर तसेच मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा विषय मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद समोर मान्यतेकरीता सादर.

**निर्णय क्र.५५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२० ते सप्टेंबर-२०२० या कालावधीत वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१,८९,६४,१२०/-मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३०,८४,८९५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **जुन २०२०** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **६,१८१** व **५४०** आयपीडी रुग्णांपैकी **१,१२५** ओपीडी व **२२४** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.२९,००,६९५/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१९५** रुग्णाना रक्कम **रु.१,८४,२००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४५ | ४,३२,५४९/- | - | ४,३२,५४९/- |
| **२** | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील | १६६ | १२,४०,८१६/- | ४,८९,५६४/- | ७,५१,२५२/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | | | | |
| **३** | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १० | ३०,९०१/- | २,७१२/- | २८,१८९/- |
| **४** | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ३४१ | १५,९५,१६५/- | ७,५८,७८६/- | ८,३६,३७९/- |
| **५** | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ७३ | १०,२१,८८६/- | ६,४५,०००/- | ३,७६,८८६/- |
| **६** | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ७१३ | ४,७५,४४०/- | - | ४,७५,४४०/- |
| | **एकुण** | **१,३४८** | **४७,९६,७५७/-** | **१८,९६,०६२/-** | **२९,००,६९५/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | थॅलेसिमिया | ४८ | ६२,०००/- | - | ६२,०००/- |
| **२** | हिमोफिलीया | २ | ४,८००/- | **-** | ४,८००/- |
| **३** | सिकल सेल अॅनेमीया फ्रि | ० | - | **-** | - |
| **४** | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ६ | ४,८००/- | **-** | ४,८००/- |
| **५** | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ६४ | ६,७००/- | **-** | ६,७००/- |
| **६** | महात्मा फुले आरोग्या योजना | ९ | १६,१००/- | **-** | १६,१००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ६ | ८,२००/- | **-** | ८,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ४ | ५,४००/- | **-** | ५,४००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ५६ | ७६,२००/- | **-** | ७६,२००/- |
| | **एकुण** | १९५ | १,८४,२००/- | **-** | १,८४,२००/- |
| | **एकुण अ+ब** | **१,५४३** | **४९,८०,९५७/-** | **१८,९६,०६२/-** | **३०,८४,८९५/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.३०,८४,८९५/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र. ५५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुन-२०२० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३०,८४,८९५/-मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१७** अ) **संस्थान कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**– १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

अर्जदार संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेली होती.

त्यास अनूसरुन (अ) दि.२७/०३/२०२० रोजीच्या मा.तदर्थ समिती सभेसमोर विषय क्रं.४७ अन्वये १५ कर्मचा-यांची रु.९,६७,७६८/-मात्र रकमेची व (ब) विषय क्रं.४८ अन्वये १८ कर्मचा-यांची रु.२१,६१,१२२/- मात्र रकमेची बिले परतावा मिळणेस मान्यता मिळणेकामी सादर केलेली होती.सदरहू विषयांवर अनुक्रमे निर्णय क्रं.२२६ व २२७ अन्वये " यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचा-यांनी सादर केलेल्या बिलांपैकी साधारण १०% बिलाची At random पडताळणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी व त्यानंतर सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा " असे ठरले होते.

सदरहू संमत निर्णयास अनुसरुन दि.२६/०५/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षामध्ये मा.वैद्यकीय संचालक , खरेदी व्यवस्थापक व संबंधित औषधनिर्माता यांनी वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेले अर्ज व बिले मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर केली. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यामधील random बिलांची पडताळणी केली असता, त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्या नाही. सर्व बिले योग्य असून सदरहू बिलांचा परतावा मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर फेरसादर करावा असे , निर्देश दिलेले आहेत. वैद्यकीय बिल परतावा मिळणेकामी कर्मचा-यांनी सादर केलेल्या बिलांचा तपशील खालीलप्रमाणे –

(अ-)

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | जाधव संध्या विनायक<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-परिचारिका | पती | Hyper Tension/DM<br>उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४६०३.०० | ४६०३.०० |
| २. | विनायक केशव कुलकर्णी<br>विभाग- औ.प्र.संस्था<br>हुद्दा-निर्देशक | पत्नी | Diabetes Hyper Tension मधुमेह /रक्तदाब | डॉ.साबळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३७६८.०० | ३७६८.०० |
| ३ | नवनाथ साहेबराव जाधव<br>विभाग- बगीचा<br>हुद्दा-मदतनीस | आई | Epilepsy<br>पटकी झटके येणे/मेंदुचा आजार | डॉ.गोडगे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ९०२२.०० | ९०२२.०० |
| ४. | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग-आय.टी.आय<br>हुददा-निर्देशक | स्वतः<br>पत्नी | Hyper Tension Ca<br>उच्च रक्तदाब व कर्करोग | डॉ.जाधवर<br>डॉ.बो-हाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १५३६१.०० | १५३६१.०० |
| ५. | रुक्साना साजिद खान<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-परिचारिका | स्वतः | Heart Disease<br>हदयरोग | डॉ.गगन शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८२१३.०० | ८२१३.०० |
| ६. | लिली जोश विदयाथील<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुददा-लॅब टेक्निशियन | पती | DM/Nephro<br>मधुमेह व किडनी आजार | डॉ.वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४४७३.०० | ४४७३.०० |
| ७. | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-बायो. इंजिनिअर | स्वतः | Ulcerative Colities<br>आतड्याच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव<br>डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३१३१.०० | ३१३१.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ एकुण रक्कम रु.** | | | | | ४८५७१.०० | ४८५७१.०० |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले -** | | | | | | |
| ८. | तांबे सुनिल सोपान<br>विभाग-प्रशासन<br>हुददा-<br>मा.कार्य.अ.स्विय.सहा. | पत्नी | Fibriod Uterous C Adenomonsis<br>गर्भाशयात गाठ | डॉ.जाधवर | जहांगीर हॉस्पिटल, पुणे | १८१४३६.०० | १६७०१६.०० |
| ९. | योगेश त्रिंबक साळवी<br>विभाग- प्रसादालय<br>हुद्दा-मदतनीस | स्वतः | कर्करोग<br>Ca | डॉ.खांदे | क्युरी मानवता सेंटर नासिक | ३१०१७३.०० | ३०४२९३.०० |
| १०. | संजय लक्ष्मण कुंभार<br>विभाग- मंदीर<br>हुद्दा-सि.क्लर्क | स्वतः | पोटाचा कॅन्सर<br>Ca | डॉ.राम नाईक | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई | १२१३५२.०० | ११९३९२.०० |
| ११. | शकिला सलीम शेख<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-मदतनीस | पती | Ca<br>तोंडाचा कर्करोग व उजव्या फुफुसात पाणी | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ७९४६९.०० | ७१३२९.०० |
| १२. | बंदावणे सुभाष मल्हारी<br>विभाग-विदयुत पर्यवेक्षक<br>हुद्दा-ध्वनिक्षेपण | मुलगा | Chronic Renal Failure<br>किडनीचा आजार | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल,नासिक | ६८०९०.०० | ६८०९०.०० |
| १३ | स्वाती इंद्रभान कडु<br>विभाग-शिक्षिका<br>हुद्दा-ज्यु.कॉलेज | स्वत:<br>पती | Ca , Diabetes<br>कर्करोग, मधुमेह, पांढरी कावीळ | डॉ.बो-हाडे<br>डॉ.इंगळे | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १०४३२५.०० | १०१४४५.०० |
| १४ | काळे भाऊसाहेब गंगाधर<br>विभाग-संरक्षण<br>हुद्दा-पहारेकरी | स्वत: | Liver Cuitsis Sorasis<br>यकृताचा आजार | डॉ.ढाकणे | सहयाद्री हॉस्पिटल,नासिक | ४८९८३.०० | ४४३१२.०० |
| | **ब एकुण रक्कम रु.** | | | | | ९१३८२८.०० | ८७५८७७.०० |
| | क.संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | |
| १५. | किशोर के क्षिरसागर<br>विभाग-मुंबई कार्यालय<br>हुद्दा-प्र.कार्यालय अधिक्षक | वडिल | Accute Gastro with kidney injury | डॉ.गोरे<br>डॉ.अमोल<br>डॉ.ढाके | नोबल हॉस्पिटल मुंबई | ५७९९०.०० | ४३३२०.०० |
| | **क एकुण रक्कम रु.** | | | | | ५७९९०.०० | ४३३२०.०० |
| | **अ+ ब+क एकुण रक्कम रु.** | | | | | १०२०३८९.०० | ९६७७६८.०० |

(ब-)

| **अ. नं.** | **कर्मचा-याचे नाव** | **कर्मचा-याशी नाते** | **आजाराचे नाव** | **डॉक्टरांचे नाव** | **रुग्णालयाचे नाव** | **एकूण मागणी रक्कम** | **एकूण देय रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-परिचारिका | आई | Diabetes<br>मधुमेह | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४१३५.०० | ३३३६.०० |
| २. | सचिन राजेंद्र क्षिरसागर<br>विभाग- औ.प्र.संस्था<br>हुद्दा-निर्देशक | मुलगा | Diabetes<br>Hyper Tension<br>उच्च रक्तदाब/ मधुमेह | डॉ.साबळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | ५६६१.०० | ५६६१.०० |
| ३ | योगेश बाळकृष्ण गेठे<br>विभाग- औ.प्र.संस्था<br>हुद्दा-ई.एन.टी .सर्जन | वडिल<br>आई | Diabetes<br>Hyper Tension<br>उच्च रक्तदाब/ मधुमेह | डॉ.गायकवाड | श्री साईनाथ हॉस्पिटल | ६०१३.०० | ६०१३.०० |
| ४. | देवराम विठठ्ल तांबे<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुददा-आर .एम .ओ. | आई | Pyelonephritis<br>मुत्रपिंड इन्फेक्शन | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४३५६०.०० | ४३५६०.०० |
| ५. | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-बायो. इंजिनिअर | स्वतः | Ulcerative Colities<br>आतडयाच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४७८९३.०० | ४७८९३.०० |
| ६. | लिली जोश विदयाथील<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुददा-लॅब टेक्निशियन | पती | DM/Nephropath portutunge<br>मधुमेह व किडनी आजार | डॉ.वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५२१९.०० | ५२१९.०० |
| ७. | ज्योतीलाल भिका जाधव<br>विभाग-सहा.भांडारपाल<br>हुददा- आय.टी.आय | स्वत: | Diabetes<br>Blood Pressure<br>मधुमेह /रक्तदाब | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ४९७०.०० | ४९७०.०० |
| | अ एकूण रक्कम रु. | | | | | ११७४५१.०० | ११६६५२.०० |
| | ब संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले | | | | | | |
| ८. | परसराम सोमाजी भालेराव<br>विभाग-साई प्रसादालय<br>हुददा-मदतनीस | पती | Post Dengue encephalitis<br>डेंग्युमुळे मेंदुत ताप | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | २०४४४.०० | २०४४४.०० |
| ९ | नंदा प्रकाश राऊत<br>विभाग-आरोग्य विभाग<br>हुददा-मदतनीस | पती | Glaucoma<br>डोळयाचा आजार | डॉ.अग्रवाल | तुलसी आय हॉस्पिटल नासिक | १४४३०.०० | १४४३०.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | हमीद झुंबर शेख<br>विभाग-कॅन्टीन<br>हुददा-मदतनीस | स्वत: | Renal Transplant किडनी प्रत्यारोपण | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ११०४२७१.०० | ९८७२८८.०० |
| ११ | अशोक गणपत कुरणे<br>विभाग-लेखाशाखा<br>हुददा-मदतनीस | स्वत: | Thrombocytopenia पांढ-या पेशी कमी | डॉ.ढाकणे | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १४८६४९.०० | ११२८५९.०० |
| १२ | स्वाती इंद्रभान कडु<br>विभाग-ज्यु.कॉलेज<br>हुददा-सहा.शिक्षिका | स्वत: | Ca कर्करोग | डॉ.बो-हाडे | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १९००५०.०० | १८७४२०.०० |
| १३ | छाया पोपट शेलार<br>विभाग-साईनाथ हॉस्पि<br>हुददा-मदतनीस | स्वत: | Ca कर्करोग | डॉ.राम नाईक | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | ४०४१०.०० | ४०४१०.०० |
| १४. | सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-विदयुत पर्यवेक्षक<br>हुददा-ध्वनिक्षेपण | मुलगा | Renal Transplant किडनी प्रत्यारोपण | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ३१३४८.०० | ३१३४८.०० |
| १५ | सुनिल बाबुराव देशमुख<br>विभाग-पाणीपुरवठा<br>हुददा-मदतनीस | वडिल | Plasmacytoma of Anterior chest wall कर्करोग | डॉ.राम नाईक | प्रवरा हॉस्पिटल लोणी | ५१५००.०० | ५१५००.०० |
| १६ | जगन्नाथ देवराम डांगे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि<br>हुददा-डायलेसिस टेक्नि. | स्वत: | Neuroblastoma कर्करोग मेंदुचा आजार | डॉ.गोडगे | सहयाद्री हॉस्पिटल नासिक | ५५४०५७.०० | ५०९४९७.०० |
| | ब एकूण रक्कम रु. | | | | | २१५५१५९.०० | १९५५१९६.०० |
| | संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर केलेले ,परंतु निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | |
| १७. | महेश विश्वनाथ पवार<br>विभाग-साईप्रसाद निवासस्थान<br>हुददा-मदतनीस | पत्नी | Sturred Speech Sidded Wedmon मेंदुचा आजार | डॉ.बागवे | सोपान हॉस्पिटल ॲण्ड न्युरोलॉजी नासिक | ९६१८०.०० | ६०७५२.०० |
| | क एकूण रक्कम रु. | | | | | ९६१८०.०० | ६०७५२.०० |
| | संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | |
| १८. | जपे अरविंद दत्तात्रय<br>विभाग-साईबाबा हॉस्पि<br>हुददा-औषधनिर्माता | पत्नी<br>मुलगी | Delivery Pregnency acute febrile illness re on बाळंतपण व लहान बाळाचा आजार | डॉ.नम्रता<br>डॉ.भडांगे | क्षत्रिय हॉस्पिटल सिन्नर डॉ.भडांगे बालरुग्णालय | ३७५७२.०० | २८५२२.०० |
| | ड एकूण रक्कम रु. | | | | | ३७५७२.०० | २८५२२.०० |

| | अ+ ब+क+ड एकूण रक्कम रु. | २४०६३६२.०० | २१६११२२.०० |
|---|---|---|---|

तरी उपरोक्त नमुद केलेल्या संस्थान कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबित असलेल्या कुंटुंबियांचा त्यांचे नावासमोर दर्शविलेला रकमेचा परतावा त्यांना विहीत पध्दतीने अदा करणेस मान्यता असावी.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**ब) संस्थान कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी– पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग-औ.प्र.संस्था<br>हुद्दा-निर्देशक | स्वत: | High Blood Pressure उच्च रक्तदाब | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १२२०५.०० | १२२०५.०० |
| २. | वाल्मिक बापुराव धरम<br>विभाग- सी.सी.टी.व्ही.<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | High Blood Pressure उच्च रक्तदाब | डॉ.देवरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २७१३३.०० | २४८७२.०० |
| ३ | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुदद‌ा-सि.बायो.इंजिनिअर | स्वत: | Ulcerative Colities आतडयाच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४३००८.०० | ४३००८.०० |
| | **अ एकूण रक्कम रु.** | | | | | ८२३४६.०० | ८००८५.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | |
| ४. | मंजुषा विजय चौधरी<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-लॅब टेक्निशियन | वडील | कर्करोग Ca | डॉ.जाधवर | कयुरी मानवता कॅन्सर सेंटर, नासिक | ३६०२५.०० | ३६०२५.०० |
| ५. | सुनिल बाबुराव कोते<br>विभाग-- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा- मदतनिस | स्वत: | यकृताचा कर्करोग | डॉ.बो-हाडे | कयुरी मानवता कॅन्सर सेंटर, नासिक | २८२७५.०० | २८२७५.०० |
| ६. | विजय पंढरीनाथ हुरे<br>विभाग-बगीचा<br>हुद्दा- मदतनिस | स्वत: | कर्करोग Ca | डॉ.बच्छाव | नामको हॉस्पिटल,नासिक | १४९३७.०० | १३४१७.०० |
| ७ | दिलीप बाळकृष्ण औदिच्य<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा- स्टोअर मॅनेजर | आई | उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ.जाधवर | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | १५१६९.०० | १२१६९.०० |
| ८. | सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-विदयुत पर्यवेक्षक<br>हुद्दा-ध्वनिक्षेपण | मुला | Renal Transplant | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | ४०४५६.०० | ३८१५३.०० |
| ९. | स्वाती इंद्रभान कडु<br>विभाग-ज्यु.कॉलेज<br>हुद्दा-सहा.शिक्षिका | स्वत: | कर्करोग Ca | डॉ.बो-हाडे | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | १२९५३६.०० | १२९५३६.०० |
| १० | संजय लक्ष्मण कुंभार<br>विभाग- मंदीर विभाग<br>हुद्दा- वरिष्ठ लिपिक | स्वत: | कर्करोग Ca | डॉ.राम नाईक | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई | २८८५९.०० | २७८७९.०० |
| ११ | भाऊसाहेब गंगाधर काळे<br>विभाग-संरक्षण<br>हुद्दा –पहारेकरी | स्वत: | Liver Limobasis यकृताचा आजार | डॉ.ढाकणे | सहयाद्री हॉस्पिटल,नासिक | ४७०७०.०० | ४४८१०.०० |
| | **ब एकूण रक्कम रु.** | | | | | ३४०३२७.०० | ३३०२६४.०० |
| | क.संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले परंतु निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | |
| १२ | संजय गोपीनाथ कोते<br>विभाग-बांधकाम<br>हुद्दा- मदतनिस | पत्नी | रक्ताचा कर्करोग | डॉ. गायकवाड | एम बी अग्रवाल मुंबई | ३४५६२.०० | २६५२८.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | **क एकूण रक्कम रु.** | ३४५६२.०० | २६५२८.०० |
| | **अ + ब +क एकूण रक्कम रु.** | ४५७२३५.०० | ४३६८७७.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु. ४,३६,८७७-/-इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत** –नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त १२ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. ४,३६,८७७/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

---

**क) संस्थान कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी– पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | योगेश बाळकृष्ण गेठे विभाग- साईनाथ हॉस्पिटल हुद्दा-ई.एन.टी.सर्जन | आई | HTN उच्च रक्तदाब | डॉ.गायकवाड | श्री साईनाथ हॉस्पिटल | ४७७१.०० | ४७७१.०० |
| २. | ज्योतिलाल भिका जाधव विभाग- सी.सी.टी.व्ही. हुद्दा-मदतनीस | स्वत: | HTN Diabetes उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ११७२६.०० | ११७२६.०० |
| ३ | राजेश रमणलाल वाकडे विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा- सि.बायो.इंजिनिअर | स्वत: | Ulcerative Colities आतड्याच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव डॉ.ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४७२६८.०० | ४७२६८.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | संजय लक्ष्मण कुंभार विभाग-मंदिर विभाग हुददा-सि.क्लर्क | स्वत: | Ca कर्करोग | डॉ.उंबरकर डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १६६११.०० | १६२९०.०० |
| | **अ एकूण रक्कम रु.** | | | | | ८०३७६.०० | ८००५५.०० |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | |
| ५. | शकिला सलीम शेख विभाग- साईनाथ हॉस्पि. हुद्दा-आया | पती | Ca कर्करोग | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | २५०२०.०० | २५०२०.०० |
| ६. | स्वाती इंद्रभान कडू विभाग-सिनिअर कॉलेज हुद्दा- सहा.शिक्षिका | स्वत: | Ca कर्करोग | डॉ.बो-हाडे | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | ६४३८२.०० | ६४३८२.०० |
| ७. | काळे भाऊसाहेब गंगाधर विभाग-संरक्षण हुद्दा- पहारेकरी | स्वत: | Liver Limobasis यकृताचा आजार | डॉ.ढाकणे | सहयाद्री हॉस्पिटल,नासिक | ४८२८०.०० | ४५०७७.०० |
| | **ब एकूण रक्कम रु.** | | | | | १३७६८२.०० | १३४४७९.०० |
| | **क. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले परंतु निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | |
| ८ | दिलीप बाळकृष्ण औदिच्य विभाग- साईबाबा हॉस्पि. हुद्दा- स्टोअर मॅनेजर | आई | उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ.जाधवर | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | ६२०७३.०० | ४९६५९.०० |
| ९. | कांताबाई श्रीमंत पटोले विभाग- प्रसादालय हुद्दा-मदतनीस | स्वत: | मेंदूला झटके येणे | डॉ.संजय वराडे | सोपान हॉस्पिटल न्युरोलॉजी नासिक | ११३६०८.०० | ८३३३४.०० |
| | **क एकूण रक्कम रु.** | | | | | १७५६८१.०० | १३२९९३.०० |
| | **अ + ब +क एकूण रक्कम रु.** | | | | | ३९३७३९.०० | ३४७५२७.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु. ३,४७,५२७-/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त ०९ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. ३,४७,५२७/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अ, ब व क मध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे प्रस्ताव 'अ' मधील ३७ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.३१,२८,८९०/-, प्रस्ताव 'ब' मधील १२ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.४,३६,८७७/- व प्रस्ताव 'क' मधील ०९ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.३,४७,५२७/-मात्र त्यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३४,७३,५०८/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **जुलै २०२०** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **५,९२३ व ४६९** आयपीडी रुग्णांपैकी **१,१७३** ओपीडी व **२३५** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.३२,५४,००८/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१९१** रुणाना रक्कम **रु.२,१९,५००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| **अ. नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७७ | ६,४२,०७४/- | - | ६,४२,०७४/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८७ | १४,४४,९२५/- | ६,११,८४५/- | ८,३३,०८०/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६ | ६९,७४२/- | १९,०००/- | ५०,७४२/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ३३० | १२,९४,१२५/- | ६,०८,९९९/- | ६,८५,१२६/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ७५ | १७,८१,६०१/- | १३,६६,०००/- | ४,१५,६०१/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ७३३ | ६,२७,३८५/- | - | ६,२७,३८५/- |
| | **एकुण** | **१,४०८** | **५८,५९,८५२/-** | **२६,०५,८४४/-** | **३२,५४,००८/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४८ | ६९,२००/- | - | ६९,२००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | हिमोफिलीया | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ११ | ११,८००/- | - | ११,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३८ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १३ | १८,०००/- | - | १८,०००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ४ | ७,२००/- | - | ७,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ७ | १०,८००/- | - | १०,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ६८ | ७५,९००/- | - | ७५,९००/- |
| | **एकुण** | १९१ | २,१९,५००/- | - | २,१९,५००/- |
| | **एकुण अ+ब** | **१,५९९** | **६०,७९,३५२/-** | **२६,०५,८४४/-** | **३४,७३,५०८/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.३४,७३,५०८/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुलै-२०२० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३४,७३,५०८/- मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑगस्ट २०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३६,९१,६३६/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **ऑगस्ट २०२०** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **६,६२८ व ५५१** आयपीडी रुग्णांपैकी **१,३९०** ओपीडी व **२३३** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.३५,१३,७३६/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१९९** रुगाना रक्कम **रु.१,७७,९००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६८ | ४,८८,०६१/- | - | ४,८८,०६१/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०२ | १२,८१,२६३/- | ५,५३,२८५/- | ७,२७,९७८/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८ | २४,७२७/- | ७,६१०/- | १७,११७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | २८९ | १३,१८,८७५/- | ६,३७,९४३/- | ६,८०,९३२/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ८७ | ११,६३,९७८/- | ६,६८,५००/- | ४,९५,४७८/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ९६९ | ११,०४,१७०/- | - | ११,०४,१७०/- |
| | **एकुण** | **१,६२३** | **५३,८१,०७४/-** | **१८,६७,३३८/-** | **३५,१३,७३६/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४२ | ५२,६००/- | - | ५२,६००/- |
| २ | हिमोफिलीया | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ८ | ११,६००/- | - | ११,६००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ८२ | ९,२००/- | - | ९,२००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ६ | २१,५००/- | - | २१,५००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ५ | ७,२००/- | - | ७,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ५ | ६,०००/- | - | ६,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ४९ | ६७,४००/- | - | ६७,४००/- |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑगस्ट-२०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३६,९१,६३६/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे ऑगस्ट-२०२० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु. ३६,९१,६३६/- मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२०** **श्री साई धर्मशाळा येथे व श्री साईबाबा संस्थानमार्फत सुरु करणेत आलेल्या कोविड रुग्णालयात उपचार घेत असलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्रं. -नवीन ठराव.

प्रास्ताविक- रुग्ण सेवा हिच ईश्वरसेवा या श्री साईबाबांचे शिकवणीतुनच श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी सन-१९६४ पासुन श्री साईनाथ रुग्णालय (जनरल स्पेशालिटी हॉस्पीटल) व सन-२००६ पासुन श्री साईबाबा (सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल) अशी दोन रुग्णालये कार्यान्वित केली.

मा.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांचेकडील क्र.एमजी-०४/१७०/२०२० दि.०४/०३/२०२० रोजीचे पत्रामध्येराज्य शासनाने कोरोना विषाणू चा प्रादुर्भाव रोखणेसाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २,३,४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अहमदनगर यांनी कोरोना विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणुन अहमदनगर जिल्हामध्ये नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जिल्हातील सर्व महानगरपालिका,

नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रातील ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होऊ शकेल असे कोणतेही ठिकाण होणारी गर्दी टाळण्यासाठी वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी,लॉकडाऊन या उपाययोजनेमुळे व शासनाच्या वेळोवेळीच्या निर्देशानुसार काही व्यक्तींची /रुग्णांची संस्थात्मक विलगीकरण कक्षामध्ये व्यवस्था करणे गरजेचे झाल्याने जिल्हा प्रशासन /आरोग्य विभागामार्फत निश्चीत करणेत येणा-या रुग्णांची अदयावत कक्षामध्ये विलगीकरण करणे अंत्यत आवश्यक झाले आहे.व वैद्यकीय देखभाल पुरविणे आवश्यक आहे.तयाकरिता अशा स्थलांतरीत कामगार व बेघर व्यक्ती यांना निवा-याची व्यवस्था करणे अंत्यत आवश्यक आहे.

त्याअर्थी,मी उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीतील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० अन्वये मौजे निघोज ता.राहाता येथील श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम फेज -२ धर्मशाळा हेलिपॅड रोड येथील दोन हॉल उक्त कारणासाठी दि.०५/०४/२०२० पासुन पुढील आदेशापर्यतअधिग्रहीत करीत आहे.

त्याअनुषंगाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत संस्थात्मक विलगीकरण कक्ष दि.०५/०४/२०२० पासुन बिल्डींग A व बिल्डींग E मध्ये सुरु करणेत आले.

मा.तहसिलदार तथा इंसिडेंट कमांडर,राहाता यांचेकडील क्र.कावि/नैआव्य/३५६/२०२०, दि.२३/०४/२०२० रोजीचे पत्रामध्ये व्दारावती निवासस्थान व श्री साईनाथ रुग्णालय हे अनुक्रमे CCC व DCHC राखीव ठेवुन अधिग्रहन आदेश पारीत केलेले आहेत.तथापी मा.वैद्यकीय संचालक साई संस्थान,शिर्डी यांचेशी समक्ष चर्चा झालेनंतर त्यांना सदर रुग्णालय हे संपूर्ण मोफत असुन तेथे दैनंदिन गरजु रुग्णांची मोठी गर्दी असते.तसेच तेथे स्त्री रोग,बालरोग विभाग सेवा सुरु असल्याने कोव्हिड -१९ साठी संस्थानचे साई आश्रम -२ (साईधर्मशाळा) येथील जागेचा पर्यायी विचार होणेकामी विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने तालुका वैद्यकीय अधिकारी,पंचायत समिती राहाता,वैद्यकीय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय राहाता,मुख्याधिकारी नगर पंचायत शिर्डी यांचे समक्ष तेथील जागेची तसेच मा.वैद्यकीय संचालक यांना सुचविलेल्या पर्यायाची पाहणी केली.मा.वैद्यकीय संचालक यांनी आवश्यक सुविधा तेथे उभारणी चालु असल्याचे निर्दशनास आणून दिलेले आहे.यास्तव कृपया संदर्भाकित आदेशात नमुद केल्याप्रमाणे बदल करुन CCC व DCHC साठी साईआश्रम -२ या संस्थान मालकीच्या इमारतीपैकी विंग A, B, E व F राखीव ठेवण्यात याव्यात अशी विनंती केलेली होती.

त्यानुसार कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत संस्थात्मक विलगीकरण कक्ष दि.०५/०४/२०२० व कोविड केअर सेंटर,डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर दि.०४/०६/२०२० पासून बिल्डींग B व बिल्डींग F मध्ये सुरु करणेत आलेले आहे.

याकरिता श्री साईबाबा संस्थानची इमारत श्रीसाईधर्मशाळा येथे खालीलप्रमाणे एकुण ४ हॉल राखीव ठेवणेत आलेले आहेत.

| **अ. नं.** | **बिल्डींगचे नांव** | **सुरु केलेची तारीख** | **उपलब्ध बेडची संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | **A**(संस्थात्मक विलगीकरण) | दि.०५/०४/२०२० | २५६ बेड |
| | **E**(संस्थात्मक विलगीकरण) | दि.३०/०५/२०२० | २५६ बेड |
| ०२ | **B** (डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर) | दि.०४/०६/२०२० | ११४ बेड |
| ०३ | **F**(कोविड केअर सेंटर) | दि.०४/०६/२०२० | ११४ बेड |

**बिल्डींग A आणि E (संस्थात्मक विलगीकरण)**– संस्थान मार्फत आत्तापर्यत १८५३ व्यक्तींना संस्थात्मक विलगीकरण कक्षामध्ये ठेवणेत आलेले आहे.सदर लोकांची दैनंदिन आरोग्य तपासणी दिवसातुन २ वेळा रुग्णालयाकडुन केली जात आहे.याकरिता रुग्णालयाकडुन तज्ञ डॉक्टर्स,स्टाफ नर्स व वॉर्डबॉय पुरविले जात आहेत.सदर ठिकाणी राहणा-या व्यक्तींची मोफत आरोग्य तपासणी तसेच औषधोपचार केले जात आहेत.

**बिल्डींग F (CCC)** – कोविड केअर सेंटरकरिता राखीव असुन सदर ठिकाणी एकुण ११४ बेड उपलब्ध आहेत.पैकी ६ बेड हे ऑक्सीजन बेड आहेत.सदर ठिकाणी पॉझिटीव्ह रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना भरती करुन सदर व्यक्तींचे घशातील स्त्राव घेवुन त्यांची RT PCR चाचणी/Rapid Antigen Test केली

जाते.आत्तापर्यंत साधारणपणे ११०० संशयीत व्यक्तींची तपासणी करुन पॉझीटीव्ह असणारे रुग्ण संस्थानच्याच DCHC सेंटरला पाठविले जात आहेत.व निगेटिव्ह रुग्ण हे होम विलगीकरण करणेकामी पाठविले जात आहेत.

**बिल्डींग B (DCHC)**-डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर करिता राखीव असुन सदर ठिकाणी ११४ बेड उपलब्ध आहेत.पैकी २४ बेड हे ऑक्सीजन बेड आहेत.सदर ठिकाणी पॉझीटीव्ह आलेले रुग्ण भरती करुन त्यांचेवर शासकीय नियमानुसार ठरवुन दिलेले उपचार करणेत येत आहेत.आजपर्यंत १०९७ रुग्णांवर योग्य ते उपचार करुन बरे झालेनंतर त्यांना घरी सोडणेत आलेले आहे.

दि.०४/०६/२०२० पासुन CCC व DCHC मधील व दि.११/०९/२०२० पासुन DCH मधील रुग्णांना आवश्यकतेनुसार उपचार देणेकामी दोनही रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व इतर स्टाफ आत्तापर्यंत तैनात करणेत आलेला आहे.त्याचे विवरण खालील तक्त्यात दर्शविलेले आहे.

| अ. नं. | वैद्यकीय अधिकारी | सिस्टर ईनचार्ज | स्टाफ नर्स | वॉर्डबॉय | आया | संस्थान आरोग्य कर्मचारी | फोकस स्वच्छता कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ५० | ६० | १५० | ६८ | ६८ | ४३ | ८३ |

याबरोबरच ४ लॅब टेक्नीशियन,१०एक्स-रे टेक्नीशियन,६ ईसीजी टेक्नीशियन देखील ऑनकॉल नेमलेले आहेत.तसेच ४ कान,नाक,घसा तज्ञ डॉक्टर्स रुग्णांचे स्वॅब घेणेकामी तैनात असुन ४ फिजीशियन व ६ भुलतज्ञ डॉक्टर्स हे देखील रुग्णांना आवश्यकतेनुसार ऑनकॉल उपचार देणेकामी तैनात आहेत.CCC व DCHCसेंटरमधील भरती रुग्णांना सकाळचे चहा,नाष्टा,दोन वेळचे जेवण तसेच संध्याकाळचा चहा देखील संस्थानमार्फत मोफत पुरविला जात आहे.

याबरोबरच पुर्वीपासुन चालत आलेली दोन्ही रुग्णालये (श्री साईनाथ व श्री साईबाबा) नॉन कोविड रुग्णांकरिता २४ X ७ कार्यरत आहेत.श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकुण ३०० बेड कार्यरत असुन यामध्ये ८ आयसीयु बेड,५ ऑपरेशन थिएटर्स तसेच अत्यावश्यक अशा स्त्रीरोग व बालरोग विभागातील सेवा सुरु आहेत.तसेच श्री साईबाबा रुग्णालयामध्ये एकुण २५० बेड असुन यामध्ये ६० बेड आयसीयु बेड, ८ ऑपरेशन थिएटर्स तसेच अत्यावश्यक अशा कार्डियाक,कार्डिओथोरॅसीक,न्युरो व डायलेसिस विभागातील सेवा सुरु आहेत.सदर दोनही रुग्णालयात दैनंदिन रुग्णांची तपासणी व उपचाराबरोबरच सर्पदंश,विषबाधा,हृदयविकाराचा झटका,डायलेसिस,अपघात,स्त्रीरोग व बालरोग विभागातील अत्यावश्यक सेवा आजअखेर सुरु आहेत.

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव सुरु झालेपासुन आजअखेर दोनही रुग्णालयामध्ये खालीलप्रमाणे रुग्णांवर उपचार करणेत आले.

**श्री साईनाथ रुग्णालय**

| महिना | ओपीडी | आयपीडी | शस्त्रक्रिया | तपासण्या (एक्स-रे) |
|---|---|---|---|---|
| एप्रिल -२०२० | ७४०० | १९० | ३६ | ८८९ |
| मे -२०२० | ९९४५ | २३६ | १४७ | ५५२ |
| जुन-२०२० | ९९३८ | ३३६ | २७३ | ६२३ |
| जुलै-२०२० | १०७५४ | ३८६ | ३३५ | ८६२ |
| ऑगस्ट-२०२० | ११६०६ | ४८० | ३३९ | ९८० |
| **एकुण** | **४९६४३** | **१६२८** | **११३०** | **३९०६** |

**श्री साईबाबा हॉस्पिटल**

| महिना | ओपीडी | आयपीडी | शस्त्रक्रिया | तपासण्या (एक्स-रे) | सीटी स्कॅन | डायलेसिस |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल-२०२० | ३८८३ | ३१७ | १३७ | ७१८ | २७३ | २१२ |
| मे -२०२० | ५५८१ | ४५० | २३२ | ९७३ | ४९८ | १७० |
| जुन-२०२० | ६१८१ | ५४० | ३०५ | ११०४ | ६०७ | २०७ |
| जुलै-२०२० | ५९२३ | ४६९ | २९२ | ११५२ | ९५८ | २१६ |
| ऑगस्ट-२०२० | ६६२८ | ५५१ | ३०६ | १०५९ | १५७६ | १७३ |
| **एकुण** | **२८१९६** | **२३२७** | **१२७२** | **५००६** | **३९१२** | **९७८** |

श्री साईबाबा रुग्णालयामध्ये भरती होणा-या एकुण रुग्णांपैकी ५० % रुग्ण हे आयसीयु विभागातील रुग्ण असुन ते अत्यावश्यक सेवेत मोडत आहेत.तसेच दैनंदिन दोनही रुग्णालयाकडे येणारे रुग्णांपैकी आजपर्यंत एकुण २२५ रुग्ण कोवीड करिता संशयीत म्हणुन आढळुन आलेले आहेत.या रुग्णांना पुढील उपचारा करीता संस्थानच्या CCC व DCHC तसेच अत्यावश्यक रुग्णांना सिव्हील हॉस्पीटल,अहमदनगर येथे पाठविणेत आलेले आहे.

श्री साईधर्मशाळा येथील Aबिल्डींग मध्ये संस्थात्मक विलगीकरण,B बिल्डींग मध्ये डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC),F बिल्डींग मध्ये कोरोना केअर सेंटर चालु करणेबाबत व व्दारावती भक्तनिवास येथे सर्व हेल्थ वर्कर यांचे संस्थानमार्फत अलगीकरण करणेकामी व सदर ठिकाणी कोणकोणत्या विभागांनी काय कामे करावे याबाबत दि.०४/०५/२०२० रोजीच्या टिपणीन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.सदर CCC व DCHC सेंटर मध्ये ११४ बेडप्रमाणे एकुण २२८ बेड कोविड रुग्णांकरिता तयार करण्यात आले.इमारत क्रं. F बाहेरील बाजुस संशयीत रुग्णांचे घशातील स्वॅब घेणेकामी स्वतंत्र स्वॅब बुथचेही व्यवस्था करणेत आली.सदर ठिकाणी रुग्णांनचेच ईएनटी सर्जन काम बघतात(स्वॅब घेतात).

दि.१५/०६/२०२० रोजीच्या टिपणीन्वये (CCC) कोरोना केअर सेंटर व (DCHC) डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर मध्ये ठेवण्यात येणा-या रुग्णांवर होणारा खर्च हा श्री साईबाबा रुग्णालयाच्या जनरल वॉर्डमधील उपचाराच्या सेवाआकाराप्रमाणे दर लावणेस,तसेच सदरची सेवा मोफत देणेस व सदरचा खर्च हा चॅरीटी खाती खर्ची टाकणेस प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

मा.तहसिलदार राहाता यांचेकडील क्र.कावि /नैआव्य /१०२७ /२०२०, दि.१३/०८/२०२० रोजीचे पत्रामध्ये कोविड रुग्णांच्या उपचारासाठी साईआश्रम फेज २ येथे कोव्हीड केअर सेंटर(CCC) व डेडिकेटेड कोवीड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेत आलेले आहे.त्याठिकाणी सध्या १८४ कोरोना बाधीत रुग्णांवर उपचार सुरु आहेत.तसेच सध्या राहाता तालुक्यामध्ये कोरोना विषाणु (कोव्हिड -१९) च्या रुग्णांमध्ये झपाटयाने वाढ होत आहे व त्यामध्ये काही रुग्णांना Oxygen Bed तसेच ICU Bed ची गरज भासत आहे.त्यासाठी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.सदर बैठकीस तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक,गट विकास अधिकारी,वैद्यकीय संचालकश्री साईबाबा हॉस्पीटल,शिर्डी,वैद्यकीय अधिकारी,साईनाथ हॉस्पीटल,शिर्डी वैद्यकीय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय राहाता,वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय राहाता व तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती राहाता उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये वरील परिस्थितीचा विचार करता श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी येथील B मध्ये विस्तारीत डेडिकेटेड कोवीड हेल्थ सेंटर सुरु करण्याबाबत चर्चा करण्यात आली व सदरच्या इमारतीमध्ये उपलब्ध सुविधांचा आढावा घेण्यात आला व त्याठिकाणी ४० Bed Oxygen सह व १० ICU Beds,५ Ventilator सुरु करण्याबाबतचे प्रस्तावित आहे.

तसेच तालुक्यातील कोवीड रुग्णांची सातत्याने वाढती संख्या व गंभीर रुग्णांची संख्या लक्षात घेता साईनाथ हॉस्पीटल,शिर्डी येथीलB विंग येथे ४० Bed Oxygen सह,१० ICU Beds,५ Ventilator सह व अनुषंगीक तपासण्या ( HRCT,Labrotaryतपासण्या,X-rayइतर) रुग्णांच्या मोफत उपचाराकरिता सुरु करण्यासाठी संबंधीतांना योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केलेली आहे.

तरी,मा.तहसिलदार तथा इंसिडेट कमांडर राहता,यांनी पत्रात नमुद केलेप्रमाणे सद्यस्थितीला डॉक्टर्स, लॅब व इतर तपासणी तसेच औषधे याबाबी रुग्णालयामध्ये उपलब्ध नसलेमुळे सदरच्या बाबी या शासन स्तरावर उपलब्ध होणेबाबतचे पत्र मा.जिल्हा शल्य चिकीत्सक यांना दि.२४/०८/२०२० रोजी दिलेले आहे.

**सदर पत्रामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.**

| | **संस्थानकडुन पुरविण्यात येणा-या बाबी** | **शासन स्तरावर उपलब्ध करावयाच्या बाबी** |
|---|---|---|
| १) | फिजीशियन (ऑन कॉल) – १ प्रति दिन | जनरल डयुटी एमबीबीएस डॉक्टर्स -८ प्रति दिन |
| मनुष्यबळ | भुलतज्ञ (ऑन कॉल) – १ प्रति दिन | |
| | ईएनटी सर्जन (ऑन कॉल) – १ प्रति दिन | |
| | एक्स–रे टेक्नीशियन(ऑन कॉल)–१ प्रति दिन | |
| | लॅब टेक्नीशियन (ऑन कॉल) – १ प्रति दिन | |

| | | |
|---|---|---|
| | इनचार्ज सिस्टर्स – २ प्रति दिन | |
| | स्टाफ नर्स -३६ प्रति दिन | |
| | वॉर्ड बॉय -३६ प्रति दिन | |
| | वॉर्ड आया -३६ प्रति दिन | |
| | स्वच्छता कर्मचारी -१६ प्रति दिन | |
| २) लॅब व इतर तपासण्या | CBC,RFT,RBS,LFT,ABG,ESR,CRP,Sr.Triglisrid,BloodC/S,ECG,CXR,HRCT CHEST ETC. | RTPCR For Corona TestingSr.Ferritim,DDimer,LDH, Tropnini,CPKMB,IL6 |
| ३) औषधे | Tab.Vit C,<br>Tab.Zinc with Multivitamin<br>Tab Cefiximen 200 mlg<br>Tab.Amaxoclav 625 mlg<br>Inj. Ceftrixazole 1 gm<br>Inj.Tazobactum/ Piperacilln<br>Inj.MPS | Tab.Vit D3 6000 IU<br>Tab.Favipivavir<br>Tab.HCQ<br>Inj.Lmwx 40 mlg<br>Inj.Remdecivir 200 mlg<br>Inj.Dexa 8 mlg<br>Inj.Tocilizumab<br>Inj.Meropenem 1gm |

परंतु मा.जिल्हा शल्य चिकीत्सक,यांचे दुरध्वनीवरील चर्चेवरुन सदरचे कोविड हॉस्पीटल लवकरात लवकर सुरु करणे गरजेचे असलेचे त्यांनी सांगितले.

तदनंतर मा.तहसिलदार राहाता यांचेकडील क्र.कावि /नैआव्य /१२१७ /२०२०, दि.०३/०९/२०२० रोजीचे पत्रामध्ये,दरम्यानच्या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयाच्या ऐवजी डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल हे साईआश्रम फेज २ शिर्डी येथे सुरु करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती केलेली आहे.तसेच तिथे दाखल होणा-या रुग्णांना उपलब्ध असणा-या सुविधा मोफत देणेत याव्यात.ज्या सुविधा उपलब्ध नाहीत(रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे ,लॅब टेस्ट)त्याकरिता रुग्णांनी स्वत: खर्च करावयाचा आहे.तरी दि.२१/०८/२०२० रोजी देणेत आलेले पत्र रदद समजुन नवीन पत्राप्रमाणे कार्यवाही करणेच्या सुचना संबंधीताना दयाव्यात, हि नम्र विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री साईधर्मशाळा येथील E बिल्डींगमधील संस्थात्मक विलगीकरण लॉकडाऊन बंद झालेपासुन सदर बिल्डींग मध्ये (DCH) डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल खालील आराखडयाप्रमाणे बदल करुन सुरु करणेत आलेले आहे.

१) **तळमजला (डावी बाजु)-**

| **वॉर्डचे नांव** | **ऑक्सीजन बेड** | **व्हेंटीलेटर बेड** | **एकुण बेड** |
|---|---|---|---|
| रुम नं.१ | ६ बेड ऑक्सीजन | ३ बेड व्हेंटीलेटर | ०६ बेड |
| रुम नं.२ | ६ बेड ऑक्सीजन | २ बेड व्हेंटीलेटर | ०६ बेड |
| रुम नं.३ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| रुम नं.४ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| | | **एकुण** | २४ बेड |

**२) तळमजला (उजवी बाजु)–(सारी रुग्णांकरिता)**

| **वॉर्डचे नांव** | **बेड** | **व्हेंटीलेटर बेड** | **एकुण बेड** |
|---|---|---|---|
| रुम नं.१ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| रुम नं.२ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| रुम नं.३ | स्टाफ रुम | ० | |
| रुम नं.४ | स्टोअर रुम | ० | |
| | | **एकुण** | **१२ बेड** |

**३) पहिला मजला (डावी बाजु)-**

| **वॉर्डचे नांव** | | **ऑक्सीजन बेड** | **एकुण बेड** |
|---|---|---|---|
| रुम नं.१ | | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| रुम नं.२ | | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| रुम नं.३ | | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| रुम नं.४ | | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| | | **एकुण** | **२४ बेड** |

जावक क्रं.जिनिस/0/2020/Sep/AAO/00681दि.०४/०९/२०२०पत्रान्वये,मा.आमदार राधाकृष्ण विखे पाटील, शिर्डी विधानसभा मतदार संघ यांचे स्थानिक आमदार निधीतुन सेंट्रल ऑक्सीजन सिस्टीम,एअर कॉमप्रेसर व ऑक्सीजन प्लोमीटर हयुमीडीफायरकरिता एकुण ७,७९,७००/-(रु.सात लाख एकोणऐंशी हजार सातशे मात्र) देणेत आलेले आहे.

तरी वरील आराखडयाप्रमाणे कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांकरिता ४८ बेड राखीव पैकी ५ बेड व्हेंटीलेटर,तसेच सारी या आजारांच्या रुग्णांकरिता १२ बेड राखीव असे एकुण ६० बेड रुग्णांकरिता तयार करणेत आलेले आहे.Air Compressor चे काम चालु असल्याने सारी रुग्णांकरीता असलेले बेड सदयस्थितीला कार्यान्वीत करणेत आलेले नाहीत. सदर ठिकाणी उपचार घेणा-या सर्व रुग्णांची लॅब, एक्स–रे, ईसीजी तसेच स्वॅब तपासणी ही देखील तेथेच करणेत येत आहे.

श्री साईबाबा संस्थानकडुन लागणारे मनुष्यबळ स्टाफ नर्स, टेक्निशियन, स्वच्छता कर्मचारी हे उपलब्धतेनुसार पुरविले जात आहेत.CCC, DCHC व DCH सदर ठिकाणी उपचार घेत असलेल्या रुग्णांना संस्थान रुग्णालयात उपलब्ध असणा-या सर्व तपासण्या व औषधोपचार या रुग्णालयाकडुन मोफत पुरविणेत येत आहेत.तसेच जी औषधे रुग्णालयात उपलब्ध नाहीत ती जिल्हा रुग्णालय,अहमदनगर यांचेकडे मागणी केलेली आहे.

परंतु जी औषधे उपलब्ध नाहीत ती रुग्णांना बाहेरुन आणणेस सांगणेत येत आहे. तसेच ज्या तपासण्या रुग्णालयात उपलब्ध नाहीत त्या देखील रुग्णांना बाहेरुन करणेस सांगणेत येत आहे.

**प्रस्ताव: -**महाराष्ट्र शासनाच्या (मा.तहसिलदार तथा इंसिडेंट कमांडर,राहाता) यांचे पत्रानुसार श्री साईधर्मशाळा येथील बिल्डिंग E मध्ये DCH कार्यान्वीत करणेसदि.१४/०९/२०२० रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे.सदर DCHकार्यान्वित करणेकामी व रुग्णांना लागणारी औषधे जी रुग्णालयात उपलब्ध आहेत ती मोफत देणेस व उपचार देखील मोफत करणेत देखील मान्यता मिळालेली आहे.तसेच जे औषधे व लॅब तपासण्या रुग्णालयात उपलब्ध नाहीत त्या बाहेरुन रुग्णांना स्व:त करुन घेणेस देखील मान्यता घेतलेली आहे.

दि.०४/०६/२०२० पासुन कोविड सेंटर सुरु झालेपासुन कोवीड रुग्णांना उपचाराकरिता श्री साईबाबा संस्थान मार्फत (औषधे व सर्जिकल साहीत्य) एकुण ६४,८७,५१८/- (रु.चौसष्ट लाख सत्याऐंशी हजार पाचशे अठरा रुपये मात्र) इतका खर्च झालेला आहे.तसेच CCC व DCHC आयपीडी रुग्णांचे दि. ०४/०६/२०२० ते दि. ३०/०६/२०२० रोजी अखेर आय.पी.डी.बिलापोटी रक्कम रु.४,४५,६०८/-(चार लाख पंचेचाळीस हजार सहाशे आठ मात्र) हा झालेला खर्च मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीच्या समोर मान्यतेसाठी व अवलोकनार्थ सादर करणेस मान्यता असावी.तसेच जुलै पासुन ते आज अखेर पर्यत कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता रुग्णांवर उपचारापोटी मोफत खर्च केला जात आहे.सदर उपचारापोटी खर्च झालेल्या रकमेची बिले तयार करणेत येऊन चॅरीटी खाती खर्ची टाकता येईल.

तरी दि.०४/०६/२०२० पासुन सुरु करणेत आलेल्या CCC व DCHC येथील रुग्णांवर होणा-या खर्चास तसेच दि.११/०९/२०२० पासुन डेडिकेटेड कोविड हॉस्पीटल सुरु झालेपासुन सदर रुग्णांवर होणारा खर्च (ऑक्सीजन,व्हेंटीलेटर,औषधे व सर्जिकल साहित्य व जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट खर्च) श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयाच्या चॅरीटी खाती खर्ची टाकणेस मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीच्या सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत श्री साई धर्मशाळा येथे सुरु करण्यात आलेल्या कोव्हीड रुग्णालयात उपचार घेतलेल्या रुग्णांकरीता झालेल्या खर्चास व सदरचा खर्च संस्थानच्या रुग्णालय चॅरीटी खाती खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बीलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४०,५७,४७९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे सप्टेंबर २०२० मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण ८,५०५ व ६०८ आयपीडी रुग्णांपैकी १,६५४ ओपीडी व २५२ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.३८,८४,४७९/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्यासंबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/ एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१७१** रुग्णाना रक्कम **रु.१,७३,०००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७६ | ५,१२,५६६/- | - | ५,१२,५६६/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २६२ | १५,८५,१०३/- | ७,०६,०६४/- | ८,७९,०३९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ९ | ६५,२६७/- | ३०,०००/- | ३५,२६७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ३०३ | १३,११,९१६/- | ७,१७,१७३/- | ५,९४,७४३/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ९९ | १८,८९,३७४/- | ११,८८,९५०/- | ७,००,४२४/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | १,१५७ | ११,६२,४४०/- | - | ११,६२,४४०/- |
| | **एकुण** | **१,९०६** | **६५,२६,६६६/-** | **२६,४२,१८७/-** | **३८,८४,४७९/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४२ | ६१,०००/- | - | ६१,०००/- |
| २ | हिमोफिलीया | २ | १,६००/- | - | १,६००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ४ | २,२००/- | - | २,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ५६ | ६,०००/- | - | ६,०००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ४ | ३,०००/- | - | ३,०००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | १५,०००/- | - | १५,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ५४ | ८१,८००/- | - | ८१,८००/- |
| | **एकुण** | १७१ | १,७३,०००/- | - | १,७३,०००/- |
| | **एकुण अ+ब** | **२,०७७** | **६६,९९,६६६/-** | **२६,४२,१८७/-** | **४०,५७,४७९/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **सप्टेंबर २०२०** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.४०,५७,४७९/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बीलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४०,५७,४७९/-मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये आक्टोंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३४,३०,४७९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **ऑक्टोबर २०२०** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **७,७७९ व ५७९** आयपीडी रुग्णांपैकी **१,५४२** ओपीडी व **२९०** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.३२,८१,५७९/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१७२** रुणाना रक्कम **रु.१,४८,९००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १०२ | ५,२८,९८५/- | - | ५,२८,९८५/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३२३ | १७,९४,२७०/- | ८,२२,८२१/- | ९,७१,४४९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७ | २५,४२३/- | ३,०००/- | २२,४२३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ३८४ | १३,१९,४१७/- | ७,७५,१६७/- | ५,४४,२५०/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ११० | २४,१६,२२७/- | १८,०६,५००/- | ६,०९,७२७/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ९०६ | ६,०४,७४५/- | - | ६,०४,७४५/- |
| | **एकुण** | **१,८३२** | **६६,८९,०६७/-** | **३४,०७,४८८/-** | **३२,८१,५७९/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४२ | ४८,६००/- | - | ४८,६००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ४ | ५,४००/- | - | ५,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ५५ | ६,१००/- | - | ६,१००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ८ | ६,०००/- | - | ६,०००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ५ | ६,०००/- | - | ६,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ० | - | - | - |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ५८ | ७६,८००/- | - | ७६,८००/- |
| | **एकुण** | १७२ | १,४८,९००/- | - | १,४८,९००/- |
| | **एकुण अ+ब** | **२,००४** | **६८,३७,९६७/-** | **३४,०७,४८८/-** | **३४,३०,४७९/-** |

प्रस्ताव - उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑक्टोबर २०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३४,३०,४७९/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये आक्टोंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३४,३०,४७९/-मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये २१ डिसेंबर २०१९ ते ऑगस्ट २०२० या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यासाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने फेरनेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**मा व्यवस्थापन समिती ठराव क्र-**

मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७२.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयामधील वैद्यकीय अधिकारी व एक फिजिओथेरपिस्ट ठेकेदारामार्फत यांना त्यांचे नेमणूक संपुष्टात असल्याचे लगतचे दिनांकापासून ४ दिवस सेवा खंडीत करून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षीका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्याटप्याने नेमणूक देण्यात मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना-** माहे २१ डिसेंबर २०१९ ते २४ ऑगष्ट २०२० या कालावधीत श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वेळोवेळी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व फिजिओथेरपिस्ट (ठेकेदारामार्फत) यांच्या ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे नेमणूका केलेल्या आहेत.

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पदाचे नाव | नेमणूक दिनांक | ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्ठात येत असल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| १ | डॉ पोर्णीमा रामराव शेळके | वैद्यकीय अधिकारी (दंतरोग) श्री साईबाबा हॉस्पिटल | २१/१२/२०१९ | २०/११/२०२० |
| २ | डॉ सचिन श्रीहरी यादव | कनिष्ठ भुलतज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ३ | डॉ प्रसाद रामभाऊ उंबरकर | मेंदूशल्य विशारद श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ४ | डॉ गणेश सदाशिव चौधरी | शल्य चिकित्सक, श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ५ | डॉ विक्रांत विश्वास खैरणार | मानसोउपचार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ६ | डॉ प्रियंका विलास गायकवाड | स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ७ | डॉ गगन सुरेंद्रकुमार शर्मा | ह्दयविकार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २६/०१/२०२० | २५/१२/२०२० |
| ८ | डॉ उज्वला भाऊसाहेब काळे | मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ) श्री साईनाथ रूग्णालय | १३/०२/२०२० | १२/०१/२०२१ |
| ९ | डॉ स्वप्नाली राम चव्हाण | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | १३/०२/२०२० | १२/०१/२०२१ |
| १० | डॉ विशाल धनाजी पटेल | मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन) श्री साईनाथ रूग्णालय | १३/०२/२०२० | १२/०१/२०२१ |
| ११ | डॉ संदीप नारायणराव देवरे | ह्दयविकार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०३/२०२० | ०९/०२/२०२१ |
| १२ | डॉ नितीन दशरथ ठाकरे | ह्दयविकार शस्त्रक्रिया तज्ञ | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | श्री साईबाबा हॉस्पिटल | | |
| १३ | डॉ विजय मुरलिधर थोरात | शल्य चिकित्सक<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १४ | डॉ विद्या मनोहर बोराडे | शल्य चिकित्सक<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १५ | डॉ शोभना तुकाराम कोल्हे | मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी)<br>श्री साईनाथ रूग्णालय | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १६ | डॉ रोहित राजेंद्र सप्रे | ज्युनियर मायक्रोबायोलॉजीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १७ | डॉ अंजली पदमाकर सोनवणे | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १८ | डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १९ | डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे | कनिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ<br>श्री साईनाथ रूग्णालय | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| २० | विश्वजीत विश्वनाथ गायकवाड<br>(ठेकेदारामार्फत) | फिजिओथेरपिस्ट (बाह्ययंत्रणेमार्फत)<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | २४/०४/२०२० | २३/०३/२०२१ |
| २१ | डॉ अविनाश लक्ष्मणराव<br>जाधवर | फिजिशियन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०५/२०२० | १९/०४/२०२१ |
| २२ | डॉ शिरीष शशीकांत शेळके | कान, नाक, घसा तज्ञ<br>श्री साईनाथ रूग्णालय | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २३ | डॉ अभिषेक जयराम खोडे | मेडीकल ऑफिसर (होमिओपॅथी)<br>श्री साईनाथ रूग्णालय | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २४ | डॉ देविदास लक्ष्मण लव्हाटे | रेसिडेंट मेडीकल ऑफिसर<br>श्री साईनाथ रूग्णालय | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २५ | डॉ श्रीकांत मधुकर नागरे | वरिष्ठ क्ष-किरण शस्त्रज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २६ | डॉ अजिंक्य बन्सीधर ढाकणे | वैद्यकीय उपचार तज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| २७ | डॉ शिल्पा दशरथ सोनावणे | वरिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| २८ | डॉ कल्याणी साहेबराव शिंदे | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| २९ | डॉ रविंद्र शांताराम गायकवाड | मेडीकल ऑफिसर (फिजिशियन)<br>श्री साईनाथ रूग्णालय | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| ३० | डॉ प्रिती हिरालाल दोशी | स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| ३१ | डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर | आस्थीरोग शस्त्रक्रिया तज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | २४/०८/२०२० | २३/०७/२०२१ |
| ३२ | डॉ अमित दिपक नाईकवाडे | मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन)<br>श्री साईनाथ रूग्णालय | २४/०८/२०२० | २३/०७/२०२१ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १९ डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे, कनिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय यांची कोरोना विषाणु कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत DCHC सेंटर मध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून ड्युटी नेमणुक करण्यात आली होती. सदर ठिकाणी मा जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तज्ञ वैद्यकीय अधिकारी सातत्याने ड्युटीवर असणे क्रमप्राप्त आहे. दि.०८/१०/२०२० रोजी DCHC सेंटरमध्ये सकाळी ०८ ते ०२ ड्युटी असताना गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधीत ठिकाणी गैरहजर असल्याने कोवीड सेंटरमधील रूग्णांची हेळसांड झालेली आहे. आपत्ती व्यवस्थापन सारख्या अति महत्वाच्या विषयाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसुन येते. सदर गैरवर्तनामुळे रूग्ण तपासणीकामी अडथळा निर्माण झाला. कोवीड रूग्णांची तपासणी करणेकरीता डॉक्टर उपलब्ध झाले नाहीत. सदर गैरवर्तनामुळे रूग्ण तपासणीकामी अडथळा निर्माण झाला. सदरचे कृत्य हे गैरवर्तन असुन त्यांचे काम व वर्तणूक असमाधानकारक असल्याने त्यांना पुन्हा ११ महिने कालावधीकरीता नेमणूक देता येणार नाही.

उपरोक्त सर्व वैद्यकीय अधिकारी व फिजिओथेरपिस्ट यांचा नेमणूक कालावधी त्यांचे नावासमोर स्तंभ क्र ०५ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. नेमणूक संपुष्टात आल्यानंतर पुन्हा नेमणूक देतांना साधारण ४ दिवस अंतर / सर्विस ब्रेक देऊन नेमणूक देण्यात येते. हॉस्पिटलमधील ओपीडी, ऑपरेशन थिएटर, वॉर्ड या ठिकाणी कामाची अडचण होऊ नये म्हणून एकाच वेळी एकापेक्षा जास्त वैद्यकीय अधिका-याची मुदत संपुष्टात

येत असल्यास त्या सर्व वैद्यकीय अधिका-यांना एकाच वेळी ४ दिवस अंतर / सर्विस ब्रेक न देता आळी-पाळीने ४ दिवस अंतर / सर्विस ब्रेक देण्यात येते.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १९ डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे यांचे नेमणूक कालावधीतील कामकाज समाधानकारक नसुन त्यांना पुन्हा ११ महिने कालावधीची नेमणूक देण्यात येऊ नये. तसेच उपरोक्त इतर वैद्यकीय अधिकारी व एक फिजिओथेरपिस्ट (ठेकेदारामार्फत) यांना त्यांचे नेमणूक संपुष्टात येत असल्याचे लगतचे दिनांकापासून ४ दिवस अंतर / सर्विस ब्रेक देऊन पुन्हा ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक/ वैद्यकीय अधिक्षीका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्याटप्याने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५५८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये २१ डिसेंबर २०१९ ते ऑगस्ट २०२० या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यासाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने फेरनेमणूक देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असल्याने आजचे सभेत सदरचा विषय मागे घेण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२४** **संस्थान परिसरात साईभक्तांच्या सोईसाठी प्रसाद नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री, जनरल स्टोअर्स, शालेय साहित्य इत्यादी व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या संस्थानमालकीचे विविध बारा ठिकाणचे जागा/गाळे वापराची मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेस/१९३/ २०१९, दि.१४.१२.२०१९.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेतील विषय नं.१ निर्णय क्रं.१७३ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

दि.२६/०२/२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

दि.२६/०२/२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

१) निर्णय क्रं.१३१–यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थान परिसरात साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह, क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद नॉव्हेल्टी,दुध व दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय विक्री,जनरल स्टोअर इत्यादी व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या विविध १२ ठिकाणचे जागा/गाळे वापरास मुदतवाढ देण्यात येऊ नये, त्याऐवजी सदर १२ ठिकाणचे जागा/गाळयामध्ये प्रस्तावात नमुद केलेले व्यवसाय चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना पाचारण करण्यात यावे,असे ठरले.

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थान मालकीचे उपरोक्त प्रस्तावातील खालील परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या १२ ठिकाणच्या जागा/गाळा त्यासमोर दर्शविलेल्या प्रयोजनासाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठीच्या वापरास मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे भाडे करारनामा नोटराईज करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

परिशिष्ट "अ"

| अ.नं. | गावाचे नाव | ठिकाण (लोकेशन) | सर्वे नं. (पैकी) | जागा/गाळा साईज (फूट) | प्रयोजन | एकूण स्टॉल | दि.१६/०५/२०१८ ते दि.१५/०४/२०१९ या कालावधीचे मासिक भाडे | १०% वाढ करुन होणारे मासिक भाडे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | शिर्डी | साईआश्रम भाग-१ - आर ब्लॉक च्या दक्षिण बाजूकडील लाडू विक्री काऊंटर शेजारील मोकळी जागा | १०९ | १०x१० मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर. | ०१ | ७४३/- | ८१७/- |
| २ | निमगाव-को-हाळे | साईआश्रम भाग-२ धर्मशाळा-ज्युनियर कॉलेजचे दक्षिण प्रवेशद्वाराजवळ पार्कींग परिसरामध्ये. | १७२ | १०x१० मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय विक्री स्टॉल. | ०१ | ३०२/- | ३३२/- |
| ३ | शिर्डी | द्वारावती भक्तनिवास - द्वारावती भक्तनिवासचे दक्षिण बाजूकडील मोकळया जागेत. | १४८ | १०x१० मोकळी जागा | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम. | ०१ | ४९२/- | ५४१/- |
| ४ | शिर्डी | साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) - साईबाबा भक्तनिवासस्थानमधील डी गाळा (बांधीव) नं.२,३ व ४.<br>(एकूण ३ गाळे) | १०७<br>१०७<br>१०७ | २९x११ बांधीव गाळा नं.२<br>२९x११ बांधीव गाळा नं.३<br>२९x११ बांधीव गाळा नं.४ | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर. | ०३ | ४,९९२/-<br>४,९९२/-<br>४,९९२/- | ५,४९१/-<br>५,४९१/-<br>५,४९१/- |
| ५ | निमगाव-को-हाळे | साई प्रसादालय - साई प्रसादालय इन गेटजवळ. | ८५ | १०x१० मोकळी जागा | प्रसाद विक्री स्टोअर. | ०१ | ३०२/- | ३३२/- |
| ६ | शिर्डी | शैक्षणिक संकुल –<br>१) औ.प्र.संस्था मुख्य गेटजवळ<br>२) इंग्लिश मेडीयम स्कूल-शैक्षणिक संकुलाचे प्रवेशद्वार उत्तर बाजूचे भिंतीलगत पूर्व बाजूने<br>३) कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस. | १०८<br>१०८<br>१०८ | १०x१० मोकळी जागा<br>१०x१० मोकळी जागा<br>१०x१० मोकळी जागा | शालेय साहित्य अल्पदराने विक्री करणेसाठी | ०३ | ५९०/-<br>५९०/-<br>५९०/- | ६४९/-<br>६४९/-<br>६४९/- |
| ७ | शिर्डी | साईनाथ रुग्णालय - चहा कॅन्टीन समोरील मोकळया जागेत | १४८ | १०x१० मोकळी जागा | जनरल स्टोअर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय स्टोअर. | ०१ | ४९२/- | ५४१/- |
| ८ | शिर्डी | साईनाथ मंगल कार्यालय - मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूस असणारी संरक्षक भिंत व मंगल कार्यालय यांच्यामध्ये लिंबाचे झाडाखाली. | ४ | १०x१० मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल. | ०१ | १,०७८/- | १,१८६/- |
| | | | | | **एकूण** | **१२** | | |

उपरोक्त निर्णयाप्रमाणे उक्त सोसायटीकडून दि.०४/०९/२०१९ रोजी करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. सदर करारनाम्याप्रमाणे उपरोक्त जागा वापराची मुदत दि.१५/०३/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१९३/२०१९ दि.१४/१२/२०१९ अन्वये संस्था श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम कर्मचा-यांची नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्था संस्थेच्या सभासदांना कर्ज पुरवठयाबरोबरच संस्थान परिसरात संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मोफत पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम सुविधा चालवत आहे. त्याचप्रमाणे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था,प्रसाद विक्री स्टोअर,

नॉव्हेल्टी स्टोअर, दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टोअर, शालेय साहित्य विक्री केंद्र चालवत असून त्या माध्यमातून श्री साईभक्तांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना वाजवी दरात चांगली सेवा पुरवित आहे.

संस्थेस सदर व्यवसायांचे माध्यमातून मिळणा-या उत्पन्नातून संस्था संस्थेच्या सभासदांना म्हणजेच संस्थान कर्मचा-यांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठयाबरोबरच अनेक सुविधा पुरवत आहे. त्यामुळे संस्था ही संस्थान कर्मचा-यांची कामधेनू ठरत आहे.

संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी पुढीलप्रमाणे चालवत असलेल्या व्यवसायांची मुदत दि.१५/०३/२०२० रोजी पूर्ण झाली आहे.

| अ.क्र. | ठिकाण (लोकेशन) | सर्व्हे नं. | जागा/गाळा साईज | प्रयोजन | एकुण स्टॉल |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग– १, आर ब्लॉकच्या दक्षिण बाजूकडील लाडू विक्री काऊंटर शेजारील मोकळी जागा | १०९ | १०x१० फुट मोकळी जागा | दुग्धजन्य प्रदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर | ०१ |
| २ | साईआश्रम भाग – २ धर्मशाळा - ज्युनिअर कॉलेजचे दक्षिण प्रवेशद्वाराजवळ पार्कींग परीसरामध्ये | १७२ | १०x१० फुट मोकळी जागा | दुग्धजन्य प्रदार्थ,थंडपेय विक्री स्टॉल | ०१ |
| ३ | द्वारावती भक्तनिवास – द्वारावती भक्तनिवासचे दक्षिण बाजूकडील मोकळया जागेत | १४८ | १०x१० फुट मोकळी जागा | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम | ०१ |
| ४ | साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रूम) साईबाबा भक्तनिवासस्थानमधील डी गाळा (बांधीव) नं.२,३ व ४ (एकुण ३ गाळे) | १०७<br>१०७<br>१०७ | २९x११ फुट बांधीव गाळा नं.२,<br>२९x११ फुट बांधीव गाळा नं.३,<br>२९x११ फुट बांधीव गाळा नं.४ | प्रसाद व नॉव्हेल्टी | ०३ |
| ५ | साई प्रसादालय – साईप्रसादालय इन गेटजवळ | ८५ | १०x१० फुट मोकळी जागा | प्रसाद विक्री स्टोअर | ०१ |
| ६ | शैक्षणिक संकुल<br>१) औ.प्र.संस्था मुख्य गेटजवळ<br>२) इंग्लिश मेडीयम स्कुल – शैक्षणिक संकुलाचे प्रवेशद्वार उत्तर बाजूचे भिंतीलगत पूर्व बाजूने<br>३) कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालय प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस | <br>१०८<br>१०८<br>१०८ | <br>१०x१० फुट मोकळी जागा<br>१०x१० फुट मोकळी जागा<br>१०x१० फुट मोकळी जागा | शालेय साहित्य अल्पदराने विक्री करणेकरीता. | ०३ |
| ७ | साईनाथ रुग्णालय – चहा कॅन्टीन समोरील मोकळया जागेत | १४८ | १०x१० फुट मोकळी जागा | जनरल स्टोअर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय स्टोअर | ०१ |
| ८ | साईनाथ मंगल कार्यालय- मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूस असणारी संरक्षक भिंत व मंगल कार्यालय यांच्यामध्ये लिंबाचे झाडाखाली. | ४ | १०x१० फुट मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल | ०१ |

तरी संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय पुढील ११ महिन्यांसाठी चालविणेस परवानगी मिळावी, असेबाबत विनंती केलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांचेमार्फत उपरोक्त परिशिष्टातील अ.नं.१,२,४,५,७ व ८ या ठिकाणचे स्टॉलमध्ये दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री केली जाते. त्यासाठी सदर संस्थेने अन्न व औषध प्रशासन विभाग यांचेकडील परवाना व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व

सेवाशर्तीचे विनियमन) नियम २०१८ मधील नियम ९ प्रमाणे दि.०६/०३/२०२० रोजीचे नमुना ग मधील सुचनापत्र दि.०९/०७/२०२० रोजी इकडेस समक्ष सादर केलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- साईभक्तांच्या सोयीच्या व सुविधेच्या दृष्टिकोनातून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांचेकडील उपरोक्त विनंतीचे अनुषंगाने खालील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणच्या जागा/गाळे त्यासमोर दर्शविलेल्या प्रयोजनासाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन (खालील परिशिष्ट अ मधील रकाना ९ मध्ये दर्शविलेप्रमाणे) व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.१६/०३/२०२० ते दि.१५/०२/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी उक्त जागा/गाळे वापराची मुदत वाढवून देता येईल व पूर्वीच्याच अटी व शर्तीवर करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

**परिशिष्ट "अ"**

| अ.नं. | गावाचे नाव | ठिकाण (लोकेशन) | सर्वे नं. (पैकी) | जागा/गाळा साईज (फूट) | प्रयोजन | एकूण स्टॉल | मागील मासिक भाडे दर रु. | मागील भाडेदरात १०% वाढ करुन होणारे मासिक भाडे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | शिर्डी | साईआश्रम भाग-१ - आर ब्लॉक च्या दक्षिण बाजूकडील लाडू विक्री काऊंटर शेजारील मोकळी जागा | १०९ | १०x१० मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर. | ०१ | ८१७/- | ८९९/- |
| २ | निमगाव-को-हाळे | साईआश्रम भाग-२ धर्मशाळा-ज्युनियर कॉलेजचे दक्षिण प्रवेशद्वाराजवळ पार्कीग परिसरामध्ये. | १७२ | १०x१० मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय विक्री स्टॉल. | ०१ | ३३२/- | ३६५/- |
| ३ | शिर्डी | द्वारावती भक्तनिवास - द्वारावती भक्तनिवासचे दक्षिण बाजूकडील मोकळया जागेत. | १४८ | १०x१० मोकळी जागा | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम. | ०१ | ५४१/- | ५९५/- |
| ४ | शिर्डी | साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) - साईबाबा भक्तनिवासस्थानमधील डी गाळा (बांधीव) नं.२,३ व ४.<br>(एकूण ३ गाळे) | १०७<br><br>१०७<br><br>१०७ | २९x११ बांधीव गाळा नं.२<br>२९x११ बांधीव गाळा नं.३<br>२९x११ बांधीव गाळा नं.४ | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर. | ०३ | ५,४९१/-<br><br>५,४९१/-<br><br>५,४९१/- | ६,०४०/-<br><br>६,०४०/-<br><br>६,०४०/- |
| ५ | निमगाव-को-हाळे | साई प्रसादालय - साई प्रसादालय इन गेटजवळ. | ८५ | १०x१० मोकळी जागा | प्रसाद विक्री स्टोअर. | ०१ | ३३२/- | ३६५/- |
| ६ | शिर्डी | शैक्षणिक संकुल –<br>१) औ.प्र.संस्था मुख्य गेटजवळ<br><br>२) इंग्लिश मेडीयम स्कूल-शैक्षणिक संकुलाचे प्रवेशद्वार उत्तर बाजूचे भिंतीलगत पूर्व बाजूने<br>३) कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस. | १०८<br><br>१०८<br><br>१०८ | १०x१० मोकळी जागा<br>१०x१० मोकळी जागा<br>१०x१० मोकळी जागा | शालेय साहित्य अल्पदराने विक्री करणेसाठी | ०३ | ६४९/-<br><br>६४९/-<br><br>६४९/- | ७१४/-<br><br>७१४/-<br><br>७१४/- |
| ७ | शिर्डी | साईनाथ रुग्णालय - चहा कॅन्टीन समोरील मोकळया जागेत | १४८ | १०x१० मोकळी जागा | जनरल स्टोअर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय स्टोअर. | ०१ | ५४१/- | ५९५/- |
| ८ | शिर्डी | साईनाथ मंगल कार्यालय - मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूस असणारी संरक्षक भिंत व मंगल कार्यालय यांच्यामध्ये लिंबाचे झाडाखाली. | ४ | १०x१० मोकळी जागा | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल. | ०१ | १,१८६/- | १,३०५/- |
| | | | | | **एकूण** | **१२** | | |

**प्रस्ताव**– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना त्यांचे विनंतीनुसार उपरोक्त परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणच्या जागा/गाळे त्यासमोर दर्शविलेल्या प्रयोजनासाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन (परिशिष्ट अ मधील रकाना ९ मध्ये दर्शविलेप्रमाणे) व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.१६/०३/२०२० ते दि.१५/०२/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी उक्त जागा/गाळे वापराची मुदत वाढवून देणेच्या व पूर्वीच्याच अटी व शर्तीवर करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले ०८ ठिकाणच्या जागा/गाळे त्यासमोर दर्शविलेल्या प्रयोजनासाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर उक्त जागा/गाळे वापराची मुदत दि.१६/०३/२०२० ते दि.१५/०२/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वाढवून देण्यास मान्यता देण्यात आली. व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेण्यात यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२५** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेमार्फत साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी संस्थान परिसरात चालवत असलेल्या विविध प्रकारच्या व्यवसायाकामीचे स्टॉल/गाळयांचे जागा वापराचे भाडे माफ होणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.श्रीसासंएक्रेसो/१२/२०२०, दि.२०.०५.२०२०.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना–मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/ १२/२०२० दि.२०/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये "संस्था श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थान मान्यतेने संस्थान परिसरात मोफत पादत्राणेगृह व मोफत बॅग क्लोकरुम व्यवस्था तसेच थंडपेय,दुध व दुग्धजन्य पदार्थ,प्रसाद,नॉव्हेल्टी,जनरल स्टोअर,शालेय साहित्य विक्री व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालवून साईभक्तांना सेवा सुविधा पुरवित आहे. जगभरात कोरोना या साथ रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने भारतात कोरोना या साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण देशात लॉकडाऊन तसेच जमावबंदी लागू करण्यात आल्याने संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी चालवत असलेल्या सर्व सेवा सुविधा दि.१८/०३/२०२० पासून बंद असून कर्मचारी वेतन व इतर खर्चामुळे संस्थेचेही मोठे नुकसान होत आहे. संस्थेस संस्थान मालकीच्या खालील नमुद केलेल्या ठिकाणी त्यासमोर दर्शविलेले व्यवसाय करणेकामी जागा वापरास दिलेल्या आहेत.

| अ.नं. | जागेचा तपशिल | क्षेत्र | व्यवसाय | जागा वापरास दिल्याची मुदत | मासिक भाडे रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम-१ आर ब्लॉकचे दक्षिणेस. | १०० चौ.फुट | दुग्धजन्य पदार्थ, प्रसाद विक्री व जनरल स्टोअर. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.८१७/- |
| २ | साईआश्रम-२ | १०० चौ.फुट | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.३३२/- |
| ३ | साईप्रसादालय इन गेटलगत | १०० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.३३२/- |
| ४ | साईनाथ मंगल कार्यालय परिसर | १०० चौ.फुट | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.१,१८६/- |
| ५ | द्वारावती निवासस्थान परिसर | १०० चौ.फुट | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.५४१/- |
| ६ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी ब्लॉक गाळा नं.२ | ३१९ चौ.फुट | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.५,४९१/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी ब्लॉक गाळा नं.३ | ३१९ चौ.फुट | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.५,४९१/- |
| ८ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी ब्लॉक गाळा नं.४ | ३१९ चौ.फुट | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.५,४९१/- |
| ९ | साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेटजवळ. | १०० चौ.फुट | शालेय साहित्य विक्री केंद्र. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.६४९/- |
| १० | साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल गेटजवळ. | १०० चौ.फुट | शालेय साहित्य विक्री केंद्र. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.६४९/- |
| ११ | साईबाबा कन्या विद्या मंदिर गेटजवळ. | १०० चौ.फुट | शालेय साहित्य विक्री केंद्र. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.६४९/- |
| १२ | साईनाथ रुग्णालय कॅन्टीनसमोर | १०० चौ.फुट | जनरल स्टोअर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री स्टॉल. | दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० | रु.५४१/- |
| १३ | साईप्रसाद परिसर सुलभ शौचालयशेजारी. | १२० चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम. | दि.२६/०८/२०१९ ते दि.२५/०७/२०२० | रु.१,४२२/- |
| १४ | साईआश्रम-१ परिसर | १४४ चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| १५ | साईआश्रम-१ परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| १६ | साईआश्रम-२ परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| १७ | साईप्रसादालय परिसर | ८० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| १८ | द्वारावती निवासस्थान परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| १९ | साईउद्यान इमारत परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २० | साईप्रसाद इमारत नं.२ परिसर | १६८ चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २१ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर. | १२० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २२ | साईआश्रम भाग-१ परिसर | ९० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर. | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २३ | द्वारावती इमारत परिसर | ९० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर. | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २४ | साईउद्यान इमारत परिसर | १५० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २५ | साईआश्रम-१ परिसर | ९० चौ.फुट | जनरल स्टोअर | दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० | रु.५,३१४/- |
| २६ | बसस्टॅण्ड समोर जूने स्वागतकक्षाचे जागेत. | १५० चौ.फुट | बॅग क्लोकरुम. (मोफत सुविधा) | दि.२१/१०/२०१९ ते दि.२०/०९/२०२० | रु.१,५१९/- |
| २७ | सुलभ शौचालय इमारतीत. | ६२५ चौ.फुट | बॅग क्लोकरुम. (मोफत सुविधा) | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| २८ | साईप्रसाद नं.२ परिसर | २५० चौ.फुट | बॅग क्लोकरुम. (मोफत सुविधा) | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| २९ | साईप्रसाद नं.१ उत्तर बाजूस. | ६४ चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| ३० | साईप्रसाद नं.१ उत्तर बाजूस. | ९६ चौ.फुट | दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टोअर | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१ | साईप्रसाद इमारत नं.२ परिसर. | २०० चौ.फुट | मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम. | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| ३२ | साईउद्यान इमारत परिसर | १५० चौ.फुट | मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम. | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| ३३ | साईप्रसाद इमारत परिसर. | १८० चौ.फुट | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| ३४ | साईउद्यान इमारत परिसर. | १५० चौ.फुट | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.११,७९०/- |
| ३५ | मंदिर परिसर गेट नं.१ लगत | ८८ चौ.फुट | मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम. | दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० | रु.१,१५८/- |
| ३६ | मंदिर परिसर गेट नं.४ लगत | २०४ चौ.फुट | मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम. | दि.१३/११/२०१९ ते दि.१२/१०/२०२० | रु.१,३१६/- |
| ३७ | मंदिर परिसर गेट नं.४ लगत | | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | दि.१३/११/२०१९ ते दि.१२/१०/२०२० | मोफत. |
| ३८ | साईनाथछाया इमारत | ४३७.२१ चौ.फुट | बॅग क्लोकरुम (मोफत सुविधा) व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम. | दि.१७/१२/२०१९ ते दि.१६/११/२०२० | रु.११,४८६/- |
| ३९ | गुरुस्थान मंदिराशेजारी (दक्षिणेस) | ३७.७० चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम. | दि.०७/०८/२०१९ ते दि.०६/०२/२०२० | रु.१०,३७६/- |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१२ व अ.नं.२६ या ठिकाणचे व्यवसाय सध्यस्थितीत चालू आहेत. त्याव्यतिरिक्त उपरोक्त उर्वरित सर्व व्यवसाय/गाळे दि.१८/०३/२०२० पासून बंद आहेत. कोरोना या साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण देशात लॉकडाऊन तसेच संचारबंदी आदेश लागू केलेले आहेत. त्यामुळे दि.१८/०३/२०२० पासून शिर्डी येथे श्री साईबाबांचे मंदिर दर्शनासाठी बंद करणेत आलेले आहे. यास्तव संस्थेमार्फत चालविणेत येणारे उपरोक्त थंडपेय,दुध व दुग्धजन्य पदार्थ,प्रसाद,नॉव्हेल्टी,जनरल स्टोअर्स,शालेय साहित्य विक्री,मोबाईल क्लोकरुम,मोफत पादत्राणेगृह व मोफत बॅग क्लोकरुम इ.सर्व व्यवसाय बंद करणेत आलेले आहेत. त्यामुळे संस्थेचे कर्मचारी वेतन व इतर खर्च भागविणे संस्थेला शक्य होत नाही. तरी लॉकडाऊनचे कालावधीसाठीचे उपरोक्त व्यवसायांसाठी संस्थान मालकीच्या संस्थेला भाडेतत्वावर वापरास दिलेल्या जागांचे मासिक भाडे माफ होणेस विनंती आहे," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त पत्राचे अवलोकन केले असता, त्यांचे संस्थेस, साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी विविध व्यवसायाकामी वापरास दिलेल्या संस्थान मालकीच्या उपरोक्त गाळे/स्टॉल/जागांचे, कोरोना या साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखणेकामी पुकारण्यात आलेल्या लॉकडाऊन कालावधीसाठीचे म्हणजेच दि.१८/०३/२०२० पासूनचे जागा भाडे माफ करुन मिळणेकामी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- उक्त संस्थेस भाडेतत्वावर वापरास दिलेल्या संस्थान मालकीच्या उपरोक्त गाळे/ स्टॉल/ जागांचे दरमहा होणारे एकूण भाडयाची रक्कम सुमारे रु.२,१५,०००/- इतकी होत आहे.

उक्त संस्थेने उपरोक्त गाळे/स्टॉल/जागांचे माहे मार्च २०२० अखेरचे होणारे मासिक भाडयाची एकूण रक्कम रु.२,०७,५३४/- इतकी संस्थानचे लेखाशाखेकडे अलाहिदा जमा केलेली आहे.

उक्त संस्था उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या अ.नं.२६,२७,२८,३३,३४,३७ व ३८ यामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी साईभक्तांना बॅग क्लोकरुम व पादत्राणेगृह या सेवा मोफत पुरवित आहे. सदर ठिकाणचे जागेचे भाडे देखील संस्था नियमितपणे अदा करीत आहे.

सध्यस्थितीत कोरोना या साथीचे प्रादुर्भाव रोखणेकामी शासनाने दि.२३ मार्च २०२० पासून लॉकडाऊन पुकारलेला असल्याने श्रीं चे मंदिर दर्शनास बंद केलेले आहे. परिणामी साईभक्त दर्शनास येणेचे बंद झालेले आहे. तसेच सर्वत्र सर्व व्यवसाय बंद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार उक्त सोसायटीमार्फत उपरोक्त तक्त्यात

दर्शविलेल्या ठिकाणचे व्यवसाय देखील बंद करण्यात आलेले आहेत. मात्र संस्थेचे कर्मचा-यांचे वेतन व इतर खर्च संस्थेस करावे लागत आहेत. सदर खर्च भाग्विणेचे दृष्टिने उक्त संस्थेने सदरचे पत्र सादर केलेले आहे.

लॉकडाऊनचे कालावधीत संस्थेमार्फत चालविणेत येत असलेले उपरोक्त व्यवसाय बंद करणेत आलेले असले तरी संस्थान मालकीच्या उपरोक्त ठिकाणच्या मिळकती उक्त संस्थेच्याच ताब्यात राहणार आहेत. शिवाय उक्त संस्थे व्यतिरिक्त इतर विभाग/ संस्था/व्यक्ती यांना संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर वापरास दिलेल्या जागांचे संबंधात देखील संबंधीत विभाग/संस्था/व्यक्ती या उक्त कालावधीतील जागा वापराचे भाडे माफ करुन मिळणेकामी विनंती करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रस्ताव- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर वापरास दिलेल्या उपरोक्त तक्त्यातील गाळे/स्टॉल/जागांचे भाडे माहे एप्रिल २०२० पासून ते लॉकडाऊन उठेपर्यंत म्हणजेच श्रीं चे मंदिर दर्शनासाठी खुले होईपर्यंतचे मासिक भाडे माफ करणे अथवा न करणे अथवा अंशत: माफ करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६०** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२६** **दर्शनरांग व्यवस्थापन कार्य प्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांना त्यांचे कर्मचाऱ्यांचे निवासव्यस्थेसाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांचे वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना–साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजनासंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि. यांना कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीचा कार्यादेश देणेचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीच्या बैठकीत निर्णय क्रं.५८० प्रमाणे करणेत आलेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-आय.टी./२४६५/२०१६ दि.१७/०८/२०१६ अन्वये पुढील ५ वर्षाकरीता कार्यादेश देणेत आलेला आहे.

मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांचे कर्मचा-यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा ३ खोल्यांचे वापराचे संबंधात यापूर्वी मा.तदर्थ समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५०० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.कॅम्प शिर्डी यांचे कर्मचा-यांना संस्थानचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीतील रुम नं.६,७ व किचन रुम अशा ३ खोल्या दरमहा सेवाआकार रक्कम रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन वापरास लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.१७/०९/२०१९ ते दि.१६/०८/२०२० या ११ महिनेंचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.कॅम्प शिर्डी यांनी दि.०४/०२/२०२० रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन दिलेला आहे.

सदर करारनाम्याची मुदत दि.१६/०८/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने मा.डायरेक्टर,मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुमला,तिरुपती यांनी त्यांचेकडील दि.१५/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त ३ खोल्या वापराची पुढील मुदत वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुमला (ए.पी.) यांचेकडील उपरोक्त दि.१५/०७/२०२० रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे त्यांच्या कंपनीच्या कर्मचा-यांना शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्वे नं.९/२८ व सर्वे नं.९/३२ एकूण क्षेत्र ०.०३.७२ आर मधील शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या उपरोक्त तीन खोल्यांची वापराची मुदत वाढवून देणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६१५/२०२० दि.२७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे आय.टी.विभाग प्रमुख यांचे अभिप्राय मागविणेत आले.

तदनुषंगाने संस्थानचे प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएसटी/आयटी/५८/२०२० दि.३१/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि. तिरुमला यांचे कर्मचा-यांचे निवासासाठी वापरास दिलेल्या खोल्यांची मुदत दि.१७/०८/२०२० ते दि.१६/०७/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वाढवून देणे संदर्भात केलेली विनंती मान्य करणेस हरकत नाही,असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- सध्यस्थितीत कोविड-१९ या विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी दि.२३/०३/२०२० पासून सर्वत्र लॉकडाऊन पुकारणेत आलेला असून दि.१७/०३/२०२० पासून श्रीं चे मंदिर भक्तांना दर्शनासाठी बंद करणेत आलेले आहे. यास्तव मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि. यांचेमार्फत बायोमेट्रीक दर्शनपास देणेचे काम बंद आहे. तथापि सदर एजन्सीचे कर्मचारी हे सध्या संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीत वास्तव्यास आहेत. तेंव्हा मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि.यांचेकडील उपरोक्त दि.१५/०७/२०२० रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे व संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे अभिप्रायाप्रमाणे मा.व्यवस्थापक,मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. यांना त्यांचे कर्मचा-यांसाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीमधील वापरास दिलेल्या रुम नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांची वापराची मुदत दि.१७/०८/२०२० ते दि.१६/०७/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वाढवून देता येईल व पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- मा.डायरेक्टर,मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुमला यांना त्यांचे कर्मचा-यांसाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीमधील वापरास दिलेल्या रुम नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांची वापराची मुदत दि.१७/०८/२०२० ते दि.१६/०७/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वाढवून देणेच्या व पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६१** **दर्शनरांग व्यवस्थापन कार्य प्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांनी उपरोक्त प्रस्तावात नमुद तीन रुमपैकी किचन रुम सशुल्क वापरासाठी ठेवून उर्वरीत दोन रुम (रुम नं.६ व ७) रुमची आवश्यकता नसल्याने सदर दोन रुम खाली करुन देत असल्याबाबत दि.६.८.२०२० रोजीचे पत्रान्वये संस्थानला कळविले आहे व त्या अनुषंगाने आजचे सभेत विषय नं.३४ सादर करण्यात आलेला असल्याने सदरचा विषय रद्द करण्यात आला.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२७** **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील विकसीत एकूण ११ रस्त्यांपैकी भुसंपादनाचे ०९ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०९/२००७ निवाडा घोषीत दि.३०.११.२००९ एलएक्यु/एसआर/२१/२००३ निवाडा घोषीत दि.२५.११.२००३ व एलएक्यु/एसआर/०३/२००७ निवाडा घोषित दि.०४.११.२०१० चे भुसंपादन प्रकरणी संबधीत जमीन मालक यांनी भूसंपादन कायदा कलम १८ खाली दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्यांमध्ये वाढीव मोबदला रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.५६२** **प्रस्तुत प्रकरणी आजचे सभेत विषय नं.३६ नुसार फेरप्रस्ताव सादर करण्यात आलेला असल्याने सदरचा विषय मागे घेण्यात आला.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२८** **मौजे पांढुर्ली, ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य, सामाजिक व धार्मिक कार्यासाठी देतांना आकारण्यात येणा-या रकमेमध्ये वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर,जि.नाशिक येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर ही जमीन सौ.सिंधुताई विजय दळवी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना दि.२२/०९/२००६ रोजी विनामोबदला नोंदणीकृत दस्ताने कायमस्वरुपी बक्षिस दिलेली आहे.

सदर मिळकतीस मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडील आदेश क्रं.जमा/एनए/एसआर/६९/२००८ दि.०४/०६/२००८ अन्वये रहिवास साईभक्त विश्रामगृह या अकृषिक प्रयोजनासाठी वापरास परवानगी आदेश निर्गत केलेला आहे. सदर क्षेत्रात संस्थानने पालखी विसावा (मुख्य शेड),भांडारगृह (स्टोअर रुम), स्वयंपाकगृह (किचन रुम), प्रसाधनगृह (Latrine,Bathroom) इ. चे बांधकाम करणेत आलेले आहे.

सदर पालखी थांब्यात दरवर्षी सुमारे १५० ते २०० पदयात्री पालख्या मुक्कामी थांबत असतात.

संस्थानचे पांढुर्ली व सिन्नर (मुसळगाव) औद्योगिक वसाहत येथील पालखी थांब्याचे संबंधात मा.व्यवस्थापन स्थानिक उपसमितीचे दि.०३ एप्रिल २०१० रोजीचे सभेतील शिफारशीनुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३५८ नुसार सिन्नर व पांढुर्ली येथील पालखी थांबे स्थानिक रहिवाशांना, पालखी सोहळे ज्या कालावधीत कमी असतील त्यावेळेस लग्नकार्य,सामाजिक,धार्मिक कार्यासाठी रु.५,०००/- मात्र प्रति दिवस (२४ तासांसाठी) भाडे आकारुन उपलब्ध करुन देणेत यावे,असा निर्णय झालेला आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.११९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मौजे मुसळगाव,ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य, सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी देताना आकारण्यात येणा-या रकमेत वाढ करुन ती रक्कम रु.१०,०००/- मात्र करण्यात यावी,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे मौजे मुसळगाव येथील पालखी थांबा स्थानिक रहिवासी अथवा इतर नागरीकांनी संस्थानकडे लग्नकार्य,सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी मागणी केल्यास खालील अटी व शर्तीवर सदर पालखी थांबा वापरास दिला जातो.

१) पालखी थांबा वास्तू ही श्री साईंची पदयात्रेद्वारे येणा-या भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी उभारणेत आलेली आहे. त्यामुळे पदयात्री भक्तांना पालखी थांबा प्राधान्याने वापरण्यास उपलब्ध करुन देण्यास संस्थान व्यवस्थापनाची प्राथमिकता राहील. त्यामुळे अर्जदार यास पालखी थांबा उपलब्ध करुन देणे अथवा न देणेचा अधिकार व हक्क संस्थान व्यवस्थापनाने पूर्णपणे राखून ठेवलेला आहे.

२) संस्थान व्यवस्थापनाने निश्चित केलेनुसार पालखी थांबा वास्तूचे एक दिवसाचे दि. / / सायंकाळी ५ वाजेपासून ते दि. / / रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत (२४ तासाचे) वापरासाठी रु.१०,०००/- मात्र (रु.दहा हजार मात्र) वापराचे शुल्क आकारले जाईल.

३) पालखी थांबा आरक्षित केल्यानंतर ते रद्द करावयाचे झाल्यास वापर शुल्कापोटी भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

४) अ.नं.१ नुसार आरक्षित केलेल्या दिवशी सदर पालखी थांब्याचे ठिकाणी पदयात्री भक्त आल्यास पालखी थांबा वास्तू अशा भक्तांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणे अर्जदारावर बंधनकारक राहील. त्याबाबत कुठलीही तक्रार अथवा हरकत चालणार नाही. अशा पदयात्री भक्तांशी सौजन्याने व सहकार्याने वागण्याचे अर्जदारांसह त्यांचे कार्यक्रमास कार्यक्रमस्थळी उपस्थित असणा-या सर्व व्यक्तींवर बंधनकारक राहील. त्यांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे.

५) पालखी थांबा व परिसरातील जागा ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा एक भाग असल्याने त्याचे पावित्र्य राहील अशा अनुरुप कार्यक्रमासाठीच त्याचा वापर व उपयोग करण्यात यावा.

६) विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या इमारती व इतर वस्तूंची कोणत्याही प्रकारे खराबी किंवा नुकसान करु नये. अशाप्रकारे खराबी/ नुकसान केलेचे संस्थान प्रतिनिधीस आढळल्यास त्याची नुकसान भरपाई म्हणून उचित रक्कम अर्जदार यांचेकडून वसुल करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

७) पालखी थांबा आरक्षित केलेली मुदत संपलेनंतर, पालखी थांबा स्वच्छ केलेल्या स्थितीत संस्थान प्रतिनिधीच्या ताब्यात त्वरीत द्यावा.

८) पालखी थांब्याचे ठिकाणी असलेली विद्युत व पाणीपुरवठा व्यवस्था आवश्यकतेनुसार व गरजेनुसार वापरावी. विद्युत व पाणीपुरवठा व्यवस्था खंडीत झाल्यास त्याची पर्यायी व जादा सुविधा/व्यवस्था अर्जदाराने स्वखर्चाने स्वत:चे जबाबदारीवर करुन घ्यावी. त्यास संस्थान व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

९) जादा क्षमतेची विद्युत व्यवस्था/विद्युत रोषणाई करावयाची झाल्यास त्यासाठी अतिरिक्त व्यवस्था अर्जदाराने स्वत: करावी. संस्थानच्या विद्युत जोडणीमधून त्यासाठी जोडणी दिली जाणार नाही. अशी जोडणी घेतल्याचे आढळून आल्यास संस्थानचे नियमानुसार जादा विद्युत आकारणी केली जाईल. याबाबत अर्जदारास कुठलीही तक्रार अगर हरकत घेता येणार नाही.

१०) पालखी थांब्याचे ठिकाणी व परिसरात डी.जे.चा आवाज ध्वनीप्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० चे संबंधात मे.सुप्रीम कोर्ट,नवी दिल्ली यांनी दि.१८ जुलै २००५ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे कोणतेही वाद्य रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत वाजविणेवर संपूर्ण निर्बंध आहेत. तसेच इतर वेळेस आवाजाची पातळी १० डेसीबल पेक्षा जास्त किंवा जास्तीत जास्त ७५ डेसीबल या दोघांपैकी जी पातळी कमी राहील त्या पातळीवर ठेवणे बंधनकारक आहे. तसेच याबाबत स्थानिक महसुल किंवा पोलीस प्रशासनाने घालून दिलेल्या अटींचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. सदर अटींचे उल्लंघन केल्यामुळे अर्जदार यांचेवर स्थानिक महसुल किंवा पोलीस प्रशासनाने कारवाई केल्यास संस्थान त्यास जबाबदार राहणार नाही.

११) लग्न समारंभासाठी नियोजित वर व वधू यांचे कायद्यानुसार वयोमान पूर्ण झाले आहे किंवा कसे याबाबत त्यांचे आई-वडील/ पालक/अर्जदार हे सर्वस्वी जबाबदार राहतील. याबाबत काही कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्यास अर्जदार व इतर संबंधीत व्यक्ती जबाबदार राहतील.

१२) पालखी थांब्याचे ठिकाणी आणण्यात येणा-या वस्तू/साहित्य/मौल्यवान चीज-वस्तू इ.अर्जदाराने स्वत:चे जबाबदारीवर सांभाळावे.

१३) पालखी थांबा इमारत व जागे व्यतिरिक्त इतर कोणतेही साहित्य/वस्तू संस्थान व्यवस्थापनाकडून उपलब्ध करुन दिल्या जाणार नाही.

१४) पालखी थांब्यासाठी भरलेला वापर शुल्क आकार हा २४ तासासाठी असल्याने निर्धारित वेळेत पालखी थांबा ताब्यात घेणे/ सोडणे अर्जदारावर बंधनकारक राहील. वापर आकार शुल्क आकारणेसाठी एक दिवस (२४ तास) ची परिगणना प्रथम दिवशी सायंकाळी ५ वाजेपासून दुस-या दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अशी करणेत येईल.

१५) उपरोक्त अटी व शर्ती मध्ये तसेच सदर शुल्काचे आकारणीत बदल करणे,त्यामध्ये वाढ करणे किंवा अंशत: बदल करणेबाबतचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य,सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी वापरास मिळणेकामी संस्थानकडे आजपावेतो स्थानिक रहिवाशी अथवा नागरीकांनी मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर पालखी थांबा वापरास देण्याचा प्रश्न उदभवला नाही.

तथापि भविष्यात सदरचा पांढुर्ली येथील पालखी थांबा स्थानिक रहिवाशी अथवा नागरीकांकडून लग्नकार्य,सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी वापरास मागण्याची शक्यता गृहीत धरुन त्यासाठी सध्यस्थितीत पालखी थांबा वापरण्यासाठी आकारण्यात येणा-या रकमेत मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.११९ प्रमाणे मौजे मुसळगाव, ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास वापरण्यासाठी आकारण्यात येणा-या रकमेत ज्याप्रमाणे रक्कम रु.५,०००/- ऐवजी रु.१०,०००/- इतकी वाढ करणेत आलेली आहे त्याप्रमाणेच मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील पालखी थांबा वापरण्यासाठी आकारण्यात येणा-या रक्कम रु.५,०००/- ऐवजी रक्कम रु.१०,०००/- इतकी वाढ करता येईल.

प्रस्ताव- मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर,जि.नाशिक येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर मध्ये असलेल्या पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य,सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी देतांना

आकारण्यात येणा-या रकमेत रक्कम रु.५,०००/- मध्ये वाढ करुन ती रक्कम रु.१०,०००/- मात्र करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर,जि.नाशिक येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर मध्ये असलेल्या पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य,सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी देतांना आकारण्यात येणा-या रकमेत रक्कम रु.५,०००/- मध्ये वाढ करुन ती रक्कम रु.१०,०००/- मात्र करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२९** **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची रक्कम शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(ज) मध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर,भाडे,भरपाई,आकार व इतर रकमा यांचे प्रदान करील,अशी तरतुद आहे.

प्रकरणाची पुर्वपिठीका– यापूर्वी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२८/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या एकूण १३४ मालमत्तेवरील संकलित कर, शिक्षण कर,रोजगार हमी कर,वृक्ष कर व अग्निशमन कराची आकारणी मागणीची एकूण रक्कम रु.१,०२,६६,०७३/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख सहासष्ट हजार त्र्याहत्तर मात्र) इतकी कळविलेली होती. तदनंतर शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०८/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त रक्कम १५ दिवसाचे आत नगरपंचायत कार्यालयास भरणा केल्यास नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम १५०(३) अन्वये १% सुट देण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे संकलित करावर १% सुट रक्कम रु.५२,०१७/- इतकी वजा करुन रक्कम रु.१,०२,१४,०५७/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख चौदा हजार सत्तावन्न मात्र) नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेकामीचा प्रस्ताव तसेच यापुढे संस्थान मिळकतीचे संबंधातील शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई,आकार व इतर शासनास देय असलेल्या रकमा शासनास अदा करणेबाबतचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर घेणेकामीचे मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.७६७ प्रमाणे **“यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस वेळोवेळी बराचसा निधी दिला जातो. याकरीता शिर्डी नगरपंचायतीने संस्थान इमारतीचा कर माफ करावा असे त्यांना कळविणेत यावे.”**

सदर निर्णयाप्रमाणे इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३६१४/२०१७ दि.०५/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये “संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस वेळोवेळी विविध प्रयोजनांसाठी मोठया प्रमाणात निधी दिला जात असतो. उदा.नगरपंचायत हद्दीतील विविध रस्त्यांचे भुसंपादनाची रक्कम,नगरपंचायत हद्दीतील विविध रस्त्यांच्या विकास कामांसाठी,नगरपंचायत हद्दीतील स्वच्छता राखणेकामी व इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी संस्थानमार्फत नगरपंचायतीस वेळोवेळी मोठया प्रमाणात निधी अदा केला जातो. यास्तव नगरपंचायतीची उपरोक्त मालमत्ता कराची रक्कम माफ करणेत यावी,” असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत आले.

त्यास अनुसरुन मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरंपचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नप./टे-०५/२४६/२०१७ दि.१२/१०/२०१७ अन्वये शिर्डी नगरपंचायतीने आपणास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता संकलित कर,शिक्षण कर, रोजगार हमी कर,वृक्ष कर व अग्निशमक कराची मागणी बीले दि.२९/०७/२०१७ रोजी रक्कम रु.१,०२,६६,०७३/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख सहासष्ट हजार त्र्याहत्तर मात्र) आपले कार्यालयात पाठविले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथील २५५४ चौमी. क्षेत्रफळावरील रक्कम रु.४,०७,२५३/- (अक्षरी रु.चार लाख सात हजार दोनशे त्रेपन्न मात्र) दि.२९/०७/२०१७ रोजी कराचे मागणी बील पाठविले आहे. परंतु आपण संदर्भीय पत्रान्वये संस्थान इमारतीचा कर माफ करावा,असे कळविले आहे. परंतु नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये नगरपंचायतीस कुठलाही कर माफ करता येत नाही. तरी आपण नगरपंचायतीत त्वरीत सर्व कराचा भरणा करुन नगरपंचायतीस सहकार्य करावे,असेबाबतचे पत्र इकडेस सादर केलेले आहे.

उपरोक्त पत्रात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ चे अवलोकन केले असता त्यात कर निर्धारण यादी तयार करणेबाबतची तरतुद आहे. मात्र त्यात नगरपंचायतीस कुठलाही कर माफ करता येत नाही,अशी तरतुद असलेचे दिसून येत नाही. विशेष बाब म्हणून नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम माफ करावी म्हणून मा.नगराध्यक्षा,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३९३९/२०१७ दि.२७/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले.

तरीदेखील मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरंपचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नपं./टे.क्रं.०५/२१०/२०१७ दि.०५/१२/२०१७ अन्वये नगरपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने महाराष्ट्र नगरपंचायती, नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये लागू केलेले कर हे शहरातील खाजगी,सहकारी यासोबतच केंद्र सरकारचे उपक्रम तसेच राज्य शासनाच्या मालमत्ता यांना देखील भरावे लागतात. शासनाद्वारे नगरपंचायतीला विकास कामासाठी भरीव निधी दिला जातो. या कारणास्तव शासनाला देखील स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर विशेष बाब म्हणून माफ होत नाहीत. यास्तव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना सदर करातून सूट देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. करामधून सूट देणेचा अधिकारच शिर्डी नगरपंचायतला नाही. संस्थानने कराची रक्कम विहित मुदतीत न भरल्याने महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषदांना व नगरपंचायतींना राज्य शासनाद्वारे पुरविण्यात आलेल्या संगणक प्रणालीमधील कमांडमुळे यापूर्वी संस्थानला दिलेल्या बीलामधील रकमेवर पुन्हा नव्याने व्याज आकारणी झालेली असून दि.०४/१२/२०१७ पर्यंत मालमत्ता व इतर करांची मुळ रक्कम रु.१,०२,६६,०७३/- ऐवजी रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची मुळ रक्कम रु,४,०७,२५३/- ऐवजी रु.४,११,३२६/- इतकी झालेली आहे. नगरपंचायत कराच्या रकमा विहित मुदतीत न भरल्यामुळे संगणक प्रणालीमध्ये या बीलामध्ये आपोआप व्याज व दंड व्याज रकमा वाढत जातात. सदर संगणक प्रणालीमध्ये कुठल्याही मानवी हस्तक्षेपाला वाव नाही व तसा अधिकारही शिर्डी नगरपंचायतीला नाही. सन २०१६-१७ पर्यंत संस्थानद्वारे नगरपंचायतीचे सर्व कर विहित वेळेत भरलेले आहेत. सबब या वर्षी संस्थानकडील संदर्भीय पत्रानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालमत्तांचा कुठलाही कर माफ करता येत नाही. आपण भरलेल्या सदर कर रकमांचा विनियोग शिर्डी नगरपंचायत शहरातील विकास कामांसाठीच करणार आहे. यास्तव नगरपंचायत करांचा भरणा करुन किमान शिर्डी शहरातील विकास कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी योगदान देणे आवश्यक आहे, वगैरेबाबत नमुद केलेले आहे.

यास्तव उपरोक्त मालमत्ता कराची सन २०१७-१८ या वर्षाची व्याजासह होणारी कराची रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची व्याजासह होणारी कराची रक्कम रु.४,११,३२६/- इतकी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेकामीच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.१०५८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, "सन २०१७-१८ या वर्षाच्या संस्थानच्या मालमत्ता कराची रु.१,०२,६६,०७३/- मात्र रक्कम व परिवहन महामंडळाचे इमारतीच्या मालमत्ता कराची रु.४,०७,२५३/- मात्र रक्कम शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या रकमांवरील दंडनीय व्याजाची आकारणी न करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस कळविणेत यावे,"असे ठरले**.**

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांची शिर्डी येथील मालमत्ता कराची सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम रु.१,०२,६६,०७३/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख सहासष्ट हजार त्र्याहत्तर) मात्र इतकी तसेच शिर्डी येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे मालकीची सर्वे नं.१७१/१२ मधील संस्थानच्या ताब्यात असलेल्या भक्तनिवास इमारतीचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम रु.४,०७,२५३/- (अक्षरी रु.चार लाख सात हजार दोनशे त्रेपन्न) इतकी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना RTGS द्वारे संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत अदा करण्यात येवून उक्त मालमत्ता कराचे रकमेवरील दंडनीय व्याजाची आकारणी न करणेबाबत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५०७५/२०१७ दि.२२/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त कराच्या रकमा नगरपंचायतीस अदा करणेकामी नगरपंचायतीबरोबर संस्थानचा पत्रव्यवहार चालू होता. अशा कालावधीत उक्त कराच्या रकमेवर दंडनीय व्याजाची रक्कम आकारणी करणे

विधीग्राहय ठरत नाही. यास्तव नगरपंचातीकडील दि.०५/१२/२०१७ रोजीच्या पत्रात नमुद केलेप्रमाणेची दंडनीय व्याजाची रक्कम आकारणी करु नये,असेबाबत पुन:श्च कळविणेत आले.

मात्र शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी पुढील आर्थिक वर्षाचे म्हणजेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे कराचे सादर केलेल्या मालमत्ता बीलाचे रकमेत उपरोक्त दंडनीय व्याजाची रक्कम थकबाकी म्हणून दर्शविलेने व शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.०५/१२/२०१७ रोजीच्या पत्रात नगरपंचायत कराच्या रकमा विहीत मुदतीत न भरल्यामुळे संगणक प्रणालीमध्ये,बीलामध्ये आपोआप व्याज व दंड व्याज रकमा वाढत जातात. सदर संगणक प्रणालीमध्ये कुठल्याही मानवी हस्तक्षेपाला वाव नाही व तसा अधिकारही शिर्डी नगरपंचायतीला नाही वगैरेबाबत नमुद केलेले असलेने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(ज) मध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर,भाडे,भरपाई,आकार व इतर रकमा यांचे प्रदान करील. या तरतुदीच्या अनुषंगाने व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१००९ अन्वये यापुढे संस्थान मिळकतीचे संबंधातील नियमानुकूल शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई,आकार व इतर शासनास देय असलेल्या रकमा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर शासनास अदा करावे या निर्णयाचे अनुषंगाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम रु.१,०२,५२,६२६/- इतकी मधून थकबाकी म्हणून दर्शविलेली (दंडनीय व्याजाची रक्कम) रु.१,०१,५०१/- व १% सुट रक्कम रु.५१,४२९/- अशी एकूण रक्कम रु.१,५२,९३०/- इतकी वजा करुन उर्वरित रक्कम रु.१,००,९९,६९६/- इतकी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेत येवून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची रक्कम माफ करणेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ १८०७/ २०१८ दि.१३/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले.

त्यास अनुसरुन शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-५/१७४/२०१८ दि.२४/०७/२०१८ चे पत्रान्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर व इतर करांचे मागणी बीलापोटी संस्थानकडून रक्कम रु.१,००,९९,६९६/- इतकी रक्कम RTGS द्वारे बँकेत जमा झालेली असून त्याप्रमाणे पावत्या देण्यात येत आहेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे करांचे रकमेवरील दंडनीय व्याजाची रक्कम रु.१,०१,५०१/- मात्र सॉफटवेअरमध्ये प्रथम थकबाकी वसुल करण्याची प्रणाली असल्याने सदरची थकीत व्याजाची रक्कम प्रथम वसुल करण्यात आलेली आहे. यास्तव चालू मागणी बीलातील थकबाकीपोटी शिल्लक राहीलेली रक्कम रु.१,०१,५०१/- चा चेक नगरपंचायतीकडे जमा करावा, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तदनुषंगाने व मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१०५८ चे अनुषंगाने शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे करांचे रकमेवरील दंडनीय व्याजाची (थकबाकी दर्शविलेली) उपरोक्त रक्कम रु.१,०१,५०१/- इतकी अदा करणेकामीच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यात **निर्णय क्रं.५२१ प्रमाणे "शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना संस्थानकडून वेगवेगळया कामासाठी मोठया प्रमाणात आर्थिक निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना देय असलेल्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची रक्कम रु.१,०१,५०१/- मात्र माफ करणेबाबत सर्व समिती सदस्यांनी मा.अध्यक्ष,नगरपंचायत तथा समिती सदस्या यांना विनंती केली असता दंडनीय रक्कम रु.१,०१,५०१/- मात्र माफ करणेबाबत नियमातील तरतुदीनुसार तपासून कार्यवाही करण्याचे मान्य केले."**

सदर निर्णयाप्रमाणे उक्त दंडनीय व्याजाची रक्कम माफ करुन मिळणेकामी मा.अध्यक्षा,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२८३०/२०१८ दि.१४/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

तरी देखील मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.११/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराच्या बीलांमध्ये व मागणी यादीमध्ये सदर दंडनीय व्याजाची रक्कम थकबाकी म्हणून दर्शविलेने मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णय क्रं.५२१ चे निर्णयाचे अनुषंगाने सदरची मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची रक्कम भरता येणार नाही म्हणून व उपरोक्त सन २०१९-२० च्या मालमत्ता कराचे बीलात व मागणी तक्त्यात असलेल्या त्रुटींची दुरुस्ती करुन मिळणेकामी आणि दंडनीय व्याजाची रक्कम व संकलित करावरील १% सुटीची रक्कम वजा करुन येणारी रक्कम संस्थान भरण्यास तयार आहे. त्याप्रमाणे दुरुस्ती बील व मालमत्ता यादी सादर करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी

नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/१५८७/२०१९ दि.३०/०७/२०१९ अन्वये अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

त्यास अनुसरुन मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-०५/१९५/२०१९ दि.३१/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये "उक्त दंडनीय व्याजाची रक्कम माफ करता येत नसलेबाबत व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये केलेली मालमत्ता कराची आकारणी व त्याबाबत महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रातील नगरपरिषदांकरीता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीनुसार आकारले जाणारे दंड व व्याज श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे निर्णयामुळे बदलता येवू शकत नाही. नगरपंचायतद्वारे श्री साईबाबा संस्थानला सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे दिलेल्या बीलांनुसार मालमत्ता कराची रक्कम भरणेस पुन्हा ऊशिर झाल्यास एकूण बीलाच्या रकमेवर १% सुट मिळणार नाही व त्यावर पुन्हा संगणकीय प्रणालीनुसार दंड व व्याज आकारणी होईल,ही बाब देखील आपले निदर्शनास आणून देणे आवश्यक वाटते. सबब मालमत्ता कराची रक्कम सत्वर भरुन नगरपंचायतीस सहकार्य करावे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तदनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ कलम २१(१)(ज) मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी आय कर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून समितीकडून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर,भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल. या तरतुदीचे अनुषंगाने आणि मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१००९ प्रमाणे यापुढे संस्थान मिळकतीचे संबंधातील नियमानुकूल शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई,आकार व इतर शासनास देय असणा-या रकमा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर शासनास अदा करावे,असेबाबतच्या झालेल्या निर्णयाप्रमाणे सदर सन २०१९-२० या वर्षाचे मालमत्ता करावर यापुढे दंडनीय व्याजाचे रकमेत वाढ होवू नये म्हणून सदरची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराची खालील दर्शविलेप्रमाणेची रक्कम शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अलाहिदा अदा करण्यात आलेली आहे.

| एकूण मालमत्ता संख्या | संकलित कराची एकूण रक्कम रु. | थकबाकी रक्कम रु. | चालू मागणी रक्कम (दंडनीय व्याजाची रक्कम) रु. | एकूण मागणी रक्कम रु. (रकाना ३+४) | संकलित करावर १% सुट रक्कम रु. | थकबाकी व १% सुटीची एकूण रक्कम (रकाना ३+६) रु. | थकबाकी व १% सुट वजा करुन नगरपंचायतीस अदा करावयाची रक्कम रु. (रकाना ५-७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १३७ | ४९८७५७८/- | १०१४६५/- | ९८८२४१९/- | ९९८३८८४/- | ४९८७६/- | १५१३४१/- | ९८३२५४३/- |

उपरोक्तप्रमाणे दंडनीय व्याजाची रक्कम वजा जाता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम रु.९८,३२,५४३/- इतकी नगरपंचायतीस अलाहिदा अदा करणेत आलेली आहे. म्हणजेच संस्थानकडे दंडनीय व्याजाची रक्कम वगळता मालमत्ता कराची बाकी राहीली नाही,अशी इकडील धारणा झाली. दरम्यानचे काळात प्रकरणी कामासाठी संस्थानकडे थकबाकी नसलेबाबतचा दाखला मिळणेकामी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस विनंती करण्यात आली. तदनुषंगाने शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.नप-टे-५/३५६/२०२० दि.१६/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे अखेर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मालमत्तेवरील मालमत्ता कर व इतर करांची थकबाकी रक्कम रु.९६,४६०/- असून सदर बाकी भरलेनंतर थकबाकी नसलेबाबतचा दाखला देणेत येईल,असेबाबत इकडेस कळविले असून तदनंतर जा.नं.नप-टे-५/१०१/२०२० दि.२१/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे अखेर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मालमत्ता क्रं.बी २००००१ या मालमत्तेचे मालमत्ता व इतर कराची आजअखेर थकबाकी रक्कम रु.९८,१७०/- इतकी असून सदर थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे दर्शविलेला आहे.

| करांचा तपशिल | थकबाकीची रक्कम (२०१९-२०) | एकुण रक्कम |
|---|---|---|
| संकलित कर | २१,३२६/- | २१,३२६/- |
| वृक्ष कर | १,६६८/- | १,६६८/- |
| शिक्षण कर | ४४,४८७/- | ४४,४८७/- |
| रोजगार हमी कर | ११,१२२/- | ११,१२२/- |
| अग्निशमन कर | ६,६७३/- | ६,६७३/- |
| विशेष स्वच्छता कर | २००/- | २००/- |
| उपयोग कर्ता शुल्क | ३६०/- | ३६०/- |
| दंड | १२,३३४/- | १२,३३४/- |
| एकूण बील रक्कम | ९८,१७०/- | ९८,१७०/- |

वरीलप्रमाणे सन २०१९-२० ची थकबाकी भरलेनंतर आपणास त्वरीत थकबाकी नसलेबाबतचा दाखला देणेत येईल, असेबाबत इकडेस कळवून त्यासोबत मालमत्ता क्रं.बी २०००००१ या मिळकतीचे सन २०१९-२० या वर्षाचे कराचे बील क्रं.४०८३ दि.०९/०७/२०१९ चे सादर केलेले आहे. त्यात खालीलप्रमाणे तपशिल दर्शविलेला आहे.

| करांचा तपशिल | थकबाकीची रक्कम (२०१९-२०) | एकुण रक्कम |
|---|---|---|
| संकलित कर | -- | ७०,०६७/- |
| वृक्ष कर | -- | १,६६८/- |
| शिक्षण कर | -- | ४४,४८७/- |
| रोजगार हमी कर | -- | ११,१२२/- |
| अग्निशमन कर | -- | ६,६७३/- |
| विशेष स्वच्छता कर | -- | २००/- |
| उपयोग कर्ता शुल्क | -- | ३६०/- |
| एकूण बील रक्कम | -- | १,३४,५७७/- |
| आगाऊ समायोजन रक्कम | -- | -- |
| एकूण जमा रक्कम | -- | -- |
| समायोजित रक्कम | ५,५८३/- | ५,५८३/- |
| एकूण देय रक्कम | -- | १,३४,५७७/- |

सन २०१९-२० या वर्षाची संस्थानकडे दंडनीय व्याजाच्या रकमे व्यतिरिक्त मालमत्ता कराची थकबाकी नसलेची इकडील धारणा झालेली असलेने याबाबत नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/८४१/२०२० दि.३०/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त थकबाकीबाबत विचारणा करण्यात आली.

त्यास अनुसरुन नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नप/टे-५/१२१/२०२० दि.१३/०८/२०२० अन्वये शिर्डी नगरपंचायतद्वारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे विविध मालमत्तांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे मागणी बीले देण्यात आलेली होती. संदर्भीय पत्रान्वये बीलातील दंडनीय व व्याजाची रक्कम माफ करता येत नसलेबाबत यापूर्वीच इकडील कार्यालयाकडून संस्थानला कळविण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये केलेली मालमत्ता कराची आकारणी व त्याबाबत महाराष्ट्र शासनाने संपुर्ण महाराष्ट्रातील नगरपरिषदांकरीता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीनुसार आकारले जाणारे दंड व व्याज श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयामुळे बदलता येऊ शकत नाही. विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीनुसार सन २०१९-२० मध्ये आपण अदा केलेले रक्कमेतून प्रथम थकबाकीची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे,असेबाबत नमुद करुन, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात आपणास दि.०४/०८/२०२० रोजी पाठवलेल्या सुधारीत मागणी बीलातील मालमत्ता क्रं.B2000001 व A1000062 या मालमत्तेचे थकबाकीसह इतर सर्व मागणी बील दि.०४/०८/२०२० रोजी देण्यात आले आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे दिलेल्या बीलानुसार मालमत्ता

कराची रक्कम भरणेस पुन्हा विलंब झाल्यास एकुण बीलाच्या संकलित कराच्या रक्कमेवर १% सुट मिळणार नाही व त्यावर पुन्हा संगणकीय प्रणालीनुसार दंड व व्याज आकारणी होईल.ही बाब देखील आपले निदर्शनास आणून देणे आवश्यक वाटते. दि.०४/०८/२०२० रोजी आपणास पाठवलेले मागणी बीलानुसार संपुर्ण मालमत्ता कराची रक्कम सत्वर भरुन नगरपंचायतीस सहकार्य करावे,असेबाबत कळवून जा.क्रं.नप/टे-५/१२२/२०२० दि.१३/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची एकूण रक्कम रु.९९,६६,४९२/- इतकी मागणी केली असून सदर रकमेचा धनाकर्ष/धनादेश मालमत्ता कराची सदरची बीले मिळालेपासून १५ दिवसांचे आत नगरपंचायत कार्यालयात भरणा केल्यास नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम १५०(३) अन्वये संकलित करावर १% सुट देण्याची तरतुद आहे. तरी सदर कर

आकारणी मागणी बील रकमेचा धनाकर्ष/धनादेश पाठवून नगरपंचायतीस सहकार्य करावे,असेबाबत इकडेस कळवून त्यासोबत संस्थान मालकीचे १२९ मालमत्तांच्या कर आकारणीची यादी सादर केलेली आहे.

सदरची सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराची एकूण मागणी रक्कम रु.९९,६६,४९२/- या रकमेपैकी १% संकलित कराची सुट रक्कम रु.४९,८२४/- इतकी वजा जाता व नगरपंचायतने उपरोक्तप्रमाणे दर्शविलेली थकबाकीची रक्कम (पूर्वीची दंडनीय व्याजाची रक्कम) रु.९८,१७०/- अशी एकूण रक्कम रु.१,४७,९९४/- इतकी वजा जाता उर्वरित रक्कम रु.९८,१८,४९८/- इतकी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ कलम २१(१)(ज) मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून समितीकडून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल. या तरतुदीचे अनुषंगाने आणि मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१००९ प्रमाणे यापुढे संस्थान मिळकतीचे संबंधातील नियमानुकूल शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई, आकार व इतर शासनास देय असणा-या रकमा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर शासनास अदा करावे, असेबाबतच्या झालेल्या निर्णयाप्रमाणे सदर सन २०२०-२१ या वर्षाचे मालमत्ता करावर यापुढे दंडनीय व्याजाचे रकमेत वाढ होवू नये म्हणून सदरची सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेची कार्यवाही करणेत आलेली आहे.

| एकूण मालमत्ता संख्या | संकलित कराची एकूण रक्कम रु. | थकबाकीची दंडनीय रक्कम रु. | सन २०१९-२० ची थकबाकीची रक्कम | चालू मागणी रक्कम | एकूण मागणी रक्कम रु. (रकाना ३+४+५) | संकलित करावर १% सुट रक्कम रु. | थकबाकी रकाना क्रं.३ मधील दंडनीय रक्कम व १% सुटीची एकूण रक्कम (रकाना ३+७) रु. | थकबाकी व १% सुट वजा करुन नगरपंचायतीस अदा करावयाची रक्कम रु. (रकाना ६-८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १२९ | ४९,८१,३८८/- | ९८,१७०/- | १,१४९/- | ९८,६७,१७३/- | ९९,६६,४९२/- | ४९,८२४/- | १,४७,९९४/- | ९८,१८,४९८/- |

विभागाचा अभिप्राय- शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील उपरोक्त पत्रव्यवहाराचे अवलोकन केले असता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये केलेली मालमत्ता कराची आकारणी व त्याबाबत महाराष्ट्र शासनाने संपुर्ण महाराष्ट्रातील नगरपरिषदांकरीता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीनुसार आकारले जाणारे दंड व व्याज बदलता येऊ शकत नाही. विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीनुसार चालू वर्षात अदा केलेल्या रकमेतून प्रथम थकबाकीची रक्कम वसुल करण्यात येत असलेचे दिसून येते. म्हणजेच सन २०१७-१८ या वर्षाची दंडनीय व्याजाची रक्कम ही सन २०१७-१८ नंतर थकबाकीची रक्कम म्हणून दर्शविणेत आलेली असलेचे दिसून येत आहे. सदरची थकबाकीची रक्कम (पूर्वीची दंडनीय व्याजाची रक्कम) ही नगरपंचायतीस अदा करणे क्रमप्राप्त आहे अन्यथा यापुढेही दरवर्षी सदरची रक्कम थकबाकीची रक्कम दर्शवून त्यावर नगरपंचायतीकडून उक्त संगणकीय प्रणालीनुसार दंडनीय व्याज रकमेची आकारणी चालू राहील,अशी धारणा आहे. तेंव्हा उपरोक्तप्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची शिर्डी

नगरपंचायत,शिर्डी यांनी दर्शविलेली मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम रु.९८,१७०/- मात्र (यापूर्वीची दंडनीय व्याजाची रक्कम) शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणे उचित होईल.

प्रस्ताव- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दर्शविलेली मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम रु.९८,१७०/- मात्र (यापूर्वीची दंडनीय व्याजाची रक्कम) शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात दर्शविलेली रक्कम रु.९८,१७०/-मात्र शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३०** **संस्थान आस्थापनेवरील मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वीत करणेबाबतच्या मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८६ मध्ये अशत: दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम ३(२) मध्ये नियत दिवशी,पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता,हक्क,दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व निहित होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-यास त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल,असे नमुद आहे.

तसेच उक्त अधिनियमाचे कलम ४(३) मध्ये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहित केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशिलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सुची तयार करील आणि तिची प्रत नियत दिनांकापासून ९० दिवसांचे आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी,विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करील. मालमत्तांची मुळ सुची संस्थान व्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल. याची जबाबदारी कार्यकारी अधिका-यांवर सोपविण्यात आलेली आहे.

आणि कलम ४(४) मध्ये पोटकलम (१) किंवा (२) अन्वये तरतुद केल्याप्रमाणे कोणत्याही मालमत्ता सुपूर्द किंवा हस्तांतरीत करण्यात आली असेल त्याबाबतीत कार्यकारी अधिकारी वस्तुसुचीची यथोचित पडताळणी केल्यानंतर हस्तांतरकास त्याची योगय ती लेखी पावती देईल आणि त्यानंतर अशा मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी कार्यकारी अधिकारी जबाबदार असेल,अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना–** संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९८६ मध्ये संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देणेत आली. याऐवजी संस्थानच्या अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली अशी दुरुस्ती करणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.१३/०७/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.३७० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा,असे ठरले."

सदर निर्णयात नमुद केलेप्रमाणे खालीलप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**पूर्वपिठीका**-यापूर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था,अधिनियम १९५० अन्वये शिर्डी, जि.अहमदनगर येथील श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नावे नोंदणी झालेली होती. श्री शिर्डी साईबाबा संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरीता आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन,प्रशासन,शासन व नियंत्रण करण्यासाठी तरतुद करण्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ चा दि.२३/०८/२००४ रोजी पासून अंमलात आलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम ३(२) मध्ये नियत दिवशी,पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता,हक्क,दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व निहित होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-यास त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल, असे नमुद आहे.

तसेच उक्त अधिनियमाचे कलम ४(३) मध्ये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहित केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशिलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सुची तयार करील आणि तिची प्रत नियत दिनांकापासून ९० दिवसांचे आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी,विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करील. मालमत्तांची मुळ सुची संस्थान व्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल. याची जबाबदारी कार्यकारी अधिका-यांवर सोपविण्यात आलेली आहे.

मात्र त्यावेळेस अभिलेखाचे योग्यरितीने जतन करणे व नोंदी वेळोवेळी अद्ययावत करणे अशी व्यवस्था केंद्रीभुतरित्या अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आलेने व शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असलेने साईभक्तांना मुलभूत सेवा सुविधा पुरविणेकामी संस्थानला मोठया प्रमाणात जागेची आवश्यकता भासल्याने, याकरीता संस्थानने शिर्डी व परिसरातील गावांमधील जमीनी भुसंपादनाने तसेच खरेदीने घेतलेल्या आहेत. या सर्व मालमत्तेचे व्यवस्थापन व संरक्षण करणे, त्यावर काही अतिक्रमण होवू नये यासाठी आवश्यक ती संरक्षण व्यवस्था उभारणे, माहिती फलक लावणे तसेच संस्थानने पूर्वी भाडेपट्टयावर दिलेल्या मालमत्तेचे आवश्यक असल्यास प्रचलित दराने नुतनीकरण करणे अथवा गरजेनुसार त्याच्या उचित प्रयोजनासाठी विनियोग करणे इ. कामांचे महत्व व व्याप्ती ही मोठया प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले.

त्यावेळेस संस्थानच्या सर्व मिळकतीचे रेकॉर्ड विधी विभागाकडे होते. याशिवाय संस्थानचे सर्व कायदेविषयक कामे ही विधी विभागामार्फत केली जात होती. त्यामुळे संस्थानच्या मिळकतीबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल ठेवणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे, त्याबाबत असलेल्या अडीअडचणी दुर करणे,याबाबतची माहिती अद्ययावत ठेवणे,संस्थानच्या चल अचल मालमत्तेची

माहिती मा.व्यवस्थापन समिती व कार्यकारी अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे इ.कामे करणेस तत्कालीन यंत्रणा सक्षम नसल्याचे निदर्शनास आलेने उपरोक्त सर्व कामकाज करणेकामी स्वतंत्र विभाग आवश्यक असलेचे निदर्शनास आलेने संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेकामीचा प्रस्ताव संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. **त्यात निर्णय क्रं.९८६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच या विभागाकरीता एक विभाग प्रमुख,एक जमीन मोजणीदार,एक वरिष्ठ लिपीक,एक लिपीक व एक मदतनीस इ. आवश्यक कर्मचारी संस्थान कर्मचा-यांमधून देण्यात यावे,असे ठरले.**

उपरोक्त निर्णयाप्रमाणे संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रं.एसएसएस/वशी-०१/३८३८/२०१४ दि.१९/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे.

तदनुसार दि.१९/११/२०१४ पासून मालमत्ता विभागाचे स्वतंत्ररित्या कामकाज चालू झालेले आहे. संस्थानचे स्थावर मालमत्तेत दिवसेंदिवस वाढच होत असून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थान मालकीच्या जमीनींच्या (स्थावर मालमत्तेच्या) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम १९५१ चे नियम २४ अ नुसार अनुसूची १०अअ, भाग १ (स्थावर मालमत्ता) प्रमाणे आवश्यक त्या नोंदी घेवून नोंदवहया अद्ययावत करणेचे कामकाज मालमत्ता विभागामार्फत चालू आहे. उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने संस्थानचे फक्त स्थावर मालमत्तेसंबंधात (अचल) मालमत्ते संबंधात कामकाज मालमत्ता विभागामार्फत करणेचे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे संस्थानचे फक्त अचल मालमत्ते संबंधातीलच (स्थावर मालमत्ते संबंधात) कामकाज मालमत्ता विभागामार्फत करणेत येते.

**संस्थानच्या चल मालमत्तेबाबत म्हणजेच सोने,चांदी,दागिने,मौल्यवान वस्तू व इतर चीज वस्तू याबाबतची संपूर्ण माहिती विहित नमुन्यात संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत ठेवली जाते. तसेच टेबल, खुर्ची, कपाट व इतर वस्तू (डेडस्टॉक) हयाबाबतच्या नोंदी विहीत नमुन्यात सदर वस्तू ज्या ज्या विभागाकडे आहेत त्या त्या विभागामार्फत ठेवणेत येतात व दर आर्थिक वर्षात चल मालमत्तेच्या (Dead Stock) तसेच सादिल/ किरकोळ (Consumable Item) वस्तूंची पडताळणी देखील लेखाशाखा विभागामार्फत नियमितपणे करणेत येत असते.**

**विभागाचा अभिप्राय**–संस्थानचे चल मालमत्ते संबंधातील म्हणजेच सोने,चांदी,दागिने,मौल्यवान वस्तू व इतर चीज वस्तू याबाबतची माहिती विहित नमुन्यात संस्थानच्या लेखाशाखा विभागामार्फत अद्ययावत

ठेवली जाते. तसेच टेबल,खुर्ची,कपाट व इतर वस्तू (डेडस्टॉक) हयाबाबतच्या नोंदी विहीत नमुन्यात सदर वस्तू ज्या ज्या विभागाकडे आहेत त्या त्या विभागामार्फत ठेवणेत येतात व दर आर्थिक वर्षात चल मालमत्तेच्या (Dead Stock) तसेच सादिल/ किरकोळ (Consumable Item) वस्तूंची पडताळणी देखील लेखाशाखा विभागामार्फत नियमितपणे करणेत येत असते.

यास्तव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९८६ मध्ये संस्थानच्या **चल-अचल** मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली. यात खालीलप्रमाणे अंशत: बदल करणे आवश्यक आहे.

संस्थानच्या **चल-अचल** मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली याऐवजी संस्थानच्या **अचल मालमत्तेकरीता** स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली, अशी दुरुस्ती करता येईल.

प्रस्ताव–संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९८६ मध्ये संस्थानच्या **चल-अचल** मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली याऐवजी संस्थानच्या **अचल मालमत्तेकरीता** स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली, अशी दुरुस्ती करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वीत करणेबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८६-संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली याऐवजी संस्थानच्या अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली, अशी दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३१** **मालमत्ता विभागात कार्यरत असलेले कंत्राटी सल्लागार श्री.सुरेश सुधाकर भालेराव (सेवानिवृत्त नायब तहसीलदार) यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.१९/०८/२०२० रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना- संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दिवसेंदिवस वाढत असलेल्या कामांची व्याप्ती विचारात घेवून व भविष्यात १) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी,अहमदनगर ते शिर्डी, भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छाननी करणे इ. २) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे. ३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे. ४) मौजे रुई, ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छाननी करणे,मोजणी करुन घेणे व त्यासंबंधीत कामकाज करणे. ५) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्द करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्द करणेकामीची कार्यवाही करणे. ६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता,कोपरगाव,दिवाणी न्यायालय, व.स्तर,कोपरगाव,सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय, औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३८ केसेसमध्ये उचित कार्यवाही करणे. ७) संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै. चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे ८) मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे ९) यापूर्वीचे भुसंपादन प्रकरणात शासनाकडे संस्थानने भरलेली अनामत रक्कम परत मिळणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व पाठपुरावा करणे १०) मौजे येसगाव येथील पालखी थांब्याची जागा संस्थानचे नावावर करुन घेणेकामी कार्यवाही करणे. ११) संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे, अशा प्रकारची महत्वाची कामे करावयाची आहेत. १२) अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छाननी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणे.१३) मिळकत रजिस्टर नव्याने करुन ते अद्ययावत करणे. इ.कामे करावयाची आहेत. याशिवाय यापूर्वी मालमत्ता विभागाचे कोर्ट केसेसचे सर्व कामकाज विधी विभागामार्फत करणेत येत होते. ते सर्व

कामकाज विधी विभागाकडून मालमत्ता विभागाकडेस वर्ग करणेत आलेले आहे. त्यात दिवाणी न्यायालय,क.स्तर,व.स्तर,जिल्हा व सत्र न्यायालय,उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय इ. कोर्टामध्ये सर्व मिळून मालमत्ता विभागाच्या सुमारे ३० ते ३५ केसेस चालू आहेत. त्यांचे कामकाज पाहणेसाठी आणि उपरोक्त दर्शविलेले कामकाजाची व्याप्ती,विविधता व महत्व विचारात घेता मालमत्ता विभागासाठी आणखी एका सेवानिवृत्त नायब तहसिलदाराची आवश्यकता असलेने श्री.सुरेश सुधाकर भालेराव,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधन तत्वावर दरमहा रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या रकमेवर कंत्राटदारामार्फत ११ महिन्यांचे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सल्लागार म्हणून नियुक्त करणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात आयत्या वेळचा विषय नं.३५ निर्णय क्रं.२९२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**"यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.सुरेश सुधाकर भालेराव,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधन तत्वावर दरमहा रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या रकमेवर कंत्राटदारामार्फत ११ महिन्यांचे कालावधीसाठी मालमत्ता विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली."**

दरम्यानचे काळात श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांची संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील जा.क्रं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/२०७४/२०१९ दि.२९/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवरील मालमत्ता विभागाकडील जमीन महसुल व भुसंपादन विषयक अनुषंगिक कामकाजासाठी सेवाकरार पध्दतीने ३ महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आली. तदनुषंगाने श्री.सुरेश सुधाकर भालेराव हे दि.०५/०९/२०१९ रोजी संस्थानचे मालमत्ता विभागाकडे कार्यरत झाले. तदनंतर संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५९ च्या अनुषंगाने संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१२/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांना सहा महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तदनंतर संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१४ चे अनुषंगाने संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०१/०८/२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांचे नियुक्तीस दि.०५/०६/२०२० पासून पुढील तीन महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.०४/०९/२०२० रोजी संपुष्टात येत असलेने पुढील कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेकामी श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांनी त्यांचेकडील दि.१९/०८/२०२० रोजीच्या अर्जान्वये संस्थानकडे विनंती केलेली आहे.

उपरोक्त कालावधीत श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांनी मालमत्ता विभागात खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) संस्थान मालकीच्या मौजे पांगरी,ता.सिन्नर येथील ग.नं.५१९ पै.चे क्षेत्र रस्ते विकास महामंडळाचे रस्त्याचे भुसंपादन नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त करुन घेणेकामी आवश्यक ती कार्यवाही करणेत आली.

२) संस्थान मालकीच्या मौजे पांगरी,ता.सिन्नर येथील जमीन ग.नं.५१९ पै.चे क्षेत्र दुरुस्तीकामी प्रस्ताव तयार करुन मा.तहसिल कार्यालय,सिन्नर यांचे आदेश प्राप्त करुन घेवून त्यानुसार दुरुस्त फेरफार घेण्यात आला असून प्रस्तुत नोंद निर्णयासाठी प्रलंबित आहे.

३) संस्थान मालकीच्या मौजे पांढुर्ली, ता.सिन्नर येथे असलेल्या "साई पालखी थांबा" या अकृषीक प्रयोजनासाठी होत असलेला वापर हा धार्मिक प्रयोजनासाठी होत असल्याने या क्षेत्रास केलेली अकृषीक आकारणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ११७ नुसार अकृषीक आकारणी (सारा) माफ होणेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणेत येत आहे.

४) संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील शेतजमीन/अकृषीक जमीनीचे जमीन महसूल/अकृषीक कर इ. करांच्या रकमा शासनास अदा करणेकामी निश्चित केलेल्या आकारणीची पडताळणी करुन शासनास देय असलेल्या महसुल कराची रक्कम शासनास जमा करणेची कार्यवाही करणेत आली.

५) संस्थानचे नवीन पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईन टाकणेसाठी परवानगी मिळणेकामी तहसिल कार्यालय,राहाता यांचेकडेस संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करुन अंतिम आदेश प्राप्त करुन घेतले आहेत.

६) प्रस्तावित नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी बांधावयाच्या पाण्याच्या टाक्यांसाठी संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी व सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचेकडेस बांधकाम परवानगी मिळणेसाठी सादर केलेल्या आराखडयास मंजुरी मिळणेकामी पाठपुरावा करुन परवानगी प्राप्त करुन घेतली आहे.

७) संस्थान मालकीच्या मालमत्तेची विहीत नमुन्यात ठेवणेत आलेली नोंदवही अद्ययावत करणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार विहीत नमुन्यातील इंग्रजी व मराठी भाषेतील नोंदवहया नव्याने छपाई करुन घेण्यात आलेल्या आहेत.

८) शिर्डी विकास योजनेअंतर्गत असलेल्या रस्त्याचे भुसंपादन प्रकरणातील जमीन मालकांनी भुसंपादन कायदा कलम १८ खाली वाढीव नुकसान भरपाईसाठी न्यायालयात भुसंदर्भ दाखल केले होते. त्या दाव्यात न्यायालयाचे निर्णयानुसार जमीन मालक यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेसाठीच्या ०६ प्रकरणात आवश्यक ती माहिती मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी यांचे कार्यालयात समक्ष जावून प्राप्त करुन घेवून जमीन मालकांना वाढीव नुकसान भरपाई संदर्भात सदर रक्कम अदा करणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

९) संस्थान मालकीच्या जमीनींचे ईआरपी प्रणालीत माहिती भरणेकामी लेखाशाखेत समक्ष हजर राहून बुक व्हॅल्यूच्या मुल्याबाबत असलेल्या तफावतीचा मेळ घेण्यात आलेला आहे.

१०) संस्थान मालकीच्या मौजे निघोज येथील साईपालखी निवारा या मिळकतीवर इमारत कराच्या ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेल्या बीलाच्या रकमेत सकृतदर्शनी तफावत दिसून येत असलेने त्यात दुरुस्ती करुन ग्रामपंचायत कार्यालयाशी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

११) संस्थान मालकीच्या मौजे निमगांव-को-हाळे,कनकुरी,को-हाळे,ता.राहाता,पांगरी,पांढुर्ली आणि मुसळगांव,ता.सिन्नर, भोयरेपठार,ता.नगर येथील मिळकतींवरील श्री साईबाबा संस्थान,शिर्डी या नावाऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (अधिनियम २००४ प्रमाणे) याप्रमाणे नावात दुरुस्ती करणेकामी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

१२) मौजे शिर्डी,ता.राहाता येथे संस्थानने धारण केलेल्या शेतजमीन/अकृषिक जमीनीचे शेतसारा यासंबंधातील आकारणीची गांव नमुना ८ अ व ७/१२ चा मेळ घेवून आवश्यक ती दुरुस्ती करणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

१३) शिर्डी नगरपंचायत हद्दीतील संस्थान मालकीच्या जमीनींच्या कराच्या सन २०२०-२१ या वर्षाच्या नगरपंचायत,शिर्डी कडून प्राप्त झालेल्या मागणी बीलाची तपासणी करुन सदर मालमत्ता कराची रक्कम शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेकामी कार्यवाही चालू आहे.

१४) भुसंपादन प्रकरणात शासनाकडे संस्थानने भरलेल्या अनामत रकमेपैकी अखर्चित राहीलेली रक्कम रु.२० कोटी संस्थानकडे जमा होणेकामीची कार्यवाही करणेत आली.

१५) संस्थान मालकीच्या मौजे निमगांव-को-हाळे येथील मिळकतींच्या सन २०१८-१९ या वर्षाच्या मिळकत कराच्या मागणी बीलाची तपासणी केली असता त्यात सुमारे रु.२,३१,१४८/- इतकी रक्कम जास्त आकारलेचे निदर्शनास आलेने ती रक्कम कमी करुन दुरुस्त मागणी बील प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करणेत आली.

१६) मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची शेतजमीन/अकृषीक जमीनीचे महसूल व इतर कराची सन २०१९-२० या वर्षाच्या मागणी बीलाची तपासणी केली असता त्यात जमीन महसूल कराच्या रकमेत सुमारे **रु.२४,७५१/-** इतकी रक्कम जास्त आकारणेत आलेली असलेचे कामगार तलाठी यांचे निदर्शनास आणून देवून दुरुस्त मागणी बील प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करणेत आली.

**विभागाचा अभिप्राय-** संस्थानचे मालमत्ता विभागाकडील अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छानणी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणेचे कामकाज सुरु करणेत आले असून नव्याने छपाई करुन घेतलेले मराठी व इंग्रजी भाषेतील मिळकत रजिस्टर जुन्या मिळकत रजिस्टरवरुन अद्ययावत करणेचे काम अलाहिदा चालू करणेत येत आहे.

तसेच मालमत्ता विभागात संस्थान मालकीच्या विविध ठिकाणी असलेल्या प्रत्येक मालमत्तेची स्वतंत्र संचिका तयार करण्याचे काम चालू करणेत आले आहे. सदर संचिकेत संबंधीत मिळकतीचा ७/१२ उतारा/सिटी सर्वे उतारा (मिळकत उतारा), सदरची मिळकत संस्थानकडे ज्या अधिकाराने प्राप्त झाली त्यासंबंधीचे दस्तऐवज, ७/१२ उता-यावरील/मिळकत उता-यावरील सर्व फेरफार उतारे, अकृषीक जमीन संबंधात सक्षम अधिकारी

यांचेकडील अकृषीक परवानगी आदेश/मंजूर रेखांकन आराखडा, मंजूर बांधकाम रेखांकन आराखडा, संबंधीत बांधकाम परवानगी आदेश, संबंधीत मिळकतीचा नगरपंचायत/ग्रामपंचायत असेसमेंट उतारा व इतर अनुषंगिक दस्तऐवज लावून नोट शीट तयार करावे लागणार आहे. सदरची उपरोक्त सर्व कागदपत्रे संकलित करणेत येत आहेत.

सदरचे काम हे मोठया स्वरुपाचे असून संस्थान मालकीचे प्रत्येक मालमत्तेची स्वतंत्र अद्ययावत संचिका तयार होणार आहे. त्यामुळे संस्थान मालकीच्या प्रत्येक मिळकतीचा पुर्वइतिहासासह सर्वांगीण परिपूर्ण माहिती सदर संचिकेतून दृष्टिक्षेपात उपलब्ध होणार आहे.

मालमत्ता विभागाकडील उपरोक्त सर्व कामांचा व्याप विचारात घेता व श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांचा महसुल खात्यातील अनुभव विचारात घेता या सर्व कामांसाठी संस्थानला श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांचे सेवेची आवश्यकता आहे.

यास्तव श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांना दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीकरीता संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे यापूर्वीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२९२ प्रमाणे कंत्राटी सल्लागार म्हणून संस्थानचे कर्मचारी कंत्राटदारामार्फत एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.२५,०००/- इतकी अदा करता येईल व दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल.

प्रस्ताव- श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीकरीता संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे यापूर्वीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२९२ प्रमाणे कंत्राटी सल्लागार म्हणून संस्थानचे कर्मचारी कंत्राटदारामार्फत एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.२५,०००/- इतकी अदा करणेकामी व दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५६६** **सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमुद केले की, संस्थानचे मालमत्ता विभागाकरीता कंत्राटी सल्लागार नियुक्त करणेकामी जाहीरात प्रसिध्द करुन व निवड प्रक्रिया राबवून नवीन सल्लागाराची निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना कंत्राटी सल्लागार म्हणून संस्थानचे कर्मचारी कंत्राटदारामार्फत एकत्रित मासिक रक्कम रु.२५,०००/- या मानधनावर दि.०५/०९/२०२० पासून मुदतवाढ देण्यात यावी. त्यास समिती सदस्य श्री.पालवे साहेब यांनी सहमती दर्शविली.**

**मा.अध्यक्षांनी खालील मत मांडले-**

**प्रस्तुतचे विषय नं.३१ व विषय नं.३२ हे दिनांक २४.११.२०२० रोजी चक्रिय पध्दतीने अमान्य करण्यात आलेले आहेत, करिता श्री. सुरेश सुधाकर भालेराव व श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांना मुदतवाढ देणे अध्यक्ष यांना मान्य नाही. करिता अध्यक्षांतर्फे अमान्य करण्यात येत आहेत.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी असे मत व्यक्त केले की, प्रस्ताव आधीच अमान्य करण्यात आला आहे. करिता श्रीमती बनकर यांचेमार्फत देखील अमान्य करण्यात येत आहे.**

**सदर निर्णयाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३२** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे(सेवानिवृत्त नायब तहसीलदार) यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतुद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना- संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व आस्थापना विभागाकडील दि.१९/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणे कामकाज केले जाते.

१) संस्थानचे मिळकत रजिस्टर अद्ययावत ठेवणे.

२) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेकामी तसेच आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जमीनी खरेदी करणेकामी संस्थानकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे,जागेची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

३) देणगी स्वरुपात मिळकती स्विकारणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे,मिळकतीची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

४) खरेदी केलेल्या मिळकतींच्या व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या मिळकतींच्या नोंदी महसुल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) खरेदी घेतलेल्या व दान स्विकारलेल्या मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्दी निशाण्या ठरवून घेणे.

६) संस्थान मालकीच्या कृषीक जमीनी आवश्यकतेनुसार अकृषीक करणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व सक्षम अधिकारी यांचेकडेस सादर करुन उचित कार्यवाही करणे.

७) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतचे प्रकरणी समन्वय साधून उचित कार्यवाही करणे.

८) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेसबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

९) संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर दिलेल्या अथवा द्यावयाच्या मिळकतींचे करारनामे करुन घेणे.

१०) संस्थानचे मालमत्तेबाबतचे शासकीय कर,नगरपंचायत कर व ग्रामपंचायत कर इ.भरणेबाबत कार्यवाही करणे.

११) संस्थानने भाडेपट्टयाने घेतलेल्या मिळकतींचे भाडे व स्थानिक कर भरणा करणे.

१२) संस्थानच्या मिळकती भाडेकराराने देणेकामी प्रस्ताव सादर करणे,भाडेकराराने दिलेल्या मिळकतींच्या वापराची मुदत वाढवून देणे व भाडेकरारनामे करुन घेणे.

१३) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पालखी थांब्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा उपलब्ध करणे,जागेची निश्चिती करणे व पुढील उचित कार्यवाही करणे.

१४) सर्व राज्यातील मुख्य शहरात संस्थानचे माहीती केंद्र उभारणेकामी जागा उपलब्ध करणे.

१५) वर्षातील उत्सवांचे नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे जमीनी अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही करणे.

१६) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीनी कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचे प्रस्ताव व तद्रुषंगाने कार्यवाही करणे.

१७) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे,वरिष्ठांना अहवाल सादर करणे.

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर प्रथमत: दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६६ प्रमाणे दि.१९/१०/२०१६ ते दि.१८/१०/२०१७ या एक वर्ष कालावधीसाठी मासिक रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर, तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८९९ प्रमाणे दि.१९/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७२४ प्रमाणे दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/०९/२०१९ आणि मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४४० प्रमाणे दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कं.कर्मचारी म्हणून प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आलेली आहे. तसेच मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६५ प्रमाणे त्यांचे पूर्वीचे एकत्रित मासिक मानधनात रक्कम रु.५,०००/- इतकी वाढ करुन त्यांना एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३०,०००/- इतके दि.०१/०२/२०२० पासून अदा करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार), कं.सल्लागार यांनी त्यांचे कार्यकालात मालमत्ता विभागाकडे खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवरील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाचे कालावधीसाठी ग्रामपंचायतीने आकारलेली कराची रक्कम प्रति वर्ष रु.१२,७८,०००/- प्रमाणे दोन वर्षांची रक्कम रु.२५,५६,०००/- इतकी ग्रामपंचायतीकडून माफ करुन घेतली असून उर्वरित सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षांसाठी ग्रामपंचायत कराची प्रतिवर्ष रक्कम रु.१२,७८,०००/- ऐवजी प्रतिवर्ष रक्कम रु.६,३९,०००/- इतकी किमान दराने आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

२) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य

मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क मा.मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निश्चित करुन घेणेकामीचे प्रकरणी कामकाज केलेले आहे.

३) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामीचे प्रकरण करुन सदरची रक्कम मिळणेकामी दिवाणी न्यायालयात प्रकरण करणेत आलेले आहे.

४) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथील शासकीय मुल्यांकन रक्कम रु.३२,२७,१३,५००/- इतक्या किंमतीच्या इमारत बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्त करुन तपासून मा.मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन निश्चित करुन घेवून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतची कार्यवाही पूर्ण केली असून त्याप्रमाणे संस्थानच्या नावाने महसुल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

५) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

६) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले आहे व पाठपुरावा करीत आहे.

७) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनींपैकी काही जमीन खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

८) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

९) मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जमीनीपैकी भुसंपादनाद्वारे संस्थानला प्राप्त झालेल्या स.नं.८७ व ८८ मधील क्षेत्रात प्रस्तावित लाडू इमारत व वाणिज्य प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस सादर करणेत आला असून परवानगीसाठी पाठपुरावा करणेत येत येवून आदेश प्राप्त करुन घेतला आहे.

१०) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केलेला आहे. त्यात आरक्षण क्रं.३४ ची भुसंपादन कार्यवाही यापूर्वीच दि.२९/०४/२०१५ रोजी पूर्ण झालेली होती. मात्र भुसंपादित क्षेत्राचा ताबा संस्थानला मिळणेस ऊशिर होत होता. त्याकामी पाठपुरावा करुन भुसंपादन क्षेत्र ६९०३ चौमी.चा ताबा संस्थानला दि.०७/०३/२०१८ रोजी मिळविलेला आहे व त्याप्रमाणे महसुल दपत्री रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानचे नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी "जमीन खरेदी धोरण" निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन पाठविलेला आहे.

१२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत येवून त्यात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करणेचे कामकाज चालू आहे.

१३) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली श्री.भंडारी व श्री.भनसाळी यांची जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छाननी करणे,मोजणी करुन घेणे व त्या संबंधीत कोर्ट प्रकरणी कामकाज पूर्ण करणेत येवून शासन निर्णयाप्रमाणे व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे सदर जमीन संस्थानला खरेदी करणेसाठीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे व सदर खरेदी जमीनींची महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

१४) श्रीं चे शताब्दी उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार खाजगी व शेती महामंडळाची जमीन वेळोवेळी अधिग्रहण करणेची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

१५) सध्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात मयत साखरबाई हरीभाऊ शेळके यांची जमीन संस्थानला भुसंपादनाद्वारे खरेदी करणेचे प्रकरण चालू आहे. या प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेचे कामकाज चालू आहे.

१६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या सुमारे ३२ केसेसमध्ये नियमाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मार्गदर्शन करीत आहे.

१७) संस्थानच्या ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पैकीचे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज चालू आहे.

१८) संस्थानसाठी आरक्षित असलेले आरक्षण क्रं.३९ हे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील आदेशाप्रमाणे रद्द करणेची कार्यवाही करणेत आली असून शासनाकडे भुसंपादनापोटी जमा करणेत आलेली अनामत रक्कम परत मिळणेकामी व इतर भुसंपादन प्रकरणी शासनाकडे जमा असलेल्या रकमा परत मिळणेकामी पाठपुरावा करुन रक्कम रु.२०,७९,००,०००/- इतकी संस्थानकडे जमा करुन घेण्यात आलेली आहे.

१९) मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सर्वे नं.५७/९५ क्षेत्र ०.०१ आर ही कै.महतछत्री यांचे मालकीची स्वकष्टार्जित मिळकत त्यांचे मृत्यूनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना देण्याची त्यांची इच्छा असल्याचे त्यांचे दि.०७/०९/२००५ रोजीच्या अर्जावरुन स्पष्टपणे दिसून आलेने सदरचा अर्ज हेच त्यांचे इच्छापत्र (मृत्युपत्र) संबोधून ते दिवाणी न्यायालयात दाखल करुन मे.कोर्टाकडून प्रोबेट करुन घेणेकामीचे प्रकरण तयार करुन संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के. गोंदकर यांना त्याप्रमाणे मे.कोर्टात उक्त मिळकतीस संस्थानचे नाव लावणेकामीचे आदेश प्राप्त करुन घेणेकामी सुचित केलेले आहे.

२०) मयत हंसाबेन त्रिवेदी यांचे शिर्डी येथील साई समर्पण इमारतीतील उर्वरित क्षेत्र संस्थानला दान करणेबाबतचे मृत्यपत्राप्रमाणे मिळकत कायदेशीररित्या संस्थानचे नावावर करुन घेणेकामीची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

२१) सौ.मंजु दिलीप सुलाखे यांचे मालकीचे मौजे रुई शिवारातील ०.४० आर इतके क्षेत्र संस्थानला दानपत्र करुन देणेबाबतचे अर्जाप्रमाणे संस्थानला सदरची जमीन दान स्विकारणेकामीची कार्यवाही चालू करणेत आलेली आहे.

२२) मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी प्रस्तावित असलेली आरक्षणे रद्द करणेकामी संबंधीत कार्यालयांकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

२३) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे अद्ययावत करणेत आलेले आहेत.

२४) संस्थान मालमत्तेची देखभाल करणेकामी वेळोवेळी मिळकतींना भेटी देणेत आलेल्या आहेत व अडचणींचे निराकरण करणेत आलेले आहे. त्यात विशेषत: कनकुरी येथील संस्थान मालकीच्या तळयाकडे जाण्यासाठीच्या रस्त्याबाबत संबंधीत जमीन मालक यांनी हरकत घेतलेने त्याकामी सदर जमीनीचे मुळ खरेदीखत पडताळून सदर रस्त्या संबंधात बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग यांना मार्गदर्शन करणेत आलेले आहे.

२५) कार्यालयाचे दैनंदिन कामकाजात कार्यालयीन टिपण्या,मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावयाच्या टिपण्या व इतर पत्रव्यवहार नियमितपणे सादर करणेकामी मार्गदर्शन करणेत आलेले आहे.

भविष्यात मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणेची कामे करावयाची आहेत.

१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे.

२) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव,सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय, औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३२ केसेमध्ये उचित कार्यवाही करणे.

३) मौजे येसगाव येथील पालखी थांब्याची जागा संस्थानचे नावावर करुन घेणेकामी कार्यवाही करणे.

४) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी,अहमदनगर ते शिर्डी, भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छानणी करणे.

५) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे.

६) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्द करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्द करणेकामीची कार्यवाही करणे.

७)	संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै. चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे.

८)	मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे.

९)	संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे.

१०)	अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छाननी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणे.

११)	मिळकत रजिस्टर नव्याने करुन ते अद्ययावत करणे. इ.कामे करावयाची आहेत.

विभागाचा अभिप्राय- श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची नेमणुकीची मुदत दि.१८/०९/२०२० रोजी संपत आहे. त्यांनी उपरोक्तप्रमाणे समाधानकारक कामे केलेली असून मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात देखील त्यांचे मार्गदर्शन होत आहे. मालमत्ता विभागामार्फत भविष्यात उपरोक्तप्रमाणे कामे प्रस्तावित आहेत. उपरोक्त कामांच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टिने यापुढेही श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांच्या सेवेची मालमत्ता विभागास आवश्यकता आहे. श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी यापूर्वी त्यांना रजा व शासकीय सुट्टया सवलत नसलेने काही अडचणीचे वेळेस अथवा आजारपणाच्या वेळेस त्यांनी सुटी घेतली तर त्या सुटीच्या दिवसाचे त्यांचे मानधनातून रक्कम कपात केली जाते. परिणामी त्यांना एकत्रित मासिक मानधनाची परिपूर्ण रक्कम मिळत नाही. यास्तव त्यांनी महाराष्ट्र शासनाचे कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या सुट्टया त्यांना अनुज्ञेय करणेकामी विनंती केलेली आहे.

तरी कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे नेमणुकीची पुढील मुदत दि.१९/०९/२०२० ते दि.१८/०९/२०२१ या एक वर्षे कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पूर्वीचेच एकत्रित रक्कम रु.३०,०००/- मात्र (अक्षरी रु.तीस हजार मात्र) इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देता येईल व त्यांना रजा सवलत मिळत नसलेने महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय सुट्टया अनुज्ञेय करता येतील.

प्रस्ताव- कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे नेमणुकीची पुढील मुदत दि.१९/०९/२०२० ते दि.१८/०९/२०२१ या एक वर्षे कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पूर्वीचेच एकत्रित रक्कम रु.३०,०००/- मात्र (अक्षरी रु.तीस हजार मात्र) इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देणेच्या व त्यांना रजा सवलत मिळत नसलेने महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय सुट्टया अनुज्ञेय करणेच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५६७	सदस्य सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमुद केले की, संस्थानचे मालमत्ता विभागाकरीता कंत्राटी सल्लागार नियुक्त करणेकामी जाहीरात प्रसिध्द करुन व निवड प्रक्रिया राबवून नवीन सल्लागाराची निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसीलदार) यांना कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून रक्कम रु.३०,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून दि.१९/०९/२०२० पासून मुदतवाढ देण्यात यावी. त्यास समिती सदस्य श्री.पालवे साहेब यांनी सहमती दर्शविली.**

**मा.अध्यक्षांनी खालील मत मांडले-**

**प्रस्तुतचे विषय नं.३१ व विषय नं.३२ हे दिनांक २४.११.२०२० रोजी चक्रिय पध्दतीने अमान्य करण्यात आलेले आहेत, करिता श्री. सुरेश सुधाकर भालेराव व श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांना मुदतवाढ देणे अध्यक्ष यांना मान्य नाही. करिता अध्यक्षांतर्फे अमान्य करण्यात येत आहेत.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी असे मत व्यक्त केले की, प्रस्ताव आधीच अमान्य केला आहे. करिता श्रीमती बनकर यांचेमार्फत अमान्य करण्यात येत आहे.**

**सदर निर्णयाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरले.		(कार्यवाही- मालमत्ता विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३३	स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत व बॅंकैच कार्यालय व ए.टी.एम. स्थलातंराबाबत मा.शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचे दि.०८.०७.२०२० व तत्सम आशयाचे दि.२१.०९.२०२० रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना–यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५०५ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८ चौमी. जागा स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना वापरासाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.१,०८,९००/- + १०% (रु.१०,८९०/-) अशी एकुण रक्कम रु.१,१९,७९०/- इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर, लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.११/०९/२०१९ ते दि.१०/०८/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले."

तदनुषंगाने स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी दि.१८/०२/२०२० रोजी मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेसमोर नोंदणीकृत लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन दिलेला आहे. सदर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याची मुदत दि.१०/०८/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

उक्त जागा वापराची पुढील मुदत दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिने कालावधीसाठी वाढवून मिळणेकामी मा.शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.बीआर/२०२०-२१/०२७ दि.०७/०८/२०२० अन्वये इकडेस विनंती केली असून त्यात त्यांनी "स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावर क्षेत्र १६२.८८ चौमी. ही जागा दरमहा मासिक भाडे रक्कम रु.१,१९,७९०/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.११/०९/२०१९ ते दि.१०/०८/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरणेकामी संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५०५ प्रमाणे मुदतवाढ दिलेली आहे. त्याप्रमाणे बॅंकेने दि.१८/०२/२०२० रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन दिलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.१०/०८/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. तथापि स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे कार्यालय व ए.टी.एम.हे हॉटेल टेम्पल व्हयू शिर्डी येथे पुढील अंदाजे दोन महिन्यात स्थलांतरीत होणार आहे. बॅंकेचे कार्यालय स्थलांतरीत होईपर्यंत म्हणजेच दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिने कालावधीसाठी संस्थानचे उपरोक्त जागेची बॅंकेला आवश्यकता आहे. तरी दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिन्यांचे कालावधीसाठी उपरोक्त जागा वापराची मुदत वाढवून मिळणेस विनंती आहे. तसेच सध्यस्थितीत स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील एका गाळयामध्ये दोन ए.टी.एम.कार्यरत आहेत. त्यापैकी एक ए.टी.एम. स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी हे स्वत: चालवित असून दुसरे ए.टी.एम. स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे वतीने ईपीएस ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD कंपनी (Agency) यांचेकडे बाहयस्त्रोत (outsource) केलेले आहे. आतापर्यंत ए.टी.एम.चे जागा वापरासाठी स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी आपले संस्थानबरोबर करारनामा केलेला आहे. तथापि सदर जागा स्थलांतरीत होत असल्याने यापुढील ए.टी.एम.साठी चा करारनामा ईपीएस (ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD) कंपनी या Agency सोबत करणे गरजेचे आहे. तरी आपले स्तरावरुन पुढील करारनाम्याची उचित कार्यवाही करण्यात यावी. मंदिरामध्ये असणारी वर्दळ व साईबाबा भक्तांच्या सुविधेसाठी ईपीएस कंपनीचे ए.टी.एम.सदर ठिकाणी पुर्ववत ठेवण्याच्या प्रयोजनामुळे सदर कंपनीने बॅंक कार्यालयाची पूर्वपरवानगी घेतलेली असून त्याकरीता त्यांना VSAT ची स्थापना करणे गरजेचे आहे. त्याकरीता त्यांना इमारतीच्या छतावर खालील क्षेत्रफळाची आवश्यकता आहे. Space Diamension-6*6 Feet (१२ चौ.फुट जागा) Weight of VSAT and blasting-200 KG Approx. तरी आपण वरील VSAT स्थापनेला तसेच कार्यालयाच्या स्थलांतरणाला परवानगी द्यावी,ही विनंती" असेबाबत नमुद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेकडील उपरोक्त पत्राचे अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८ चौमी. जागा वापरास पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.११/०८/२०२० ते

दि.१०/१०/२०२० या दोन महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,१९,७९०/- + १०% (रु,११,९७९/-) अशी एकूण रक्कम रु.१,३१,७६९/- इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

तसेच सदर बॅंकेचे ए.टी.एम.संदर्भात मा.तदर्थ समितीचे दि.११/०५/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी. जागा स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.चे वापरासाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,९८६/- + १०% रु.७९९/- अशी एकूण रक्कम रु.८,७८५/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने दि.२८/०४/२०२० ते दि.२७/०३/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरासाठी मान्यता देण्यात आली. तसेच पूर्वीप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले. सदर निर्णयाप्रमाणे स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी दि.२९/०७/२०२० रोजी उक्त ए.टी.एम.साठी जागा वापराचा लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा नोंदवून दिलेला आहे.

तथापि मा.शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.०७/०८/२०२० रोजीच्या पत्रातील उत्तरार्धात "सध्यस्थितीत स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील एका गाळयामध्ये दोन ए.टी.एम.कार्यरत आहेत. त्यापैकी एक ए.टी.एम. स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी हे स्वत: चालवित असून दुसरे ए.टी.एम. स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे वतीने ईपीएस (ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD कंपनी (Agency) यांचेकडे बाहयस्त्रोत (outsource) केलेले आहे. आतापर्यंत ए.टी.एम.चे जागा वापरासाठी स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी आपले संस्थानबरोबर करारनामा केलेला आहे. तथापि सदर जागा स्थलांतरीत होत असल्याने यापुढील ए.टी.एम.साठी चा करारनामा ईपीएस (ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD) कंपनी या Agency सोबत करणे गरजेचे आहे. तरी आपले स्तरावरुन पुढील करारनाम्याची उचित कार्यवाही करण्यात यावी. मंदिरामध्ये असणारी वर्दळ व साईबाबा भक्तांच्या सुविधेसाठी ईपीएस कंपनीचे ए.टी.एम.सदर ठिकाणी पुर्ववत ठेवण्याच्या प्रयोजनामुळे सदर कंपनीने बॅंक कार्यालयाची पूर्वपरवानगी घेतलेली असून त्याकरीता त्यांना VSAT ची स्थापना करणे गरजेचे आहे. त्याकरीता त्यांना इमारतीच्या छतावर खालील क्षेत्रफळाची आवश्यकता आहे. Space Diamension-6*6 Feet (१२ चौ.फुट जागा) Weight of VSAT and blasting-200 KG Approx. तरी आपण वरील VSAT स्थापनेला तसेच कार्यालयाच्या स्थलांतरणाला परवानगी द्यावी,ही विनंती" अशी विनंती केलेली आहे.

म्हणजेच स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेमार्फत चालविणेत येत असलेले एक ए.टी.एम. व बॅंकेचे कार्यालय हे सुमारे दोन महिन्यात म्हणजेच साधारणत: ऑक्टोबर २०२० मध्ये स्थलांतरीत होणार असून उक्त बॅंकेचे दुसरे ए.टी.एम. ईपीएस (ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD) कंपनी (Agency) यांचेमार्फत बाहयस्त्रोत (outsource) म्हणून ए.टी.एम.साठी सध्यस्थितीत वापरास असलेल्या जागेतच ए.टी.एम.चालू ठेवणार आहेत.

म्हणजेच यापुढे संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी. जागेत सुरु असलेले स्टेट बॅंकेचे उर्वरित एक ए.टी.एम. उक्त कंपनीमार्फत चालू राहणार आहे. त्यासाठी उक्त कंपनीने स्टेट बॅंक ऑफ इंडीया कार्यालयाची पुर्वपरवानगी घेतलेली असलेचे शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०७/०८/२०२० रोजीच्या पत्रात नमुद केलेले असून त्यात त्यांनी त्याकरीता उक्त कंपनीस VSAT स्थापना करणे गरजेचे आहे. त्याकरीता त्यांना इमारतीच्या छतावर Space Diamension-6*6 Feet (१२ चौ.फुट जागा) या क्षेत्रफळाचे जागेची आवश्यकता असलेचे देखील नमुद केलेले आहे.

तेंव्हा स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे कार्यालयाचे व सदर बॅंकेमार्फत चालविणेत असलेले एक ए.टी.एम.चे स्थलांतर होणेच्या कालावधीत ईपीएस ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD या कंपनीमार्फत चालविणेत येत असलेल्या एका ए.टी.एम.साठी उक्त इमारतीच्या छतावर वापरासाठी प्रस्तावित केलेल्या १२ चौ.फुट या जागेचे मासिक भाडे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चित

करुन घेता येईल व सदर जागेचे निश्चित होणारे मासिक भाडे आणि ए.टी.एम.साठीच्या वापरास दिलेल्या गाळयाचे उपरोक्तप्रमाणे ठरलेले दि.२७/०३/२०२१ पर्यंतचे मासिक भाडे रक्कम रु.८,७८५/- इतके व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ईपीएस ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD या कंपनीकडून वसुल करता येईल व त्याप्रमाणे सदर कंपनीसोबत उक्त जागा वापराचा स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेसोबत केलेल्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याप्रमाणेच करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.०७/०८/२०२० व तत्सम आशयाचे दि.२१/०९/२०२० रोजीच्या पत्राचे अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८ चौमी. जागा वापरास पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,१९,७९०/- + १०% (रु.११,९७९/-) अशी एकूण रक्कम रु.१,३१,७६९/- इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ तसेच स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे कार्यालयाचे व सदर बॅंकेमार्फत चालविणेत असलेले एक ए.टी.एम.चे स्थलांतर होणेच्या कालावधीत ईपीएस ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD या कंपनीमार्फत चालविणेत येत असलेल्या एका ए.टी.एम.साठी उक्त इमारतीच्या छतावर सुमारे २०० किलो वजनाचा VSAT and Blasting ची स्थापना करणेसाठीच्या जागा वापरासाठी प्रस्तावित केलेल्या १२ चौ.फुट या जागेचे मासिक भाडे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चित करुन घेणेच्या व सदर जागेचे निश्चित होणारे मासिक भाडे आणि ए.टी.एम.साठीच्या वापरास दिलेल्या गाळयाचे उपरोक्तप्रमाणे ठरलेले दि.२७/०३/२०२१ पर्यंतचे मासिक भाडे रक्कम रु.८,७८५/- इतके व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ईपीएस ELECTRONIC PAYMENT & SERVICES (P) LTD या कंपनीकडून वसुल करणेच्या व त्याप्रमाणे सदर कंपनीसोबत उक्त जागा वापराचा स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेसोबत केलेल्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याप्रमाणेच करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८ चौमी. जागा स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना वापरास मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,१९,७९०/-+१०% (रु,११,९७९/-) अशी एकूण रक्कम रु.१,३१,७६९/- इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.११/०८/२०२० ते दि.१०/१०/२०२० या दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग )**

---

**विषय नं.३४** **दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोल्यांचे वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजनासंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि. यांना कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीचा कार्यादेश देणेचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीच्या बैठकीत निर्णय क्रं.५८० प्रमाणे करणेत आलेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील

जा.नं.एसएसएसटी/वशी-आय.टी./२४६५/२०१६ दि.१७/०८/२०१६ अन्वये पुढील ५ वर्षाकरीता कार्यादेश देणेत आलेला आहे.

मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांचे कर्मचा-यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा ३ खोल्यांचे वापराचे संबंधात यापूर्वी मा.तदर्थ समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५०० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.कॅम्प शिर्डी यांचे कर्मचा-यांना संस्थानचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीतील रुम नं.६,७ व किचन रुम अशा ३ खोल्या दरमहा सेवाआकार रक्कम रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन वापरास लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर दि.१७/०९/२०१९ ते दि.१६/०८/२०२० या ११ महिनेंचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.कॅम्प शिर्डी यांनी दि.०४/०२/२०२० रोजी लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन दिलेला आहे.

सदर करारनाम्याची मुदत दि.१६/०८/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने मा.डायरेक्टर,मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुमला,तिरुपती यांनी त्यांचेकडील दि.१५/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त ३ खोल्या वापराची पुढील मुदत वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुमला (ए.पी.) यांचेकडील उपरोक्त दि.१५/०७/२०२० रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे त्यांच्या कंपनीच्या कर्मचा-यांना शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्वे नं.९/२८ व सर्वे नं.९/३२ एकूण क्षेत्र ०.०३.७२ आर मधील शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या उपरोक्त तीन खोल्यांची वापराची मुदत वाढवून देणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६१५/२०२० दि.२७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे आय.टी.विभाग प्रमुख यांचे अभिप्राय मागविणेत आले.

तदनुषंगाने संस्थानचे प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएसटी/ आयटी/ ५८/२०२० दि.३१/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि.तिरुमला यांचे कर्मचा-यांचे निवासासाठी वापरास दिलेल्या खोल्यांची मुदत दि.१७/०८/२०२० ते दि.१६/०७/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वाढवून देणे संदर्भात केलेली विनंती मान्य करणेस हरकत नाही,असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

तदनुषंगाने मा.डायरेक्टर,मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुमला यांना त्यांचे कर्मचा-यांसाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीमधील वापरास दिलेल्या रुम नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांची वापराची मुदत दि.१७/०८/२०२० ते दि.१६/०७/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर वाढवून देणेच्या व पूर्वीप्रमाणेच लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला आहे.

सदर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी आहे.

दरम्यानचे काळात संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील दि.२६/०८/२०२० रोजीच्या कार्यालयीन टिपणी अन्वये "मे.त्रिलोक,तिरुपती यांनी पत्राद्वारे केलेल्या विनंतीनुसार त्यांचे कर्मचा-यांसाठी शांतीनिकेतन इमारतीमध्ये सशुल्क देणेत आलेल्या ३ रुमपैकी किचन रुम सशुल्क वापरासाठी ठेवून उर्वरित २ रुम (रुम नं.६ व ७) साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत तपासून सदर रुमच्या चाव्या जमा करुन घेणेस व मालमत्ता विभागामार्फत या संदर्भात नव्याने करारनामा करणेस संबंधीत विभागांना आदेश होणेकामी मान्यता देणेत आलेली आहे.

तदनुषंगाने मालमत्ता विभागाकडील दि.०६/०९/२०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आली असता त्यावर प्रस्तुतकामी सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेकामी निर्देशित करणेत आलेले आहे.

त्यास अनुसरुन संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील उपरोक्त दि.२६/०८/२०२० रोजीचे टिपणीप्रमाणे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत कार्यवाही करणेत आली किंवा कसे याबाबत संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभाग यांना विचारणा करणेत आली असता त्यांनी त्यांचेकडील दि.२५/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये "त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांचे प्रतिनिधी इकडील कार्यालयात सदर रुमच्या

चाव्या जमा करणेसाठी आले असता त्यांना सदर रुमचे माहे एप्रिल २०२० पासूनचे थकीत भाडे भरणेस सांगितले व भाडे भरणा पावतीसोबत चाव्या जमा करुन घेता येतील असे सांगितले असता सदर प्रतिनिधी यांनी आमचे वरिष्ठांशी बोलतो असे सांगून कार्यालयातून निघून गेले. त्यानंतर अद्यापपर्यंत सदर रुमचे थकीत भाडे भरणेसाठी या कार्यालयाकडे आलेले नाहीत," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात मा.व्यवस्थापक,त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.तिरुपती यांनी त्यांचेकडील दि.०६/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली (टाईमबेस) ने त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांचे मासिक भाडे रक्कम रु.१८,०००/- प्रमाणेचे कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी घोषित करणेत आलेल्या लॉकडाऊन कालावधीतील (एप्रिल २०२० ते जुलै २०२०) या कालावधीतील भाडे माफ करणेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/११००/२०२० दि.१४/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडून अभिप्राय मागविणेत आले.

तदनुषंगाने प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएसटी/आयटी/९५/ २०२० दि.२६/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये "मे.त्रिलोक यांना शांतीनिकेतन इमारतीमध्ये निवासासाठी देणेत आलेल्या ०३ रुम (६,७ व किचन रुम) पैकी २ रुम (६,७) सध्यस्थितीत लॉकडाऊनचे धर्तीवर व प्रणाली कार्यान्वित नसल्याने त्यांचे कर्मचारी वास्तव्यास नसल्याने खाली करत असून त्यांचे चाव्या जमा करुन घेण्यात याव्यात अशी त्यांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार मे.त्रिलोक यांचे कर्मचा-यांसाठी देणेत आलेल्या तीन (६,७ व किचन रुम) पैकी किचन रुम सशुल्क वापरासाठी ठेवून उर्वरित दोन रुम (६ व ७) साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत तपासून सदर रुमच्या चाव्या जमा करुन घेणेस मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर मान्यतेअन्वये मे.त्रिलोक यांचे प्रतिनिधी श्री.रमेश हे रुम नं.६ व ७ चे चाव्या साईप्रसाद निवासस्थान यांचेकडेस जमा करणेसाठी दि.०१/०९/२०२० रोजी गेले होते. परंतु त्यांचेकडे यापूर्वीचे रुम भाडे थकीत असल्याने साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत सदर रुमच्या चाव्या जमा करुन घेणेस नकार देण्यात आला. मे.त्रिलोक, तिरुपती यांनी संस्थानमार्फत त्यांना सशुल्क स्वरुपात निवासासाठी देण्यात आलेल्या ३ रुमचे भाडे (एप्रिल २०२० ते जुलै २०२०) या कालावधीचे) कोविड-१९ चे धर्तीवर सध्यस्थितीत प्रणाली कार्यान्वित नसल्याने माफ करणेत यावे अशी विनंती केलेली आहे. सबब मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि.तिरुमला यांचे कर्मचा-यांचे निवासासाठी तीन रुम (६,७ व किचन रुम) **वापरास देणेत आलेल्या आहेत. परंतु कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात घोषित करणेत आलेल्या लॉकडाऊनमुळे मा.व्यवस्थापनाचे निर्देशान्वये दि.२३ मार्च २०२० पासून मंदिर पुढील आदेश होईपर्यंत बंद असल्याने मे.त्रिलोक यांचेमार्फत सुरु असलेली दर्शनपास वितरण व्यवस्थाही बंद करणेत आलेली आहे. त्यानुसार मे.त्रिलोक यांनी त्यांचेकडील कर्मचारी कमी केलेले असून सध्यस्थितीत त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी वापरास दिलेल्या ३ रुमपैकी १ रुम वापरात असून उर्वरित २ रुम खाली करणेत आले असल्याने त्यांनी केलेली विनंती तथा कोविड-१९ चे धर्तीवर सध्यस्थितीत कार्यप्रणाली कार्यान्वित नसल्याने मे.त्रिलोक यांचे कर्मचा-यांकरीता वास्तव्यास देण्यात आलेल्या २ रुमचे सदर कालावधीतील मासिक भाडे मानवतेच्या दृष्टिकोनातून प्रशासकीय मान्यतेने अंशत: कमी करता येईल,"** वगैरेबाबत इकडेस अभिप्राय सादर केलेले आहेत.

दरम्यानचे काळात त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.तिरुपती यांनी त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेसाठी वापरास दिलेल्या उपरोक्त खोल्यांचे माहे एप्रिल २०२० ते मे २०२० या दोन महिन्यांचे मासिक भाडे दरमहा रु.१८,०००/- प्रमाणे दोन महिन्यांचे भाडे एकूण रक्कम रु.३६,०००/- इतके संस्थानचे लेखाशाखेकडेस दि.०१/१०/२०२० रोजी जमा केलेले आहे.

**उपरोक्त विवेचनावरुन** १) त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेसाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीमधील वापरास देण्यात आलेल्या तीन रुमच्या वापराची मुदत दि.१६/०८/२०२० रोजी संपलेली आहे.

२) सदर तीन रुमचे मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी मासिक भाडे माहे मे २०२० अखेर संस्थानकडे जमा केलेले आहे.

३) उपरोक्त तीन रुमपैकी किचन रुम सशुल्क वापरासाठी ठेवून उर्वरित दोन रुम (रुम नं.६ व ७) या दोन रुमची आवश्यकता नसलेबाबत व सदरच्या रुम खाली करुन देत असलेबाबत मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी दि.०६/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागास कळविलेले आहे.

४) तदनुसार मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांचेकडेस नियमाप्रमाणे दि.१७/०५/२०२० दि.०६/०८/२०२० या पावणे तीन महिनेचे कालावधीचे एकूण भाडे रक्कम रु.४८,६००/- इतके+ दि.०७/०८/२०२० ते दि.०६/१०/२०२० या दोन महिने कालावधीसाठीचे एक रुमचे (किचन रुम) दरमहा मासिक भाडे रु.६,०००/- प्रमाणे एकूण रु.१२,०००/- असे एकूण रु.६०,६००/- इतके येणे असलेचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

विभागाचा अभिप्राय- संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील उपरोक्त पत्रातील अभिप्रायानुसार कोविड-१९ या विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात घोषित करणेत आलेल्या लॉकडाऊनमुळे मा.व्यवस्थापनाचे निर्देशान्वये दि.२३ मार्च २०२० पासून मंदिर पुढील आदेश होईपर्यंत बंद असल्याने मे.त्रिलोक यांचेमार्फत सुरु असलेली दर्शनपास वितरण व्यवस्थाही बंद करणेत आलेली आहे. त्यानुसार मे.त्रिलोक यांनी त्यांचेकडील कर्मचारी कमी केलेले असून सध्यस्थितीत त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी वापरास दिलेल्या ३ रुमपैकी १ रुम वापरात असून उर्वरित २ रुम खाली करणेत आले असल्याने त्यांनी केलेली विनंती

तथा कोविड-१९ चे धर्तीवर सध्यस्थितीत कार्यप्रणाली कार्यान्वित नसल्याने मे.त्रिलोक यांचे कर्मचा-यांकरीता वास्तव्यास देण्यात आलेल्या २ रुमचे सदर कालावधीतील मासिक भाडे मानवतेच्या दृष्टिकोनातून प्रशासकीय मान्यतेने अंशत: कमी करता येईल. म्हणजेच दि.०६/१०/२०२० पर्यंतची मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांचेकडेस थकीत असलेली रक्कम रु.६०,६००/- ही रक्कम माफ करणे अथवा अंशत: माफ करणेच्या निर्णयार्थ सादर.

तसेच मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेसाठी यापुढे फक्त एक रुमची (किचन रुम) ची आवश्यकता असलेने माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार सदर रुमचे नियमानुसार होणारे दरमहा भाडे रक्कम रु.६,०००/- इतके आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०८/२०२० ते दि.०६/०७/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी वापरास देणेच्या व पूर्वीप्रमाणेच लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा दुरुस्त प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.५६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीतील एक रुम (किचन रुम) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि.यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेसाठी दरमहा भाडे रक्कम रु.६,०००/- इतके आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०८/२०२० ते दि.०६/०७/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी वापरास देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच पूर्वीप्रमाणेच लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांचेकडे नियमाप्रमाणे दि.१७/०५/२०२० दि.०६/०८/२०२० या कालावधीचे एकूण भाडे रक्कम रु.४८,६००/-+दि.०७/०८/२०२० ते दि.०६/१०/२०२० या कालावधीसाठीचे एक रुमचे दरमहा मासिक भाडे रु.६,०००/- प्रमाणे एकूण रु.१२,०००/- असे येणे असलेली एकूण रक्कम रु.६०,६००/-मात्र त्यांचेकडून वसूल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३५** **शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.०० मिटर रुंदीकरण भूसंपादन एलएक्यएसआर/२१/२००३ दि.२५.११.२००३ यामध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅन्ड रेफरन्स नं. (भूसंपादन निर्देश अर्ज) २/२००४ वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१(२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतुद आहे.

प्रकरणाची पुर्वपिठीका- शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता ९.०० मी. रुंदीकरणाकरीता जमीन संपादनासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन देणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी यापूर्वी सन २००२-०३ मध्ये संस्थानकडे विनंती केली होती. सदर रस्ता रुंदीकरणासाठी संपादीत होणा-या जमीनीची व त्यावर असलेल्या बांधकामांची मुल्यांकनानुसार होणारी एकूण रक्कम रु.१,५४,२७,८३१/- इतकी येत असून त्यापैकी भूसंपादनासाठी ८०% प्रमाणे रक्कम रु.१,२३,४२,२६५/- मात्र मा.उपविभागीय अधिकारी यांचे प्रस्तावानुसार महसुल विभागाकडे आगाऊ भरणेसाठी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी सदर रकमेची संस्थानकडे मागणी केली होती. याबाबत दि.२८-२९/०९/२००२ रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळ सभेत चर्चा करणेत येऊन निर्णय क्रं.४६८ अन्वये उपरोक्त ८०% आगाऊ रक्कम रु.१,२३,४२,२६५/- शिर्डी नगरपंचायतला त्यांचे विनंतीनुसार देणेसाठी खालील अटीवर मान्यता देणेत आली.

१) सदर रस्त्याच्या रुंदीकरण केलेल्या भागावर पक्का डांबरी अथवा सिमेंट क्रॉक्रीटचा रस्ता तयार करण्याची पूर्ण जबाबदारी (त्यावरील खर्चासह) शिर्डी नगरपंचायतीची राहील. तसेच सदर पूर्ण रस्त्याची व देखभालीची जबाबदारी व खर्च शिर्डी नगरपंचायतीचाच राहील.

२) सदर रुंद रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी घेण्याची व दुर्दैवाने ते झाल्यास तात्काळ ते काढण्याची जबादारी शिर्डी नगरपंचायतीची राहील.

त्याप्रमाणे सदरची ८०% आगाऊ रक्कम रु.१,२३,४२,२६५/- इतकी संबंधीत तत्कालीन भूसंपादन अधिकारी मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांचेकडेस दि.३०/०५/२००३ रोजी धनादेशाद्वारे जमा करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे रथ पालखी रस्त्यावरील अतिक्रमणे काढणे व संपादीत केलेली बांधकामे काढणेसाठी झालेला खर्च उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा तत्कालीन भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत अदा करणेकामी त्यांनी मागणी केलेल्या रक्कम रु.१५,००,०००/- या रकमेस निर्णय क्रं.२९० दि.२९-३०/०५/२००४ अन्वये तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने सदर खर्चाची रक्कम अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. तद्रुषंगाने उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांना रक्कम रु.१४,००,०००/- इतकी दि.२१/१०/२००४ रोजी चेकद्वारे अदा करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठीचे भूसंपादन निवाडा मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांचेकडील एलएक्यूएसआर/२१/२००३ दि.२५/११/२००३ अन्वये घोषित करण्यात आलेला आहे. सदर निवाडयातील संपादीत केलेल्या मिळकतींचे ताबे दि.०८/०५/२००४ रोजी घेण्यात आलेले आहेत.

दरम्यानचे काळात सदर निवाडयातील संबंधीत जमीन मालक १) श्री.दिलीप कन्हैयालाल संकलेचा २) सौ.निर्मला कुंदनमल लुनावत व श्रीमती पुनम दिलीप संकलेचा ३) सौ.निर्मला कुंदनमल लुनावत व श्रीमती सुरजाबाई कन्हैयालाल संकलेचा यांनी प्रस्तुत प्रकरणी भूसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ सह कलम ३० अन्वये भूसंपादन निवाडा जाहीर होवून देय असलेल्या नुकसान भरपाई पेक्षा जास्त नुकसान भरपाई मिळावी म्हणून मा.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं.अनुक्रमे ७/२००४, ८/२००४ आणि ९/२००४ चे दि.१८/०६/२००४ रोजी दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे श्री.रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर १ यांनी लॅण्ड रेफरन्स नं.१/२००४ चा दि.१८/०६/२००४ रोजी दाखल केलेला आहे. आणि श्री.प्रकाश बाबुराव माळवे यांनी लॅण्ड रेफरन्स नं.१०/२००४ चा दि.१८/०६/२००४ रोजी दाखल केलेला आहे.

उपरोक्त लॅण्ड रेफरन्स नं.१/२००४ व लॅण्ड रेफरन्स नं.१०/२००४ मध्ये मे.कोर्टाने दि.२५/१०/२०१२ रोजी आणि लॅण्ड रेफरन्स नं.७/२००४,८/२००४ आणि ९/२००४ मध्ये दि.२८/०२/२०१३ रोजी संबंधीत जमीन मालकांस मोबदला रक्कम वाढवून देण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मे.कोपरगाव कोर्टात रेग्युलर दरखास्त क्रं.१०७/२०१५,१०५/२०१५ व १०६/२०१५ च्या दाखल आहेत.

मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगाव यांचेकडील उपरोक्त आदेशाचे अनुषंगाने मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.२/६५९/ २०१६ दि.२९/१०/२०१६ अन्वये उपरोक्त लॅण्ड रेफरन्स मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम रु.२८,८३,७८८/- इतकी जमा करणेबाबत नगरपंचायत,शिर्डी यांना पत्र निर्गत करुन प्रत संस्थानला निर्गत केलेली आहे. नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.नपं/टे.क्र.८/२९०६/२०१६ दि.०७/११/२०१६ अन्वये सदरची रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी

भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणेकामी इकडेस विनंती केलेली आहे. दरम्यानचे काळात संस्थानने उपरोक्त लॅण्ड रेफरन्स नं.७/२००४, ८/२००४ आणि ९/२००४ मधील निर्णयाविरुध्द संस्थानचे विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात ॲड.नितीन भवर यांचेमार्फत खालील फर्स्ट अपील दाखल केलेले आहेत.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी विरुध्द दिलीप कन्हैयालाल संकलेचा फर्स्ट अपील एसटी ३६४२८/२०१६.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी विरुध्द निर्मला कुंदनमल लुनावत फर्स्ट अपील एसटी ६६८८/२०१७.

३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी विरुध्द निर्मला कुंदनमल लुनावत फर्स्ट अपील एसटी ३६४२५/२०१६.

उर्वरित लॅण्ड रेफरन्स नं.१/२००४ व १०/२००४ मध्ये संस्थानला प्रतिवादी केलेले नसलेने सदर प्रकरणी अपील दाखल केलेले नाहीत.

उपरोक्त फर्स्ट अपीलपैकी फर्स्ट अपील नं.६६८८/२०१७ CA No.10170/2017 मध्ये मे.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.०५/१०/२०१७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

1. This an application for stay to the execution of the impugned award.

2. Heard learned counsel for the appellant and learned A.G.P.for respondent no.3.

3. Learned counsel for the applicant points out that the claimants are not entitled for the interest under Section 34 of the Land Acquisition Act, because the possession of the acquired land was taken after passing of the award. Therefore, prima facie, it appears that in view of the provisions of Section 34 of the Land Acquisition Act the claimants are not entitled for the interest under Section 34 of the Land Acquisition Act.

4. In view of above,the execution and operation of the impuged award is stayed on the condition that the appellant shall deposit entire amount of compensation together with interest, except interest under Section 34 of the Land Acquisition Act in this Court within a period of 12 weeks from today.

5. Civil Application is disposed of.

उपरोक्त आदेशात नमूद केलेप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मे.कोर्टात जमा करणेकामी प्रस्तुत प्रकरणी व्याजासह वाढीव नुकसान भरपाईची रक्कम हिशोबित करुन मिळणेकामी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना इकडील दि.१०/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले.

त्याप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.कावि/२/८६६/ २०१७ दि.१०/११/२०१७ अन्वये प्रस्तुत प्रकरणी “मा.उच्च न्यायालय,खंडपीठ.औरंगाबाद यांनी फर्स्ट अपील क्रं.६६८८/२०१७ मधील सिव्हील ॲप्लीकेशन क्रं.१०१७०/२०१७ मध्ये दि.०५/१०/२०१७ रोजी स्थगिती आदेश पारीत केलेला आहे. सदर स्थगिती आदेशात कलम ३४ खालील व्याजाची रक्कम वगळून उर्वरित रक्कम १२ आठवडयाच्या आत जमा करणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार ज्या प्रकरणात फर्स्ट अपील दाखल करुन स्थगिती आदेश प्राप्त झालेला आहे त्या प्रकरणात खालीलप्रमाणे परिगणीत केलेली रक्कम मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस तात्काळ जमा करणेत यावी. तसेच ज्या प्रकरणात फर्स्ट अपील दाखल केलेले आहे. परंतु स्थगिती आदेश मिळालेले नाहीत अशा प्रकरणात स्थगिती आदेश मिळाल्यानंतर दि.२४/११/२०१७ पर्यंत हिशोबित केलेली रक्कम मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस जमा करावी व ज्या प्रकरणात पहीले अपील दाखल केलेले नाही (भूसंदर्भ क्रं.१/२००४ व १०/२००४) अशा प्रकरणात वाढीव मोबदल्याची रक्कम मे.कोपरगाव कोर्टात तात्काळ जमा करणेत यावी व तसे केलेबाबत या कार्यालयास कळवावे” वगैरेबाबत नमूद केलेले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी मोबदल्याची प्रकरणवार परिगणीत केलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | भूसंदर्भ क्रं. | वाढीव मोबदला रक्कम | कलम २८ अन्वये व्याज (दि.२४/११/२०१७ पर्यंत) | दि.२४/११/२०१७ पर्यंत हिशोबित करुन येणारी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/२००४ | १८,१५०/- | ३७,०२६/- | ५५,१७६/- |
| २ | ०७/२००४ | ३,२५,८९७/- | ६,६४,८२९/- | ९,९०,७२५/- |
| ३ | ०८/२००४ | १,६२,०४६/- | ३,३०,५७४/- | ४,९२,६२१/- |
| ४ | ०९/२००४ | १,८३,८४६/- | ३,७५,०४५/- | ५,५८,८९१/- |
| ५ | १०/२००४ | ६,१८७/- | १२,६२१/- | १८,८०८/- |
| | | ६,९६,१२६/- | १४,२०,०९६/- | २१,१६,२२२/- |

१) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील क्रं.६६८८/२०१७ मधील दि.०५/१०/२०१७ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी उपरोक्त तक्त्यातील अ.नं.३ प्रमाणे भूसंदर्भ क्रं.८/२००४ मध्ये परिगणित करुन दिलेली रक्कम रु.४,९२,६२१/- इतकी मे.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेकद्वारे जमा करता येईल.

२) तसेच मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे उर्वरित प्रकरणी म्हणजेच उपरोक्त तक्त्यातील अ.नं.२ व ४ मधील भूसंदर्भ क्रं.७/२००४ व ९/२००४ चे विरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल असलेले फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६ व ३६४२५/२०१६ मध्ये मे.कोर्टाकडून स्थगिती आदेश मिळाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणातील

दि.२४/११/२०१७ पर्यंतची हिशोबित केलेली रक्कम अनुक्रमे रु.९,९०,७२५/- व रु.५,५८,८९१/- अशी एकूण रक्कम रु.१५,४९,६१६/- इतकी रक्कम मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस संस्थानचे लेखाशाखेमार्फत जमा करणेची तरतूद करुन ठेवता येईल.

३) तसेच मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे ज्या प्रकरणात फर्स्ट अपील दाखल केलेले नाहीत म्हणजेच भूसंदर्भ क्रं.१/२००४ व १०/२००४ या प्रकरणात वाढीव मोबदल्याची रक्कम अनुक्रमे रु.५५,१७६/- व रु.१८,८०८/- अशी एकूण रक्कम रु.७३,९८४/- इतकी रक्कम मे.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, कोपरगाव यांचे कोर्टात संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेकद्वारे जमा करता येईल,असेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.१०११ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.०० मी. रुंदीकरण संबंधीत भुसंपादन एलएक्युएसआर २१/२००३ दि.२५/११/२००३ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात लॅन्ड रेफरन्स नं.८/२००४,९/२००४ आणि १/२००४ व १०/२००४ तसेच मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६, ६६८८/२०१७ व ३६४२५/२०१६ मधील वाढीव नुकसान भरपाईची प्रस्तावात नमुद केलेली रक्कम मे.कोर्टात जमा करणेस मान्यता देण्यात आली.**

उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने १) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील क्रं. ६६८८/२०१७ मधील दि.०५/१०/२०१७ रोजीच्या आदेशाचे अनुषंगाने वाढीव मोबदला रक्कम रु.४,९२,६२१/- इतक्या रकमेचा The Registrar,High Court Mumbai Bench Aurangabad यांचे नावाने स्टेट बॅंक ऑफ इंडीया या बॅंकेचा डी.डी.नं.७०६३८४ दि.०४/१२/२०१७ रोजीचा काढणेत येवून सदरचा डी.डी.संस्थान पॅनलवरील वकील ॲड.नितीन भवर यांचेमार्फत मे.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात जमा करणेत आलेला आहे.

२) तसेच मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगाव यांचेकडील भूसंदर्भ क्रं.(लॅण्ड रेफरन्स) १/२००४ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.५५,१७६/- चा डी.डी.नं.७०६३९१ व लॅण्ड रेफरन्स १०/२००४ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.१८,८०८/- इतक्या रकमेचा डी.डी.नं.७०६३८६ हे The Civil Judge, (Senior Division), Kopargaon यांचे कोर्टात मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेमार्फत जमा करणेत आलेले आहे.

३) तसेच दि.२३/०९/२०१९ रोजीच्या मंजूर टिपणीप्रमाणे उपरोक्त भुसंदर्भ क्रं.७/२००४ मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६ (सी.ए.नं.६९०२ /२०१७) एफ.ए.नं.४२३/ २०१९ मधील वाढीव मोबदल्याची व कलम २८ प्रमाणे व्याजाची दि.२४/१०/२०१९ पर्यंतची हिशोबित करुन येणारी एकुण रक्कम रु.१०,८४,४२३/- इतक्या रकमेचा सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी या

बॅंकेचा डी.डी.नं.०४०२५८ दि.२५/०९/२०१९ रोजीचा The Registrar High Court Bench at Aurangabad या नावाने काढणेत आलेला आहे.

४) तसेच भुसंदर्भ क्रं.९/२००४ मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील नं.३६४२५/ २०१६ (सी.ए. नं.६९०५/२०१७) एफ.ए.नं.४२४/२०१९ मधील वाढीव मोबदल्याची व कलम २८ प्रमाणे व्याजाची दि.२४/१०/२०१९ पर्यंतची हिशोबित करुन येणारी एकुण रक्कम रु.६,११,७४७/- इतक्या रकमेचा सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी या बॅंकेचा डी.डी. नं.०४०२५९ दि.२५/०९/२०१९ रोजीचा The Registrar High Court Bench at Aurangabad या नावाने काढणेत आलेला आहे.

उपरोक्त दोन्हीही डी.डी.संस्थान पॅनलवरील वकील ॲड.नितीन भवर यांचेमार्फत इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी /मालमत्ता/२५३५/२०१९ दि.२७/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात जमा करणेत आलेले आहेत.

आता मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.टे-०८/११५७/२०२० दि.२९/०७/२०२० अन्वये “शिर्डी मंजूर विकास योजनेतील (सन १९९२) पालखी रस्त्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेली असून त्यामध्ये निवाडा एलएक्यु/एसआर /२१/२००३ दि.२५/११/२००३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालीलप्रमाणे दाखल झालेल्या भुसंपादन निर्देशन (Land Acquisition Reference) अर्ज क्रं.०२/२००४ मध्ये दि.१६/०३/२०२० रोजी संदर्भ क्रं.०१ नुसार निकाल झालेला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टाने अर्जदार यांना वाढीव नुकसान मोबदला अदा करण्याचे आदेश दिलेले आहे. नगरपंचायतने संदर्भ क्रं.०२ नुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे मे.कोर्टाचे आदेशाची प्रत सादर करुन वाढीव नुकसान मोबदला निश्चित करुन देण्याबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्रं.०३ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करुन निश्चित केलेली आहे.

| | |
|---|---|
| १) जमीन | - ४५,३३३/- |
| २) वाढीव मोबदला रकमेवर ३०% दिलासा | - १३,६००/- |
| ३) कंपोनंट १२% वाढीव मोबदला रकमेवर २७/०३/२००३ ते २५/११/२००३ | - ३,६१८/- |
| | -------------- |
| एकूण | - ६२,५५१/- |

वरील रु.६२,५५१/- या रकमेवर ताबा दि.३०/०५/२००४ पासून १५/०९/२०२० पर्यंत कालावधीसाठी प्रथम वर्षाला ९% व त्यानंतरच्या कालावधीसाठी १५% दराने व्याज कलम २८ प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रथम वर्ष ३०/०५/२००४ ते २९/०५/२००५ पर्यंत (६२,५५१ x १ x ०.०९) | -५,६३०/- |
| २) | दि.३०/०५/२००५ ते १५/०९/२०२० पर्यंत (६२,५५१ x २.२९६३) देय वाढीव मोबदला व्याजासह | -१,४३,६४२/- |
| | १) वाढीव मोबदला | - ६२,५५१/- |
| | २) व्याज १ वर्ष ९% दराने | - ५,६३०/- |
| | ३) व्याज ५५८८ दिवस | - १,४३,६४२/- |
| | **एकूण देय रक्कम** | **- २,११,८२३/-** |

वरीलप्रमाणे मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेली आहे. तरी सदर वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/- इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल. तरी वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/- इतकी शिर्डी नगरपंचायतकडे जमा करण्यास विनंती आहे,” असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रं.२/२००४ मध्ये श्री.भिकचंद कचरदास संकलेचा व इतर ११ हे वादी असून महाराष्ट्र शासन, भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादीपणात सामील केलेले आहेत.

दरम्यानचे काळात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे भुसंपादना संबंधातील विविध प्रकरणांसाठी तसेच शिर्डी विकास योजनेच्या शिर्डी नगरपंचायतीसाठी संपादित केलेल्या जमीनीच्या नुकसान भरपाईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडेस जमा केलेल्या (अग्रीम) रकमेतून झालेल्या खर्चाचा व शिल्लक रकमेचा निवाडा निहाय तपशिल भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतला असून त्यात उक्त भुसंपादन एलएक्युएसआर २१/२००३ या निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.१,३७,४६,११२/- इतकी जमा केलेली असून त्यापैकी रक्कम रु.१,२८,६१,६७२/- इतकी खर्च केलेली असून शिल्लक रक्कम रु.८,८४,४४०/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्वीय प्रबंजी लेखा) या खात्यात जमा असलेचे दिसून येत आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उक्त निवाडा क्रं.२१/२००३ मधील भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रं.२/२००४ या प्रकरणात मे.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, राहाता यांचेकडील उपरोक्त आदेशाचे अनुषंगाने भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी दि.१५/०९/२०२० पर्यंतच्या व्याजासह परिगणित केलेली रक्कम रु.२,११,८२३/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्वीय प्रबंजी लेखा) खात्यात जमा असलेल्या रक्कम रु.८,८४,४४०/- या रकमेतून समायोजित करता येईल व तसे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविता येईल.

**प्रस्ताव-**

उक्त निवाडा क्रं.२१/२००३ मधील भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रं.२/२००४ या प्रकरणात मे.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,राहाता यांचेकडील उपरोक्त आदेशाचे अनुषंगाने भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी दि.१५/०९/२०२० पर्यंतच्या व्याजासह परिगणित केलेली रक्कम रु.२,११,८२३/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्वीय प्रबंजी लेखा) खात्यात जमा असलेल्या रक्कम रु.८,८४,४४०/- या रकमेतून समायोजित करणेच्या व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७०** **यावर सविस्तर चर्चा झाली, सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमुद केले की, शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता ९ मी. रुंदीकरण करणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून संस्थानला भूसंपादन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८-२९.०९.२००२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६८ अन्वये भूसंपादन करणे व भूसंपादनासाठी लागणारी रक्कम रु.१,२३,४२,२६५/- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर रस्त्याची भूसंपादन प्रक्रिया ही उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत एलएक्युएसआर २१/२००३ निवाडा पारीत दि.२५.११.२००३ रोजी पुर्ण करण्यात आली आहे. सदर प्रकरणी भूसंपादन मोबदला रक्कम ही उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे पुर्वीच जमा करण्यात आली आहे.**

**दरम्यानचे काळात सदर भूसंपादन निवाडयातील जमीन मालक यांनी निवाडयातील नुकसान भरपाई व्यतिरिक्त भूसंपादनाची भरपाई वाढवून मिळावी याकरीता मा.दिवाणी न्यायाधीश व.स्तर राहाता येथे LAR No.2/2004 येथे दावा दाखल केला होता. सदर LAR No.2/2004 मध्ये मे.कोर्टाने दि.१६.०३.२०२० रोजी वाढीव मोबदला देण्याचे आदेश पारीत केले आहे.**

**उपरोक्त आदेशास अनुसरुन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे कडील पत्र क्र.नप/टे-०८/११५७/२०२० दि.२९.०७.२०२० अन्वये LAR No.2/2004 आदेश दि.१६.०३.२०२० अन्वये वाढीव मोबदला रक्कम नगरपंचायत यांचेकडे जमा करणेबाबत विनंती केली आहे.**

**सदर LAR No.2/2004 मध्ये श्री साईबाबा संस्थान हे उत्तरवादी क्र.४ हे पक्षकार होते. उपरोक्त रस्त्याचे भूसंपादन करतांना मुळ भूसंपादन रक्कम ही संस्थानमार्फत उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे जमा करण्यात आली होती. आता सदर प्रकरणी मे.कोर्टाने वाढीव भूसंपादन मोबदला देण्याचे आदेश केले असल्याने मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी**

**वाढीव मोबदला जमा करावयाचे कळविले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी देय होणारा वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/-संस्थानकडून अदा करणे योग्य राहील. जर भूसंपादनाची वाढीव मोबदला वेळेवर दिला न गेल्यास सदर रकमेवर १५ टक्के व्याजाचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल. उपरोक्त परिस्थितीनुसार भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्वीय प्रबंजी लेखा) खात्यात संस्थानची रक्कम रु.८,८४,४४०/-मात्र जमा आहे. सदर जमा रकमेतुन मा.न्यायालयाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/- समायोजीत करता येईल.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांचे मते एलएआर नं.२/२००४ मधील पक्षकारास पैसे देणेस हरकत नाही.**

**यावर मा.अध्यक्ष यांनी खालील मत मांडले-**

**फक्त एल.ए.आर. क्र.२/२००४ वगळता इतर एल.ए.आर. मध्ये संस्थानला दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राहाता यांच्या न्यायालयात पक्षकार करण्यात आलेले नाही. म्हणजेच संस्थानला वाढीव मोबदल्याच्या अर्जास प्रतिरोध (contest) करता आलेला नाही. अशा परिस्थितीत सदर एल.ए.आर. मधील अर्जदार व शिर्डी नगरपंचायत यांच्यातील न्यायनिवाडयाची संस्थानकडून अंमलबजावणी होवू पाहत आहे. अध्यक्षांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या पुर्ण पिठाने दिलेल्या U.P. Awas Evam Vikas Parished Vs. Gyan Devi (Dead) By Lrs. & others (1995)2, Supreme Court Cases, 326 या निवाडयाचा आधार घेऊन संस्थानला सदर एल.ए.आर.मध्ये पक्षकार न केल्याने, जर त्रिपक्षीय कराराच्या आधारावर वाढीव मोबदला द्यावयाचा असल्यास आज पर्यंतचे व्याज संस्थानने देणे, हे संस्थानच्या आर्थिक हिताविरुध्द आहे.**

**अध्यक्षांनी असा प्रस्ताव मांडला की, सदर एल.ए.आर.मधील अर्जदार वाढीव मोबदला बिनव्याजी घेत असल्यास त्याप्रमाणे मध्यस्थ केंद्र (Mediation Centre) राहाता यांचेकडे मध्यस्ती तडजोड करुन सदर वाद मिटत असल्यास मिटवावा. मुख्यत्वेकरुन सदर एल.ए.आर.मधील न्यायनिर्णय हे संस्थानचे विरुध्द नाहीत. करिता संस्थानने व्याज देण्याचा प्रश्नच नाही. तदनंतर अध्यक्ष यांनी आधी नमूद केल्याप्रमाणे आक्षेप हा इतर प्रकरणात आहे, एलएआर नं.२/२००४ मध्ये नाही. इतोपर एलएआर नं.२/२००४ मध्ये संस्थानने संबधीत पक्षकारास पैसे देण्यास माझी हरकत नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उक्त निवाडा क्रं.२१/२००३ मधील भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रं.२/२००४ या प्रकरणात मे.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, राहाता यांचेकडील उपरोक्त आदेशाचे अनुषंगाने भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी दि.१५/०९/२०२० पर्यंतच्या व्याजासह परिगणित केलेली रक्कम रु.२,११,८२३/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्वीय प्रबंजी लेखा) खात्यात जमा असलेल्या रक्कम रु.८,८४,४४०/- या रकमेतून समायोजित करण्यास व तसे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना कळविण्यास सर्वोनुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३६** **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील विकसीत एकूण ११ रस्त्यांपैकी भूसंपादनाचे ०९ रस्त्यांपैकी एलएक्य/एसआर/०९/२००७ निवाडा घोषीत दि.३०.११.२००९ व भूसंपादन निवाडा एलएक्य/एसआर/०३/२००७ निवाडा घोषीत दि.०४.११.२०१० चे भूसंपादन प्रकरणी संबधीत जमीन मालक यांनी भूंसपादन कायदा कलम १८ खाली दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्यामध्ये वाढीव मोबदला रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१(२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना–मा.तदर्थ समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेतील झालेल्या निर्णय क्रं.४५१ चे अनुषंगाने पुन:श्च प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

प्रकरणाची पुर्वपिठीका- संस्थानचे बांधकाम विभागाकडील दि.१४/०७/२०२० रोजीच्या कार्यालयीन टिपणी अन्वये इकडील विभागाकडेस पाठविलेल्या टिपणीत, "शिर्डी शहरातील साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पूर्ण करणेसाठी संस्थान व्यवस्थापन समिती शिर्डी नगरपंचायतीस मदत करीत आहे. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील एकुण २५ रस्ते भुसंपादन व विकसित करणेकामी दि.१५/१०/२००६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये त्रिपक्षीय करार झाला होता. त्यानुसार या कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करणेबाबत ठरले. सदर करारानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत ०५ रस्ते विकसनाचे काम २०१२ मध्ये पुर्ण झालेले असल्याने व उर्वरीत ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत आलेले असल्याने सध्या फक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दरम्यान सदर कराराबाबत सदर कार्यवाही सुरु आहे.

या करारात ठरलेनुसार शिर्डी नगरपंचायतमार्फत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०९ रस्त्यांचे भूसंपादन करणे, सेवावाहिन्या स्थलांतरीत करणे, अतिक्रमणे हटविणे इ.कामे करणेत आली व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत रस्ते विकसनाचे काम करण्यात आले.

| रस्ता क्रं. | रस्त्याचे नांव | सध्यस्थिती |
|---|---|---|
| | **विकसित केलेले रस्ते** | |
| ०१) | शिर्डी- निमगांव शिव रस्ता (नगर-मनमाड रोडचे पुर्वेकडील) | काम पुर्ण |
| ०२) | शिर्डी रुई रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) | काम पुर्ण |
| | **भूसंपादन करुन विकसित केलेले रस्ते** | |
| ०३) | नांदुर्खी रस्ता | काम पुर्ण |
| ०४) | कनकुरी रस्ता | काम पुर्ण |
| ०५) | विकास योजनेतील १८ मी. रुंद वळण रस्ता (आरक्षण क्रं.३१ ते नाला क्रं.३४ पर्यंत) | काम पुर्ण |
| ०६) | विकास योजनेतील १५ मी. रुंद रस्ता (आरक्षण क्रं.३१ ते नविन पिंपळवाडी रस्त्यापर्यंत) | काम पुर्ण |
| ०७) | विकास योजनेतील २४ मी.वळणरस्ता (नगर-मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटी ) | काम पुर्ण |
| ०८) | विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर निमगांव शिव ते पिंपळवाडी रस्ता -१८ मीटर रुंदीचा रस्ता. | काम पुर्ण |
| ०९) | विकास योजनेतील १८ मी.रुंदीचा रस्ता( नगर-मनमाड रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता) पुर्व-पश्चिम | काम पुर्ण |
| ०९अ) | विकास योजनेतील १८ मी. रुंदीचा पूर्व -पश्चिम रस्ता ते आरक्षण क्रं. ३१ पोहच. (सुधारित शिर्डी विकास योजनेतील बदलांमुळे भूसंपादन प्रलंबित आहे.) | काम बाकी |
| १०) | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील द्वारकामाई ते ताजीमखान बाबा चौकापर्यंत रस्ता. | काम पुर्ण |
| ११) | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील ६ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर (पालखी रस्ता ते नविन पिंपळवाडी रस्ता) | काम पुर्ण |

शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि.०४/०९/२०१४ अन्वये रु.८८ कोटी व दि.०८/०६/२०१७ रोजीचे शासन निर्णयान्वये रु.३०,७५,३३,१४५/- इतक्या वाढीव भूसंपादन खर्चास मंजूरी देणेत आली असून रु.११८,७५,३३,१४५/- इतक्या खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे. वरील रस्त्यांसाठी अंतिम निवाडयाप्रमाणे होणारी भूसंपादन मोबदल्याची रक्कम, आस्थापना खर्च व इतर योग्य त्या अनुषंगिक रकमा रस्ते विकास महामंडळाने केलेले ०५ रस्ते व उर्वरीत ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करुन संबंधितांना रकमा अदा करण्यात आल्या आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं | संस्था/विभाग | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी (९ रस्ते संयुक्त मोजणी व इतर अनुषंगीक कामापोटी) | ४१,०२,७२४/- |
| ०२ | उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर (९ रस्ते भूसंपादन कार्यवाही) | ३५,०२,७९,०७९/- |
| | मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी (९ रस्ते भूसंपादन कार्यवाहीसाठी) | २७,१६,५०,२०२/- |
| ०३ | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे - ०५ रस्ते विकसन करणे | ९,२२,३४,१८६/- |
| ०४ | ठेकेदार रोमन टारमॅट लि.नवी मुंबई -०६ रस्ते विकसन करणे | २४,३३,५७,३५७/- |
| ०५ | सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि पुणे-०६ रस्ते विकसन करणे | १,२९,८६,४३३/- |
| ०६ | ठेकेदार एस.के.येवले अँड कं.रस्ता क्रं.०५ (आ.क्रं ३१ ते नाला रस्ता ) उर्वरीत कामे | १,४९,३९,७८३/- |
| | एकुण रक्कम | **९८,९५,४९,७६४/-** |

वगैरेबाबत संस्थानचे बांधकाम विभागाचे दि.१४/०७/२०२० रोजीचे टिपणीत नमूद आहे.

वरील एकुण ११ रस्त्यांपैकी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी दि.३०/११/२००९ रोजी घोषित केलेल्या भुसंपादन अंतिम निवाडा एलएक्यु/एसआर/०९/२००७ अन्वये मंजूर केलेल्या संपादित जमीनीच्या मोबदला रकमा मान्य नसल्याने एलएक्यु/एसआर/०९/२००७ संबंधातील जमीन मालक श्री.दिपक गोपाळराव गांधी यांनी भुसंदर्भ क्रं.११९/२०११, सौ. सुमित्रा कैलास कोते यांनी भुसंदर्भ क्रं.१२०/२०११, श्री. कैलास गोविंद कोते यांनी भुसंदर्भ क्रं.१२१/२०११, सौ.सुमित्रा कैलास कोते, भुसंदर्भ क्रं.१२२/२०११ या क्रमांकाचे भुसंदर्भ मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे न्यायालयात भुसंपादन कायदा कलम १८ अन्वये दाखल केलेले होते. सदर दाव्यांत मा.दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,राहाता यांनी दि.०६/०३/२०२० रोजी न्यायनिर्णय दिलेले आहेत. तसेच तत्कालीन मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांनी भूसंपादन अंतिम निवाडा एलएक्यु/एसआर/०३/२००७ दि.०४/११/२०१० रोजी घोषित प्रकरणी संबंधित जमीन मालक श्री.सदाशिव माधव शेळके,रा.शिर्डी, ता.राहाता यांचे सर्वे नं.३/२७ पै. मधील २५८.१८ चौमी.क्षेत्र संपादन करण्यात आले असून सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचे अभिप्राय घेवून रस्ता रुंदीकरणाखालील क्षेत्रास मोबदला रक्कम देय नसल्याने अंतिम निवाडयामध्ये १ रुपये इतकी किंमत त्यांना अदा करण्यात आली आहे. तथापि जमीन मालक श्री.सदाशिव माधव शेळके यांनी निवाडयामधील घोषित केलेली रक्कम रु.१ त्यांना मान्य नसल्याने त्याविरुध्द त्यांनी मे.कोपरगाव कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं.२६/२०१२ दाखल केला होता. त्यामध्ये मे.कोर्टाचा निकाल होवून सदर दावा निकाली काढून त्यांना निवाडयानुसार १ रुपया देण्यात आलेली किंमत योग्य असल्याबाबत आदेश दिलेले आहेत.

मे.कोपरगाव न्यायालयाचे उक्त निर्णयाविरुध्द जमीन मालक श्री.सदाशिव माधव शेळके यांनी मे.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद येथे फर्स्ट अपील क्रं.२४१०/२०१० दाखल केले होते. सदर अपीलामध्ये मे.उच्च न्यायालयाने दि.०५/०२/२०१९ रोजी जमीन मालकांना रक्कम अदा करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच तत्कालीन मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील एलएक्यु/एसआर/२१ /२००३ अंतिम निवाडा घोषित दि.२५/११/२००३ अन्वये मंजूर केलेली मोबदला रक्कम मान्य नसलेने सदर निवाडयातील जमीन मालक भिकचंद पि.कचरदास संकलेचा व इतर १० सर्व रा पालखी मार्ग,शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांनी मा.दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,कोपरगांव यांचे न्यायालयात भुसंपादन कायदा कलम १८ खाली भूसंदर्भ क्रं.०२/२००४

अन्वये दाखल केलेले होते. सदर दाव्यात मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर राहाता यांनी दि.१६/०३/२०२० रोजी वाढीव मोबदल्याबाबत निर्णय दिलेला आहे.

उक्त दाव्यात मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,राहाता यांचे निर्णयानुसार तसेच मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयानुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांनी भूसंपादन कायदा कलम २८ अन्वये निवाडे घोषित केलेले आहेत. त्याचा तपशिल तसेच वाढीव नुकसान भरपाई संदर्भात कलम २८ नुसार पारित केलेल्या आदेशाप्रमाणे संबंधित जमीन मालक यांना अदा करावयाच्या वाढीव नुकसान भरपाईचा सविस्तर तपशिल सोबतच्या **परिशिष्ट अ** व **परिशिष्ट ब** मध्ये नमुद केला आहे. संबंधित जमीन मालक निहाय वाढीव मोबदला रकमेचा एकत्रित गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | जमीन मालकाचे नांव | मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर राहाता यांचेकडील भूसंपादन निर्देशन अर्ज क्रं. व मा मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे कडील फर्स्ट अपिल क्रं. | न्यायनिर्णय दिनांक | मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांनी घोषित केलेल्या कलम २८ प्रमाणे निवाडयातील एकुण वाढीव मोबदला रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | भिकचंद पि. कचरदास संकलेचा व इतर १० सर्व रा.पालखी मार्ग,शिर्डी,ता.राहाता | २/२००४ | १६/०३/२०२० | २,११,८२३/- |
| २) | दिपक पि. गोपाळराव गांधी, रा.राहाता,जि.अहमदनगर | ११९/२०११ | ०६/०३/२०२० | ४०,३६,८७८/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | सुमित्रा भ्र. कैलास कोते,रा.शिर्डी,ता.राहाता | १२०/२०११ | ०६/०३/२०२० | १,५९,२००/- |
| ४) | कैलास पि. गोविंद कोते,रा.शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर | १२१/२०११ | ०६/०३/२०२० | ७,७४,००६/- |
| ५) | सुमित्रा भ्र.कैलास कोते,रा.शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर | १२२/२०११ | ०६/०३/२०२० | ३,३८,३३६/- |
| ६) | सदाशिव माधव शेळके,रा.शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर | फर्स्ट अपिल क्रं.२४१०/२०१० | ०५/०२/२०१९ | ४६,४८,६४९/- |
| | | | एकुण | **१,०१,६८,८९२/-** |

उक्त तक्त्यातील रकाना क्रं.५ मध्ये नमुद केलेली एकुण रक्कम रु.१,०१,६८,८९२/- ही दि.१५ सप्टेंबर २०२० अखेर मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी व्याजाची आकारणी करुन परिगणीत केली आहे. संबंधित जमीन मालकांना मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद तसेच मा.दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,राहाता यांचेकडील न्यायनिर्णया नुसार वाढीव मोबदल्याची रक्कम अदा करणेसाठी रक्कम रु.१,०१,६८,८९२/- (रु.एक कोटी एक लाख अडुसष्ट हजार आठशे ब्याण्णव मात्र) इतकी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस अदा करणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यात निर्णय क्रं.४५१ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून या विषयावर अभ्यासपुर्वक प्रस्ताव समितीसमोर आणावा असे तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री.स्वामी साहेब यांचे मत पडले. त्यावर सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,शिर्डी नगरपंचायत व शिर्डी संस्थान यांच्या संयुक्त करानाम्यानुसार रस्ते विकासासाठी भुसंपादन केलेल्या जमीनीची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी शिर्डी संस्थानने स्विकारलेली आहे व त्या अनुषंगाने पूर्वीचे निर्णय क्रं.२६३ नुसार या कामाला तत्कालीन समितीने मंजुरी दिलेली आहे. वाढीव नुकसान भरपाई देण्याचा मुद्दा असा आलेला असल्याने व भुसंपादनाची मुळ रक्कम संस्थानने दिलेली असल्यामुळे अशी वाढीव नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी ही संस्थानवर येते. आता एक कोटी रुपये एवढी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम देण्याचा निर्णय घेतला तर व्याजाची रक्कम देण्याची टळेल व यामुळे संस्थानच्या पैशाची बचत होईल. सभेसमोर प्रस्तावामध्ये सर्व मुद्दे परिपूर्ण

१०० टक्के येतीलच असे नाही. तथापि याउपरही काही अतिरिक्त माहिती आवश्यक असेल तर संबंधीत अभिलेख पाहता येतील. केवळ या कारणास्तव प्रस्ताव प्रलंबित ठेवून खर्चवाढ होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. असे सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिपादीत केले.
यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री.स्वामी साहेब यांचे खालीलप्रमाणे मत पडले.

While presenting this subject certain important documents were not referred to in the note prepared by the concerned department. Be that as it may, the important point for consideration before the Committee is the fact that though there is tripartite agreement between Sansthan, Shirdi Nagarpanchayat and Executive Engineer of MSRDC,Pune, the Sansthan was not made party in the Reference before Civil Court,Rahata.
The concerned department has not studied this aspect because while accepting the liability in further proceedings of Reference under the said tripartite agreement, the Sansthan has lost valuable right to challenge the verty claim of the petitioners in the Land Reference proceedings. Concerned department to examine this angle and come up with proper proposal which shall be in the financial interest of the Sansthan, असेबाबतचा निर्णय झालेला आहे.

उक्त निर्णयाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**परिच्छेद अ**-उपरोक्त ११ रस्त्यांपैकी शिर्डी विकास योजनेतील २४ मीटर वळण रस्ता नगर-मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटी या रस्त्यासाठी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी भुसंपादन निवाडा एलएक्युएसआर ९/२००७ दि.३०/११/२००९ रोजी घोषित केलेला आहे. त्यात भुसंपादन

कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालील नमुद केलेल्या जमीन मालकांनी मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,राहाता यांचे कोर्टात त्यांचेसमोर दर्शविलेले भुसंपादन निर्देशन (LAR) दाखल केलेले होते.

| अ.नं. | मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,राहाता यांचे कोर्टातील भुसंदर्भ निर्देशन (LAR क्रमांक) | अर्जदार | सामनेवाले | निर्णय दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ११९/२०११ | दिपक गोपाळराव गांधी | १) महाराष्ट्र शासन करीता उपविभागीय अधिकारी,शिर्डी २) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | ०६/०३/२०२० |
| २ | १२०/२०११ | सुमित्रा कैलास कोते | १) महाराष्ट्र शासन करीता उपविभागीय अधिकारी,शिर्डी २) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | ०६/०३/२०२० |
| ३ | १२१/२०११ | कैलास गोविंद कोते | १) महाराष्ट्र शासन करीता उपविभागीय अधिकारी,शिर्डी २) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | ०६/०३/२०२० |
| ४ | १२२/२०११ | सुमित्रा कैलास कोते | १) महाराष्ट्र शासन करीता उपविभागीय अधिकारी,शिर्डी २) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | ०६/०३/२०२० |

**उपरोक्त अ.नं.१ चे** संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नप/टे-०८/१०६२ /२०२० दि.१६/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये "शिर्डी मंजूर विकास योजनेतील (सन १९९२) नगर-मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीपर्यंत २४.० मी. रुंदीच्या रस्त्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेली असून त्यामध्ये निवाडा एलएक्यु/एसआर /०९/२००७ दि.३०/११/२००९ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालीलप्रमाणे दाखल झालेल्या भुसंपादन निर्देशन (Land Acquisition Reference) अर्ज क्रं.११९/२०११ मध्ये दि.०६/०३/२०२० रोजी संदर्भ क्रं.०१ नुसार निकाल झालेला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टाने अर्जदार यांना वाढीव नुकसान मोबदला अदा करण्याचे आदेश दिलेले आहे. नगरपंचायतने संदर्भ क्रं.०२ नुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे मे.कोर्टाचे आदेशाची प्रत सादर करुन वाढीव नुकसान मोबदला निश्चित करुन देण्याबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्रं.०३ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करुन निश्चित केलेली आहे.

| | |
|---|---|
| १) जमीन | - १०,०७,५५६/- |
| २) वाढीव मोबदला रकमेवर ३०% दिलासा | - ३,०२,२६७/- |
| ३) कंपोनंट १२% वाढीव मोबदला रकमेवर २८/०२/२००८ ते ३१/११/२००९ | - २,१२,२९२/- |
| एकूण | - १५,२२,११५/- |

वरील रु.१५,२२,११५/- या रकमेवर ताबा दि.२९/१२/२००९ पासून १५/०९/२०२० पर्यंत कालावधीसाठी प्रथम वर्षाला ९% व त्यानंतरच्या कालावधीसाठी १५% दराने व्याज कलम २८ प्रमाणे-

१) प्रथम वर्ष २९/१२/२००९ ते २८/१२/२०१० पर्यंत - १,३६,९९०/-
(१५,२२,११५ x १ x ०.०९)

२) दि.२९/१२/२०१० ते १५/०९/२०२० पर्यंत - २२,१९,८५३/-
(१५,२२,११५ x १.४५८४) देय वाढीव मोबदला व्याजासह

| | | |
|---|---|---|
| १) | वाढीव मोबदला | - १५,२२,११५/- |
| २) | व्याज १ वर्ष ९% दराने | - १,३६,९९०/- |

| | | |
|---|---|---|
| ३) | व्याज ३५४९ दिवस | - २२,१९,८५३/- |
| ४) | दाव्याचा खर्च | - १,५७,९२०/- |
| | **एकूण देय रक्कम** | **- ४०,३६,८७८/-** |

वरीलप्रमाणे मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेली आहे. तरी सदर वाढीव मोबदला रक्कम रु.४०,३६,८७८/- इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. **सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल.** तरी वाढीव मोबदला रक्कम रु.४०,३६,८७८/- इतकी शिर्डी नगरपंचायतकडे जमा करण्यास विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**तसेच उपरोक्त अ.नं.२ चे** संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नप/टे-०८/ ११५४/२०२० दि.२९/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये "शिर्डी मंजूर विकास योजनेतील (सन १९९२) नगर-मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीपर्यंत २४.० मी. रुंदीच्या रस्त्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेली असून त्यामध्ये निवाडा एलएक्यु/एसआर /०९/२००७ दि.३०/११/२००९ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालीलप्रमाणे दाखल झालेल्या भुसंपादन निर्देशन (Land Acquisition Reference) अर्ज क्रं.१२०/२०११ मध्ये दि.०६/०३/२०२० रोजी संदर्भ क्रं.०१ नुसार निकाल झालेला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टाने अर्जदार यांना वाढीव नुकसान मोबदला अदा करण्याचे आदेश दिलेले आहे. नगरपंचायतने संदर्भ क्रं.०२ नुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे मे.कोर्टाचे आदेशाची प्रत सादर करुन वाढीव नुकसान मोबदला निश्चित करुन देण्याबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्रं.०३ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करुन निश्चित केलेली आहे.

| | |
|---|---|
| १) जमीन | - ३५,९०४/- |
| २) वाढीव मोबदला रकमेवर ३०% दिलासा | - १०,७७१/- |
| ३) कंपोनंट १२% वाढीव मोबदला रकमेवर २८/०२/२००८ ते ३१/११/२००९ | - ७,५६१/- |
| एकूण | - ५४,२३६/- |

वरील रु.५४,२३६/- या रकमेवर ताबा दि.२९/१२/२००९ पासून १५/०९/२०२० पर्यंत कालावधीसाठी प्रथम वर्षाला ९% व त्यानंतरच्या कालावधीसाठी १५% दराने व्याज कलम २८ प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रथम वर्ष २९/१२/२००९ ते २८/१२/२०१० पर्यंत - (५४,२३६ x १ x ०.०९) | ४,८४१/- |
| २) | दि.२९/१२/२०१० ते १५/०९/२०२० पर्यंत (५४,२३६ x १.४५८४) देय वाढीव मोबदला व्याजासह | - ७९,०९८/- |

| | |
|---|---|
| १) वाढीव मोबदला | - ५४,२३६/- |
| २) व्याज १ वर्ष ९% दराने | - ४,८८१/- |
| ३) व्याज ३५४९ दिवस | - ७९,०९८/- |
| ४) दाव्याचा खर्च | - २०,९८५/- |
| **एकूण देय रक्कम** | **- १,५९,२००/-** |

वरीलप्रमाणे मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेली आहे. तरी सदर वाढीव मोबदला रक्कम रु.१,५९,२००/- इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. **सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना अदा न केल्यास १५% व्याज सुरु**

**राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल.** तरी वाढीव मोबदला रक्कम रु.१,५९,२००/- इतकी शिर्डी नगरपंचायतकडे जमा करण्यास विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**तसेच उपरोक्त अ.नं.३ चे** संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नप/टे-०८/१५५५/२०२० दि.२९/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये "शिर्डी मंजूर विकास योजनेतील (सन १९९२) नगर-मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीपर्यंत २४.० मी. रुंदीच्या रस्त्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेली असून त्यामध्ये निवाडा एलएक्यु/एसआर/०९/२००७ दि.३०/११/२००९ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालीलप्रमाणे दाखल झालेल्या भुसंपादन निर्देशन (Land Acquisition Reference) अर्ज क्रं.१२१/२०११ मध्ये दि.०६/०३/२०२० रोजी संदर्भ क्रं.०१ नुसार निकाल झालेला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टाने अर्जदार यांना वाढीव नुकसान मोबदला अदा करण्याचे आदेश दिलेले आहे. नगरपंचायतने संदर्भ क्रं.०२ नुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे मे.कोर्टाचे आदेशाची प्रत सादर करुन वाढीव नुकसान मोबदला निश्चित करुन देण्याबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्रं.०३ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करुन निश्चित केलेली आहे.

| | |
|---|---|
| १) जमीन | - १,८७,०००/- |
| २) वाढीव मोबदला रकमेवर ३०% दिलासा | - ५६,१००/- |
| ३) कंपोनंट १२% वाढीव मोबदला रकमेवर २८/०२/२००८ ते ३१/११/२००९ | - ३९,३८२/- |
| एकूण | - २,८२,४८२/- |

वरील रु.२,८२,४८२/- या रकमेवर ताबा दि.२९/१२/२००९ पासून १५/०९/२०२० पर्यंत कालावधीसाठी प्रथम वर्षाला ९% व त्यानंतरच्या कालावधीसाठी १५% दराने व्याज कलम २८ प्रमाणे-

| | |
|---|---|
| १) प्रथम वर्ष २९/१२/२००९ ते २८/१२/२०१० पर्यंत (२,८२,४८२ x १ x ०.०९) | - २५,४२३/- |
| २) दि.२९/१२/२०१० ते १५/०९/२०२० पर्यंत (२,८२,४८२ x १.४५८४) | - ४,११,९७२/- |
| देय वाढीव मोबदला व्याजासह | |
| १) वाढीव मोबदला | - २,८२,४८२/- |
| २) व्याज १ वर्ष ९% दराने | - २५,४२३/- |
| ३) व्याज ३५४९ दिवस | - ४,११,९७२/- |
| ४) दाव्याचा खर्च | - ५४,१२९/- |
| **एकूण देय रक्कम** | **- ७,७४,००६/-** |

वरीलप्रमाणे मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेली आहे. तरी सदर वाढीव मोबदला रक्कम रु.७,७४,००६/- इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल. तरी वाढीव मोबदला रक्कम रु.७,७४,००६/- इतकी शिर्डी नगरपंचायतकडे जमा करण्यास विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

आणि उपरोक्त अ.नं.४ चे संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नप/टे-०८/ ११५६/२०२० दि.२९/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये "शिर्डी मंजूर विकास योजनेतील (सन १९९२) नगर-मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीपर्यंत २४.० मी. रुंदीच्या रस्त्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेली असून त्यामध्ये निवाडा एलएक्यु/एसआर/०९/२००७ दि.३०/११/२००९ अन्वये प्रसिध्द

करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालीलप्रमाणे दाखल झालेल्या भुसंपादन निर्देशन (Land Acquisition Reference) अर्ज **क्रं.१२२/२०११** मध्ये दि.०६/०३/२०२० रोजी संदर्भ क्रं.०१ नुसार निकाल झालेला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टाने अर्जदार यांना वाढीव नुकसान मोबदला अदा करण्याचे आदेश दिलेले आहे. नगरपंचायतने संदर्भ क्रं.०२ नुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे मे.कोर्टाचे आदेशाची प्रत सादर करुन वाढीव नुकसान मोबदला निश्चित करुन देण्याबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्रं.०३ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करुन निश्चित केलेली आहे.

| | |
|---|---|
| १) जमीन | - ७९,२८८/- |
| २) वाढीव मोबदला रकमेवर ३०% दिलासा | - २३,७८६/- |
| ३) कंपोनंट १२% वाढीव मोबदला रकमेवर २८/०२/२००८ ते ३१/११/२००९ | - १६,६९८/- |
| एकूण | - १,१९,७७२/- |

वरील रु.१,१९,७७२/- या रकमेवर ताबा दि.२९/१२/२००९ पासून १५/०९/२०२० पर्यंत कालावधीसाठी प्रथम वर्षाला ९% व त्यानंतरच्या कालावधीसाठी १५% दराने व्याज कलम २८ प्रमाणे-

| | |
|---|---|
| १) प्रथम वर्ष २९/१२/२००९ ते २८/१२/२०१० पर्यंत (१,१९,७७२ x १ x ०.०९) | - १०,७७९/- |
| २) दि.२९/१२/२०१० ते १५/०९/२०२० पर्यंत (१,१९,७७२ x १.४५८४) | - १,७४,६७५/- |

देय वाढीव मोबदला व्याजासह

| | |
|---|---|
| १) वाढीव मोबदला | - १,१९,७७२/- |
| २) व्याज १ वर्ष ९% दराने | - १०,७७९/- |
| ३) व्याज ३५४९ दिवस | - १,७४,६७५/- |
| ४) दाव्याचा खर्च | - ३३,११०/- |
| **एकूण देय रक्कम** | **- ३,३८,३३६/-** |

वरीलप्रमाणे मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेली आहे. तरी सदर वाढीव मोबदला रक्कम रु.३,३८,३३६/- इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. **सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल.** तरी वाढीव मोबदला रक्कम रु.३,३८,३३६/- इतकी शिर्डी नगरपंचायतकडे जमा करण्यास विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे भुसंपादना संबंधातील विविध प्रकरणांसाठी तसेच शिर्डी विकास योजनेच्या शिर्डी नगरपंचायतीसाठी संपादित केलेल्या जमीनीच्या नुकसान भरपाईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडेस जमा केलेल्या (अग्रीम) रकमेतून झालेल्या खर्चाचा व शिल्लक रकमेचा निवाडा निहाय तपशिल भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतला असून त्यात उक्त भुसंपादन एलएक्युएसआर ०९/२००७ या

निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.२,३३,९६,६४५/- (अक्षरी रु.दोन कोटी तेहतीस लाख शहाण्णव हजार सहाशे पंचेचाळीस मात्र) इतकी जमा केलेली असून त्यापैकी शिल्लक राहीलेली रक्कम रु.४/- (अक्षरी रु.चार मात्र) इतकी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२९/११/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे दि.१६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थानकडे जमा केलेली आहे.

**परिच्छेद ब** - तसेच उपरोक्त ११ रस्त्यांपैकी शिर्डी विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर निमगाव शिव ते पिंपळवाडी रस्ता १८.० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी भुसंपादन अधिकारी तथा

उपविभागीय अधिकारी यांनी भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०३/२००७ दि.०४/११/२०१० रोजी घोषित केलेला आहे. त्यात भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार जमीन मालक श्री.सदाशिव माधव शेळके यांनी मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,राहाता यांचे कोर्टात महाराष्ट्र शासन व मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेविरुध्द भुसंपादन निर्देश (LAR) क्रं.२६/२०१२ चा दाखल केलेला होता.

प्रस्तुत प्रकरणासंबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नपं/टे-०८ /१०६१/२०२० दि.१६/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये "शिर्डी नगरपंचायत मंजूर विकास योजनेमध्ये पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता यांना जोडणारा (हॉटेल भाग्यलक्ष्मी रस्ता) १८.० मी. रुंदीच्या रस्त्यासाठी जमीन संपादन करणेची कार्यवाही उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी पूर्ण करुन दि.०४/११/२०१० रोजी अंतिम निवाडा प्रसिध्द केलेला आहे. प्रसिध्द केलेल्या अंतिम निवाडयानुसार श्री.सदाशिव माधव शेळके,रा.शिर्डी यांचे स.नं.३/२७ पै. (सि.स.नं. ९०८) मधील २५८.१८ चौमी. क्षेत्र संपादन करण्यात आले असून सहाय्यक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचे अभिप्राय घेऊन रस्ता रुंदीकरणाखालील क्षेत्रास मोबदला रक्कम देय नसल्याने अंतिम निवाडयामध्ये रु.१/- इतकी किंमत अदा करण्यात आलेली आहे. तथापि जमीन मालक श्री.सदाशिव माधव शेळके यांनी निवाडयामधील देण्यात आलेली किंमत रु.१/- मान्य नसल्याने या विरुध्द मे.कोपरगाव कोर्टात लॅन्ड रेफरन्स दावा क्रमांक २६/२०१२ दाखल केला होता. त्यामध्ये निकाल होऊन सदर दावा निकाली काढून त्यांना निवाडयानुसार रु.१/- देण्यात आलेली किंमत योग्य असल्याबाबत आदेश दिलेले आहे. मात्र मे.कोपरगाव येथील न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द श्री.सदाशिव माधव शेळके,रा.शिर्डी यांनी मे.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे फर्स्ट अपील क्रमांक २४१०/२०१० दाखल केलेले होते. सदर अपीलामध्ये मे.उच्च न्यायालयाने दि.०५/०२/२०१९ रोजी जमीन मालकांना मोबदला रक्कम अदा करण्याबाबत आदेश दिलेले आहे. शिर्डी नगरपंचायतने मे.उच्च न्यायालयाचे निकालाविरुध्द मे.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे स्पेशल लिव पिटीशन क्रमांक २४७८२/२०१९ दाखल करण्यात आले होते. तथापि सदर स्पेशल लिव पिटीशन मे.सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केले आहे. मे.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार श्री.सदाशिव माधव शेळके यांना जमीनीच मोबदला रक्कम तातडीने देणे आवश्यक असल्याने सदर जमीनीचा मोबदला रक्कम निश्चित करण्यासाठी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे कार्यालयास संदर्भ क्रमांक ०३ नुसार कळविले होते. याबाबत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार नुकसान भरपाई मोबदला रक्कम रु.४६,४८,६४९/- इतकी निवाडा व पत्रकानुसार निश्चित करुन दिलेली आहे. सोबत निवाडा पत्रक जोडण्यात येत आहे. मंजूर विकास योजनेमध्ये पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता यांना जोडणारा (हॉटेल भाग्यलक्ष्मी रस्ता) या १८.० मी. रुंदीचे डी.पी.रस्त्याचे भुसंपादनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तरी मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार नुकसान भरपाई मोबदला रक्कम रु.४६,४८,६४९/- इतकी नगरपंचायतमार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतकडे तातडीने जमा करण्यास विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे भुसंपादना संबंधातील विविध प्रकरणांसाठी तसेच शिर्डी विकास योजनेच्या शिर्डी नगरपंचायतीसाठी संपादित केलेल्या जमीनीच्या नुकसान भरपाईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडेस जमा केलेल्या (अग्रीम) रकमेतून झालेल्या खर्चाचा व शिल्लक रकमेचा निवाडा निहाय तपशिल भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतला असून त्यात उक्त भुसंपादन एलएक्युएसआर ०३/२००७ या निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.८,५१,७६,५९०/- (अक्षरी रु.आठ कोटी एक्कावन्न लाख शहात्तर हजार पाचशे नव्वद मात्र) इतकी जमा केलेली असून त्यापैकी रक्कम रु.४,३१,६०,३३५/- (अक्षरी रु.चार कोटी एकतीस लाख साठ हजार तीनशे पस्तीस मात्र) इतकी खर्च झालेली असून रक्कम रु.४,२०,१६,२५५/- (अक्षरी रु.चार कोटी वीस लाख सोळा हजार दोनशे पंचावन्न मात्र) इतकी भुसंपादन अधिकारी यांचे (PLA) अकाऊंट (स्वीय प्रबंजी लेखा) या खातयात जमा असलेचे दिसून येत आहे.

**परिच्छेद क** – तसेच उपरोक्त ११ रस्त्यांपैकी शिर्डी विकास योजनेतील कनकुरी रस्ता १२.० मी. रुंदीकरणासाठी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०५/२००७ दि.३१/१२/२००८ रोजी घोषित केलेला आहे. त्यात भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार जमीन मालक श्री.सदाशिव मानकू सालियान व इतर ३ यांनी मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,राहाता यांचे कोर्टात

महाराष्ट्र शासन करीता भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेविरुध्द भुसंपादन निर्देश अर्ज क्रं.१२/२००९ चा दाखल केलेला होता.

प्रस्तुत प्रकरणासंबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी "शिर्डी मंजूर विकास योजनेतील (सन १९९२) कनकुरी रस्ता १२.० मी. रुंदीकरणासाठी भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेली असून त्यामध्ये निवाडा एलएक्यु/एसआर/०५/२००७ दि.३१/१२/२००८ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार खालीलप्रमाणे दाखल झालेल्या भुसंपादन निर्देशन (Land Acquisition Reference) अर्ज क्रं.१२/२००९ मध्ये दि.२७/०१/२०२० रोजी संदर्भ क्रं.०१ नुसार निकाल झालेला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टाने अर्जदार यांना वाढीव नुकसान मोबदला अदा करण्याचे आदेश दिलेले आहे. नगरपंचायतने संदर्भ क्रं.०२ नुसार मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे मे.कोर्टाचे आदेशाची प्रत सादर करुन वाढीव नुकसान मोबदला निश्चित करुन देण्याबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्रं.०३ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम खालीलप्रमाणे हिशोबित करुन निश्चित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जमीन | - ३,०६,६७०/- |
| २) | वाढीव मोबदला रकमेवर ३०% दिलासा | - ९२,००१/- |
| ३) | कंपोनंट १२% वाढीव मोबदला रकमेवर २८/०२/२००८ ते ३१/१२/२००८ | - ३०,९४३/- |
| | एकूण | - ४,२९,६१४/- |

वरील रु.४,२९,६१४/- या रकमेवर ताबा दि.१६/०१/२००९ पासून ३०/०९/२०२० पर्यंत कालावधीसाठी प्रथम वर्षाला ९% व त्यानंतरच्या कालावधीसाठी १५% दराने व्याज कलम २८ प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रथम वर्ष १६/०१/२००९ ते १५/०१/२०१० पर्यंत (४,२९,६१४ x ०.०९) | - ३८,६६५/- |
| २) | दि.१६/०१/२०१० ते ३०/०९/२०२० पर्यंत (४,२९,६१४ x १.६०६८) | - ६,९०,३०४/- |

देय वाढीव मोबदला व्याजासह

| | |
|---|---|
| १) वाढीव मोबदला | - ४,२९,६१४/- |
| २) व्याज १ वर्ष ९% दराने | - ३८,६६५/- |
| ३) व्याज ३९१० दिवस | - ६,९०,३०४/- |
| ४) दाव्याचा खर्च | - २८,४२५/- |
| **एकूण देय रक्कम** | **- ११,८७,००८/-** |

वरीलप्रमाणे मे.कोर्टाचे आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा विशेष भुसंपादन अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेली आहे. तरी सदर वाढीव मोबदला रक्कम रु.११,८७,००८/- इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. **सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल.** तरी वाढीव मोबदला रक्कम रु.११,८७,००८/- इतकी शिर्डी नगरपंचायतकडे जमा करण्यास विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे भुसंपादना संबंधातील विविध प्रकरणांसाठी तसेच शिर्डी विकास योजनेच्या शिर्डी नगरपंचायतीसाठी संपादित केलेल्या जमीनीच्या नुकसान भरपाईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडेस जमा केलेल्या (अग्रीम) रकमेतून झालेल्या खर्चाचा व शिल्लक रकमेचा निवाडा निहाय तपशिल भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतला असून त्यात उक्त भुसंपादन एलएक्युएसआर ०५/२००७ या निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.६५,१६,३७६/- (अक्षरी रु.पासष्ट लाख सोळा हजार तीनशे शहात्तर मात्र) इतकी जमा केलेली असून त्यापैकी शिल्लक राहीलेली रक्कम रु.१३,४७,९७८/- (अक्षरी रु.तेरा लाख सत्तेचाळीस हजार

नऊशे अठ्याहत्तर मात्र) इतकी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२९/११/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे दि.१६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थानकडेस जमा केलेली आहे.

उपरोक्त परिच्छेद अ,ब व क मध्ये नमुद केलेल्या प्रकरणात खालील परिशिष्टात दर्शविलेप्रमाणे भुसंपादनाची वाढीव मोबदला रक्कम जमीन मालकांना देय होत आहे.

**परिशिष्ट**

| अ.नं. | भुसंपादन निवाडा क्रं. | भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रमांक | जमीन मालकाचे नाव | भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी घोषित केलेल्या कलम २८ प्रमाणे निवाडयातील वाढीव मोबदल्याची रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १ | एलएक्युएसआर ०९/२००७ | ११९/२०११ | दिपक गोपाळराव गांधी | रु. ४०,३६,८७८/- |
| | | १२०/२०११ | सुमित्रा कैलास कोते | रु. १,५९,२००/- |
| | | १२१/२०११ | कैलास गोविंद कोते | रु. ७,७४,००६/- |
| | | १२२/२०११ | सुमित्रा कैलास कोते | रु. ३,३८,३३६/- |
| **एलएक्युएसआर ०९/२००७ मध्ये एकूण देय रक्कम** | | | | **रु. ५३,०८,४२०/-** |
| २ | एलएक्युएसआर ०३/२००७ | २६/२०१२ | सदाशिव माधव शेळके | रु. ४६,४८,६४९/- |
| ३ | एलएक्युएसआर ०५/२००७ | १२/२००९ | सदाशिव मानकू सालियान व इतर ३ | रु. ११,८७,००८/- |
| | | **एकूण** | | रु.१,११,४४,०७७/- |

**विभागाचा अभिप्राय** – शिर्डी शहरातील साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पूर्ण करणेसाठी संस्थान व्यवस्थापन समिती, शिर्डी नगरपंचायतीस मदत करीत आहे. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील एकूण २५ रस्ते भुसंपादन व विकसित करणेकामी दि.१५/१०/२००६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमध्ये त्रिपक्षीय करार झालेला आहे. त्यानुसार या कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करणेबाबत ठरलेले आहे.

उपरोक्त भुसंपादन प्रकरणातील रस्ते हे उक्त करारनाम्यातील असून सदर रस्त्यांसाठीच्या भुसंपादनासाठीच्या खर्चाची रक्कम यापूर्वी संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस जमा केलेली आहे. त्यामुळे व उक्त करारनाम्यानुसार प्रस्तुत प्रकरणातील भुसंपादनाची वाढीव मोबदला रक्कम देखील संस्थानने अदा करणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणात उक्त करारनाम्यानुसार सर्व खर्च संस्थानने करावयाचा असलेने मात्र भुसंपादन संस्था नगरपंचायत असलेने संस्थानला प्रतिवादीपणात सामील केलेले दिसून येत नाही. उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या वाढीव मोबदल्याच्या रकमा जमीन मालकास अदा न केल्यास सदर रकमेवर १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल. यास्तव प्रथमत: सदर रकमा शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना खालील नमुद केलेप्रमाणे अदा करता येतील व तदनंतर मा.उच्च न्यायालयातील संस्थान पॅनलवरील वकील यांचे सल्ल्यानुसार प्रस्तुत प्रकरणांमध्ये संस्थानने अपील दाखल करणे उचित होईल किंवा कसे याकामी मार्गदर्शन मागविता येईल.

उपरोक्त परिशिष्टामधील

**अ.नं.१** मधील भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०९/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.५३,०८,४२०/- (अक्षरी रु.त्रेपन्न लाख आठ हजार चारशे वीस मात्र) इतकी संस्थानचे लेखाशाखेमार्फत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करता येईल.

**अ.नं.२** मधील भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०३/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.४६,४८,६४९/- (अक्षरी रु.शेहेचाळीस लाख अठठेचाळीस हजार सहाशे एकोणपन्नास मात्र) इतकी भुसंपादन अधिकारी यांचे स्वीय प्रबंजी लेखा (PLA अकाऊंट) मध्ये जमा असलेल्या रक्कम रु.४,२०,१६,२५५/- या

रकमेतून समायोजित करता येईल. तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविता येईल.

**अ.नं.३** मधील भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०५/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.११,८७,००८/- (अक्षरी रु.अकरा लाख सत्याऐंशी हजार आठ मात्र) इतकी संस्थानचे लेखाशाखेमार्फत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करता येईल.

**प्रस्ताव**– भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०९/२००७ मधील भुसंपादन निर्देशन अर्ज क्रं.११९/२०११, १२०/२०११, १२१/२०११ व १२२/२०११ मधील वाढीव मोबदल्याची रक्कम रु.५३,०८,४२०/- (अक्षरी रु. त्रेपन्न लाख आठ हजार चारशे वीस मात्र) इतकी संस्थानचे लेखाशाखेमार्फत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करणेच्या तसेच भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०३/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.४६,४८,६४९/- (अक्षरी रु.शेहेचाळीस लाख अठठेचाळीस हजार सहाशे एकोणपन्नास मात्र) इतकी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे PLA अकाऊंट जमा असलेल्या रक्कम रु.४,२०,१६,२५५/- (अक्षरी रु.चार कोटी वीस लाख सोळा हजार दोनशे पंचावन्न मात्र) या रकमेतून समायोजित करणेच्या व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी आणि भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविणेच्या आणि भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०५/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.११,८७,००८/- (अक्षरी रु.अकरा लाख सत्याऐंशी हजार आठ मात्र) इतकी संस्थानचे लेखाशाखेमार्फत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना अदा करणेच्या निर्णयार्थ व प्रस्तुत भुसंपादन अर्जातील निर्णयाचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयातील संस्थान पॅनलवरील वकीलाचे सल्ल्यानुसार प्रस्तुत प्रकरणांमध्ये संस्थानने अपील दाखल करणे उचित होईल किंवा कसे याकामी मार्गदर्शन मागविणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७१** **यावर सविस्तर चर्चा झाली, सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमुद केले की, तत्कालीन व्यवस्थापन समितीचे दि.२४.०४.२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६३ अन्वये शिर्डी नगरपंचायत हद्दीतील एकुण २५ रस्ते भुसंपादन व विकसित करणेकामी दि.१५/१०/२००६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये त्रिपक्षीय करार झाला होता. त्यानुसार या कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करणेबाबत ठरलेले आहे. तसेच याकामी महाराष्ट्र शासनाची पुर्व मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. सदर प्रकरणी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-सासंवि २००६/८७६/(१३१)/का.सोळा, दि.०४ सप्टेंबर, २०१४ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.**

**त्यानुसार उपविभागीय अधिकारी , श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी वर नमुद २५ रस्त्यांपैकी ९ रस्त्यांची भूसंपादन प्रक्रिया एलएक्य/एसआर/०९/२००७ निवाडा घोषीत दि.३०.११.२००९, एलएक्य/एसआर/०३/२००७ निवाडा घोषीत दि.०४.११.२०१० व एलएक्यु/एसआर/०५/२००७ निवाडा घोषीत दि.३१.१२.२००८ केला होता व यासाठीचे भुसंपादनासाठी रक्कम रु.३५,०२,७९,०७९/- मात्र निधी दि.१३.०४.२०११ अखेर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.**

**दरम्यानचे काळात भुसंपादनाची रक्कम वाढवून मिळावी याकरीता**

**अ) भुसंपादन निवाडा क्रमांक एलएक्यु/एसआर/०९/२००७ मधील श्री.दिपक गोपाळराव गांधी व इतर यांनी मा.दिवाणी न्यायाधीश, मा.दिवाणी न्यायालय, व.स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स ११९/२०११, १२०/२०११, १२१/२०११, व १२२/२०११, दि.२०.१०.२०१० रोजी दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मे. कोर्टाने दि. ०६.०३.२०२० रोजी वाढीव मोबदला देण्याचे आदेश पारीत केले आहे. त्याचे विवरण खालील प्रमाणे.**

| अ.नं. | भुसंपादन निवाडा क्रं. | भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रमांक | जमीन मालकाचे नाव | निकाल तारीख | भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी घोषित केलेल्या कलम २८ प्रमाणे निवाडयातील वाढीव मोबदल्याची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|
| १ | एलएक्युएसआर ०९/२००७ | ११९/२०११ | दिपक गोपाळराव गांधी | | रु. ४०,३६,८७८/- |
| | | १२०/२०११ | सुमित्रा कैलास कोते | ०६.०३.२०२० | रु. १,५९,२००/- |
| | | १२१/२०११ | कैलास गोविंद कोते | | रु. ७,७४,००६/- |
| | | १२२/२०११ | सुमित्रा कैलास कोते | | रु. ३,३८,३३६/- |
| एलएक्युएसआर ०९/२००७ मध्ये एकूण देय रक्कम | | | | | रु. ५३,०८,४२०/- |

ब) भुसंपादन निवाडा क्रमांक एलएक्य/एसआर०३/२००७ मधील जमीन मालक श्री. सदाशिव माधव शेळके यांनी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी देऊ केलेली भूसंपादन मोबदला रक्कम रु.१/-मात्र मान्य नसल्याने लॅण्ड रेफरन्स २६/२०१२ मा.दिवाणी न्यायालय, व.स्तर कोपरगाव यांचे कोर्टात दाखल केले आहे. सदर प्रकरणी मा.दिवाणी न्यायालय कोपरगाव यांनी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी देऊ केलेली भूसंपादन मोबदला रक्कम रु.१/-मात्र योग्य असल्याचे आदेश दि.१०.०३.२०१६ रोजी पारीत केले आहे. सदर निर्णया विरुध्द श्री. सदाशिव माधव शेळके यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयात **First Appeal No.2410/2016** दाखल केले. त्यावर मा.उच्च न्यायालयाने वाढीव मोबदला देणेबाबतचा आदेश दि.०५.०२.२०१९ रोजी पारीत केलेला आहे. तथापी श्री.शेळके यांनी मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचे न्यायालयात **Special Leave Petition (Civil) No.24782/2019** दाखल केले होते. त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय कायम असल्याचे आदेश दि.०९.१२.२०१९ पारीत केले. मा.उच्च न्यायालयाने श्री. सदाशिव शेळके यांनी दाखल केलेल्या **First Appeal No.2410/2016** निर्णय दि.०५.०२.२०१९ अन्वये देय रकमेचे विवरण खालील प्रमाणे.

| अ.नं. | भुसंपादन निवाडा क्रं. | भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रमांक | जमीन मालकाचे नाव | निकाल तारीख | भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी घोषित केलेल्या कलम २८ प्रमाणे निवाडयातील वाढीव मोबदल्याची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|
| २ | एलएक्यु एसआर ०३/२००७ | २६/२०१२ | सदाशिव माधव शेळके | मा.दिवाणी न्यायालय कोपरगाव १०.०३.२०१६<br>मा.उच्च न्यायालय ०५.०२.२०१९<br>मा.सर्वोच्च न्यायालय ०९.१२.२०१९ | रु. ४६,४८,६४९/- |

क) भुसंपादन निवाडा क्रमांक एलएक्यु/एसआर/०५/२००७ मधील श्री. सदाशिव मानकु सालियान व इतर यांनी मा.दिवाणी न्यायाधीश, मा.दिवाणी न्यायालय, व.स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स १२/२००९ दि.२८.१०.२००९ रोजी दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मे. कोर्टाने दि. २७.०१.२०२० रोजी वाढीव मोबदला देण्याचे आदेश परीत केले आहे. त्याचे विवरण खालील प्रमाणे.

| अ.नं. | भुसंपादन निवाडा क्रं. | भुसंपादन निर्देशन अर्ज (LAR) क्रमांक | जमीन मालकाचे नाव | निकाल तारीख | भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी घोषित केलेल्या कलम २८ प्रमाणे निवाडयातील वाढीव मोबदल्याची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|
| ३ | एलएक्युएसआर ०५/२००७ | १२/२००९ | सदाशिव मानकू सालियान व इतर ३ | २७.०१.२०२० | रु. ११,८७,००८/- |
| | | | | एकुण वाढीव मोबदला रक्कम (अ+ ब+ क) | रु.१,११,४४,०७७/- |

वरील नऊ रस्त्यांकरीता भूसंपादनाची मुळ रक्कम ही श्री साईबाबा संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दिलेली होती. सदर रस्ते हे शिर्डी नगरपंचायत मालकीचे असुन भूसंपादन यंत्रणा ही शिर्डी नगरपंचायत, शिर्डी आहे. व भूसंपादन प्रकीया ही उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी पुर्ण केलेली आहे. संस्थानचा तसा सदर भूसंपादनाशी प्रत्यक्ष संबध नसल्याने जमीन मालक यांनी वाढीव मोबदला मिळणेकामी दाखल केलेल्या दाव्यामध्ये संस्थानला प्रतिवादी/पक्षकार करण्यात आलेले नाही.

सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये त्रिपक्षीय करार झाला होता. त्यानुसार या कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करणेबाबत ठरले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मागणी केल्याप्रमाणे भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०९/२००७ मधील वाढीव मोबदल्याची रक्कम रु.५३,०८,४२०/- व भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर ०५/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.११,८७,००८/- मात्र मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणे योग्य होईल. तसेच भुसंपादन निवाडा क्रमांक क्रं.एलएक्युएसआर ०३/२००७ मधील वाढीव मोबदला रक्कम रु.४६,४८,६४९/- (अक्षरी रु.शेहेचाळीस लाख अठठेचाळीस हजार सहाशे एकोणपन्नास मात्र) इतकी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचे PLA अकाऊंट जमा असलेल्या रक्कम रु.४,२०,१६,२५५/- (अक्षरी रु.चार कोटी वीस लाख सोळा हजार दोनशे पंचावन्न मात्र) या रकमेतून समायोजित करता येईल.

सदर वाढीव मोबदला रक्कम अदा न केल्यास १५ टक्के व्याजाचा आर्थिक भार पडू शकतो व तो पुढे वाढत जाईल. म्हणून सदर रक्कम रु. १,११,४४,०७७/-ही वर नमुद LAR मध्ये शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना वर्ग करावी, असे मत मांडले. त्यास समिती सदस्य श्री.पालवे साहेब यांनी सहमती दर्शविली.

यावर मा.अध्यक्ष यांनी खालील मत मांडले-

फक्त एल.ए.आर. क्र.२/२००४ वगळता इतर एल.ए.आर. मध्ये संस्थानला दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राहाता यांच्या न्यायालयात पक्षकार करण्यात आलेले नाही. म्हणजेच संस्थानला वाढीव मोबदल्याच्या अर्जास प्रतिरोध (contest) करता आलेला नाही. अशा परिस्थितीत सदर एल.ए.आर. मधील अर्जदार व शिर्डी नगरपंचायत यांच्यातील न्यायनिवाडयाची संस्थानकडून अंमलबजावणी होवू पाहत आहे. अध्यक्षांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या पुर्ण पिठाने दिलेल्या U.P. Awas Evam Vikas Parished Vs. Gyan Devi (Dead) By Lrs. & others (1995)2, Supreme Court Cases, 326 या निवाडयाचा आधार घेऊन संस्थानला सदर एल.ए.आर.मध्ये पक्षकार न केल्याने, जर त्रिपक्षीय

**कराराच्या आधारावर वाढीव मोबदला द्यावयाचा असल्यास आज पर्यंतचे व्याज संस्थानने देणे, हे संस्थानच्या आर्थिक हिताविरुध्द आहे.**

**अध्यक्षांनी असा प्रस्ताव मांडला की, सदर एल.ए.आर.मधील अर्जदार वाढीव मोबदला बिनव्याजी घेत असल्यास त्याप्रमाणे मध्यस्थ केंद्र (Mediation Centre) राहाता यांचेकडे मध्यस्ती तडजोड करुन सदर वाद मिटत असल्यास मिटवावा. मुख्यत्वेकरुन सदर एल.ए.आर.मधील न्यायनिर्णय हे संस्थानचे विरुध्द नाहीत. करिता संस्थानने व्याज देण्याचा प्रश्नच नाही.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांचे मते संस्थान कलम १८ मधील रेफरन्समध्ये पक्षकार नसल्याने बिनव्याजी वाढीव रक्कम ते घेण्यास तयार असल्यास Mediation मार्फत तडजोड करण्यास माझी हरकत नाही.**

**सदर निर्णयाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-मालमत्ता विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत शिर्डी नगरपंचायतीस दैनंदिन स्वच्छता करणेसाठी रक्कम रु.४२,५१,५९९/- अर्थसहाय्य पुर्ववत सुरु करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** विधी व न्याय विभागाचे शासन शुद्धीपत्रक क्रं. सासंवि -१०१८/१७९/प्र.क्र.२०/का-१६ दि. २२.११.२०१८. नुसार डिसेंबर २०१७ ते एप्रिल २०२० पर्यंत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत शिर्डी नगरपंचायतीस दैनंदिन स्वच्छतेसाठी दरमहा रु.४२,५१,५९९/- मात्र अर्थसहाय्य देण्यात येत होते. मात्र COVID -19 विषाणूच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभुमीवर दि.१७ मार्च,२०२० पासून श्री साई मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद करण्यात आलेले होते त्यापार्श्वभुमीवर माहे मे २०२० पासून शिर्डी नगरपंचायतीस दैनंदीन स्वच्छता अनुदान देणे बंद करण्यात आलेले आहे. त्याबाबत मा. तदर्थ समितीने दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेत निर्णय क्रं.३२३ खालीलप्रमाणे निर्णय घेतला होता.

मा.तदर्थ समिती निर्णय:- आजचे सभेत शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. COVID -19 विषाणूच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभुमीवर दि.१७ मार्च,२०२० पासून श्री साई मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे भाविकांचे येणे बंद झाले आहे, असे समितीस समक्ष दाखवुन देण्यात आले. तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, शिर्डी शहरातील दुकाने, हॉटेल्स, हार-फुले प्रसादाची छोटी मोठी दुकाने व इतर सर्व वाणिज्यीक उपक्रम बंद आहेत. सद्यस्थितीत ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाचा विचार करता समितीचे असे लक्षात आले की, शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.४२,५१,५९९/- स्वच्छतेसाठी देत असतांना सदर रकमेचा विनियोग योग्य पध्दतीने होतो किंवा नाही, तसेच साफसफाई होते किंवा नाही, या सर्व देखरेखीसाठी कुठलीही उपाययोजना केलेली नाही.

वरील परिस्थितीत शिर्डी नगरपंचायतीस सदर दरमहा रक्कम रु.४२,५१,५९९/-देणे अव्यवहार्य आहे. तथापी माहे मार्च-२०२०व एप्रिल-२०२०चे दरमहा रु. ४२,५१,५९९/-मात्र रक्कम शिर्डी नगरपंचायत यांना यापुर्वीच आदा केली असल्याने दि.०१.०५.२०२० पासून शिर्डी नगरपंचायतीस देणे बंद करावे. शिर्डी नगरपंचायतीस पैसे देणेबाबत समिती पुढील निर्णय योग्य वेळी घेईल.

शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनाचा विचार करता जेव्हा शिर्डी संस्थानने इतकी मोठी रक्कम नगरपंचायत शिर्डी यांना दिली आहे तेव्हा पासून या रकमेचा विनियोग कशा पध्दतीने केला गेला, स्वच्छता कुठे व कशी केली गेली, त्याची देखरेख कशी केली गेली, व त्यासाठी किती कर्मचारी लावले गेले इत्यादी बाबी शिर्डी नगरपंचायतीकडून स्पष्ट करुन घेणे गरजेचे आहे. करीता मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना शिर्डी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत तपशिलवार पत्र देऊन वरील तपशिल व बाबी स्पष्ट करणारा अहवाल मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडून त्वरीत मागवावा. वरील अहवाल साधारणत: १५ दिवसात येईल अशी विनंती मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना करण्यात यावी. सदरचा अहवाल व अभिप्राय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा, जेणे करुन याबाबत पुढील विचार करता येईल, असा निर्णय झाला आहे.

मा. तदर्थ समितीचे दि. १३.०७.२०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त कायम करतांना दि. २८.०८.२०२० निर्णय क्रं. ४२१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. तदर्थ समितीचा निर्णय:- वरील विषयाचा सखोल अभ्यास करण्यात आला, समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, सन २०१७-१८ दरम्यान शिर्डी नगरपंचायत, शिर्डी दि.०५.०५.२०१७ च्या संयुक्त बैठकीमध्ये स्वच्छतेसाठी दरमहा रु.२५,००,०००/-इतक्या रकमेची मागणी केली होती. त्यावर या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी व सदर निविदेनुसार येणारे निम्नतम दर किंवा शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली २५,००,०००/-रुपयांची मागणी यापैकी जी रक्कम कमी असेल ती देण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षातील बैठकीत त्यावेळी घेण्यात आला. त्यानंतर ०३.११.२०१७ रोजी शिर्डी नगरपंचायतीने नवीन वाढीव प्रस्ताव दिला की ज्यामध्ये दरमहा ४२,५१,५९९/-ची निविदा प्राप्त झाल्याने दरमहा तेवढया रकमेची मागणी केली.

सबब शिर्डी नगरपंचायतीस ठराविक रक्कम देण्याबाबतचा निर्णय घेतांना सदरचे प्रकरण छाननी समितीच्या समोर ठेवण्यात आले होते. छाननी समितीचे अध्यक्ष मा.न्यायमुर्ती श्री.चांदीवाल यांनी दिनांक १९.०१.२०१८ रोजीच्या छाननी समितीच्या सभेतील निर्णय क्र.२४ अन्वये दरमहा रक्कम रु.३०,००,०००/-पाच वर्षासाठी देणेबाबत निर्णय दिला व त्यानुसार या निधीच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाच्या न्याय व विधी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. दरम्यान व्यवस्थापन समितीने दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेत निर्णय क्र.९५२ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.३५,००,०००/-एवढे अनुदान देण्यात यावे व उर्वरीत खर्चाची रक्कम शिर्डी नगरपंचायतीने सोसावी असा निर्णय घेतलेला होता.

महाराष्ट्र शासनाचे दि.७ एप्रिल २०१८ चे शासन निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.३०,००,०००/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन देण्याबाबत शासन मान्यता दिली. आणि या शासन निर्णयाप्रमाणे अनुदान देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. परंतु शिर्डी नगरपंचायतीने दि.२८/०४/२०१८ रोजी पुन्हा प्रस्ताव पाठवुन प्रतिमहा रु.४२,५१,०००/- एवढया अनुदानाची मागणी केली. त्यावर तात्कालीन व्यवस्थापन समितीने ०२/०५/२०१८ चे सभेत निर्णय क्र.३३९ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस दरमहा ३५,००,०००/- रु.एवढा निधी दि.०१/१२/२०१७ पासून द्यावा व त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करावा तथापि शिर्डी नगरपंचायतीची ४२,५१,०००/-रुपये प्रतिमहा मागणीची माहिती शासनाकडे पाठवावी असा निर्णय घेतला. त्यावर छाननी समिती अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ति श्री.चांदीवाल यांनी मत व्यक्त केले की, सर्व गोष्टीचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने दि.७ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयानुसार दरमहा ३०,००,०००/-रुपये एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे व त्यामुळे ३०,००,०००/-रुपयांऐवजी ३५,००,०००/- रुपये अनुदान देणे अयोग्य आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, या दरम्यान व्यवस्थापन समितीच्या वैधतेबाबत मा.उच्च न्यायालयात पी.आय.एल.क्र.१०२/२०१६ ही प्रलंबीत होती.

अभिलेखावरुन असेही दिसून येते की, त्यानंतर शासन स्तरावर निर्णय होऊन दि.२२/११/२०१८ चे शासन निर्णयानुसार शुध्दीपत्रक काढून दि.०१/१२/२०१७ पासून दरमहा ४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देण्यास संस्थानला मान्यता दिलेली दिसते.

वरील परिस्थीतीत शिर्डी येथील ग्रामस्थांनी समितीला तसेच इतर अधिकाऱ्यांना तक्रार अर्ज दिलेला आहे व सदर रकमेच्या विनियोगाबाबत गंभीर मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

तदर्थ (Ad-hoc) समितीने नगरपंचायतीस पैसे देण्याबाबतची पुर्वपिठिका तसेच त्या अनुषंगाने आलेली तक्रार याचा विचार तदर्थ (Ad-hoc) समितीच्या कार्यक्षेत्राच्या अधीन राहून केला असता असे लक्षात आले की, सदर विषयात बरीच गुंतागुंत आहे. समितीच्या असेही लक्षात आले की, एवढया मोठया प्रमाणावर रक्कम देतांना त्याचा विनियोग व त्याचा हिशोब या अनुषंगाने संस्थानचे नियंत्रणाबाबत त्यात कुठलीही तरतूद केलेली दिसून आली नाही.

दिनांक १७/०३/२०२० पासून कोव्हीड-१९ च्या संसर्गाचे उद्रेकामध्ये श्रींचे मंदिर दर्शनासाठी बंद आहे. पर्यायाने शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची संख्या कमी झाली नाही तर पुर्णत: संपुष्टात आलेली आहे. अशा परिस्थीतीत ज्या मुख्य कारणासाठी शिर्डी नगरपंचायतीस एवढी मोठी रक्कम देण्यात येत होती त्या रकमेची आवश्यकता किंवा कमीत कमी १७/०३/२०२० नंतर लागणारी स्वच्छतेबाबतची यंत्रसामग्री, साधने, मनुष्यबळ, स्वच्छतेसाठी लागणारी औषधे, फिनेल, ॲसीड पावडर इत्यादिचे प्रमाण हे निश्चितच मोठया प्रमाणात घटणे सहाजिक आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आले की, सदर रक्कम देताना जो करार झालेला आहे त्यामध्ये संस्थान करारास पक्षकार नाही.

वरील सर्व परिस्थीतीत दि.०९/०६/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३२३ प्रमाणे तदर्थ (Ad-hoc) समितीने शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकाऱ्याकडून तक्रारींच्या अनुषंगाने खुलासा मागवला होता. मुख्याधिकारी यांनी दिलेल्या त्या खुलाशावरुन स्पष्ट होते की, वादातील बऱ्याच मुद्दयांचे तसेच तक्रार अर्जातील मुद्दयांचे उत्तर तदर्थ (Ad-hoc) समिती स्तरावर सापडणे निव्वळ अशक्य आहे.

तदर्थ (Ad-hoc) समितीसमोरील अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की, पी.आय.एल. क्र.१२०/२०१९ ही प्रलंबीत आहे व त्यातील याचिकाकर्ते हे संस्थानबाबत असलेल्या विविध विषयावर वेळोवेळी मा.उच्च न्यायालयासमोर त्यांची बाजू मांडतात तसेच विविध बाबी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देतात.

वरील परिस्थीतीत समितीचे सदस्य १) मा.श्री.श्रीकांत ल.आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक ३) मा.श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.

१. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.१७.०३.२०२० नंतर स्वच्छतेसाठी किती रक्कम द्यावी तसेच मार्च, एप्रिल, मे २०२० या महिन्यात दिलेल्या रकमेचा हिशोब/लेखाजोखा कोणी व कशा पध्दतीने मागवावा,

२. भविष्यात साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी शिर्डी नगरपंचायतीस दरमहा स्वच्छतेसाठी किती रक्कम द्यावी तसेच या रकमेच्या मोबदल्यात नगरपंचायतीने संस्थानचे मालमत्तेवर सफाई करात व इतर करात सुट द्यावी किंवा कसे, तसेच इतर काही सवलती देण्याबाबत,

३. तक्रारकर्त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.

४. भविष्यात अशा तक्रारी होवू नयेत यासाठी उपाययोजना तसेच साईबाबा संस्थान यांचेकडून सदर रकमेच्या विनियोगाबाबत तसेच ज्या कारणासाठी ती रक्कम दिली आहे त्या कामाच्या देखरेखीबाबत,

वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयासमोर पी.आय.एल.क्र.१२०/२०१९ मध्ये संस्थानने अहवाल दाखला करावा व याबाबत निर्देश देण्यासाठी मा.उच्च न्यायालयास विनंती करावी. यासाठी संस्थानने मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे पी.आय.एल क्र.१२०/२०१९ मध्ये दिवाणी अर्ज (सिव्हील ॲप्लीकेशन) दाखल करावा, असे ठरले.

समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.

दि.१७ मार्च,२०२० पासुन श्री साईबाबांचे मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद करण्यात आले आहे. माहे मार्च व एप्रिल-२०२० या महिन्याची रक्कम शिर्डी नगरपंचायत यांना आदा करण्यात आलेली आहे. याबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांचेकडून वेळोवेळी अहवाल मागविण्यात आले असुन सदरचे अहवाल मा.समितीसमोर वेळोवेळी सादर करण्यात आलेले आहेत. तरी मा.तदर्थ समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे अनुषंगाने मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर दस्ताऐवजासह उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व लॉकडाऊनचे कालावधीत (मंदिर दर्शनाकरीता सुरु होईपर्यत) मुख्याधिकारी यांचे खुलाशानुसार किती रक्कम अदा करावयाची याबाबत निर्णय घ्यावा. व **यासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.** असा निर्णय झाला.

त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ॲप्लीकेशन ५८६५/२०२० दि. १८.०९.२०२० दाखल करण्यात आलेले आहे ते अद्याप प्रलंबीत आहे.

**शिर्डी नगरपंचायतीची मागणी:-** शिर्डी नगरपंचायतीने जा. क्रं. नप/टे-६/१९१४/२०२० दि.११.१२.२०२० अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे संपूर्ण शिर्डी शहर साफसफाई करण्यासाठी अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर झालेला आहे. शहर साफसफाई कामाचा ठेका दरमहा रुपये ४२,५१,५९९/- प्रमाणे देण्यात आलेला असून माहे मे २०२० ते नोव्हेंबर २०२० या महिन्यांचे शहर साफसफाई कामाचे अनुदान श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून शिर्डी नगरपंचायतीस प्राप्त झालेले नाही. त्याबाबत संस्थानकडे वेळोवेळी मागणी केली आहे. सदर महिन्यांचे अनुदान शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करणे आवश्यक आहे.

शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या दैनंदीन स्वच्छता विषयक साफसफाईचे कामे माहे मे २०२० ते नोव्हेंबर २०२० अखेर सुव्यवस्थीत झालेली आहे.

यास्तव श्री साईबाबा समाधी मंदीर भाविकांसाठी दि.१६.११.२०२० पासून खुले झालेले आहे. त्याअनुषंगाने दि. १६.११.२०२० ते ३०.११.२०२० या कालावधीचे अनुदान रुपये २१,२५,८००/-मात्र देणेबाबत तसेच यापुढे दरमहा रु. ४२,५१,५९९/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख एक्कावन्न हजार पाचशे नव्याण्णव मात्र) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून मिळणारे शिर्डी शहर साफ-सफाई करिताचे अनुदान नियमीत शिर्डी नगरपंचायतीस मिळणेस विनंती केली आहे.

**प्रस्ताव :-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून शिर्डी नगरपंचायतीला माहे डिसेंबर २०१७ ते एप्रिल २०२० अखेरपर्यंत दरमहा रु. ४२,५१,५९९/- याप्रमाणे शिर्डी शहर हद्दीतील दैनंदिन स्वच्छतेसाठी अनुदान दिलेले आहे.

२) शिर्डी ग्रामस्थांनी लॉकडाऊन कालावधीत शिर्डी नगरपंचायतीला स्वच्छतेसाठी देण्यात येणा-या अनुदानाबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. त्यावर मा. तदर्थ समितीने दि. ०९.०६.२०२० रोजीचे बैठकीतील निर्णय क्रं. ३२३ नुसार माहे मे २०२० पासून शिर्डी नगरपंचायतीस अनुदान देणे बंद करणेबाबत निर्णय घेतला आहे. तसेच दि. २८.०८.२०२० रोजीचे सभेत निर्णय क्रं. ४२१ अन्वये मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय झाला त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ॲप्लीकेशन ५८६५/२०२० दि.१८.०९.२०२० दाखल करण्यात आलेले आहे ते **अद्याप प्रलंबीत** आहे.

३) श्री साईबाबा संस्थानने शिर्डी नगरपंचायतीला मे. २०२० पासून दैनंदिन स्वच्छतेसाठी अनुदान देणे बंद केल्याने, नगरपंचायतीने मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये ६७०३/२०२० रिट पिटीशन क्रं. दाखल करून **मे २०२० पासून दरमहा नियमितपणे रु. ४२,५१,५९९/-** मिळणेबाबत याचिका दाखल केली आहे. सदर याचिका **अद्याप प्रलंबीत** आहे.

४) आता शिर्डी नगरपंचायतीने संस्थानकडे पत्र जा. क्रं. नप/टे-६/१९१४/२०२० दि. ११.१२.२०२० नुसार श्री साईबाबा समाधी मंदीर भाविकांसाठी दि. १६.११.२०२० पासून खुले झालेले असल्याने दि. १६.११.२०२० ते ३०.११.२०२० या कालावधीचे अनुदान रु.२१,२५,८००/- मात्रची व यापुढे दरमहा रु. ४२,५१,५९९/- शहर साफ-सफाई करिताचे अनुदान नियमीत शिर्डी नगरपंचायतीस मिळणेस विनंती केली आहे.

उपरोक्तप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीचे मागणीनुसार शिर्डी नगरपंचायतीस दैनंदीन स्वच्छतेसाठी दरमाह रक्कम रु. ४२,५१,५९९/- मात्र देणेचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७२** **सदस्य सचिव /मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमुद केले की, श्रींचे मंदिर साईभक्तांना दर्शनाकरीता पुर्ववत सुरु झालेले असल्याने संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस दैनंदिन स्वच्छता करणेसाठी रक्कम रु.४२,५१,५९९/- अर्थसहाय्य पुर्ववत सुरु करण्यात यावे. यापुर्वीची अनुदानाची रक्कम अदा करणेबाबत मा.न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करता येईल. त्यास समिती सदस्य श्री. पालवे साहेब यांनी सहमती दर्शविली.**

**यावर मा.अध्यक्ष यांनी असे नमुद केले की, संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस दैनंदिन स्वच्छता करणेसाठीदेण्यात येणारे अनुदान देणे बंद केल्याने शिर्डी नगरपंचायत यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.६७०३/२०२० दाखल केलेली असुन संस्थानने C.A. No. 5865/2020 दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरची बाब आता न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर निर्णय घेणे योग्य होणार नाही.**

**तदर्थ समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी सदरचा विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यावर निर्णय घेण्यात येवू नये असे मत मांडले.**

**सदर निर्णयाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.३८** **संस्थानचे जुन्या सेवाधाम इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या/रुम विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थाना त्यांचे कार्यालयासाठी भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेकामी सदर जागेचे भाडे निश्चित होणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीकाः- संस्थानचे सेवाधाम इमारतीतील खोल्या सन २०१३ पुर्वी खालीलप्रमाणे विविध कर्मचारी संघटना, कर्मचारी गृहनिर्माण संस्था, होमगार्ड कार्यालय व विद्युत महामंडळाचे कार्यालयासाठी त्यावेळच्या प्रचलित दरानुसार प्रतिमहा रु.१०/- व मिटर रिडींगप्रमाणे होणारा विद्युत आकार वेळोवेळी संस्थानकडे जमा करणेचे अटीवर उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | खोली क्र. |
|---|---|---|
| ०१ | श्री. चंद्रकांत शंकरराव गुरव, वर्ग ४ कर्मचारी (सध्या सेवानिवृत्त ) | ५४, ८१ |
| ०२ | श्री साईबाबा कर्मचारी संघटनेस त्यांचे कार्यालयासाठी (अध्यक्ष – श्री. राजेंद्र जगताप) | ५५, ८० |
| ०३ | श्री साईबाबा कर्मचारी संघटनेस त्यांचे कार्यालयासाठी (अध्यक्ष – श्री.रामराव शेळके) | ६८, ६९ |

| | | |
|---|---|---|
| ०४ | श्री साईनाथ कर्मचारी गृहनिर्माण संस्थेस त्यांचे कार्यालयासाठी<br>(श्री.रामराव शेळके) | ५६ |
| ०५ | होमगार्ड कार्यालय | ७० |
| ०६ | एम.एस. ई. बी कार्यालय | ७१ |

उपरोक्त प्रमाणे अ.नं. १ यांना निवासासाठी व अ.नं. २ ते ६ यांना त्यांचे कार्यालयासाठी देण्यात खोल्या बांधकाम विभागाकडील दि.११/०७/२०१८ रोजीचे पत्रास अनुसरुन सदर इमारतीचे दुरुस्ती व रंगकाम करणेचे कामासाठी रिक्त करुन देणेबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधीतांना कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन अ.नं. ३ ते ६ मध्ये नमूद संबंधित कार्यालयांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या खोल्या बांधकाम विभागाचे कामासाठी रिक्त करुन दिलेल्या आहेत.

**तथापी,** अ. नं. १ मध्ये नमूद केलेप्रमाणे श्री. चंद्रकांत शंकरराव गुरव, वर्ग ४ कर्मचारी (सध्या सेवानिवृत्त) यांचे ताब्यात असलेल्या खोली क्र.५४ व ८१ तसेच, अ.नं.२ नुसार श्री साईबाबा कर्मचारी संघटना (अध्यक्ष- राजेंद्र जगताप) यांचे ताब्यात असलेल्या खोली क्र.५५, ८० हया त्यांनी रिक्त करुन दिलेल्या नसून, पुर्वीच्याच अटी - शर्तीवर आजपावेतो त्यांच्या ताब्यात आहे.

अ) आता, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी चे अध्यक्ष, श्री. अरुण गणपतराव जाधव यांनी दि.०३/०३/२०२० रोजीचे पत्राने, "श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या प्रश्नांबाबत आमची श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी स्थापन झालेली असून कर्मचा-यांना न्याय मिळवून देणेसाठी आमची संघटना सक्षम आहे. परंतु आमच्या संघटनेच्या कामकाजाकरीता आम्हाला कार्यालयाची आवश्यकता आहे. हयापुर्वी संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या संघटनेकरीता संस्थानमार्फत कार्यालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन आम्हासही कार्यालयाकरीता संस्थानचे सेवाधाम इमारतीमधील एक रुम मिळावी, " अशी विनंती केली आहे.

**ब)** सध्या, सेवाधाम इमारतीतील आतील बाजूच्या खोल्यांचा वापर साईभक्तांच्या निवासासाठी करणेत येत असून, सदर निवासस्थान वापरापोटी प्रतीरुम प्रतिदिवस (२४ तासासाठी) रु.५०/- याप्रमाणे अत्यल्प शुल्क घेऊन, संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

तसेच, सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूच्या असलेल्या खोल्या पैकी सध्या खोली क्र.७० व ७१ हया रिक्त असून त्यातील एक खोली श्री साईबाबा संस्थान वेल फेअर संघटनेचे कार्यालयासाठी देता येईल, परंतू, अशा प्रकारे विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थेला त्यांचे कार्यालयासाठी सेवाधाम इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या भाडे तत्वावर उपलब्ध करुन द्यावयाच्या झाल्यास त्यासाठी सुधारीत दराने सेवाआकार निश्चीत करणे आवश्यक आहे.

**क)** त्यास अनुसरुन याकामी संस्थानचे बांधकाम विभागास इकडील जा. नं.२७३९/२०२० दि.१०/०३/२०२० व जा.क्र.५५८/२०२० दि.२२/०७/२०२० अन्वये सेवाधाम इमारतीत सध्या रिक्त असलेल्या खोली क्र.७० व ७१ चे एकूण बांधकाम क्षेत्र व त्यानुसार सदर जागेचे बाजार भावाप्रमाणे भाडे मिळणेबाबत कळविणेत आले होते.

बांधकाम विभागाने त्यांचेकडील पत्र दि.२७/०७/२०२० अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिर्डी येथील शाखा अभियंता यांचेशी समक्ष चर्चा करुन त्यांचे विभागाकडील भाडे ठरविण्याचे पध्दतीनुसार सदरहू जागेचे **भाडे ६४.७१ चौ. मिटर** असे येत असून, त्यानुसार खालीलप्रमाणे भाडे होत आहे, असे कळविले आहे.

i) रुम नं.७० चे एकूण बांधकाम क्षेत्र १०.६५ चौ. मीटर असून, त्याकरीता वरील दरानुसार रु.६८९/- मात्र दरमहा.

ii) रुम नं.७१ चे एकूण बांधकाम क्षेत्र १७.३३ चौ.मीटर असून, त्याकरीता वरील दरानुसार रु.१,१२१/- मात्र दरमहा.

तथापी, बांधकाम विभागाने उपरोक्त दर हे सेवाधाम इमारत बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन सदर जागेचे भाडे कळविले असल्याचे दिसून येते.

**ड)** संस्थानचे सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या / रुम यापुर्वीचे व नव्याने मागणी करणा-या विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थेच्या कार्यालयासाठी त्यांचे मागणीनुसार भाडे तत्वावर उपलब्ध

करुन देणेकामी खालील पर्यायापैकी एका पर्यायाची निवड होऊन, त्याप्रमाणे सुधारीत सेवाआकार (भाडे) व प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे होणारा विद्युत आकार दरमहा आकारणी करणेचे अटीवर उपलब्ध करुन देता येईल.

१. सन २०१३ व त्यापुर्वी श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी व इतर संस्थेच्या कार्यालयासाठी देणेत आलेल्या प्रचलित दराप्रमाणे दरमहा रु.१०/- व मिटर रिडींगप्रमाणे होणारे विद्युत आकार घेऊन उपलब्ध करुन देता येईल.

किंवा

२. संस्थानचे बांधकाम विभागाने दि.२३/०७/२०२० रोजीचे पत्राने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिर्डी येथील शाखा अभियंता यांचेशी समक्ष चर्चा करुन त्यांचे विभागाकडील भाडे ठरविण्याचे पध्दतीनुसार इमारत बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन सदरहू जागेचे रु.६४.७१ प्रती चौ. मिटर याप्रमाणे भाडे कळविले असून, त्यानुसार रुमचे एकूण बांधकाम (चटई) क्षेत्रानुसार दरमहा भाडे आकारणी करुन उपलब्ध करुन देता येईल.

किंवा

३. सध्या सेवाधाम इमारतीतील आतील बाजूच्या खोल्या श्री साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत प्रतीरुम प्रतिदिवस (२४ तासासाठी) रु.५०/- याप्रमाणे अत्यल्प शुल्क घेऊन, साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. त्यानुसार (रु.५० प्रतिदिवस x३०दिवस याप्रमाणे) दरमहा रु.१५००/- भाडे आकारणी करुन उपलब्ध करुन देता येईल.

तरी, संस्थानचे सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील बाहेरील बाजूच्या असलेल्या खोल्या यापुर्वीचे व नव्याने मागणी करणा-या कर्मचारी संघटना व इतर संस्थेच्या कार्यालयासाठी भाडे तत्वावर देणेकामी उपरोक्त अ.नं. १ ते ३ पैकी योग्य तो सुधारीत सेवाआकार (भाडे) निश्चीत होणेस विनंती.

तसेच, त्यानुसार श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी यांचे विनंती अर्जानुसार त्यांना संस्थानचे सेवाधाम येथील रिक्त असलेले रुमपैकी एक रुम कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५७३** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग )**

---

**विषय नं.३९** **श्री अनिल कचरु कोते व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.6224/2020 दि.10.9.2020 रोजी दाखल केलेल्या याचिकेची सद्यस्थिती मा.तदर्थ समितीचे समक्ष सादर करणेबाबत. तसेच माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे नोव्हेंबर-२०२० चे वेतन अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पूर्वपीठीका -**

**(अ-१)** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेलीआहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

*(०१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.*

*(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.*

*(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.*

*(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.*

*(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.*

*(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.*

*(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.*

*(०८)* *समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.*

*(०९)* *आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.*

*(१०)* *तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.*

*(११)* *आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.*

**(अ-२)** दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

**(अ-३)** दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच संदर्भाकिंत पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

**(अ-४)** मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत"** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे* ***सन २००१ ते २००४*** *या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या* **६३५** *कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन* ***किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन*** *शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन* ***निर्णयान्वये मंजूर केलेल्या***

***आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास*** *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

*उपरोक्तप्रमाणे* ***एकत्रित मासिक वेतन*** *मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा* ***संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी*** *म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

**(अ-५) दिनांक ०५/०६/२०१९ ते दिनांक ३०/१०/२०१९ अखेरचे कालावधीत महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात प्राप्त झालेले शासन निर्णयांचे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचे सभेत सदरहू निर्णयाचे निर्णय क्र. ५७५ अन्वये वाचन करुन नोंद घेणेत आलेली आहे.**

**(अ-६)** सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेल्या विविध विवेचनात्मक टिपणीनुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन **जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था / २२०० /(०१ ते ६३५) /२०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.**

**(ब) आता, २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेले असून त्यातील निर्णय क्र. ४२१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे-**

" दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समित सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

निर्णय क्र. ३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. १३.०७.२०२० चे विषय क्र. ६ निर्णय क्र.३६ बाबत सदरचा निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डोंगरे यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते. तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.

सन १९ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगष्ट, २००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कमगारांना पात्र ठरविण्यात आले व त्यानुसार शासन निर्णयाची शासनाने दि. १७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कर्मचा-यांना कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक दि. ०२ जानेवारी, २०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तात्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

५९८ कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकूण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे व या शासन निर्णयान्वये तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष, श्री. आणेकर साहेब व सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3 **X** 1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला."

**तसेच मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीने ५९८ कर्मचारी यांचेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे-**

(iv) वरील नमूद ५९८ कर्मचा-यांना, त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे ऑग्स्ट, २०२० ते ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वरील नमूद दि. १३.०७.२०२० च्या तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे वेतन द्यावे मात्र असे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ द्यावे कारण त्यांचे बाबतीत संस्थान प्रशासनाने दि. १३.०७.२०२० रोजीच्या निर्णयानंतर योग्य तो प्रस्ताव आणलेला नाही व त्यांचा दर्जा (**status**) स्पष्ट नाही.

**(v)** मानवतेच्या दृष्टीकानातून सदर ५९८ कर्मचा-यांना ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत काम केलेले असल्याने त्यांना, अटी व शर्तीची पूर्तता केली असल्यास, वरील प्रमाणे दि. ०१ ऑक्टोबर, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

(vi) सदर ५९८ कर्मचा-यांबाबत योग्य तो प्रस्ताव ठेवण्याची मुभा संस्थान प्रशासनास आहेच.

**(क)** संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०६५/ २०२०, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० नुसार यथोचीत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती करणेत आलेली होती. त्यावर मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांनी जा.नं. आस्था/ ४७२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० नुसार ई-मेल पत्र पाठविलेले आहे. ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-४/२१०२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, ई-मेल पत्र पाठविणेत आलेले आहे. सदरचे ई-मेल पत्राबाबत अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय आलेला नाही.

तथापि, दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२००/(०१ ते ६३५)/ २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेसाठी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१९/२०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित

करणेत आलेला होता. तसेच जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १६१२/२०२० दिनांक ०१/१२/२०२० रोजी आदेशान्वये संस्थान आस्थापनेवार घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ०२ डिसेंबर, २०२० पासून पुढील आदेश हाईपावेता खंडीत करणेबाबत आदेश पारित करणेत आलेला होता. परंतू सदरचे प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे मौखिक निर्देश दिल्याने ते पारित करता आलेले नाहीत.

तथापि दरम्यान श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या  न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे दाखल केले असल्याचे समजते तथापि शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा तपशिल इकडे उपलब्ध नाही.

सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई, दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश परित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र आता, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे  निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२२९०/२०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनीही मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र शासन व मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

**ड) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केलेली आहे. याबाबत-**

१) दिनांक २३/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जे मौखिक निर्देश दिले त्याबाबत संस्थानचे वकील ॲड. अनिल बजाज यांनी लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23/11/2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ Petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo. The Dy. CEO Mr. Thakre & Mr. Nalge were present on the said date and are aware of the same. This is for your records and necessary actions.

२) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीचे सुनावणीबाबत मा. न्यायालय यांनी खालीलप्रमाणे लेखी आदेश दिलेले आहेत-

1. It is submitted that Mr.Bajaj, learned Advocate for respondent no. 2 is not well.
2. Place the mattet on 6th January 2021.

३) **तसेच दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान** मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या मौखिक निर्देशाबबत ॲड. अनिल बजाज यांनी खालीलप्रमाणे लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23.11.2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

That, on dt. 08.12.2020 the matter was listed again on the board and as the undersigned was not well the matter was adjourned and the Hon'ble Court has again orally instructed to follow the same orders and not to terminate the employment of 598 workers.

रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० ची उपरोक्त सद्यस्थिती मा. तदर्थ समिती समक्ष सादर करावी लागणार आहे. तसेच सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांना माहे नोव्हेंबर, २०२० चे वेतन अदा करावे लागणार आहे.

विभागाचा प्रस्ताव-

१) उपरोक्त "ड" मध्ये नमूद रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० ची सद्यस्थिती मा. तदर्थ समितीचे समक्ष सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

२) उपरोक्त "ड" मधील सद्यस्थिती लक्षात घेता ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा संस्थान आस्थापनेवरुन कंत्राटदाराच्या आस्थापनेवर वर्ग करण्यासंदर्भात जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांना माहे नोव्हेंबर, २०२० चे वेतन अदा करावे लागणार आहे. त्यास अनुसरून ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे नोव्हेंबर, २०२० व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असल्याने माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२० या महिन्याचे प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे किमान/विहीत वेतनदरानुसार ५० टक्के अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**मा.अध्यक्षांनी खालील मत मांडले-**

**सदर ५९८ व्यक्तींचा दर्जा (status) निश्चित नाही. सर्व बाबी न्यायप्रविष्ट आहेत, त्यामुळे त्यांना सानुग्रह अनुदान म्हणून माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२० चे हजर दिवसांबाबतचे अनुदान देण्यास हरकत नसावी.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी सदरचा विषय न्यायप्रविष्ट असलेने त्यांना सानुग्रह अनुदान देण्यास हरकत नाही असे मत मांडले.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग )**

---

**विषय नं.४०** **स्पर्धा परिक्षा मागदर्शन केंद्र सुरु करणेबाबत.**

**विषय नं.४१** **श्री मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी यांना पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागु करणेबाबत.**

**विषय नं.४२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अधिकारी/ कर्मचा-यांसाठी (प्रशासकीय / तांत्रिक) सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४३** **श्री साईबाबा महाविद्यालयातील विद्यार्थीनींसाठी बससेवा उपलब्ध करणेबाबत.**

**विषय नं.४४** **जुन्या वाहनांचा फेर लिलाव तसेच निरुपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहिर लिलावाने विक्री करणेबाबत.**

**विषय नं.४५** **सन २०२०-२१ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेसाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४६** **श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजुकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी येणा-या अंदाजे रु.१९,३८,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **विषय नं.४७** | **श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सीव्हीटीएस ओटी, जनरल ओटी व न्युरो ओटी मध्ये ग्रेनाईट फ्लोरिंग बसविणेस तसेच रंगकाम करणेसाठी येणा-या अपेक्षीत रु.११,१९,३२३/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.** |
| **विषय नं.४८** | **श्री साईबाबा हॉस्पिटलचे दक्षिण बाजुस असलेले साईनगर कर्मचारी वसाहत येथील मैदानास वाहन पार्किंग करीता चेनलिंक फेसींगचे कंपाऊंड तयार करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत रु.२८,१९,४६२/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.** |
| **विषय नं.४९** | **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानु कंन्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांनी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२९.७.२०२० अन्वये मागणी केलेली सुरक्षा ठेव रक्कम रु.३,६१,७३,४३६/-मात्र विनार्शत बँक गॅरंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यात मुक्त करण्याच्या मागणीबाबत.** |
| **विषय नं.५०** | **मे.शिवसाई एंटरप्रायजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापू गंगाधर शेळके यांना देण्यात आलेल्या कामाचा ठेका रद्द करुन त्यांना काळया यादीत (Black List) समाविष्ठ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.** |
| **विषय नं.५१** | **कोरोना विषाणूचे (कोव्हीड-१९) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेल्या बेसन आटयाचे स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन व्यापारी / बेसनआटा मिल धारक यांचेकडून कोटेशन मागवुन त्याची उच्चतम दराने विक्री करुन विल्हेवाट (Dispose) लावणेबाबत.** |
| **निर्णय क्र.५७५** | **उपरोक्त विषय नं.४० ते ५१ या विषयावरील चर्चा वेळेअभावी पुढे ढकलण्यात आली.** |

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा संस्थानचा स्वतंत्र साईबाबा दुरदर्शन चॅनेल (तिरुपतीच्या धर्तीवर) सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील पुष्ठ क्र.३५६ वरील १७-२(ठ) श्री साईबाबांचे जीवन,त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** – निरंक

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थानकरीता **Television Channel** कार्यान्वित करणेकामी आवश्यक असणा-या पदांची माहितीबाबत अप्पर महानिदेशक (कार्यक्रम), दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई यांनी चर्चा करणेकामी दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई येथे उपस्थित राहणेबाबत दि.१२/१२/२०१९ रोजीचे पत्राद्वारे कळविलेले होते. सदरहु त्यांचे प्राप्त पत्रास अनुसरुन दि.०४/०१/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये श्री साईबाबा संस्थानला **Television Channel** कार्यान्वित करणेकामी आवश्यक असणा-या पदांची माहिती मिळणेकामी दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई येथे दि.२३/०१/२०२० रोजी श्री.किशोर गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभागप्रमुख व श्री शेखर कुलकर्णी, सीसीटीव्ही ऑपरेटर हे मिटींगकरीता उपस्थित होते. सदर मिटींगमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन, दि.२३/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये अप्पर महानिदेशक (कार्यक्रम), दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई यांनी खालील मुद्यांबाबत व्यवस्थापन समितीत चर्चा होणे अपेक्षित असल्याचे सुचविले आहे.

1) **Infrastructure for Television Channel** – The infrastructure for television channel involves land, building and associated requirements.

2) **Ministry's License** – In order to run a satellite television channel as per the present norms, there needs a License from Ministry of I & B.

3) **Teleport & uplink Facility** – It is presumed that the satellite Television Channel is a 24x7 activity which needs services of teleport & leased line connectivity.

4) **Technical Requirement** – The technical infrastructure like Studio Facilities, Cameras, Audio equipments, Graphics, Lighting, Power Supply, Set, Post Production, Archives, IT Services, Play Out Facility, Scheduling facility etc. needs a professional help.

5) **Content creation/acquisition** – Running a 24 x7 TV Channel, the major thrust is content and content is the king. Creation of right content suitable for a devotional channel is a mammoth activity which needs detailed discussion and decision of the Board of

Directors. It is reiterated that creating content, preview for its suitability and scheduling 24/7 is a sensitive and large scale activity.

6) **Human Resource** – There involves four types of professional's viz. Technical/IT, creative, administration and Sales/Marketing. It is required to appraise the Board of Directors the percentage of manpower to be engaged by the Trust and what quantum can be outsourced. The trend of the time to outsource major stake and create a mechanism for proper monitoring and control. The matter pertaining to Human Resources for the channel and their reporting structure need to be properly discussed and defined.

7) **Revenue Generation** – There is a scope for revenue generation for any television channel. This aspect also may be kept in mind while taking decisions.

8) Budget – Every point mentioned above involves cost and budget requirement which needs to be worked-out for the project implementation and there–after 24x7 operations.

9) **Genre & Language** – The devotees are pouring in from throughout India and World over. Therefore a decision needs to be taken about the language preference of the Channel.

10) **Timeline** – Installation and Commissioning of the Television Channel for Shirdi Saibaba Sansthan, a time line needs to be fixed and work on the project to complete within a time frame.

***It is advised that an Advisor/Consultant who has broad knowledge of technology, Creation of content, Social Media, administration, project management and revenue etc. need to be identified.***

***It is Nobel idea of the Management Committee to establish a TV Channel for a social cause. This office will support and guide for the appointment of an advisor/consultant and other aspects if only.***

तथापी, उपरोक्त अप्पर महानिदेशक (कार्यक्रम), दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई यांचे पत्रातील खालील मुद्यांबाबत तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी दि.२५/०१/२०२० रोजी समक्ष चर्चा केली असता, त्यांनी

- Infrastructure for Television Channel
- Ministry's License
- Teleport & uplink Facility
- Technical Requirement
- Content creation/acquisition
- Human Resource
- Revenue Generation
- Budget
- Genre & Language
- Timeline
- Appointment of an Advisor/Consultant

उपरोक्त नमुद केलेल्या मुद्दांबाबत येणा-या खर्चाचा मुद्देनिहाय सविस्तर तपशिल तसेच सदरकामी विविध स्तरावर आवश्यक असणा-या परवानगीबाबतची सविस्तर माहिती संस्थानला उपलब्ध होणेकामी दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई यांना पत्राद्वारे कळविणेबाबत निर्देश दिलेले होते. सदर निर्देशास अनुसरुन, दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई यांना दि.१८/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये माहिती उपलब्ध होणेकामी कळविणेत आलेले आहे. तथापी, त्यांचेकडुन अद्यापर्यंत कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही.

तथापी, दि.२१/११/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो.यांनी तिरुमला तिरुपती देवस्थानचे धर्तीवर चॅनेल सुरु करणेकामी माहिती घेणेबाबत निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार, तिरुमला तिरुपती देवस्थानचे **CEO,SVBC (Sri Venkateshwara Bhakti Channel)** यांना **Infrastructure for Television Channel, Ministry's License, Teleport & uplink Facility, Technical Requirement, Content creation/acquisition, Human Resource, Revenue Generation, Budget, Genre & Language, Timeline, Appointment of an Advisor/Consultant** बाबत माहिती तथा संस्थानला मार्गदर्शन मिळणेकामी दुरध्वनीद्वारे वेळोवेळी संपर्क साधण्यात आला होता. परंतु, त्यांनी **"will go through & let you know"** असे संदर्भ पाठविला आहे. तसेच त्यांचेशी पुनःश्च दुरध्वनीद्वारे संपर्क केला असता, त्यांनी **"In a meeting will call you the evening"** असे संदेशाद्वारे कळविलेले आहे. तसेच श्री साईबाबा संस्थानकरीता तिरुमला तिरुपती देवस्थानचे धर्तीवर स्वतंत्र **TV Channel** सुरु करणेकामीचे संदर्भात सविस्तर माहिती मिळणेकामी तिरुमला तिरुपती देवस्थानचे, **CEO, SVBC (Sri Venkateshwara Bhakti Channel)** यांना दि.०७/१२/२०२० रोजीचे पत्राद्वारे कळविणेत देखील आलेले आहे. परंतु, आज अखेर त्यांचेकडुन याबाबत कुठलाही खुलासा तथा पत्रव्यवहार संस्थानला प्राप्त झालेला नाही.

तथापी, श्री साईबाबांचे भक्त व त्यांची महती ही जागतिक पातळीवर असल्याकारणाने तसेच साईबाबांच्या धार्मिक व सामाजिक भावनांचा प्रसार व प्रसार करण्यासाठी जगभरात संस्थानमार्फत टीव्ही चॅनेलचे कार्य करणे आणि चालविणे हे एक मोठे अभियान आणि विशेषाधिकार असुन मोठया संख्येने लोकांपर्यंत पोहोचण्याचे साधन आहे. शतकानुशतके विकसित केलेली महान मूल्ये, धार्मिक परंपरा आणि संस्कृती संग्रहित करण्यास आणि भविष्यातील पिढयांसाठी ती जतन करण्यास देखील मदत करते. **TV Channel** साठी पायाभूत सुविधा तयार करणे, प्रभावित प्रोग्रामिंगसह 24**x**7 साठी देखभाल आणि ऑपरेट करणे हे एक आव्हानात्मक आणि फायद्याचे कार्य आहे.

त्या अनुशंगाने, श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्र **TV Channel** सुरु करणेबाबत सदर प्रकल्पाची व्याप्ती व त्याकरीता खालील नमुद केलेली कामे **Scope of Work** विचारात घेता, तांत्रीक दृष्टया सदर कामी सदर क्षेत्रात प्रदिर्घ अनुभव असलेल्या व प्रत्यक्ष काम केलेल्या तज्ञ व्यक्तीची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे तांत्रिक सल्लागारपदी नेमणुक करुन कार्यवाही करणे उचीत व सस्थानचे दृष्टीने हितावह ठरेल. तसेच सदर प्रकल्पाची कार्यवाही योग्य रितीने विहीत वेळेत अचुकतेने परिपुर्ण करता यईल, असे इकडील विभागाचे नम्र मत आहे.

a) Doing a study of the technical & programming requirements and Preparation of a detailed vision document in the line of the mission and vision of SSST.

b) After the approval of the vision document, a detailed project document needs to be prepared with budgetary requirements in consultation with Sansthan Management Committee.

**c)** The following are the scope of 24X7 TV channel.

**i Infrastructure for a TV Channel :**

The infrastructure for the proposed TV channel involves Space for Studio, Technical areas, Staff area, VVIP/Artist Assembly, Production and Post-Production areas, Air-conditioning and associated requirements.

**ii Ministry's License:**

In order to run a satellite television channel as per the present norms, there need a license from Ministry of I & B.

**iii Teleport & Up link Facility :**

24X7 Satellite Channel need to be up linked needs services of Teleport and lease line connectivity.

**Iv Technical Requirements :**

The technical infrastructure like TV Studio, PCR, Cameras, Audio equipment's, Graphic machines, Lighting, Power supply, Set, Post production, Archives, IT service, Scheduling and billing software, play out Servers, Centralized Air conditioning etc.

**V Content Creation & Programming Policy:**

The most important and sensitive area of a TV channel is its programming. Genre, languages, fresh/repeat/ in-house production, acquisition of mythological/devotional content, Preview, VIP coverage, monitoring, Archival Policy, managing the rights issues, Legal matters etc. need to be taken care.

**Vi Visibility:**

Availability of the channel on various platforms viz. Satellite, cable, DTH, YouTube, major telecom operators and OTT platforms in Indian Territory/overseas.

**Vii Revenue Generation:**

There is a scope for revenue generation and this aspect also may be kept in mind while taking decisions.

**Viii Budget :**

Every point mentioned above involves cost and budgetary requirements which need to be worked out for the proper implementation and thereafter 24X7 operations

**ix Digital Archives :**

Archival policy with technical set up to preserve "today" for future generations.

**X Identifying and engaging suitable vendors :**

For civil & acoustic works, supply of equipments, technical installation wiring, complete project execution.

**Xi Publicity & Promotion :**

Publicity and Promotion of the Channel including developing an IT cell to cater to digital space to achieve the desired results.

Budget and account including procurement.

**Xii Human resources:**

Identifying and hiring of professionals viz. Technical & IT, Creative team, Administration & Accounts, Sales and Marketing.

उपरोक्त विवेंचनानुसार, **TV Channel** तयार करणे, त्या संबंधीत लागणा-या उपकरणांची आणि इतर सामग्री खरेदी संस्थानचे विहीत पद्धतीने करणे, इन्स्टॉलेशन व कमिशनिंगचे काम वेळेवर करणे, **TV Channel** प्रोग्रामचे सर्व क्षेत्रे अतिशय व्यावसायिक तांत्रिक आहेत जी अर्थसंकल्प आणि कौशल्य यांचा त्यात समावेश आहे. उपरोक्त सर्व बाबींचे कामकाजाकरीता संस्थानकडे संबंधीत क्षेत्रातील तंत्रज्ञ उपलब्ध नाही. **TV Channel** प्रकल्पाचे नेतृत्व करण्यासाठी तंत्रज्ञान, प्रोग्रामिंग, आयटी, प्रसिद्धी आणि महसूल, धोरणात्मक बाबी इत्यादी विषयांचे संपूर्ण ज्ञान व अनुभव असलेले सल्लागाराची नेमणुक करणे आवश्यक आहे.

तरी, श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्र **TV Channel** कार्यान्वीत करणेबाबत सदर प्रकल्पाची व्याप्ती व त्याकरीता उपरोक्त नमुद केलेल्या कामाचा **Scope of Work** विचारात घेता, तांत्रीक दृष्टया सदरकामी सदर क्षेत्रात प्रदिर्घ अनुभव असलेल्या व प्रत्यक्ष काम केलेल्या तज्ञ व्यक्तीची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे तांत्रिक सल्लागारपदी नेमणुक करुन उपरोक्त Scope of Work मध्ये नमुद केलेली कामे नियुक्त केलेल्या तांत्रीक सल्लागाराकडुन करुन घेणेस तसेच सल्लागार नेमणुककामी येणारे अंदाजे रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, बिंदुनामावली तयार करण्याचे कामकाज सुरु आहे. परंतु, सीसीटीव्ही विभागाकडील आकृतीबंध मंजुर नसुन त्यानुसार सीसीटीव्ही विभागाकरीता प्रस्तावित असलेल्या आकृतीबंधाची प्रत सामान्य प्रशासन शाखेस दि.११/१०/२०१९ रोजी देण्यात आलेली आहे.

तथापी, सदर कामकाजाकरीता नेमण्यात आलेल्या प्रतिनीधींनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता वर्षभरातील उत्सव, लाईव्ह दर्शन, चारही आरत्या, संस्थानमध्ये होणारे सांस्कृतीक कार्यक्रम लाईव्ह

करणेकामी **Television Channel** कार्यान्वित करणेकामी आवश्यक असलेल्या पदांचा सीसीटीव्ही विभागाचे आकृतीबंधात समाविष्ट करणेबाबत दि.१९/११/२०१९ रोजी समक्ष झालेल्या चर्चेअंती सुचविलेले होते.

त्यानुसार, दि.२०/११/२०१९ चे मंजुर टिपणीन्वये दुरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई यांचेकडुन श्री साईबाबा संस्थानला **Television Channel** कार्यान्वित करणेकामी आवश्यक असणा-या पदांची माहिती उपलब्ध होणेकामी दि.११/१२/२०१९ चे पत्राद्वारे कळविलेले होते.

**विभागाचा अभिप्राय** – उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेल्या विवेचनास अनुसरुन, प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

**विभागाचा प्रस्ताव** - श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्र **TV Channel** सुरु करणेबाबत सदर प्रकल्पाची व्याप्ती व त्याकरीता उपरोक्त नमुद केलेली कामे **Scope of Work** विचारात घेता, तांत्रीक दृष्टया सदरकामी सदर क्षेत्रात प्रदिर्घ अनुभव असलेल्या व प्रत्यक्ष काम केलेल्या तज्ञ व्यक्तीची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे तांत्रिक सल्लागारपदी नेमणुक करुन कार्यवाही करणे उचीत व सस्थानचे दृष्टीने हितावह ठरेल. तसेच सदर प्रकल्पाची कार्यवाही योग्य रितीने विहीत वेळेत अचुकतेने परिपुर्ण करता यईल, असे इकडील विभागाचे नम्र मत आहे.

तरी, श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्र TV Channel कार्यान्वीत करणेबाबत सदर प्रकल्पाची व्याप्ती व त्याकरीता उपरोक्त नमुद केलेल्या कामाचा Scope of Work विचारात घेता, तांत्रीक दृष्टया सदरकामी सदर क्षेत्रात प्रदिर्घ अनुभव असलेल्या व प्रत्यक्ष काम केलेल्या तज्ञ व्यक्तीची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे तांत्रिक सल्लागारपदी नेमणुक करुन उपरोक्त Scope of Work मध्ये नमुद केलेली कामे नियुक्त केलेल्या तांत्रीक सल्लागाराकडुन करुन घेणेस तसेच सल्लागार नेमणुककामी येणारे अंदाजे रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा स्वतंत्र साईबाबा दुरदर्शन चॅनेल (तिरुपतीच्या धर्तीवर) सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.५३** **श्री साईबाबा मंदिर परिसरात चित्रीकरण, छायाचित्रण व वार्तांकन करणारे प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांचेसाठी तयार करण्यात आलेली नियमावली मा.तदर्थ समितीसमोर मान्यतेसाठी सादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचा कारभार श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार चालतो. संस्थान हे धार्मिक तसेच धर्मदाय अशा दोन्ही प्रकारचे उपक्रम राबवते. श्री साईबाबा हे जागतिक किर्तीचे धार्मिक स्थळ आहे. येथे दरवर्षी साधारणपणे १.५ ते २.०० कोटी भाविक दर्शनासाठी येत असतात. संस्थानतर्फे श्री साईबाबांचे उत्सव प्रामुख्याने साजरे केले जातात. रामनवमी उत्सव, गुरुपौर्णिमा उत्सव, पुण्यतिथी उत्सव या उत्सवकाळात एकाच दिवशी १.५० लाखापेक्षा जास्त भाविक मंदिरात दर्शनासाठी येत असतात.

शिर्डीमध्ये मंदिर परिसरात उत्सव काळात तसेच इतरही दिवशी दृकश्राव्य प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आपले कॅमेरे व तद्अनुषंगिक साहित्यासह उपस्थित असतात व वेळीअवेळी व्हिडीओ शुटिंग, भक्तांच्या मुलाखती करत असतात मंदिर व भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन संस्थानने बाहेरील व्यक्तींना मंदिर परिसरात मोबाईल व इतर वस्तुही (प्रसाद, फुले, हार) वगळता आणण्यास प्रतिबंध केलेला आहे. मात्र प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी कोणतीही नियमावली सध्या अस्तित्वात नाही. सदर बाबीमुळे श्री साईबाबा संस्थान विनाकारण कोणत्याही कारणास्तव वादात ढकलेले जाते. उदा. श्री साई मंदीरात येताना सभ्यतापुर्वक वेश अथवा भारतीय संस्कृतीस अनुसरून वेशभुषा असावी, याबाबतचे अवाहन व विनंती करण्याचे फलक लावल्यामुळे प्रसारमाध्याकडून विपर्यास होऊन काही प्रसिध्दीलोलुप लोक त्याचा गैरफायदा घेतात. यास्तव अशा इलेक्ट्रॉनिक मिडीयास निश्चित् संहिता असणे आवश्यक आहे. तशी संहिता देशातील जगन्नाथपुरी, तिरुपती येथे पाळण्यात येते. याशिवाय त्यामुळे मंदिर परिसरात येणारे प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी नेमके कोणत्या चॅनलचे आहेत. त्यांचे मुळ चॅनल, वर्तमानपत्राचे नाव काय आहे. त्यांनी कोणत्या क्षेत्रात शुटिंग करावे, कोणते क्षेत्र प्रतिबंधीत आहे. कोणत्या कालावधीत मंदिर परिसरात उपस्थिती अनुज्ञेय राहीलइत्यादीबाबत नियमावली/ आचारसंहिता तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार दृकश्राव्य प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांचेसाठी खालीलप्रमाणे नियमावली प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. देवस्थान संस्थानमार्फत प्रसारमाध्यमांसाठी आवश्यक चित्रीकरण, फोटो हे जनसंपर्क विभाग देवस्थानातर्फे उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यासाठी निश्चित संहिता/नियमावली संस्थानसाठी आवश्यक आहे.

२. प्रसारमाध्यमांचे अधिकृत प्रतिनिधी याबाबतची माहीती जिल्हा माहीती अधिकारी यांचेकडून मागवण्यात यावी व त्याच प्रसारमाध्यम प्रतिनीधी यांना मंदिर परीसरात प्रवेश देण्यात येईल.

३. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी मंदिर परिसरात शुटिंग, वार्तांकन किंवा भक्तांच्या प्रतिक्रिया घेण्यासाठीयेताना संस्थानचे जनसंपर्क कार्यालयात येण्यासाठी नोंदवहीत नोंद करणे आवश्यक प्रथम नोंदणीसाठी वृत्त चॅनलचे प्राधीकार पत्र व आधार कार्डची झेरॉक्स प्रत व २ फोटो द्यावे लागतील.

४. प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांनी सोबत संबधित वाहिनीचे अधिकृत ओळखपत्र बाळगणे आवश्यक राहिल.

५. प्रतिनीधींनी मंदिराच्या कोणत्या परिसरात चित्रीकरण, वार्तांकन करावयाचे आहे व कोणते क्षेत्र प्रतिबंधीत असेल याबाबत भक्तांच्या गर्दीनुसार व प्राप्त परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

६. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधींसाठी शुटिंग, वार्तांकनासाठी वेळ ठरवुन देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

७. गर्दीचे कालावधीत कोणत्याही परिस्थितीत मुख्य मंदिर, गुरुस्थान इत्यादी ठिकाणी प्रसारमाध्यमाचे प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार नाही. मात्र त्यांना वृतांत व चित्रीकरण पुरविण्यात येईल.

८. उत्सव काळात किंवा इतर महत्वाच्या कार्यक्रमाचे वअतिमहत्वाच्या व्यक्तींच्या भेटींचे फोटो तसेच व्हिडीओ चित्रीकरण संस्थान मार्फत करण्यात येऊन ते जनसंपर्क विभागा मार्फत प्रसारमाध्यमांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच आवश्यकतेनुसार प्रसारमाध्यमाचे प्रतिनिधी यांना बोलविण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकरी यांना राहतील.

९. प्रसारमाध्यमांना मंदिर परीसरात उपस्थित राहण्याची परवानगी दिल्यास संबधित चॅनलचे प्रतिनीधी व कॅमेरामन अशा दोन व्यक्तींना प्रवेश आवश्यक राहील.

१०. माध्यमाचे माहितीसाठी संस्थानतर्फेजरुरीप्रमाणेrecorded bites/information प्रसिध्दीपत्रकाद्वारे प्रसारमाध्यमांना उपलब्ध करुन देण्यात येईल. आवश्यकतेनुसार व्यवस्थापन समिती अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसारमाध्यमांना मुलाखत किंवा माहिती देऊ शकतील.

११. उत्सवाच्या काळात थेट प्रक्षेपण करण्यास शक्यतो फक्त शासकीय दुरचित्रवाणी/दुरदर्शन यांनाच परवानगी देण्यात यावी. थेट प्रक्षेपणासाठी दुरदर्शन यांचा अर्ज न आल्यास प्राप्त अर्जांपैकी फक्त एकाच खाजगी कंपनीला अटी व शर्तीसह परवानगी देण्यात यावी. सदर खाजगी कंपनीने व्हिडीओ डिस्ट्रीब्युटर्सच्या सहाय्याने ते प्रक्षेपण इतर कंपन्यांना पुरविण्याची व्यवस्थाकरावी.

१२. काही अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त नियमावलीतील तरतूदीमध्ये सूट देण्याचा अधिकार मा.व्यवस्थापन समितीला असेल.

उपरोक्त प्रमाणे नियमावलीस मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन नंतर मा.उच्च न्यायालयात Civil application दाखल करुन मान्यता घेता येईल. त्याअनुषगांने मंदिर परिसरातील चित्रीकरण व छायाचित्रण, वार्तांकन करणारे प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांचेसाठी तयार करण्यात आलेली नियमावलीस मा.तदर्थ समितीसमोर मान्यता मिळणेसाठी सविनय सादर

**निर्णय क्र.५७७** **तदर्थ समिती सदस्य तथा अपर आयुक्त यांनी असे मत व्यक्त केले की, पत्रकारांना मतदान केंद्रामध्ये प्रवेश देतेवेळी निवडणूक आयोगाकडून जी आचारसंहीता तयार केली जाते त्याच धर्तीवर श्री साईबाबा मंदिर परिसरात चित्रीकरण, छायाचित्रण व वार्तांकन करणारे प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांचेसाठी नियमावली तयार करण्यात यावी.**

**समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी विशिष्ट दिवसांचे व गर्दीच्या दिवसांचे नियमावलीमध्ये उल्लेख करणेबाबत मत मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरात चित्रीकरण, छायाचित्रण व वार्तांकन करणारे प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांचेसाठी खालील प्रमाणे नियमावली तयार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**१. संस्थानमार्फत प्रसार माध्यमांना विशिष्ट दिवसांचे चित्रिकरण, फोटो हे जनसंपर्क विभागामार्फत त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावेत. (उदा. गुरुपोर्णिमा, रामनवमी, दसरा या उत्सवात जर सकाळीच ५.३० ते ५.४५ वा. कार्यक्रम सुरु होत असतात तर त्याचे फोटो किंवा चित्रिकरण हे साधारणत: अर्ध्या ते पाऊण तासात प्रसार माध्यमांचे प्रतिनिधीपर्यंत पोहचेल, हे अपेक्षित आहे.)**

अर्थातच सर्व चित्रिकरणाच्या योग्यतेची शहानिशा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-याने करण्याची आहे.

२. अधिकृत प्रसार माध्यमांबाबतची व त्यांचे अधिकृत प्रतिनिधीबाबतची अधिकृत माहिती संस्थानने जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडून दर सहा महिन्यांनी मागवून घ्यावी.

३. सदर प्रसारमाध्यमांचे अधिकृत प्रतिनिधी (जास्तीत जास्त दोन व्यक्ती) यांनाच मंदिर परिसरात प्रवेश देण्यात यावा.

४. सदर अधिकृत प्रतिनिधींनी आपली ओळख पटवावी. (उदा. ओळखपत्र इत्यादी देवून) त्यांनी मंदिर परिसरात थेट प्रक्षेपन, वार्तांकन प्रक्रिया यासाठी येताना जनसंपर्क कार्यालयातील नोंदवहीत आपली नोंद करुन यावे. याबाबतची स्वतंत्र नोंदवही जनसंपर्क कार्यालयाचे प्रमुखांनी योग्यपणे ठेवण्याची आहे. व त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण असेल.

५. सदर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी मंदिर परिसरात त्यांचे ओळखपत्र बाळगणे आवश्यक असेल.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंदिर परिसरात विशिष्ट क्षेत्र/क्षेत्रे चित्रीकरण, वार्तांकन इत्यादिसाठी निश्चित करावीत. मात्र भक्तांच्या गर्दीवरुन अशा क्षेत्रात वार्तांकन, चित्रीकरण इत्यादि न करण्याचा निर्णय वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी हे घेवू शकतील.

७. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीसाठी शुटींग, वार्तांकन, भक्तांच्या प्रतिक्रिया घेण्यासाठी मंदिर परिसरात मंदिर उघडणे ते बंद होणे या वेळेत येण्याची मुभा राहील. मात्र अशा प्रतिनिधींनी मंदिर परिसरात तीस मिनीटांच्या वर थांबून राहू नये. त्यांच्या नोंद वहीतील नोंदीवरुन संस्थान प्रशासन त्यांना मंदिराचे बाहेर काढू शकेल. याबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिस्थितीनुरुप निर्णय घ्यावयाचे आहेत.

८. मंदिरातील गर्दीचे कालावधीत (उदा.सार्वजनिक सुटटया, उत्सव, सण) या दरम्यान कुठल्याही परिस्थितीत मुख्य मंदिर, गुरुस्थान या ठिकाणी प्रसार माध्यमांचे प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येवू नये. मात्र वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या प्रतिनिधींना छायाचित्र, चित्रिकरण हे त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल.

९. अतिमहत्वाच्या व्यक्तिंच्या भेटीचे फोटो घेणे तसेच व्हिडीओ शुटींग इत्यादि संस्थानमार्फतच करण्यात येईल व ते जनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसार माध्यमांना त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल.

(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)

---

**विषय नं.५४** स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.

**निर्णय क्र.५७८** सदर विषयावरील चर्चा वेळेअभावी पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-आरोग्य विभाग )

---

**विषय नं.५५** देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.

**विषय नं.५६** देणगीदार भक्तास श्री साई दैनंदिनी (पॉकेट साईज) व साईबाबा दिनदर्शिका-२०२१ मोफत देणेबाबत.

**निर्णय क्र.५७९** उपरोक्त विषय नं.५५ व ५६ या विषयांना चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असल्याने आजच्या सभेत सदर दोन्ही विषय मागे घेण्यात आले.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

**१. संस्थान आयकर कामकाजाकरीता करसल्लागार सीए आर.आर.मुणी, मुंबई यांची फी ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** करनिर्धारण वर्ष **२०१५-१६** चे करनिर्धारण करत असताना संस्थान धार्मिक अथवा धर्मादाय असलेबाबत व इतर अनुषंगीक पुर्ततांबाबत मतांतर करुन आयकर विभागाने दि.१८.०२.२०१८ रोजी रु.१८३ कोटी आयकर भरण्याबाबत आदेश पारीत केला होता. सदर आदेशाविरुद्ध विहीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल

करण्यात येऊन फेर करनिर्धारण करण्यात आले व रु.१२२ कोटी इतका आयकर विभागाने निश्चित केला. त्यावेळचे कर सल्लागार यांचे बरोबर वरिष्ठ अनुभवी सीए.दिपक टिकेकर यांना घेण्यात आले होते. त्यांनी फेर करनिर्धारण, आयकर अपिल व मा. उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्याकरीता आवश्यक माहिती संकलीत केली होती व सुनावणी करीता विधीज्ञांबरोबर उपस्थित होते. सदर कर निर्धारण वर्षाचे आयकर अपिल दाखल करण्यात आले असुन सुनावण्या चालु आहेत बाब न्यायप्रविष्ठ आहे. या कामकाजाची सीए. दिपक टिकेकर यांनी रु.१२.२७ लाख व संस्थानचे सीए. राहुल केळकर यांनी रु.५.५१ लाख फी मागणी केली होती. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वरिष्ठ सीए.दिपक टिकेकर यांना रु.४.५० लाख फी आदा करण्यात आली असुन सीए.राहुल केळकर यांना फी आदा करण्यात आलेली नाही. सीए. दिपक टिकेकर परदेशी स्थायीक होण्याचे नियोजन असल्याने त्यांनी पुढील कामकाज करणार नसले बाबत कळविले होते.

कर निर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणेबाबत आयकर विभागाने दि.०३.०८.२०१८ रोजी नोटीस दिली. मा.व्य.स.निर्णय क्र.५३०/दि.२२.०८.२०१८ अन्वये *"कर निर्धारण वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षांसंबधीत आलेल्या नोटींशी संदर्भात आवश्यकतेनुसार फेर करनिर्धारण करणे, अपिल, आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करणे बाबत तसेच त्यासाठी कर सल्लागार, सीए, विधीज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन ठरविणे बाबत निर्णय घेण्याचे अधिकार समिती सदस्य अॅड. मोहन जयकर यांना देण्यात यावे"* असे ठरले.

सीए.आर.आर. मुणी, मुंबई यांना आयकर कामकाज:- साधारणः सन २००० पूर्वी संस्थानचे आयकर कामकाज करणारे सीए.आर.आर. मुणी, मुंबई यांना **२०१३-१४** चे फेर करनिर्धारण करणे बाबत मा.विश्वस्त यांनी कळविले. त्यांनी सदर कामकाजाकरीता कोणतीही फी आकारणार नसल्याचे मान्य केले. त्यास अनुसरुन त्यांना दि.१५.०४.२०१९ रोजी विनामोबदला आयकर कामकाज करण्याकरिता नियुक्ती आदेश देण्यात आला होता. त्यांनी २०१३-१४ चे फेर करनिर्धारण केले. आयकर विभागाने दि.१९.०३.२०१९ रोजी रु.१२२ कोटी आयकर आदेश पारित केला. सदर आदेशा विरुद्ध सीए.आर.आर.मुनी यांनी दि.१७.०४.२०१९ रोजी आयकर अपिल दाखल केले. सदर कामकाजाकरीता त्यांनी फी आकारणार नसल्याचे मान्य केल्याने कोणतीही फी आदा करण्यात आलेली नाही.

आयकर विषयक सीए.आर.आर.मुणी यांचे कामकाज समाधानकारक वाटल्यानंतर त्यांना खालील प्रमाणे आयकर विषयक कामकाज देण्यात आले आहे.

१) आयकर विभागाने कर निर्धारण वर्ष **२०१७-१८** चे कर निर्धारण करणे बाबत दि.०१.०२.२०१९ रोजी नोटीस दिली.दि.०५.०९.२०१९ रोजी कर निर्धारण संबधीत सीए.आर.आर.मुणी यांचे नावे अधिकारपत्र देण्यात आले. त्यास अनुसरुन त्यांनी पुढील आयकर कामकाज सुरु केले. त्यांनी व त्यांचे कार्यालयाने आवश्यक माहिती संकलीत करुन प्रत्यक्ष कर निर्धारणाकरीता आयकर कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहिले. आयकर विभागाने दि.३०.१२.२०१९ रोजी रु.५८,४५,८०,७००/- देयकराचा आदेश केला. सदर आदेशा विरुद्ध दि.२७.०१.२०२० रोजी त्यांनी आयकर अपिल दाखल केले. त्याच्या दोन सुनावण्या झाल्या असुन लॉकडाऊनमुळे पुढील कामकाज थांबले आहे.

२) आयकर विभागाने दि.०८.१२.२०१९ रोजी कर निर्धारण **वर्ष २०१४-१५** चे फेर कर निर्धारण करणे बाबत नोटीस दिली. सदर नोटीस सीए.आर.आर.मुणी यांना पाठविण्यात आली. सदर आर्थिक वर्षाची माहिती संकलीत करुन फेर कर निर्धारण करु नये करिता सीए आर.आर.मुनी व विधीज्ञ मे.जुन्नरकर अॅन्ड असोसिएटस, मुंबई यांचे मार्फत विहीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी लेखापरिक्षण संस्था, अॅडव्होकेट, जेष्ठ विधिज्ञ यांचेकडुन अपेक्षीत फी बाबत दरपत्रकांची मागणी करण्यात आली होती. मा.व्य.स. निर्णय क्र.२ब दि.१४.०१.२०२० अन्वये *"कर निर्धारण, फेरकरनिर्धारण, अपिल्स संबधीत आयकर विभागाच्या आदेशाविरुद्ध, मा. उच्च न्यायालय, मुंबई, मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे रिट अर्ज दाखल करण्यास व त्याकरीता चार्टड अकौटंट,लेखापरिक्षण संस्था, अडव्होकेस, जेष्ठ विधीज्ञ यांची नियुक्ती करुन कामकाज करण्यास व त्याकरीता होणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली आहे."* सीए. आर.आर.मुणी यांनी अनुषंगीक माहिती संकलीत करुन दिली आहे. मा.उच्च न्यायालयामध्ये फेर करनिर्धारणा विरुद्ध विधीज्ञांमार्फत रिट अर्ज दाखल करण्यात आला असुन कोव्हीड-१९ लॉकडाऊन मुळे सुनावणी झालेली नाही. बाब न्यायप्रविष्ठ आहे.

३) करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे वैधानिक लेखापरिक्षण झाल्यानंतर आयकर विवरणपत्र सीए.आर.आर.मुणी यांनी दाखल केले असुन, विवरणपत्र दुरुस्ती, कर निर्धारण- स्क्रुटीनी, फेर करनिर्धारण, अपिल

इत्यादी संपुर्ण कामकाजाकरीता दि.२६.०९.२०१९ रोजी अधिकारपत्र देण्यात आले असुन त्यांनी दि.३०.०३.२०१९ रोजी आयकर विवरणपत्र दाखल केले आहे. त्यासंबधीत आयकर कलम १४३(२) अन्वये दि.२२.०९.२०१९ रोजी नोटीस प्राप्त झाली होती. सीए.आर.आर.मुणी यांनी इलेक्ट्रॉनिकली दि.०७.१०.२०१९ पुर्तता केली असुन त्यामध्ये रिफंड रु.३,४१,१४,१३२/- आहे.

४) करनिर्धारण वर्ष २०१९-२० चे वैधानिक लेखापरिक्षण झाल्यानंतर आयकर विवरणपत्र सीए.आर.आर.मुणी यांनी दि.३१.१०.२०१९ रोजी दाखल केले असुन, त्यामध्ये रिफंड रु.१७,४३,८८,४१०/- आहे. तसेच विवरणपत्र दुरुस्ती, कर निर्धारण-स्क्रुटीनी, फेर करनिर्धारण, अपिल इत्यादी संपुर्ण कामकाजाकरीता दि.१८.०६.२०२० रोजी त्यांना अधिकारपत्र देण्यात आले आहे.

५) कर निर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चा रिफंड इतर वर्षांच्या देयकरापोटी वर्ग करणे बाबत कलम २४५ अन्वये आयकर विभागाची दि.०९.०५.२०२० रोजी नोटीस प्राप्त झाली.सदर बाबत सीए.आर.आर.मुणी यांचा अभिप्राय घेण्यात आला. रिफंड रक्कम वर्ग करणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर वरिष्ठ वकील एस.गणेश, दिल्ली यांचा अभिप्राय घेतला असता मागील मा.उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ऑर्डसनुसार कर भरणा करणे बाबत स्थगिती असल्याचा अर्थ लावुन रिफंड रक्कम वर्ग करु नये आवश्यकतेप्रमाणे रिट अर्ज दाखल करता येईल असे कळविले. तत्पुर्वी आयकर विभागाने दि.१९.०६.२०२० रोजी परस्पर रक्कम रु.२२,१९,५९,०४०/- वळवुन घेतली होती. त्यावर संस्थानचे जेष्ठ वकील एस.गणेश, दिल्ली यांच्या अभिप्रायानुसार सदर रिफंड रक्कम संस्थानचे बॅंक खात्यात जमा करणे बाबत सीए.आर.आर.मुणी यांनी पत्रव्यवहार केला. आयकर विभागाने बाबत विहीत वेळेत सदर बाब कळविण्यात आली नाही. त्यामुळे सीपीसी बॅंगलोर आयकर कार्यालयाने रक्कम वर्ग करुन घेतली आहे. सदर बाबत संस्थानचे आयकर विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येऊन लॉकडाऊनमुळे विलंब झाल्याचे कळविले. आयकर संबधीत अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोनाने दि.२९.०७.२०२० रोजी रु.२२,१९,५९,०४०/-रिफंड रक्कम संस्थानच्या बॅंक खात्यात जमा केली.

६) सीए.आर.आर.मुणी यांनी केलेल्या हिशोबानुसार रु.७४,६८,१२९/- व्याज कमी प्राप्त झाले बाबत कळविले. त्याप्रमाणे संस्थानचे खात्यावर जमा करणे बाबत आयकर विभागाला दि.०८.०८.२०२० रोजी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

**याशिवाय आयकरा संबधीची विनामोबदला खालील प्रमाणे सीए, विधीज्ञ व जेष्ठ वकील काम करतआहेत.**

१) सीए.व्ही.के.बेसवाल, मुंबई यांनी आयकर अपिल सुनावणी करीता रु.१ फी घेणे बाबत कळविले आहे. आयकर विवरणपत्र भरणे, कर निर्धारण, फेरकर निर्धारण, आयकरा संबधीत नोटीसा हे काम करणार नाहीत असे त्यांनी कळविले आहे. ते स्वत: सीए.आर.आर.मुणी यांचे बरोबर मागील दोनवेळा आयकर अपिल सुनावणी करीता उपस्थित होते.

२) विधीज्ञ मे.जुन्नरकर व त्यांचे असोसिएट फर्म, मुंबई यांनी आयकर, व्हॅट संबधीत पाच वेळा मा. उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल केले आहेत.

३) मा.सर्वोच्च न्यायालय विधीज्ञ ॲड.मेहुल गुप्ता, दिल्ली यांनी मा. सर्वौच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन दाखल केली आहे.

४) वरिष्ठ वकील सीए. एस.गणेश, दिल्ली हे स्वत: चार्टर्ड अकौंटंट आहेत. ते मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे संस्थानचे वतीने सर्वोत्कृष्ट प्रभावीपणे बाजु मांडण्याचे काम करतात. त्यामुळे अद्याप संस्थानला आलेल्या नोटीसांपोटी आयकर भरावा लागलेला नाही. व मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. सर्वौच्च न्यायालय, दिल्ली येथे स्थगिती आदेश प्राप्त झाला आहे. सन २०१४-१५ चे फेर करनिर्धारणा विरुद्ध रिट अर्ज दाखल करण्यात आला असुन सुनावण्या सुरु आहे व बाब न्याय प्रविष्ठ आहे.

५) सुरुवातीला कर निर्धारण, फेर कर निर्धारण, न्यायालयात रिट संबधीत आयकर विषयक माहिती संकलीत करुन देणारे वरिष्ठ सीए. दिपक टिकेकर हे प्रत्यक्ष काम करत नसले तरी वरिष्ठ वकील, सीए.आर.आर.मुणी यांना आजही वेळोवेळी आवश्यकते प्रमाणे मदत करत आहे.

६) सेवानिवृत्त आयकर प्रिन्सीपाल कमिशनर श्री.एस.डी. श्रीवास्तव, सध्या दिल्ली हे निस्सीम साईभक्त आहेत. सुरुवातीला आलेल्या नोटीसांसंबधीत आयकर विभागाविरुद्ध जाऊन कार्यवाही करणेबाबत त्यांनी मोठया

प्रमाणावर आधार दिला. व त्याप्रमाणे कार्यवाही सुरु झाली आहे. आजही ते सदर टिममध्ये सक्रीय सहभागी होऊन मार्गदर्शन करत आहेत.

माजी विश्वस्त यांचे नियंत्रणाखाली व संस्थानचे बाजूने प्रत्यक्ष नियोजन या सर्वांचा मेळ बसुन आयकर विषयक कामकाज करण्यात येत असुन सध्या आयकर विभागाविरुद्ध संस्थानची बाजू भक्कम आहे.

सीए आर.आर. मुणी, मुंबई यांची फी मागणी व कामाचे स्वरुप:- सीए आर.आर. मुणी यांना प्रत्यक्ष कामकाज करावे लागत आहे. उपरोक्त प्रत्यक्ष कामाचे स्वरुप, कामाचा व्याप, त्यांचा स्वत:चा व त्यांच्या लेखापरिक्षण संस्थेचा त्यामध्ये लागणारा वेळ, लॉकडाऊन कालावधीतील आर्थिक अडचण इ. बाबींचा विचार करुन दि.१६.०७.२०२० रोजी ई-मेलद्वारे दि.०१.०४.२०१९ पासुन मासीक रु.७५ हजार अधिक जीएसटी म्हणजे वार्षीक रु.९ लाख अधिक जीएसटी मिळणे बाबत मागणी केली आहे. त्या संदर्भात त्यांनी इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडीया यांचे दरपत्रकाचा संदर्भ दिला आहे. पत्रामध्ये त्यांनी पुढील आयकर विषयक कामाचे स्वरुप नमुद केले आहे. वैधानिक लेखापरिक्षकांशी विचार विनिमय करुन आयकर विषयक धोरण निश्चित करणे, त्याप्रमाणे आयकर विवरणपत्र दाखल करणे, त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करणे, आयकर विषयक वजावटी मिळण्याकरीता सर्व आवश्यक फॉर्म दाखल करणे, आयकर स्क्रुटीनी संबधीत वेळोवेळी आलेल्या नोटीसांना उत्तरे देणे, आयकर निर्धारणाकरीता आयकर विभागात स्वत:हा व प्रतिनिधींसोबत हजर राहणे, फेर करनिर्धारण, आयकर अपिल, मा.उच्च व मा. सर्वोच्च न्यायालय येथे रिट अर्ज दाखल करणेकामी विधिज्ञांना आवश्यक माहिती संकलीत करुन देणे, उपस्थित राहणे इत्यादी कामकाजाचा समावेश राहिल असा उल्लेख त्यांनी त्यांचे ई-मेलमध्ये केला आहे.

विभागाचा अभिप्राय:- सीए आर.आर. मुणी, मुंबई हे माहे फेब्रुवारी २०१९ पासून सन २०१३-१४ चे आयकर विषयक कामकाज विनामोबदला करत आहेत. त्यांचे काम समाधानकारक झाल्याने प्रशासनाने त्यांना पुढील करनिर्धारण वर्षांची कामे दिली आहेत. आयकर विषयक प्रत्यक्ष कामकाज, त्यांचा व त्यांच्या सहकार्यांचा त्यामध्ये लागणारा वेळ, संस्थानच्या आयकरा संबधीत त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोण व त्यामुळे सुरुवातीला रु.१२२ कोटी, रु.१२८ कोटी व त्यानंतर २०१७-१८ करीता रु.५८ कोटी इतका कमी कर आला आहे. यावरुन योग्य दिशेने माहिती सादर होत आहे असे दिसुन येते. तसेच २०१८-१९ व २०१९-२० चा रिफंड वरिष्ठ वकील यांचे अभिप्रायानुसार पत्रव्यवहार करुन रु.२२.१९ कोटी संस्थानचे खात्यात जमा झाले असुन, ऊर्वरित व्याज रु.७४.६८ लाख संस्थानला मिळणेबाबत त्यांचेमार्फत पत्रव्यवहार केला आहे. अशा प्रकारे त्यांचे आयकर विषयक कामकाज समाधानकारक आहे.

तथापी दि.१५.०४.२०१९ रोजी विनामोबदला आयकर कामकाज करणेबाबत नियुक्ती आदेश देण्यात आला असुन, दि.१५.०१.२०२० रोजीचे ई-मेल मध्ये त्यांनी वर्षनिहाय रु.३,००,०००/- अधिक त्यावरील कर अशी मागणी केली आहे. विना मोबदला आदेश असल्याने त्याचा विचार करण्यात आला नव्हता. तथापी आयकर विषयक प्रत्यक्ष कामकाज, त्यांचा व त्यांच्या सहकार्यांचा त्यामध्ये लागणारा वेळ, व लॉकडाऊन कालावधीमध्ये त्यांची झालेली नाजुक आर्थिक परिस्थिती यामुळे तयांनी दि.१६.०७.२०२० रोजीच्या ई-मेल पत्रामध्ये दि.१.०४.२०१९ पासुन मासीक रु.७५ हजार अधिक जीएसटी अशी वार्षीक फी रु.९ लाख अधिक जीएसटी फी मागणी केली आहे. सदर प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मान्यतेस्तव प्रस्तावीत करण्यात आला होता. त्यामध्ये त्यांनी मागणी केलेली फी रु.९,००,०००/- कमी करणेबाबत विचारणा करावी असे सुचविले त्यास अनुसरुन फी कमी करणे बाबत त्यांना दि.२३.११.२०२० रोजी पत्रव्यवहार करण्यात आला होता. पत्रव्यवहारापोटी त्यांनी दि.०१.१२.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे यापुर्वी कळविलेली वार्षिक रु.९,००,०००/- फी कमी करु नये असे कळविले आहे. यापुर्वी दि.१५.०१.२०२० रोजी ई-मेलद्वारे वार्षिक रु.३,००,०००/- फी मागणी केली होती. त्याप्रमाणे फी मंजुर करावयाची असेल तर कर निर्धारण वर्ष निहाय रु.३ लाख फी द्यावी असे नमुद दि.०१.१२.२०२० रोजीचे ई-मेल मध्ये नमुद केले आहे.

**अ)** फी कमी करणेबाबत विचारणा केल्यानंतर खालीलप्रमाणे पर्याय क्र.२ स्विकारल्यास फी कमी होत आहेः-

| **पर्याय क्र.१ :-** दि.१६.०७.२०२० रोजीची मागणी | **पर्याय क्र.२:-** दि.१५.०१.२०२० रोजीची मागणी |
|---|---|
| दि.१.०४.२०१९ पासुन वार्षीक फी रु.९ लाख अधिक जीएसटी | कर निर्धारण वर्ष २०१३-१४ पासुन रु.३ लाख अधिक जीएसटी |
| कर निर्धारण वर्ष निहाय काम पुर्ण होण्या ऐवजी वार्षिक रु.९ लाख फी होत आहे. | कर निर्धारण वर्ष निहाय काम पुर्ण करण्याकरिता वार्षिक रु.३ लाख फी होत आहे. |
| आयकर विभागामार्फत साधारणः एका वर्षात एकाच वर्षाचे कर | आयकर विभागामार्फत साधारणः एका वर्षात एकाच वर्षाचे कर |

| | |
|---|---|
| निर्धारण पुर्ण केले जाईल त्याकरिता रु.९ लाख फी होईल. | निर्धारण पुर्ण केले जाईल त्याकरिता रु.३ लाख फी होईल. |
| आयकर संबधीत संपुर्ण कामकाज आयकर विवरणपत्र भरणे, कर निर्धारण, अपिल व इतर अनुशंगिक कामकाजाचा समावेश राहील. | आयकर संबधीत संपुर्ण कामकाज आयकर विवरणपत्र भरणे, कर निर्धारण, अपिल व इतर अनुशंगिक कामकाजाचा समावेश राहील. |
| १.४.२०१९ ते ३१.०३.२०२० रु.९ लाख<br>१.४.२०२० ते ३१.०३.२०२१ रु.९ लाख<br>सदर पर्यायात उर्वरीत ३ महिन्यात कोणत्याही कर निर्धारण वर्षाचे कामकाज पुर्ण होणार नाही. असे दिसते व रु.१८ लाख फी देय होईल. तसेच १.४.२०२१ पासुन पुढे वार्षीक रु.९ लाख फी द्यावी लागेल. | २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ प्रति कर निर्धारण वर्ष निहाय रु.३ लाख<br>पर्याय १ मध्ये नमुद केलेली फी पर्याय २ नुसार दिल्यास सर्वच कर निर्धारण वर्षांची प्रलंबित आयकर अपिल पर्यंतची कामे पुर्ण होतील. कर निर्धारण वर्ष निहाय फी रु.३ लाख दिल्यास २०१८-१९ अखेर आयकर विषयक संपुर्ण कामकाज पुर्ण होईल. |
| **वार्षीक रु.९ लाख फी देय राहिल.** | **कर निर्धारण वर्ष निहाय रु.३ लाख फी देय राहिल.** |

अशा प्रकारे पर्याय क्र.२ स्विकारल्यास कर निर्धारण वर्षनिहाय रु.३ लाख अधिक त्यावरील कर देय होईल. व वार्षीक रु.६ लाख बचत होईल, व देय फी रु. ३ लाख आयकर कामकाज पुर्ततेच्या प्रमाणात टप्प्या टप्प्याने देता येईल. त्यामुळे पर्याय क्र.२ नुसार फी मंजुरीस्तव निर्णय होणे,

**ब)** नव्याने आयकर सल्लागार/एजन्सी नेमणूकीस मान्यता देणे. त्याकरिता

१) साधारणत: ५०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त वार्षीक उलाढाल असलेली कंपनी, संस्था, धार्मिक व धर्मादाय ट्रस्ट इ. चे आयकर विवरणपत्र, करनिर्धारण-स्क्रुटीनी, विवरणपत्र दुरुस्ती, फेर करनिर्धारण, आयकर अपिल, न्यायालयीन कामकाजाकरीता विधीज्ञांना आवश्यक माहिती संकलीत करण्याच्या साधारणतः १० वर्षापेक्षा जास्त कामकाजाचा अनुभव इ. अटी-शर्ती नुसार

२) संस्थानच्या संकेत स्थळावर माहिती प्रसिद्ध करुन दर पत्रके मागविणे,

३) नियुक्तीकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्रस्तावित करणे, व त्यानुसार कर सल्लागाराची नियुक्ती करणे.

**क)** नव्याने नियुक्ती करावयाची असल्यास दरम्यानच्या कालावधीत आयकर विषयक कामकाज करण्याकरिता इतर कोणती लेखापरिक्षण संस्था विनामोबदला काम करण्यास तयार असेल तर त्यांचेकडून कामकाज करुन घेणे अन्यथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कामाची निकड लक्षात घेऊन सक्षम लेखापरिक्षण संस्थेकडून आयकराचे कामकाज करुन घेण्यास व त्यासाठी फी निश्चित करुन आदा करण्यास मान्यता देणे.

अशाप्रकारे उपरोक्त अ, ब, क वर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५८०/१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आयकर कामकाजाकरीता करसल्लागार सीए आर.आर.मुणी, मुंबई यांची फी ठरविणेबाबतचे प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दि.२१ डिसेंबर,२०१९ ते दि.२४ ऑगस्ट,२०२० या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिनेसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने फेरनेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ “सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी”

तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये “समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही” असे नमुद आहे.

**मा व्यवस्थापन समिती ठराव क्र-** मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७२.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयामधील वैद्यकीय अधिकारी व एक फिजिओथेरपिस्ट ठेकेदारामार्फत यांना त्यांचे नेमणूक संपुष्टात असल्याचे लगतचे दिनांकापासून ४ दिवस सेवा खंडीत करून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षीका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्याटप्याने नेमणूक देण्यात मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- माहे २१ डिसेंबर २०१९ ते २४ ऑगष्ट २०२० या कालावधीत श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वेळोवेळी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व फिजिओथेरपिस्ट (ठेकेदारामार्फत) यांच्या ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे नेमणूका केलेल्या आहेत.

| **अ नं** | **वैद्यकीय अधिका-यांचे नाव** | **पदाचे नाव** | **नेमणूक दिनांक** | **११ महिने नेमणूक कालावधी संपुष्ठात येत असल्याची दिनांक** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| १ | डॉ पोर्णीमा रामराव शेळके | वैद्यकीय अधिकारी (दंतरोग) श्री साईबाबा हॉस्पिटल | २१/१२/२०१९ | २०/११/२०२० |
| २ | डॉ सचिन श्रीहरी यादव | कनिष्ठ भुलतज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ३ | डॉ प्रसाद रामभाऊ उंबरकर | मेंदूशल्य विशारद श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ४ | डॉ गणेश सदाशिव चौधरी | शल्य चिकित्सक श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ५ | डॉ विक्रांत विश्वास खैरणार | मानसोउपचार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ६ | डॉ प्रियंका विलास गायकवाड | स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | १०/०१/२०२० | ०९/१२/२०२० |
| ७ | डॉ गगन सुरेंद्रकुमार शर्मा | ह्दयविकार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २६/०१/२०२० | २५/१२/२०२० |
| ८ | डॉ उज्वला भाऊसाहेब काळे | मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ) श्री साईनाथ रूग्णालय | १३/०२/२०२० | १२/०१/२०२१ |
| ९ | डॉ स्वप्नाली राम चव्हाण | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | १३/०२/२०२० | १२/०१/२०२१ |
| १० | डॉ विशाल धनाजी पटेल | मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन) श्री साईनाथ रूग्णालय | १३/०२/२०२० | १२/०१/२०२१ |
| ११ | डॉ संदीप नारा यणराव देवरे | ह्दयविकार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०३/२०२० | ०९/०२/२०२१ |
| १२ | डॉ नितीन दशरथ ठाकरे | ह्दयविकार शस्त्रक्रिया तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १३ | डॉ विजय मुरलिधर थोरात | शल्य चिकित्सक श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पदाचे नाव | नेमणूक दिनांक | ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्ठात येत असल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| १४ | डॉ विद्या मनोहर बोराडे | शल्य चिकित्सक श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १५ | डॉ शोभना तुकाराम कोल्हे | मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी) श्री साईनाथ रूग्णालय | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १६ | डॉ रोहित राजेंद्र सप्रे | ज्युनियर मायक्रोबायोलॉजीस्ट श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १७ | डॉ अंजली पदमाकर सोनवणे | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १८ | डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| १९ | डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे | कनिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ श्री साईनाथ रूग्णालय | ०७/०४/२०२० | ०६/०३/२०२१ |
| २० | विश्वजीत विश्वनाथ गायकवाड (ठेकेदारामार्फत) | फिजिओथेरपिस्ट(बाह्ययंत्रणेमार्फत) श्री साईबाबा हॉस्पिटल | २४/०४/२०२० | २३/०३/२०२१ |
| २१ | डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर | फिजिशियन श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०५/२०२० | १९/०४/२०२१ |
| २२ | डॉ शिरीष शशीकांत शेळके | कान, नाक, घसा तज्ञ श्री साईनाथ रूग्णालय | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २३ | डॉ अभिषेक जयराम खोडे | मेडीकल ऑफिसर (होमिओपॅथी) श्री साईनाथ रूग्णालय | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २४ | डॉ देविदास लक्ष्मण लव्हाटे | रेसिडेंट मेडीकल ऑफिसर श्री साईनाथ रूग्णालय | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २५ | डॉ श्रीकांत मधुकर नागरे | वरिष्ठ क्ष-किरण शस्त्रज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १८/०७/२०२० | १९/०४/२०२१ |
| २६ | डॉ अजिंक्य बन्सीधर ढाकणे | वैद्यकीय उपचार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| २७ | डॉ शिल्पा दशरथ सोनावणे | वरिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| २८ | डॉ कल्याणी साहेबराव शिंदे | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| २९ | डॉ रविंद्र शांताराम गायकवाड | मेडीकल ऑफिसर (फिजिशियन) श्री साईनाथ रूग्णालय | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| ३० | डॉ प्रिती हिरालाल दोशी | स्त्री रोग तज्ञ श्री साईनाथ रूग्णालय | २०/०७/२०२० | १९/०६/२०२१ |
| ३१ | डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर | आस्थीरोग शस्त्रक्रिया तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २४/०८/२०२० | २३/०७/२०२१ |
| ३२ | डॉ अमित दिपक नाईकवाडे | मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन) श्री साईनाथ रूग्णालय | २४/०८/२०२० | २३/०७/२०२१ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १९ डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे, कनिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय यांची कोरोना विषाणु कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत DCHC सेंटर मध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून ड्युटी नेमणुक करण्यात आली होती. सदर ठिकाणी मा जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तज्ञ वैद्यकीय अधिकारी सातत्याने ड्युटीवर असणे क्रमप्राप्त आहे.

दि.०८/१०/२०२० रोजी DCHC सेंटरमध्ये सकाळी ०८ ते ०२ ड्युटी असताना गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधीत ठिकाणी गैरहजर असल्याने कोवीड सेंटरमधील रूग्णांची हेळसांड झालेली आहे. आपत्ती व्यवस्थापन सारख्या अति महत्वाच्या विषयाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसुन येते. सदर गैरवर्तनामुळे रूग्ण तपासणीकामी अडथळा निर्माण झाला. कोवीड रूग्णांची तपासणी करणेकरीता डॉक्टर उपलब्ध झाले नाहीत. सदर गैरवर्तनामुळे रूग्ण तपासणीकामी अडथळा निर्माण झाला. सदरचे कृत्य हे गैरवर्तन असुन त्यांचे काम व वर्तणूक असमाधानकारक असल्याने त्यांना पुन्हा ११ महिने कालावधीकरीता नेमणूक देता येणार नाही.

उपरोक्त सर्व वैद्यकीय अधिकारी व फिजिओथेरपिस्ट यांचा नेमणूक कालावधी त्यांचे नावासमोर स्तंभ क्र ०५ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. नेमणूक संपुष्टात आल्यानंतर पुन्हा नेमणूक देतांना साधारण ४ दिवस अंतर / सर्विस ब्रेक देऊन नेमणूक देण्यात येते. हॉस्पिटलमधील ओपीडी, ऑपरेशन थिएटर, वॉर्ड या ठिकाणी कामाची अडचण होऊ नये म्हणून एकाच वेळी एकापेक्षा जास्त वैद्यकीय अधिका-याची मुदत संपुष्टात येत असल्यास त्या सर्व वैद्यकीय अधिका-यांना एकाच वेळी ४ दिवस अंतर / सर्व्हिस ब्रेक न देता आळी-पाळीने ४ दिवस अंतर / सर्विस ब्रेक देण्यात येते.

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १९ डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे यांचे नेमणूक कालावधीतील कामकाज समाधानकारक नसुन त्यांना पुन्हा ११ महिने कालावधीची नेमणूक देण्यात येऊ नये, असे नम्र मत आहे. तसेच उपरोक्त इतर वैद्यकीय अधिकारी व एक फिजिओथेरपिस्ट (ठेकेदारामार्फत) यांना त्यांचे नेमणूक संपुष्टात येत असल्याचे लगतचे दिनांकापासून ४ दिवस अंतर / सर्व्हिस ब्रेक देऊन पुन्हा ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्याटप्याने नेमणूक देता येईल.

तरी तातडीची बाब असल्यामुळे उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयास्तव दि.२४/११/२०२० रोजी सादर करणेत आला होता.

उपरोक्त प्रस्तावाबाबत मा अध्यक्ष यांनी खालील १ ते ५ प्रमाणे सूचना केलेल्या आहेत.

१) टिपणी वाचली. त्या सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. श्री नवले, मनुष्यबळ व्यवस्थापक यांच्याकडून सर्व बाबी समजावून घेतल्या.

२) यापूर्वी तदर्थ समितीसमोर या आशयाचा विषय दि.०४/१२/२०१९ रोजी ठेवण्यात आला होता व त्यात ११ महिन्यांसाठी मंजूरी देण्यात आलेली होती.

३) असे दिसून येते की, शासनाने आकृतीबंध मंजूर करत असतांना सादरची पदे स्पर्धात्मक परीक्षा घेवून नियुक्ती द्यावी तसेच शक्यतो ही पदे एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावीत, असे म्हटलेले आहे.

४) श्री नवले यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, यापूर्वी वरील पदे योग्य पध्दतीने जाहिरात देवून भरलेली आहेत. मात्र असे असतांना एक पद क्र २० हे कंत्राटदारातर्फे कसे काय घेण्यात येते हे स्पष्ट नाही.

५) वरील परिस्थितीत संस्थान प्रशासनाने तक्त्यामध्ये नमूद केलेले डॉक्टर्स/कर्मचारी जाहिरात देवून घेतलेले असल्याबाबत अभिलेख हजर करावेत.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- प्रस्तावात समावेश असलेल्या तक्त्यातील अ.नं. २० फिजिओथेरपिस्ट यांची सेवा तत्कालीन व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे निर्णय क्र ५०९ नुसार, सेवा संस्थानला कुशल / अकुशल कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत (बाह्ययंत्रणेद्वारे) घेणेत येत आहे.

तरी, तदर्थ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर यांचे दि.२४/११/२०२० रोजीचे सूचनेनुसार प्रस्तावात समावेश असलेल्या तक्त्यातील डॉक्टर्स / कर्मचारी यांचे नेमणूकीबाबत अभिलेखासह प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर केले आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५८०/२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दि.२१ डिसेंबर,२०१९ ते दि.२४ ऑगस्ट,२०२० या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिनेसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने फेरनेमणूक देणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे, आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता (Incentive) पुर्ववत लागु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम-२००४ मधील तरतूदः-कलम १७(१) व १७ (२)(ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

शासन निर्णय- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ च्या कलम १७(२) (ण) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरिक्त प्रोत्साहन भत्ता (Incentives) मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत व्यवस्थापन समीतीने घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) श्री साईबाबा सुपर स्पशोसलटी रुग्णालयाप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) दोन्ही रुग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबतची नियमावली/ अटी व शर्ती तसेच प्रोत्साहन भत्त्याचे दर व्यवस्थापन समीतीच्या मान्यतेने निश्चित करण्यात यावेत.

प्रास्तविकः-

अ) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गोर-गरीब व गरजू तसेच तातडीचे प्रसंगी येणारे रुग्णांना सवलतीचे दरामध्ये अथवा MJPJAY/PMJAY या योजने अंतर्गत वैद्यकीय उपचार केले जातात. तसेच रुग्णांना उच्च दर्जाचे वैद्यकीय उपचार मिळावे व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेले तज्ञ डॉक्टर टिकुण राहावे यासाठी तज्ञ डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरिक्त रुग्णांवर केलेल्या उपचार/तपासणी/शस्त्रक्रियांचे मा.व्य.स.सभेमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयांस अनुसरुन मंजूर दराप्रमाणे संबंधित तज्ञ डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरिक्त प्रोत्साहन भत्ता रक्कम अदा केली जाते, सदरबाबत शासन मान्यता घेण्यात आलेली आहे. श्री साईबाबा रुग्णालयाची दैनंदिन ओपीडी ही साधारणपणे ५०० ते ५५० रुग्ण अशी आहे,, व कार्यरत असणारे २५० बेड हे देखील पुर्ण क्षमतेने भरलेले असतात.

याबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना दिलेल्या वैद्यकीय सेवेपोटी आकारणी केलेल्या दरासह माहे जानेवारी २०२० ते मार्च २०२० मध्ये अदा केलेली प्रोत्साहन भत्ता रक्कम, दरमहा एकूण उत्पन्नाचे सरासरी १७ ते १८ टक्के आहे, त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | महिना | रुग्ण संख्या | रुग्णाच्या बीलात आकारणी केलेली एकुण रक्कम | बीलात आकारणी केलेली प्रोत्साहन भत्तेची रक्कम | प्रोत्साहन भत्तेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | जानेवारी २०२० | १६,७८९ | ४,६५,९९,३३५ | ८३,४६,४४९ | १८% |
| २. | फेब्रुवारी २०२० | १६,४०३ | ४,९३,६४,८२६ | ८५,९६,४२८ | १७% |
| ३. | मार्च २०२० | ११,०८७ | ४,१३,५१,८२६ | ७४,७४,४६४ | १८% |
| | **एकूण** | **४४,२७९** | **१३,७३,१५,९८७** | **२,४७,५७,३४१** | **१८%** |

तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल २०२० पासुन प्रोत्साहन भत्ता बंद असल्यामुळे माहे एप्रिल २०२० ते ऑक्टोंबर २०२० या कालावधीतील प्रोत्साहन भत्ता रक्कम व दरमहा एकूण उत्पन्नाचे सरासरी प्रमाण याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | महिना | रुग्ण संख्या | रुग्णाच्या बीलात आकारणी केलेली एकुण रक्कम | बीलात आकारणी केलेली प्रोत्साहन भत्तेची रक्कम | प्रोत्साहन भत्तेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | एप्रिल २०२० | ४,२०० | ९०,९४,३५५ | १४,९५,२२७ | १६% |
| २. | मे २०२० | ६,०३१ | १,२६,४६,५७५ | २४,०७,४२२ | १९% |
| ३. | जून २०२० | ६,७२१ | १,५२,३७,०४७ | २१,३९,४०३ | १४% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | जुलै २०२० | ६,३९२ | १,७५,०६,१३३ | २४,१५,२७३ | १४% |
| ५. | ऑगस्ट २०२० | ७,१७९ | १,८०,७४,१७६ | २१,५४,११७ | १२% |
| ६. | सप्टेंबर २०२० | ९,११३ | २,२४,२१,२३७ | २८,३४,४८३ | १३% |
| ७. | ऑक्टोंबर २०२० | ८,३५८ | २,०४,०३,८०९ | २६,३४,५८८ | १३% |
| | **एकूण** | **३९,६३६** | **११,५३,८३,३३२** | **१,६०,८१,३१३** | १४% |

ब) श्री साईनाथ रुग्णालयातील कार्यरत असलेले तज्ञ डॉक्टर टिकुण राहावे यासाठी तज्ञ डॉक्टरांना मा.व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या निर्णयान्वयये व शासन निर्णयान्वये जा.क्र.एसएसएसटी/ एसएसबीएच/२६७/२०१८ दि.१४/०९/२०१८ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटल वित्त विभागाकडील पारीत करणेत आलेल्या आदेशान्वये श्री साईनाथ रुग्णालयातील पात्र वैद्यकीय अधिका- यांना तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात प्रशासकीय पदांवर काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना दि.०१/०७/२०१८ पासून (बेसीक+ग्रेड पे च्या २०० टक्के) अटी व शर्ती नमुद करुन प्रोत्साहन भत्ता लागू करणेत आलेला होता.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये विविध वॉर्डमध्ये विविध प्रकारचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयाची दैनंदिन ओपीडीची रुग्णसंख्या ही साधारण ७०० ते ८०० होती. परंतू मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ९४४ दि. २२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवून, त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि. ०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकिय उपचार सर्व स्तरातील रुग्णांना मोफत करणेत आलेले असून, सदर बाबत रुग्णालयामार्फत कार्यवाही चालू आहे. त्यानुसार रुग्णालयातील केसपेपर विभागातून केसपेपरसाठी रु, १०/- इतके शुल्क आकारुन रुग्णांस मोफत आरोग्य सेवा पुरविणेत येतात. रुग्णालय मोफत केलेमुळे दैनंदिन ओपीडीची संख्या ही १००० ते १२०० इतकी झालेली आहे. त्यामुळे ओपीडी रुग्णांच्यासंखेमध्ये मोठया प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. रुग्णालयात असणारे बेड (३०० बेड) हे देखील पुर्ण क्षमतेने भरलेले असतात.

**कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव सुरु होण्या अगोदर श्री साईनाथ रुग्णालयाकडील जानेंवारी २०१७ ते मार्च २०२० अखेर रुग्ण संख्या-**

| **सन** | **ओपीडी रुग्ण** | **आयपीडी रुग्ण** | **ऑपरेशन रुग्ण** |
|---|---|---|---|
| जानेवारी ते डिसेंबर २०१७ | ३४०४५७ | १५९४५ | १०९३१ |
| जानेवारी ते डिसेंबर २०१८ | ३२९१५० | १४६०२ | १०६४० |
| जानेवारी ते डिसेंबर २०१९ | ३८२३५९ | १६७५६ | १३८४२ |
| जानेवारी ते मार्च २०२० | ८७९१० | ३७३० | ३१५७ |
| **एकुण** | **११३९८७६** | **५१०३३** | **३५७१७०** |

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव(LOCKDOWN) सुरु झालेपासुन श्री साईनाथ रुग्णालयाकडील माहे एप्रिल-२०२० ते जुन -२०२० अखेर रुग्ण संख्या-

| महिना | ओपीडी | आयपीडी | शस्त्रक्रिया | तपासण्या (एक्स-रे) |
|---|---|---|---|---|
| एप्रिल -२०२० | ७४०० | १९० | ३६ | ८८९ |
| मे -२०२० | ९९४५ | २३६ | १४७ | ५५२ |
| जुन-२०२० | ९९३८ | ३३६ | २७३ | ६२३ |
| एकुण | २७२८३ | ७६२ | ४५६ | २०६४ |

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव (LOCKDOWN) शिथील झालेपासुन श्री साईनाथ रुग्णालयाकडील माहे जुलै -२०२० ते ऑक्टोंबर -२०२० अखेर रुग्ण संख्या-

| महिना | ओपीडी | आयपीडी | शस्त्रक्रिया | तपासण्या (एक्स-रे) |
|---|---|---|---|---|
| जुलै-२०२० | १०७५४ | ३८६ | ३५ | ८६२ |
| ऑगस्ट-२०२० | ११६०६ | ४८० | ३३९ | ९८० |
| सप्टेंबर २०२० | ८८६१ | २६३ | १७८ | ११६८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोंबर २०२० | ११९२३ | ४६८ | ३५७ | २१०२ |
| एकुण | ४३१४४ | १५९७ | ९०९ | ५११२ |

क) कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत संस्थात्मक विलगीकरण, कोविड केअर सेंटर, डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर साठी तहसिलदार तथा इंसिडेंट कमांडर,राहाता यांचेकडील क्र.कावि/नैआव्य/३५६/२०२०, दि.२३/०४/२०२० रोजीचे पत्रामध्ये द्वारावती निवासस्थान व श्री साईनाथ रुग्णालय हे अनुक्रमे CCC व DCHC राखीव ठेवुन अधिग्रहण करणेकामी आदेश पारीत केलेले आहेत.तथापी मा.वैद्यकीय संचालक तसेच वैद्यकिय अधिक्षिका साई संस्थान रुग्णालये,शिर्डी यांचेशी समक्ष चर्चा झालेनंतर त्यांना सदर रुग्णालय हे संपूर्ण मोफत असुन तेथे दैनंदिन गरजु रुग्णांची मोठी गर्दी असते.तसेच तेथे स्त्री रोग,बालरोग विभाग सेवा सुरु असल्याने कोव्हिड -१९ साठी संस्थानचे साई आश्रम -२ (साईधर्मशाळा) येथील जागेचा पर्यायी विचार होणेकामी विनंती केलेली आहे त्यानुसार साईधर्मशाळा येथे ०४ हॉल खालीलप्रमाणे राखीव ठेवणेत आलेले आहेत.

| **अ. नं.** | **बिल्डींगचे नांव** | **सुरु केलेची तारीख** | **उपलब्ध बेडची संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | **A**(संस्थात्मक विलगीकरण) | दि.०५/०४/२०२० | २५६ बेड |
| | **E** (संस्थात्मक विलगीकरण) | दि.३०/०५/२०२० | २५६ बेड |
| ०२ | **B** (डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर) | दि.०४/०६/२०२० | ११४ बेड |
| ०३ | **F** (कोविड केअर सेंटर) | दि.०४/०६/२०२० | ११४ बेड |

बिल्डींग A आणि E (संस्थात्मक विलगीकरण)– संस्थान मार्फत आत्तापर्यंत १८५३ व्यक्तींना संस्थात्मक विलगीकरण कक्षामध्ये ठेवणेत आलेले आहे. सदर लोकांची दैनंदिन आरोग्य तपासणी दिवसातुन २ वेळा रुग्णालयाकडुन केली जात आहे. याकरिता रुग्णालयाकडुन तज्ञ डॉक्टर्स, स्टाफ नर्स व वॉर्डबॉय पुरविले जात आहेत. सदर ठिकाणी राहणा-या व्यक्तींची मोफत आरोग्य तपासणी तसेच औषधोपचार केले जात आहेत.

बिल्डींग F (CCC) – कोविड केअर सेंटरकरिता राखीव असुन सदर ठिकाणी एकुण ११४ बेड उपलब्ध आहेत. पैकी ६ बेड हे ऑक्सीजन बेड आहेत. सदर ठिकाणी पॉझिटीव्ह रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना भरती करुन सदर व्यक्तींचे घशातील स्त्राव घेवुन त्यांची RT PCR चाचणी/Rapid Antigen Test केली जाते. आत्तापर्यंत साधारणपणे १७५० संशयीत व्यक्तींची तपासणी करुन पॉझीटीव्ह (Mild Symptoms) असणारे रुग्ण CCC मध्ये ठेऊन त्यांचेवर उपचार केले जात आहे व MODERATE Symptoms असणारे रुग्ण हे संस्थानच्याच DCHC सेंटरला पाठवुन त्यांचेवर उपचारकेले जात आहे व निगेटिव्ह रुग्ण हे होम विलगीकरण करणेकामी पाठविले जात आहेत. आजपर्यंत सदरचे CCC सेंटरला एकुण २४८१ रुग्ण भरती करुन त्यांचेवर वरील प्रमाणे उपचार केलेले आहे.

**बिल्डींग B (DCHC)**- डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर करिता राखीव असुन सदर ठिकाणी ११४ बेड उपलब्ध आहेत. पैकी २४ बेड हे ऑक्सीजन बेड आहेत. सदर ठिकाणी पॉझीटीव्ह आलेले रुग्ण भरती करुन त्यांचेवर शासकीय नियमानुसार ठरवुन दिलेले उपचार करणेत येत आहेत. आजपर्यंत १००६ रुग्णांवर योग्य ते उपचार करुन बरे झालेनंतर त्यांना घरी सोडणेत आलेले आहे. CCC व DCHC सेंटरमधील भरती रुग्णांना सकाळचे चहा,नाष्टा,दोन वेळचे जेवण तसेच संध्याकाळचा चहा देखील संस्थानमार्फत मोफत पुरविला जात आहे.

आता, कोरोना रुग्णांची संख्या झपाटयाने वाढत असलेमुळे व अत्यवस्थ रुग्णांना बाहेर बेड उपलब्ध होत नसलेमुळे मा.तहसिलदार राहाता. यांचे दि.०३/०९/२०२० चे पत्रान्वये श्री साईधर्मशाळा येथील E बिल्डींग मध्ये (DCH) डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल दि.११/०९/२०२० पासून खालील आराखडयाप्रमाणे सुरु करणेत आलेले आहे.

**तळमजला (डावी बाजु)-**

| **वॉर्डचे नांव** | **ऑक्सीजन बेड** | **व्हेंटीलेटर बेड** | **एकुण बेड** |
|---|---|---|---|
| रुम नं.१ | ६ बेड ऑक्सीजन | ३ बेड व्हेंटीलेटर | ०६ बेड |
| रुम नं.२ | ६ बेड ऑक्सीजन | २ बेड व्हेंटीलेटर | ०६ बेड |

| | | | |
|---|---|---|---|
| रुम नं.३ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| रुम नं.४ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| | | **एकुण-** | **२४ बेड** |

**तळमजला (उजवी बाजु)–(सारी रुग्णांकरिता)**

| **वॉर्डचे नांव** | **बेड** | **व्हेंटीलेटर बेड** | **एकुण बेड** |
|---|---|---|---|
| रुम नं.१ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| रुम नं.२ | ६ बेड ऑक्सीजन | ० | ०६ बेड |
| रुम नं.३ | स्टाफ रुम | ० | ०० |
| रुम नं.४ | स्टोअर रुम | ० | ०० |
| | | **एकुण-** | **१२ बेड** |

**पहिला मजला (डावी बाजु)-**

| **वॉर्डचे नांव** | **ऑक्सीजन बेड** | **एकुण बेड** |
|---|---|---|
| रुम नं.१ | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| रुम नं.२ | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| रुम नं.३ | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| रुम नं.४ | ६ बेड ऑक्सीजन | ०६ बेड |
| | **एकुण** | **२४ बेड** |

याबरोबरच पुर्वीपासुन चालत आलेली दोन्ही रुग्णालये पुर्ण क्षमतेने (श्री साईनाथ व श्री साईबाबा) नॉन कोविड रुग्णांकरिता कार्यरत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकुण ३०० बेड कार्यरत असुन यामध्ये ८ आयसीयु बेड, ५ ऑपरेशन थिएटर्स तसेच अत्याआवश्यक अशा स्त्रीरोग व बालरोग विभागातील सेवा सुरु आहेत. तसेच श्री साईबाबा रुग्णालयामध्ये एकुण २५० बेड असुन यामध्ये ६० बेड आयसीयु बेड, ८ ऑपरेशन थिएटर्स तसेच अत्याआवश्यक अशा कार्डियाक, कार्डिओथोरॅसीक, न्युरो व डायलेसिस विभागातील सेवा सुरु आहेत. सदर दोनही रुग्णालयात दैनंदिन रुग्णांची तपासणी व उपचाराबरोबरच सर्पदंश, विषबाधा, ह्दयविकाराचा झटका, डायलेसिस, अपघात, स्त्रीरोग व बालरोग विभागातील अत्याआवश्यक सेवा आजअखेर सुरु आहेत.

तसेच कोरोना सेंटर सुरु झालेपासून कोविड रुग्णालयामध्ये खालीलप्रमाणे रुग्णांवर उपचार करणेत आलेले आहे.

| **माहे** | **सी.सी.सी.** | **डी.सी.एच.सी.** | **डी.सी.एच** |
|---|---|---|---|
| दि.०४/०६/२०२० ते दि. २८/११/२०२० | २४८१ | २९७५ | |
| दि.११/०९/२०२० ते दि. २८/११/२०२० | - | - | **२३९** |

दि.०४/०६/२०२० पासुन CCC व DCHC मधील रुग्णांना आवश्यकतेनुसार उपचार देणेकामी दोनही रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व इतर स्टाफ आत्तापर्यत तैनात करणेत आलेला आहे.त्यांचे विवरण खालील तक्यात दर्शविलेले आहे.

| **अ.नं.** | **वैद्यकीय अधिकारी** | **सिस्टर ईनचार्ज** | **स्टाफ नर्स** | **वर्ग ०४ कर्मचारी** | **स्वच्छता कर्मचारी** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **९६** | **९२** | **३३२** | **३१०** | **२९२** |

तसेच चक्रिय पदधतीने ४ लॅब टेक्नीशियन, १० एक्स-रे टेक्नीशियन, ६ ईसीजी टेक्नीशियन देखील नेमलेले आहेत. तसेच ४ कान,नाक,घसा तज्ञ डॉक्टर्स रुग्णांचे स्वॅब घेणेकामी तैनात असुन ४ फिजीशियन व ६ भुलतज्ञ डॉक्टर्स हे देखील रुग्णांना आवश्यकतेनुसार उपचार देणेकामी तैनात आहेत.

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या रुग्णावर उपचार करणेकामी कोरोना सेंटर **दि. ०४/०६/२०२० रोजी** सुरु झालेपासून कोविड रुग्णालयामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील **आर. एम. ओ. व बी. ए. एम.एस. डॉक्टर्स** यांनी डयुटी केलेली आहे. तसेच कोव्हिड सेंटर मध्ये अद्यापर्यन्त खालील नमुद असलेल्या तज्ञ डॉक्टरांनी डयुटी केलेली आहे.

**श्री साईबाबा रुग्णालय.**

| अ.न. | तज्ञ डॉक्टर्स | पद | अ.न. | तज्ञ डॉक्टर्स | पद |
|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ.निहार भालचंद्र जोशी | सिनीअर भुलतज्ञ | ८) | डॉ.विदया मनोहर बोराडे | जनरल सर्जन |
| २) | डॉ.संतोषकुमार नवनाथ मराठे | सिनीअर भुलतज्ञ | ९) | डॉ.राजेंद्र उत्तमराव बिडगर | ऑर्थोपेडीक सर्जन |
| ३) | डॉ.अविनाश लक्ष्मणराव जाधवर | जनरल फिजीशियन (ऑन कॉल) | १०) | डॉ.विक्रांत विश्वासराव खैरनार | सायकेट्रीस्ट |
| ४) | डॉ.अजिंक्य बन्सीधर ढाकणे | जनरल फिजीशियन (ऑन कॉल) | ११) | डॉ.सचिन श्रीहरी यादव | ज्युनिअर भुलतज्ञ |
| ५) | डॉ.दिपक भाऊसाहेब कांदळकर | कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ | १२) | डॉ.गणेश सदाशीव चौधरी | जनरल सर्जन |
| ६) | डॉ.श्रीकांत मधुकर नागरे | वरिष्ठ किरण शास्त्रज्ञ | १३) | डॉ.कविता शंतनू सरवार | हिस्टोपॅथॉलॉजीस्ट |
| ७) | डॉ.शिल्पा दशरथ सोनवणे | सिनीअर पॅथॉलॉजीस्ट | १४) | डॉ.किरण चंद्रकांत खांदे | मेक्सीलोफे-शियल सर्जन |

**श्री साईनाथ रुग्णालय.**

| अ.न | तज्ञ डॉक्टर्स | पद | अ.न | तज्ञ डॉक्टर्स | पद |
|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ.महेंद्र विलासराव तांबे | ज्यु. भुलतज्ञ | ७) | डॉ.प्रिती हिरालाल दोशी | स्त्रीरोग तज्ञ |
| २) | डॉ.निर्मला स्वाधीन गाडेकर | आरएमओ (गायनिक) | ८) | डॉ.रविंद्र शांताराम गायकवाड | जनरल फिजीशियन (ऑन कॉल) |
| ३) | डॉ.अनघा गहिनीनाथ विखे | आरएमओ (नेत्र) | ९) | डॉ.शिरीष शशिकांत शेळके | ईएनटी सर्जन |
| ४) | डॉ.शोभना तुकाराम कोल्हे | ईएनटी सर्जन | १०) | डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे | ईएनटी सर्जन |
| ५) | डॉ.अमित दिपक नाईकवाडे | ऑर्थोपेडीक सर्जन | ११) | डॉ.बाणेश छगनराव गायकवाड | **आरएमओ(ऑर्थो)** |
| ६) | डॉ.विशाल धनाजी पटेल | ऑर्थोपेडीक सर्जन | १२) | डॉ.आत्माराम लक्ष्मण धुळगंड | आरएमओ (गायनिक) |

वरीलप्रमाणेच श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील उर्वरीत डॉक्टरांची देखील वेळोवेळी मा. Incident commander, राहाता यांचेनुसार डयुटी लावणेत येणार आहे.

तथापि, कोरोना विषाणू (COVID-19) महामारीच्या काळात दि.१७ मार्च २०२० रोजी दु.३:०० वाजेपासून दर्शन करिता येणारे साईभक्तांसाठी श्रींचे मंदिर बंद करण्यात आलेले आहे. तसेच २५ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात लॉकडाउन असल्यामुळे संस्थानला भक्तांकडून देणगी (Donation) म्हणून मिळणारी रक्कम बंद झालेली आहे. त्यामुळे जा.क्र. एसएसएस/साप्रशा/ आस्था/१६४/२०२० दि.२१ मे २०२० रोजी प्रोत्साहन भत्ता अथवा इतर भत्ते तूर्त अदा करणेत येऊ नये असा आदेश पारीत करणेत आलेला आहे, त्यानुसार माहे एप्रिल २०२० पासून श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कंन्सलटंट डॉक्टरांनी केलेले उपचार/तपासणी/शस्त्रक्रिया पोटी आकारणी केलेले प्रोत्साहन भत्ता रक्कम संबंधितांना अदा करणेत आलेली नाही. तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील पात्र वैद्यकीय अधिका-यांना तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात प्रशासकीय पदांवर

काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना माहे एप्रिल –२०२० पासुन (बेसीक+ग्रेड पे च्या २०० टक्के) ने प्रोत्साहन भत्ता आदा करणेत आलेला नाही.

आता मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये Covid-19 च्या प्रादुर्भावात सेवा देणा-या वैद्यकीय अधिकारी व संबंधित कर्मचा-यांना प्रोत्साहन भत्ता (Incentive) देण्याबाबत सर्वसमावेषक अभ्यास करुन सकारात्मक दृष्टीने लवकरात लवकर तदर्थ समिती समक्ष प्रस्ताव दाखल करावा असे कळविले आहे.

**विभागाचे मत:-** श्री साईबाबा संस्थानमार्फत चालू केलेल्या कोविड सेंटर (सी.सी.सी, डी.सी.एच.सी, व डी.सी.एच) मधील रुग्णांना सेवा देणेकामी संस्थानच्या दोनही रुग्णालयाकडील डॉक्टर्स, स्टाफ नर्स, ईनचार्ज सिस्टर, टेक्निशियन तसेच स्वच्छता कर्मचारी यांची डयुटी लावणेत आलेली आहे. सदर डयुटी करतांना सात दिवस कोविड डयुटी व तीन दिवस सुट्टी देऊन पुन्हा नॉनकोविड रुग्णालयाकडे काम करणेकामी डयुटी देणेत आलेली आहे.

सदरच्या सेवा देतांना रुग्णालयातील बरेचशे डॉक्टर्स तसेच इतर कर्मचारी हे स्वतः कोविड बाधीत झालेले आहेत. स्वत:चा जीव धोक्यात घालून जोखीम पत्करुन रुग्णांना सेवा देणेकामी रुग्णालयातील डॉक्टर्स आज अखेर कार्यरत आहेत. सदर डॉक्टरांना कोविड डयुटीबरोबर श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचारासाठी येणा-या रुग्णांवर देखील उपचार करावे लागत आहे. त्यामुळे त्यांचेवर कामाचा अतिरिक्त भार पडत आहे.

तरी रुग्णालयातील डॉक्टरांवर पडणारा अतिरिक्त कामाचा भार व कोविड परिस्थीतीमध्ये जोखीम पत्करुन करत असलेली रुग्णसेवेचा विचार करता श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या तज्ञ डॉक्टरांचा प्रोत्साहन भत्ता, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना (तज्ञ व अतिविशीष्ठ तज्ञ) व प्रशासकीय पदांवरील वैद्यकीय अधिका-यांना (मुळ/प्रभारी व अतिरिक्त) देणेत येणारा प्रोत्साहन भत्ता पुर्वीप्रमाणेच चालू करावा असे मत आहे.

परंतु कोरोना विषाणू (COVID-19) महामारीचा काळ केव्हापर्यन्त राहील हे अनिश्चित असलेमुळे या काळात वैद्यकीय संचालक, रुग्णालये व वैद्यकीय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांनी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांची (तज्ञ व अतिविशिष्ठ तज्ञ) यांची कोरोना विषाणू (COVID-19) सेंटरला डयुटी लावल्यास ती डयुटी करणे त्यांचेवर बंधनकारक राहील. सदरची डयुटी करणेस डॉक्टरांनी नकार दिल्यास त्यांचा त्या महिन्याचा प्रोत्साहन भत्ता देता येणार नाही.

शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/९८०/प्र.क्र.१०८/का.१६ दि.२७/०६/२०१८. रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना व प्रशासकीय पदांवरील वैद्यकीय अधिका-यांना (मुळ/प्रभारी व कायम) प्रोत्साहन भत्ता अदा करणेत येत होता. परंतु जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१६४/२०२० दि.२१ मे २०२०रोजीचे आदेशान्वये सदरचा प्रोत्साहन बंद करणेत आलेला होता. आता दि.१६/११/२०२० पासुन श्री साईबाबा समाधी मंदिर चालु झालेले आहे तसेच संस्थानचे दोन्ही हॉस्पीटल व कोव्हिड सेंटर पुर्ण क्षमतेने चालु असल्यामुळे बंद करणेत आलेला प्रोत्साहन भत्ता पुनश्च: पुर्वीप्रमाणेच माहे १ नोव्हेंबर २०२० पासुन चालू करावा व माहे एप्रिल २०२० ते माहे ऑक्टोंबर २०२० या कालावधीतील थकित असलेला प्रोत्साहन भत्याबाबत योग्य तो निर्णय व्हावा, असे नम्र मत आहे. तरी संस्थानचे दोन्ही हॉस्पीटल व कोव्हिड सेंटर पुर्ण क्षमतेने चालु असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad Hoc) समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५८०/३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता (Incentive) पुर्ववत लागु करणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे, आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**४. देणगीदार भक्तास श्री साई दैनंदिन (पॉकेट साईज) व साईबाबा दिनदर्शिका-२०१९ मोफत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ - "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६३.

माहे नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत रक्कम रू.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणा-या साईभक्तांना सप्रेम भेट देण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याच्या तपशीलाचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली.

तसेच रू.५००/- व त्यापेक्षा जादा रकमेची देणगी देणा-या साईभक्तांना प्रकाशने विभागाकडे सन-२०१८ च्या शिल्लक असलेली रू.१५/- मात्र किंमतीची दिनदर्शिका मोफत देण्यात यावी, असे ठरले.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३१.

सन-२०१८ चे शिल्लक रक्कम रू.२०२/- मात्र प्रति नग किंमतीचे श्री साईबाबा डिलक्स वॉल २२१७ नग व रू.२३७/- मात्र प्रति नग किंमतीचे श्री साईबाबा थ्रीडी वॉल दिनदर्शिका १२५२ नग मान्यवरांचे सत्कारकामी तसेच रू.२५,०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या साईभक्तांना भेट म्हणून देणेस व याकामी येणारा रू.७,४४,५५८/- (अक्षरी रूपये सात लाख चौरैचाळीस हजार पाचशे अठ्ठावन्न मात्र) खर्चास मान्यता देण्यात येऊन, सदरचा खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात आली.

**प्रास्तविक:-** संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका-२०२० ची खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे २ प्रकारच्या दैनंदिनी व ९ प्रकारच्या दिनदर्शिका छपाई करणेत आली, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | कार्यादेशाप्रमाणे छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स -२०२०साईज-(७.५०"x९.७५") | २,२५,००० |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०२०पॉकेट साईज (३"x ४.५०") | १,००,००० |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०२०,०१ पानी मोठे साईज-(१९"x२९") | ३,२५,००० |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०२०(८ पेजेस) साईज- २२.००"x३५.००" | २०,००० |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०२०(७ पेजेस) साईज- १९.२५" x २७" | १५,००० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉलकॅलेंडर्स-२०२०(सिंगल पेज) साईज- १९.००"x२७.००" | ३,००० |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०२० (७ पेजेस) साईज- ९.७५"x०७.००" | १५,००० |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स -२०२०(१४ पेजेसवर छपाई) साईज- ६.५०" x ९.५०" | १५,००० |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (ऑफीस) साईज-१९.५०" x २८.००" | १०,००० |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (घरगुती) साईज-११.००" x १६.८०" | १५,००० |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर्स -२०२०साईज-३.८०" x ५.५०" | २५,००० |

विभागाचा अभिप्राय- श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका ही साधारणतः ऑक्टोबर महिन्यात विक्रीसाठी काऊंटरवर उपलब्ध करुन देण्यात आली होती त्याची विक्री १७ मार्च पर्यंत चालू होती, त्यानंतर कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे मंदिर दर्शनासाठी बंद करण्यात आल्याने सर्व विक्री काऊंटर्स बंद करण्यात आल्यामुळे दैनंदिनी/दिनदर्शिकाची विक्री थांबली तरीही प्रकाशने विभागाकडून ४ नं. गेटच्या बाहेर दैनंदिनी/दिनदर्शिका विक्रीसाठी ठेवण्यात आलीहोती. कोरोना कालावधीत व मंदीर सुरू झालेनंतर विक्री झालेल्या दैनंदिनी व दिनदर्शिका बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. नं. | तपशिल | कोरोना कालावधीत झालेली विक्री (दि.१७.०३.२०२० ते १५.११.२०२०) | मंदीर सुरू झालेनंतर झालेली विक्री (दि.१६.११.२०२० ते ३०.११.२०२०) |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स -२०२०साईज-(७.५०"x९.७५") | १७४ | ३०५ |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०२०पॉकेट साईज (३"x ४.५०") | २९७ | २६६ |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०२०,०१ पानी मोठे साईज-(१९"x२९") | ९०८ | ३८५ |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०२०(८ पेजेस) साईज-२२.००"x३५.००" | ३८ | ३५ |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०२०(७ पेजेस) | ३३ | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | साईज- १९.२५" x २७" | | |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉलकॅलेंडर्स-२०२०(सिंगल पेज) साईज- १९.००"x२७.००" | ६ | ० |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०२० (७ पेजेस) साईज- ९.७५"x०७.००" | २८ | ० |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स -२०२०(१४ पेजेसवर छपाई) साईज- ६.५०" x ९.५०" | ४ | १० |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (ऑफीस) साईज-१९.५०" x २८.००" | २१ | २ |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (घरगुती) साईज-११.००" x १६.८०" | १ | ० |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर्स -२०२०साईज-३.८०" x ५.५०" | १ | ४८ |

तरी सुद्धा खाली नमुद केलेल्या तक्त्यातील दैनंदिनी व दिनदर्शिका शिल्लक आहेत. त्याची आता विक्री होणे शक्य नाही करीता खाली नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करता येईल असे नम्र मत आहे.

| अ.नं. | तपशिल | आज अखेर शिल्लक साठा (नग) | छपाई दर रु. पै. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०२०पॉकेट साईज (३"x ४.५०") | ४५७४ | ११.२२ | ५१,३२०.२८ |
| ०२ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०२०(८ पेजेस) साईज- २२.००"x३५.००" | २५९८ | १७८.०० | ४,६२,४४४.०० |
| ०३ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०२०(७ पेजेस) साईज- १९.२५" x २७" | ६१५ | १७२.०० | १,०५,७८०.०० |
| ०४ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (ऑफीस) साईज-१९.५०" x २८.००" | ४५२ | २०.४९ | ९,२६१.४८ |
| | | | **एकूण-** | **६,२८,८०५.७६** |

(अक्षरी पुर्णांकित रक्कम सहा लाख अठ्ठावीस हजार आठशे सहा मात्र)

१) रक्कम रू.१,०००/-ते रू.३,०००/-पर्यंत देणगी देणा-या साईभक्तांस श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज भेट म्हणून देणे.

२) रक्कम रू.३,०००/- चे वर देणगी देणा-या साईभक्तांना श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस), श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस) यापैकी एक भेट म्हणून देणे.

३) देणगीदार भक्तांना भेट स्वरुपात दिलेल्या वस्तूंची नोंद लेखाशाखा विभागाकडे ठेवणे.

४) उपरोक्त तक्त्यातील अ.नं.४ श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (ऑफीस) आता साई भक्तांना मोफत वाटणे उचित ठरणार नाही, त्याकरिता अभिलेख कक्षामार्फत रद्दी म्हणून विक्री करणे..

५) उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली रक्कम रू.६,२८,८०६/-(अक्षरी रक्कम रूपये सहा लाख अठ्ठावीस हजार आठशे सहा मात्र) प्रकाशने विभाग खाती खर्ची टाकणे.

यापूर्वी असे शिल्लक राहिलेले साहित्य मा. व्यवस्थापन समितीचे पूर्वपरवानगीने देणगीदार साईभक्तांना वाटण्यात आले आहे. आताही देणगीदार साईभक्तांना मा. तदर्थ समितीच्या निर्देशाप्रमाणे खाली नमुद केलेले साहित्य वाटप करता येईल व देणगीदार भक्तांना भेट स्वरुपात दिलेल्या वस्तूंची नोंद लेखाशाखा विभागाकडे ठेवता येईल आणि उपरोक्त तक्तयास नमुद केलेली रक्कम प्रकाशने विभाग खाती खर्ची टाकता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्तावः- विभागाचे अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे खालील नमूद केलेल्या प्रस्तावास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

१) रक्कम रू.१०००/- ते रू.३,०००/-पर्यंत देणगी देणा-या साईभक्तांस श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज भेट म्हणून देण्यास...

२) रक्कम रू.३,०००/- चे वर देणगी देणा-या साईभक्तांना श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस), श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस) यापैकी एक भेट म्हणून देण्यास...

३) देणगीदार भक्तांना भेट स्वरुपात दिलेल्या वस्तूंची नोंद लेखाशाखा विभागाकडे ठेवणेस...

४) उपरोक्त तक्त्यातील अ.नं.४ श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (ऑफीस) आता साई भक्तांना मोफत वाटणे उचित ठरणार नाही, त्याकरिता अभिलेख कक्षामार्फत रद्दी म्हणून विक्री करणेस..

५) उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली रक्कम रू.६,२८,८०६/- (अक्षरी रक्कम रूपये सहा लाख अठ्ठावीस हजार आठशे सहा मात्र) प्रकाशने विभाग खाती खर्ची टाकणेस.

**निर्णय क्र.५८०/४ यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीदार भक्तास श्री साई दैनंदिन (पॉकेट साईज) व साईबाबा दिनदर्शिका-२०१९ मोफत देणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे, आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**५. देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मध्ये मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय:-**

**मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३.०७.२०२० चे सभेतील निर्णय क्रं.४०१.**

दि.०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० या कालावधीत मान्यवरांना देण्यास आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स याकामी झालेल्या एकुण रक्कम रु १७,७९,२४९/- मात्रचे खर्चास तसेच सदरची रक्कम प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

**प्रास्तविक:-** संस्थानचे देणगीदार साईभक्त, श्रींचे दर्शनासाठी आलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्वाच्या व्यक्तींना, जनसंपर्क कार्यालयामार्फत आयोजीत पत्रकार दिन, संतकवी दासगणु महाराज पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम, मा. अध्यक्ष, व सदस्य तदर्थ समिती, मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, व सदस्य तत्कालीन व्यवस्थापन समिती, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, शैक्षणिक संकुलात होणारे कार्यक्रम व सेवानिवृत्त कर्मचारी निरोप समारंभ इत्यादीना पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स भेट म्हणुन देण्यात येत असतात. सदरचे प्रकाशने साहित्य सन २०२०-२०२१ (०१/०४/२०२० ते ३०/०९/२०२०) या कालावधीत विभागांचे मागणीनुसार निःशुल्क देण्यात आले असून सदरचा तपशील खालील तक्त्यात नमुद केलेला आहे.

| अ.नं | पी यु बी कोड नं. | पुस्तकांचे नाव | भाषा | प्रतीX छपाई मुल्य | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं १ | श्री साईसच्चरित | मराठी | ५२ X ८४.०० | ४,३६८.०० |
| २. | पी यु बी नं २ | श्री साईचरित्र | हिंदी | १२० X ४२.५० | ५,१००.०० |
| ३. | पी यु बी नं ३ | श्री साईचरित्र | इंग्रजी | १२० X ३७.३० | ४,४७६.०० |
| ४. | पी यु बी नं ६ | श्री साईचरित्र | तेलुगु | १७६ X ४६.५० | ८,१८४.०० |
| ५. | पी यु बी नं ७ | श्री साईचरित्र | तामीळ | ३६ X ६०.७० | २१८५.२० |
| | | | | **एकुण रुपये** | **२४,३१३.२०** |

| अ.नं | पी यु बी कोड नं. | श्री साई डायरी व कॅलेंडर्स | वर्ष | प्रतीX छपाई मुल्य | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं ३१७ | श्री साई डायरी (डिलक्स)-२०१९ | २०१९ | ५७ X ८५.४० | ४,८६७.८० |
| २. | पी यु बी नं ३१९ | श्री साई डायरी (डिलक्स)-२०२० | २०२० | १८४१ X ८१.७५ | १,५०,५०१.७५ |
| ३. | पी यु बी नं ३२० | श्री साई डायरी (पॉकेट)-२०२० | २०२० | २ X ११.२२ | २२.४४ |
| ३. | पी यु बी नं ४७२ | श्री साई डेस्क कॅलेंडर्स२०१९ | २०१९ | १२ X ५०.४० | ६०४.८० |
| ४. | पी यु बी नं ४७६ | श्री साई कॅलेंडर्स २०२० | २०२० | १६५८ X १५.३७ | २५४८३.४६ |
| ५. | पी यु बी नं ४७७ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०२० | २०२० | २४३ X १७८.०० | ४३,२५४.०० |
| ६. | पी यु बी नं ४७८ | श्री साई मॅटपॅट वॉल कॅलेंडर्स २०२० | २०२० | ७१ X १७२.०० | १२,२१२.०० |
| ७. | पी यु बी नं ४७९ | श्री साई 3D वॉल कॅलेंडर्स २०२० | २०२० | १३ X १७७.०० | २,३०१.०० |
| ८. | पी यु बी नं ४८० | श्री साई साधे डेस्क कॅलेंडर्स २०२० | २०२० | ८२ X १०५.०० | ८,६१०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | पी यु बी नं ४८१ | श्री साई डेस्क कॅलेंडर्स २०२० | २०२० | ५२ X ५४.०० | २,८०८.०० |
| १०. | पी यु बी नं ४८२ | श्री साई वॉलकॅलेंडर्स(ऑफिस)२०२० | २०२० | ११६० X २०.४९ | २३७६८.४० |
| ११. | पी यु बी नं ४८३ | श्री साई वॉलकॅलेंडर्स (घरगुती)२०२० | २०२० | २ X १०.२० | २०.४० |
| | | | | **एकुण रुपये** | **२,७४,४५४.०५** |

| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **फोटोंचा तपशील** | **प्रतीX छपाई मुल्य** | **एकुण रुपये** |
|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं ७४० | 3D फोटो पालखी POKET B/w | ४००X३.८७ | १,५४८.०० |
| | | | **एकुण रुपये** | **१,५४८.००** |

| **अ.क्र.** | **तपशील** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|
| ०१. | पुस्तके | २४,३१३.२० |
| ०२. | श्री साई डायरी व कॅलेंडर्स | २,७४,४५४.०५ |
| ०३. | फोटो | १,५४८.०० |
| | **एकुण रुपये** | **३,००,३१५.२५** |
| | **पुर्णांकीत रुपये** | **३,००,३१५.००** |

**(अक्षरी रु.** तीन लाख, तिनशे पंधरा मात्र)

**विभागाचा अभिप्राय-** अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून आर्थिक सन २०२०-२०२१ चे (०१/०४/२०२० ते ३०/०९/२०२०) या कालावधीतील संस्थानमार्फत भेट देण्यात आलेली प्रकाशने (पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स) किंमतीसह खर्ची टाकता येतील, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव-** तरी मोफत देण्यात आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्सच्या रक्कम रुपये. **३,००,३१५/-** झालेल्या खर्चास व सदर खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८०/५ यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणे चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे, आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टीव्ही), टीव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र उच्चत्तम दरधारक निविदाकार M/s Tata Comm Ltd., Mumbai यांचेबरोबर चर्चा होऊन याकामी त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणे. |
| ०२ | मागणी | (see table below) |

| **Sr. No** | **Description** | **DTH** | | **TV Channel** | | **Mobile & Internet** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Non-Exl. | Exl. | Non-Exl. | Exl. | Non-Exl. | Exl. |
| 01 | Live Darshan (Temple Open Time) | | | | | | |
| 02 | Kakad Aarti | | | | | | |
| 03 | Noon Aarti | | | | | | |
| 04 | Dhoop Aarti | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 05 | Shej Aarti | | | | | | |
| | | 06 | All (4) Aartis | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.१७.०८.२०२० ते दि.२३.०९.२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | ३३ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले आहे. |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.१७.०८.२०२० सकाळी १०:०० वा.<br>तांत्रिक निविदा - दि.०३.११.२०२०<br>व्यावसायीक निविदा - दि.१६.१२.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०१ (एक) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०१ (एक) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली का? | लागू नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | निविदाकाराने बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | लागू नाही. |

१२ निविदाकाराचे नाव- M/s Tata Communications Ltd., Mumbai

निविदाकारांनी सादर केलेले दर – पुढीलप्रमाणे

| Sr. No. | Particular | DTH | | TV Channel | | Mobile & Internet | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive |
| 01 | Live Darshan (Temple Open Time) | 25,00,000 | 50,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 35,00,000 | 1,05,00,000 |
| 02 | Kakad Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 03 | Noon Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 04 | Dhoop Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 05 | Shej Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 06 | All (4) Aartis | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **3 Years Total Amt** | | **75,00,000** | **1,50,00,000** | **12,00,000** | **15,00,000** | **1,05,00,000** | **3,15,00,000** |

१३ यापुर्वीचे उच्चत्तम दरधारकाचा तपशील आणि उच्चत्तम दर – पुढीलप्रमाणे.

01. DTH (डिश टिव्ही) व Mobile & Internet साठी M/s Tata Comm यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| DTH | 1,96,00,000 | 1,97,00,000 | 1,98,00,000 | 5,91,00,000 |
| Mobile & Internet | 19,00,000 | 21,00,000 | 23,00,000 | 63,00,000 |

02. T.V. चॅनलसाठी M/s Tata व M/s Associated यांनी देऊ केलेले Non Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| M/s Tata Communications Ltd., Mumbai | 3,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 12,00,000 |
| M/s Associated Broadcasting Co Pvt Ltd., | 25,30,000 | 25,30,000 | 25,30,000 | 75,90,000 |
| | | | Total- | 87,00,000 |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - अ.नं.१३ प्रमाणे. | |
| १५ | सध्याची शिल्लक | -- |

<table>
<tr><td>१६</td><td>मागील खरेदी दर</td><td>अ.नं.१३ प्रमाणे.</td></tr>
<tr><td>१७</td><td>मागील पुरवठादार</td><td>अ.नं.१३ प्रमाणे.</td></tr>
<tr><td>१८</td><td>सध्याचे उच्चत्तम निविदाकाराने सादर केलेले दर</td><td>
<table>
<tr><th rowspan="2">Sr. No.</th><th rowspan="2">Particular</th><th colspan="2">DTH</th><th colspan="2">TV Channel</th><th colspan="2">Mobile & Internet</th></tr>
<tr><th>Non-Exclusive</th><th>Exclusive</th><th>Non-Exclusive</th><th>Exclusive</th><th>Non-Exclusive</th><th>Exclusive</th></tr>
<tr><td>01</td><td>Live Darshan (Temple Open Time)</td><td>25,00,000</td><td>50,00,000</td><td>4,00,000</td><td>5,00,000</td><td>35,00,000</td><td>1,05,00,000</td></tr>
<tr><td>02</td><td>Kakad Aarti</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td>03</td><td>Noon Aarti</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td>04</td><td>Dhoop Aarti</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td>05</td><td>Shej Aarti</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td>06</td><td>All (4) Aartis</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td colspan="2">3 Years Total Amt</td><td>75,00,000</td><td>1,50,00,000</td><td>12,00,000</td><td>15,00,000</td><td>1,05,00,000</td><td>3,15,00,000</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>१९</td><td>सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव</td><td>
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of Bidder</th><th>Specification of Material</th></tr>
<tr><td rowspan="6">01</td><td rowspan="6">M/s Tata Communications Ltd., Mumbai</td><td>Live Darshan (Temple Open Time)</td></tr>
<tr><td>Kakad Aarti</td></tr>
<tr><td>Noon Aarti</td></tr>
<tr><td>Dhoop Aarti</td></tr>
<tr><td>Shej Aarti</td></tr>
<tr><td>All (4) Aartis</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>२०</td><td>सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ?</td><td>होय</td></tr>
<tr><td>२१</td><td>सदर खरेदीचा प्रकल्प खरेदी समितीसमोर सादर करणेत आल्यास उपस्थितांची नावे</td><td>मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो., मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी सो., प्र.विभागप्रमुख, आयटी विभाग.</td></tr>
<tr><td>२२</td><td colspan="2">घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ----</td></tr>
<tr><td>२३</td><td colspan="2">मागील खरेदी रु.-------------- सध्याचे प्राप्त दर रु.---------------------- फरक रु.----------- % ने कमी/जास्त रु.-----------------
<table>
<tr><th rowspan="2">Sr. No.</th><th rowspan="2">Particular</th><th colspan="2">Amount as per work order given before</th><th colspan="2">Amount as per rate received through e-Tender</th></tr>
<tr><th>Exclusive</th><th>Non-Exclusive</th><th>Exclusive</th><th>Non-Exclusive</th></tr>
<tr><td>01</td><td>M/s Tata Comm. DTH</td><td>5,91,00,000</td><td>--</td><td>1,50,00,000</td><td>75,00,000</td></tr>
<tr><td>02</td><td>M/s Tata Comm. TV Channel</td><td>--</td><td>12,00,000</td><td>15,00,000</td><td>12,00,000</td></tr>
<tr><td>03</td><td>M/s Tata Comm. Mobile & Internet</td><td>63,00,000</td><td>--</td><td>3,15,00,000</td><td>1,05,00,000</td></tr>
<tr><td>04</td><td>M/s Associated Broadcasting TV Channel</td><td>--</td><td>75,90,000</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td colspan="2">Total :</td><td>6,54,00,000</td><td>87,90,000</td><td>4,80,00,000</td><td>1,92,00,000</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**२४. संक्षिप्त टिप:-** मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२९ चे मान्यतेन्वये, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी, राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेस, खरेदी नियमावलीस अनुसरून दोन वेळेस मुदतवाढ देऊनही फक्त एकाच निविदाधारकाने निविदा सादर (upload) केलेली आहे. यापुर्वी देणेत आलेल्या कार्यादेशातील ०३ वर्षासाठीची एकूण रक्कम (रुपये ७,४१,९०,०००/-) व राबविणेत आलेल्या ई-निविदा

प्रक्रियेअंतर्गंत प्राप्त झालेले ०३ वर्षासाठीची एकूण रक्कम (Exclusive रुपये ४,८०,००,०००/- व Non Exclusive १,९२,००,०००/-) यामध्ये मोठी तफावत आहे. तसेच यापुर्वी व सद्यस्थितीत राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचा विचार करता, M/s Tata Comm यांचे व्यतिरीक्त या क्षेत्रातील इतर पुरवठाधारक ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होणेस इच्छुक नसल्याचे निदर्शनास येते. सबब, सर्व बाबींचा विचार करता, M/s Tata Comm यांनी याकामी दिलेल्या दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा-विनीमय होऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.५८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टीव्ही), टीव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm यांना एक महिना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत दर मागवून अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उभ्दव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्र.१ कामाकरीता मुदतवाढ मिळणेसाठी ठेकेदार यांनी केलेल्या मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीपुढे विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

तसेच अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

**<u>मा. शासन निर्णय:-</u>**

**१.** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७/का.१६, दि.०१ सप्टेंबर, २०१७ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ आणि रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास अटी-शर्तीचे अधीन राहून सदर योजनेची अंमलबजावणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करुन त्यांना मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी देणेस मान्यता देणेत आली.

**२.** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) योजनेस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे) – अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C. charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/का.१६, दि.२१ डिसेंबर, २०१८ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे पात्र निविदाधारक ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि.पुणे यांना रु.२३,८१,००,०००/- (रु.तेवीस कोटी एक्याऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यास व त्यावर अधिक ५% Contg व २% W.C. सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय:-

१. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

**"...**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, निळवंडे धरण उद्भव घेवून, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पुर्ण करुन घ्यावीत व सदर संपूर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात यावी. याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येऊन, त्यांना शासकिय दराने सल्लागार फी देण्यात यावी. तसेच याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करणेत यावा."

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२८२ खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणेसंदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील नमुद केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच याचवेळी मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा व्यवस्थापन समिती सदस्या यांनी शिर्डीसाठीही या पाईपलाईनमधून पिण्याचे पाणी मिळावे, असे लेखी पत्र संस्थानला दिले.

यावर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून संस्थानसाठी येणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनमधून कोपरगाव व शिर्डी शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकामी, कोपरगाव व शिर्डी नगरपंचायतींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक बाबींची पुर्तता करुन सविस्तर आराखडा संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले."

**३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७३९ अन्वये खाली नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.**

**१)** शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे.

**२)** टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे.

**३)** सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन संपुर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात येवून याकामी तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करुन त्यांना मागणी केलेप्रमाणे या कामासाठी मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी देणे.

**४. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.१००८ खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.**

"..श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे धरण उद्भव घेऊन पाणी पुरवठा योजनेसाठी यापुर्वी रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (निळवंडे धरण हिस्यासाठी होणारी रक्कम वगळून) इ.किमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून, सदर योजनेची अंमलबजावणी करणेस शासनाने मान्यता दिलेली होती. परंतु त्यानंतर कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे रु.२७८.९० कोटी किमतीचे अंदाजपत्रके व आराखडे महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून प्राप्त झाल्याचे तसेच अंदाजपत्रक व प्रशासकीय मान्यता एकत्रित असल्यास टप्पा-०१ व टप्पा-०२ याप्रमाणे स्वतंत्र निविदा काढता

येणार नाही. संपुर्ण कामाची एकच निविदा काढावी लागेल, ही बाब मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन खुप जुनी झालेली असल्यामुळे ती बऱ्याचवेळा फुटते/लिकेज होते व पाणी पुरवठा करणेस अडचण निर्माण होते. याकरीता कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टप्पा-०१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) टप्पा-०२ (निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंतची पाईपलाईन टाकणे) असे वर्गीकरण करणेत येऊन, त्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करावा तसेच सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा व त्याप्रमाणे टप्पा-०१ व टप्पा-०२ अशी स्वतंत्रपणे मान्यता देण्यासाठी शासनास विनंती करावी."

**५. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३९ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.**

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्धव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मुद्दयांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मंजुरी देण्यात आली व तात्काळ निविदा प्रसिध्द करणेत यावी. तसेच या प्रस्तावित पाईपलाईन योजनेत शिर्डी परिसरातील दुष्काळग्रस्त सात गावांचा समावेश केल्यास या योजनेस सुधारित प्रशासकिय मान्यता घ्यावी लागेल व त्यास बराचसा कालावधी लागेल, याकरीता दुष्काळग्रस्त सात गावांचा या योजनेत समावेश करणेचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.

मात्र राहाता नगरपरिषदेचा समावेश करावयाचा झाल्यास संपूर्ण योजनेचा आराखडा व alignment बदलावी लागेल. त्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करणेत आला.

**६. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२८७ अन्वये** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३९ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, व त्यास मान्यता देण्यात आली.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्धव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मुद्दयांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मंजुरी देण्यात आली व तात्काळ निविदा प्रसिध्द करणेत यावी. टप्पा १ चा निविदा कालावधी २५ दिवस ठेवण्यात यावा. व टप्पा २ चा निविदा कालावधी ७५ कार्यरत दिवस (Working day) ऐवजी ९० दिवस (सर्व दिवस धरुन) करण्यात यावा. कारण शासनाचे महाटेंडर या website वर जास्तीत जास्त ९० दिवस इतका कालावधी घेतला जातो. तसेच या संयुक्तीक पाणी पुरवठा योजनेत शिर्डी परिसरातील दुष्काळग्रस्त खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, नादुर्खी खु., नांदुर्खी बु. या सात गावांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. तथापि याबाबतचा सविस्तर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन तयार करुन या सात गावाच्या योजनेसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.

मात्र राहाता नगरपरिषदेचा समावेश करावयाचा झाल्यास संपूर्ण योजनेचा आराखडा व alignment बदलावी लागेल. त्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करणेत आला.

**७. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५६३ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.**

**"..** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्धव धरुन) (टप्पा-१) प्रकल्पासाठी ई-निविदा वाणिज्यिक देकार उघडणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०६/०९/२०१८ रोजी मान्यता दिली त्यानुसार वाणिज्यिक देकार उघडण्यात आले. त्यामध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur | २५,६७,१९,८२०.०९ | L3 |
| ०२ | R.A.GHULE, Palghar. | २३,९१,०७,०३९.९० | L2 |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE. | २३,८७,१४,५५५.१० | **L1- निम्नतम** |

यामध्ये THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे निम्नतम दर रुपये २३,८७,१४,५५५.१० इतके असुन अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ३१.३४ % अधिक आहे. अंदाजपत्रकीय रक्कम २०१६-१७ चे DSR प्रमाणे आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक कडून २०१८-१९ चे DSR प्रमाणे अंदाजपत्रक मागवून घ्यावेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी टप्पा क्रं.-१ स्तर शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणेकरीता शासनाची प्रशासकिय मान्यता रुपये २७,१३,०३,९८०/- मात्र इतकी आहे.

मा.प्रधान सचिव, विधीव न्याय शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७ (भाग-१)/का.१६, दि. ०७ फेब्रुवारी, २०१८ यांचे पत्रान्वये, योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र, पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी अहवाल, उपांगासाठी लागणा-या जमिनीची संमतीपत्रके व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत, असे निर्देश आहेत. तथापी वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना ता.राहाता जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव धरुन) या योजनेचा टप्पा क्रं.-१ व टप्पा क्रं.-२ दोन स्वतंत्र टप्प्यात राबविणेस मान्यता दिलेली आहे. तसेच टप्पा क्रं.-१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) इ. कामे अंतर्गत पाणी पुरवठा वितरनासाठी असून आज रोजी याकामी दारणा धरणावरुन आरक्षण मंजूर आहे. त्यामुळे शासन निर्णयातील अट शिथील करुन टप्पा क्रं.-१ साठी कार्यारंभ आदेश देणेकामी शासनाची मान्यता घ्यावी यासाठी शासनाला त्वरीत प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.

तसेच THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रुपये २३,८७,१४,५५५.१० असून त्यांनी वाटाघाटी अंती लेखी स्वरुपात रु.२३,८१,००,०००/- इतक्या रकमेस सदरचे काम करणेस सहमती दर्शविली आहे. अंदाजपत्रकिय रक्कम ही सन २०१६-१७ चे DSR दराप्रमाणे असल्याने THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे निम्नतम दर स्विकारण्यात यावे असे ठरले. तथापि टप्पा क्रं.-१ साठी शासनाने Work Order देण्यासाठी अटी शिथील करुन मान्यता दिल्यानंतर THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांना कार्यारंभ आदेश दयावा, असे ठरले."

**प्रकल्पाची माहिती:- टप्पा क्रं .-१ चे कामात खालीलप्रमाणे कामाचा अंतर्भाव आहे.**

**Estimated Cost- २७.१३ कोटी.**

१. १७ द.ल.लिटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे.

२. ५०० mm व्यास शुध्द पाणी उर्ध्वनलिका डी आय के-९, लांबी- १०० मिटर.

३. आर.सी.सी. मुख्य संतुलीत जलकुंभ, क्षमता- १४,२५,००० लिटर, उंची- २५ मिटर.

४. आर.सी.सी. उंच जलकुंभ-

**अ)** क्षमता- ६,६०,००० लिटर, उंची- १५ मिटर.

**ब)** क्षमता- ७,६५,००० लिटर, उंची- १५ मिटर.

**क)** क्षमता- ३,४०,००० लिटर, उंची- १५ मिटर.

**ड)** आर.सी.सी. सम्प, क्षमता-२८०००लिटर-०२ नग.

५. ८०० mm ते १५० mm व्यास शुध्द पाणी गुरुत्ववाहिनी विविध भागासाठी डी आय के-७, एकुण लांबी- ९१८० मिटर.

६. अस्तित्वातील उंच संतुलित जलकुंभ, क्षमता- १०,००,००० लिटर दुरुस्ती कामे.

७. वितरण व्यवस्था-

**अ)** ३५० mm ते १०० mm व्यास पाईप- डीआय के-७, लांबी-५६१९ मिटर.

**ब)** ३५० mm ते ९० mm व्यास पाईप शुध्द पाणी सम्प पर्यंत वितरण व्यवस्थासाठी, लांबी-७२८२ मिटर.

८. ६ महिनेकरीता O & M व चाचणीकरीता कालावधी इत्यादी.

**निविदा प्रक्रिया:-** दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन सदरहू योजनेची निकड विचारात घेता ही योजना तातडीने कार्यान्वित होणेसाठी निविदा तयार करणेसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/ वशी/पाणी पुरवठा/६०१७/२०१८, दि.०८/०२/२०१८ अन्वये पत्र देण्यात आले. त्यास अनुसरुन मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून दि.२०/०३/२०१८ रोजीचे पत्रानुसार निविदा मसुदा तयार करुन सदरहू निविदेचे मसुदयाची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झाली.

सदरहू संयुक्त पाणी पुरवठा योजनेविषयी तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अभियंता व प्रतिनिधी यांचे समवेत निविदे संदर्भात दि.२६/०३/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्यानंतर वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेचे टप्पा क्रं.०१ करीता दि.०४/०४/२०१८ रोजी निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आलेली आहे. या कामासाठी B-2 पध्दतीने (अॅटम रेट) निविदा मागविण्यात आल्या.

**टप्पा क्रं.०१** करीता दि.०२/०७/२०१८ अखेर ०५ ई-निविदा प्राप्त झाल्या. दि.०९/०७/२०१८ रोजीचे मा.खरेदी समिती सभेत प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडणेत येवून सदर तांत्रिक ई-निविदांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर यांचेकडुन तांत्रिक छाननी करण्यात आली. या प्रकल्पाचे सल्लागार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी खालील ०३ ठेकेदार पात्र होत असल्याचा अहवाल दिला.

१. LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur.

२. R.A.GHULE, Palghar.

३. THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE.

याकामी वरील पात्र ०३ ठेकेदार यांचे वाणिज्यिक देकार (Price Bids) उघडणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला. सदर सभेतील निर्णय क्रं.५६३ नुसार वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) इ. कामे करणेकरीता शासन निर्णयातील अट शिथील करुन टप्पा क्रं.१ साठी कार्यारंभ आदेश देणेकामी शासनाची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना जा.नं.एसएसएसटीवशी/पाणी पुरवठा/४४१४/२०१८, दि.०५/१२/२०१८ अन्वये टप्पा क्रं.१ साठी THE INDIAN HUME PIPE CO.LTD. यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रु.२३,८१,००,०००/- इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देणेस व +५% Contg+२% WC सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला.

मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७/का.१६, दि.२१ डिसेंबर, २०१८ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे पात्र निविदाधारक THE INDIAN HUME PIPE CO.LTD यांना रु.२३,८१,००,०००/- (रु.तेवीस कोटी एक्याऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यास व त्यावर अधिक ५% Contg व २% W.C. सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना:-** वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे कामासाठी ठेकेदार THE INDIAN HUME PIPE CO.LTD., यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/४६६५/२०१८, दि.२२/१२/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

**सदरहु कामाचा ठळक तपशिल व कामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| कामाचे नांव:- | वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर (टप्पा क्रं.१) |
| प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार:- | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग. |
| ठेकेदार:- | द इंडियन हयुम पाईप कंपनी लि. पुणे. |
| मंजूर निविदा रक्कम:- | रु.२३.८१ कोटी. |

| | |
|---|---|
| कार्यादेश क्रमांक व दिनांक:- | जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/४६६५/२०१८, दि.२२/१२/२०१८ |
| करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | ०७/०१/२०१९. |
| काम पुर्ण करणे व योजना कार्यान्वित करण्याचा कालावधी व दिनांक:- | १८ (१२ + ०६) महिने. (काम पुर्ण करण्याचा कालावधी दि.०६/०१/२०२० अखेर पर्यंत व कार्यान्वित करणे दि.०५/०७/२०२० अखेरपर्यंत) |
| आतापर्यंत आदा करणेत आलेली रक्कम:- | आर.ए.बील क्रं.०२ पर्यंत रक्कम रु.४,७०,३५,९८५/- |
| कामाची सद्यस्थिती:- | **१) १७ द.ल.लिटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे.**<br>कामातील क्लॉरीफ्लोक्युलेटर चे आर.सी.सी. फुटींग चे काम पुर्ण झालेले आहे. व्हर्टीकल वॉलचे काम सुरु आहे. केमिकल हाऊसचे आर.सी.सी. काम ग्राऊंड लेव्हलपर्यंत पुर्ण. एरिऐशन फाऊंटनचे काम ग्राऊंड लेव्हलपर्यंत पुर्ण.<br>**२) १४,२५,००० लिटर क्षमतेच्या RCC MBR ची उभारणी करणे.**<br>**RCC MBR** चे राफ्ट फुटींगचे स्टील बांधून तयार आहे. कार्यकारी अभियंता, म.जी.प्राधिकरण यांचेकडून तपासणी करणे बाकी आहे.<br>**३) टप्पा क्रं.१ कामासाठी खालीलप्रमाणे पाईपचा पुरवठा झालेला आहे-**<br>डी आय के-७, ८०० mm व्यासाचे ११०८.५० मीटर,<br>डी आय के-७, ७०० mm व्यासाचे २९३७.०० मीटर,<br>डी आय के-७, ६०० mm व्यासाचे ४९.५० मीटर<br>डी आय के-७, ५०० mm व्यासाचे २९७.०० मीटर<br>डी आय के-७, ४५० mm व्यासाचे ३९६.०० मीटर<br>डी आय के-७, ३५० mm व्यासाचे १०९०.०० मीटर<br>डी आय के-७, ३०० mm व्यासाचे ६८२.०० मीटर<br>डी आय के-७, २५० mm व्यासाचे ४६७.५० मीटर<br>डी आय के-७, २०० mm व्यासाचे २५०२.५० मीटर<br>डी आय के-७, १५० mm व्यासाचे १५२९.०० मीटर<br>डी आय के-७, १०० mm व्यासाचे १२९२.५० मीटर<br>डी आय के-९, ५०० mm व्यासाचे ९९.०० मीटर<br>४) डी आय के-७, ८०० mm व्यासाची ६७७ मीटर पाईपलाईन टाकणेचे काम करणेत आलेले आहे.<br>ठेकेदार यांचेकडून माहे ऑक्टोबर-२०२० पासून प्रत्यक्ष काम सुरु झालेपासून टप्पा क्र.१ चे आजपर्यंत २५% काम करणेत आलेले असून पुढील कामे सुरु आहेत. |

कामातील अडचणी:- ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांचेकडुन टप्पा क्रं.१ चे कामात टाकावयाच्या पाईपलाईनचा सर्व्हे करणेत येवून या अंतर्गत येणारे WTP, MBR, ESR, GSR उभारणेचे ठिकाणे व पाईपलाईन ज्या गट नं./सर्व्हे नं. मधुन जात आहेत यासाठी उपविभागीय अधिकारी शिर्डी, तहसिलदार, राहाता, नगरपंचायत शिर्डी , ग्रामपंचायत निमगांव-को-हाळे, ग्रामपंचायत निघोज, शिर्डी पोलीस स्टेशन, बी.एस.एन.एल, महावितरण कंपनी शिर्डी, महामार्ग प्राधिकरण, इरिगेशन विभाग, शेती महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, जागतिक बँक प्रकल्प, (सा.बा.) विभाग अहमदनगर यांचे कार्यालय, अहमदनगर यांची परवानगी घेणे आवश्यक होते.

टप्पा क्रं१ चे ठेकेदार यांचेकडुन डी आय के-७, ८०० mm व्यासाची ६७७ मीटर पाईपलाईन टाकणेचे काम करणेत आलेले आहे. परंतू खालील नमुद परवानगी अभावी त्यापुढील पाईपलाईन अंथरणे व बांधकाम करणेचे काम सुरु करता आलेले नाही.

१) चारी क्रॉसिंग व त्या लगत पाईपलाईन अंथरणेकरीता जलसंपदा विभागाची परवानगी.

परवानगी मिळणेकरीता कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक दि.१७/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

सदरहू योजनेत टाकावयाच्या पाईपलाईनमधून सार्वजनिक पाणी पुरवठा करण्यात येणार असलेने पाटबंधारे विभागाकडुन पाईपलाईन संदर्भात कोणताही आकार न घेता, पाटबंधारे विभागाचे मालकीचे जमीनीखालून १ मीटर खोलीवर पाईपलाईन टाकणेकामी ना हरकत प्रमाणपत्र देणेत यावे यासाठी दि.२७/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. यावर जलसंपदा विभागाकडून परवानगी देणेची कार्यवाही सुरु आहे.

२) शेती महामंडळाचे जागेमधून पाईपलाईन अंथरणेबाबत शेतीमहामंडळाचा परवानगी

सदरहू काम करणेसाठी परवानगी मिळणेकरीता इस्टेट मॅनेजर, शेती महामंडळ, लक्ष्मीवाडी मळा यांचेकडे दि.१७/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. याविषयी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, लक्ष्मीवाडी मळा यांचे दि.११/१२/२०१९ रोजीचे पत्रात नमूद केल्यानुसार व तहसिलदार, राहाता यांनी दि.१९/१२/२०१९ चे पत्रानुसार कळविलेप्रमाणे श्रीसाईबाबा संस्थानचे संयुक्त पाणी पुरवठा योजनेची पाईपलाईनकरिता खोदाई फी रु.१७,१००/- वार्षिक परवाना फी रु.१७,१००/- व अनामत रक्कम रु.८५,५००/- अशी एकूण रक्कम रु.१,१९,७००/-(अक्षरी रक्कम रुपये एक लाख एकोणावीस हजार सातशे मात्र) दि.०९/०१/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या, लक्ष्मीवाडी यांचेकडे जमा करणेत आलेले आहेत.

शेती महामंडळाचे जागेतून पाईपलाईन अंथरणेसाठी शेती महामंडळाची परवानगी घेणेबाबत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. लक्ष्मीवाडी यांचेशी करावयाचा करारनामा दि.१८/०७/२०२० रोजी करणेत आलेला आहे.

३) नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी.

टप्पा क्रं.१ चे कामात मौजे निमगांव-को-हाळे गट नं.२२१ मध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट (WTP) व ओव्हर हेड टाकी (MBR), गट नं.८०/८५ मध्ये टाकी (ESR) व हौद (GSR), गट नं.१८६ मध्ये हौद (GSR) इ. कामे करणेसाठी सुचविण्यात आलेल्या ठिकाणी बांधकामाचे प्रयोजन योग्य आहे किंवा (अनुज्ञेय) कसे याबाबत नगर रचना विभागाचे अभिप्राय घेणेसाठी उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/ पाणीपुरवठा/२५६४/२०१९, दि.३०/०९/२०१९ रोजी आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेत आला. यावर मा.सहायक संचालक नगर रचना, शाखा-अहमदनगर यांचेकडुन उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांना अग्रेषित जा.क्र.मौ.निमगांव को-हाळे, ता.राहाता/ग.नं.२२१,८०/८५, १८६/ससं अ/६१,दि.०२/०१/२०२० रोजीचे पत्रानुसार अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिर्डी यांचेकडून दि.१४/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेप्रमाणे पुढील परवानगी मिळणेकरिता प्रस्तावित बांधकामच्या एकुण मुल्यांकणानुसार १% उपकराची रक्कम रु.८,४६,२८५/- मात्र महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना जमा करणेत आलेली आहे.

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिर्डी यांचेकडून क्र.कार्या.-३/बां.प/एसआर/२२/२०२०, दि.२०/०५/२०२० रोजीचा आदेश संस्थान कार्यालयास दि.०८/०६/२०२० रोजी प्राप्त झाला आहे. सदरहू आदेशान्वये टप्पा क्रं.१ चे कामात गट नं.२२१ मध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट (WTP) व ओव्हर हेड टाकी (MBR), गट नं.८०/८५ मध्ये टाकी (ESR) व हौद (GSR), गट नं.१८६ मध्ये हौद (GSR) इ. कामे करणेस परवानगी देणेत आलेली आहे.

**४) शिर्डी न.प. हद्दीतील पाईपलाईन व मौजे शिर्डी गट नं.१२४ मधील ओव्हर हेड टाकी व हौद इ.चे बांधकामास परवानगी मिळणेकरीता शिर्डी नगरपंचायतचा ना हरकत दाखला.**

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पाईपलाईन व मौजे शिर्डी गट नं.१२४ मधील ओव्हर हेड टाकी व हौद इ. चे बांधकामास परवानगी मिळणेसाठी दि.३०/०९/२०१९ अन्वये मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला.

यावर मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.१३/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार याकरीता मा.सहसंचालक, नगररचना विभाग नाशिक यांचेकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे. याकरीता मुख्याधिकारी शिर्डी नगरपंयाचत शिर्डी यांचे मागणीप्रमाणे कागदपत्र स्वाक्षांकित करुन सादर करणेस मान्यता मिळणेसाठी दि.२६/०२/२०२० रोजीचे टिपणीन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**५) नगर-मनमाड हायवे पाईपलाईन क्रॉसिंग करणेबाबत रस्ते बांधकाम विभागाकडुन परवानगी.**

याबाबत परवानगी मिळणेसाठी दि.३०/०९/२०१९ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

६) दि.२२/०३/२०२० पासून कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात आल्याने काम करता आले नाही. मा.जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांचे दि.२१/०४/२०२० व दि.२७/०४/२०२० रोजीचे आदेशान्वये प्रकल्पाचे कामे सुरु करणेस परवानगी देणेत आली.

याबाबत कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी दि.०३/०५/२०२० रोजी पारित केलेल्या आदेशान्वये अटींवर काम सुरु करणेसाठी ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि. यांना जा.नं.एसएसएसटी/पाणी पुरवठा/२४९/२०२०, दि.२२/०५/२०२० व जा.नं.एसएसएसटी/पाणी पुरवठा/३५६/२०२०, दि.०९/०६/२०२० रोजी पत्र देणेत आले. परंतू ठेकेदार यांचेकडुन काम सुरु करणेत आले नाही.

ठेकेदार यांनी दि.०८/०६/२०२० रोजी ई-मेल व्दारे पत्र पाठवुन कामाची मुदत संपलेली असुन याविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे पदाधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करावी अशी विनंती केली. तसेच या कामासाठी विविध परवानग्या घेणे बाकी असलेने प्रकल्पाचे कामास दरवाढीसह कामास मुदतवाढ (time limit extension with escalation) दयावी अशी मागणी केलेली आहे.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपरिषद व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.१ कामाचे ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि.पुणे यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्याचा कालावधी दि.०६/०१/२०२० अखेर पर्यंत आहे व कार्यान्वित करणे या कामी दि.०५/०७/२०२० अखेरपर्यंत होती. साईटवरील अडचणी व कोव्हीड-१९ मुळे काम पूर्ण करता आले नाही. त्यामुळे कामास मुदतवाढ व भाववाढ मिळावी अशी विनंती द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि., पुणे यांनी केली. त्यास अनुसरुन टप्पा क्रं.१ चे कामाचा आढावा घेणेसाठी दि.०९/०७/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे पदाधिकारी यांचेसमवेत बैठक घेण्यात आली.

सदरहू बैठकित भाववाढ बाबतचा Clause निविदेमध्ये नाही, त्यामुळे देय होत नाही, असे उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांनी सांगितले आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी साईटवरील अडचणी व कोव्हीड-१९ याबाबत विचार करुन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे मुदतवाढ प्रस्ताव सादर करणेत येईल. ठेकेदार यांनी दरम्यान काम सुरु करावे, असे सांगितले. त्यानुसार ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कं.लि यांनी दि.०१ ऑगस्ट, २०२० पासुन काम सुरु करणार असल्याचे सांगितले. सदरहु बैठकित ठेकेदार यांना काम पुर्ण करणेसाठी (stipulated period for completion) ०६ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने अशी १२ महिने मुदतवाढ देता येईल अशी प्राथमिक चर्चा झाली.

यापुर्वी ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि.पुणे यांचेकडून IHP/SHIRD/WSS Phase-१/०११, दि.०९/०९/२०१९, PNA/AGM/Shirdi WSS- Phase-१/३९९, दि.१८/१०/२०१९ व PNA/AGM/ Shirdi WSS-Phase-१/५७५, दि.२९/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर कामाकरीता वाढीव मुदतवाढ व कामासाठी जागा उपलब्ध न केलेने भाववाढ व आयडल चार्जेस मिळणेबाबत मागणी करणेत आलेली आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अभिप्राय:- उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग कोपरगांव यांनी जा.क्र/तांशा/शिर्डी संस्थान पापुयो/४४६/२०१९, दि.१८/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये संस्थानकडुन आपले स्तरावरुन ठेकेदारास स्पष्टपणे कळविणेत यावे की, निविदा अटी-शर्ती नुसार (Prebid चे मुद्द्यांचे पुर्ततेनुसार) भाववाढ कलम लागु नसुन ते कुठल्याही परिस्थितीत बदलणे शक्य नाही. मात्र निविदा काम पुर्ण करणेसाठी/ कामाच्या पुर्ततेसाठी वाढीव मुदतवाढ देणे शक्य आहे. त्यानुसार आपले स्तरावरुन ठेकेदारास अवगत करणेत यावे असे कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय:- प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचे अभिप्रायास अनुसरुन निविदा अटी-शर्ती नुसार (Prebid चे मुद्द्यांचे पुर्ततेनुसार) भाववाढ कलम लागु नसुन ते कुठल्याही परिस्थितीत बदलणे शक्य नाही. मात्र निविदा काम पुर्ण करणेसाठी/ कामाच्या पुर्ततेसाठी वाढीव मुदतवाढ देणे शक्य आहे. त्यानुसार याबाबत निर्णय घेणेसाठी मा.तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करता येईल असे मत आहे.

**प्रस्ताव:-** टप्पा क्र.१ कामाचे ठेकेदार यांनी IHP/SHIRD/WSS Phase-1/019, दि.१४/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये दि.२२/१२/२०१८ रोजीचे कार्यादेशा नुसार काम पुर्ण करण्याचा कालावधी (stipulated period for completion) १२ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने असा १८ महिने नमुद आहे. परंतू साईटवरील अडचणी व विविध परवानगी अभावी पाईपलाईन अंथरणे व बांधकाम करणेचे काम विहीत मुदतीत पुर्ण करता आले नाही. तसेच कोव्हीड-१९ मुळे कामास अडचणी येत आहेत. याकरीता प्रत्यक्ष काम सुरु झालेपासून कामास १८ महिने मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.१ कामाचे ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांना कोव्हीड-१९ मुळे व पावसामुळे कामास अडचणी येत असलेने दि.०१/१०/२०२० पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणेत आली.

याकरीता ठेकेदार यांना काम पुर्ण करणेसाठी (stipulated period for completion) ०६ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने असे १२ महिने मुदतवाढ प्रत्यक्ष काम सुरु झालेपासून देता येईल. असे मत आहे.

तरी ठेकेदार यांना टप्पा क्रं.१ चे काम पुर्ण करणेसाठी कामातील वर नमूद अडचणींचा तसेच कोव्हीड-१९ मुळे आलेल्या अडचणींचा विचार करता या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांनी नमूद केलेप्रमाणे भाववाढ वगळून (stipulated period for completion) ०६ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने असे १२ महिने मुदतवाढ प्रत्यक्ष काम सुरु झालेपासून देणेबाबत निर्णय होणेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीच्या सभेपुढे प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.५८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उभ्दव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्र.१ कामाकरीता सदर कामाचे ठेकेदार यांना कोणतीही दरवाढ न देता सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **कोव्हीड-१९ चे पार्श्वभूमीवर सलग सुट्टयांचे काळात गर्दीचे नियोजन व साईभक्तांना सुलभ दर्शन व्हावे म्हणून करणेत येणा-या उपाय-योजना बाबत करण्यात येणारे जाहीर प्रकटन मा.तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** कोव्हीड-१९ चे पार्श्वभूमीवर शासनाने दिलेले निर्देशानुसार सर्व मार्गदर्शक नियमांचे पालन करुन साईभक्तांना दि.१६.११.२०२० पासून श्री साईबाबांचे दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

त्यानुसार सुरवातीचे काळात दिवसभरात एकूण ०६ हजार साईभक्तांना समाधी मंदिरामध्ये प्रवेश देणेत येत होता. सद्यस्थितीत गुरूवार, शनिवार व रविवार या दिवशी शिर्डीत येणा-या साईभक्तांच्या संख्येत वाढ होत आहे,यादिवशी साधारण १५ हजार पेक्षाही जास्त साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येत आहेत.

उक्त पार्श्वभूमीवर सर्व बाबींचा विचार करता, शासनाचे कोव्हीड-१९ संदर्भातील सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन गर्दीचे काळात जास्तीत जास्त १२ हजार साईभक्तांना दर्शनास प्रवेश देणे मंदिर प्रशासनास शक्य होणार आहे. साईभक्तांच्या गर्दीचा ओघ असाच कायम राहिल्यास सलग सुट्टीचे काळात आलेल्या सर्व साईभक्तांना श्री साईबाबांचे दर्शन उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. पर्यायाने कोणत्याही पूर्व नियोजनाशिवाय क्षमतेपेक्षा जास्त भक्तगण शिर्डीस आल्यास मोफत दर्शनपास वितरण काऊंटर तसेच दर्शन रांगेत गर्दी वाढून अभुतपूर्व परिस्थितीती उद्भवू शकते. याचा कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर साकल्याने विचार करून साईभक्तांची संभाव्य गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने सर्व साईभक्तांना सुलभ दर्शन व्हावे म्हणून खालील उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

श्री साईबाबांचे दर्शनाकरीता शिर्डी येथे येणा-या सर्व साईभक्तांनी संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे दर्शनपास आरक्षीत करुन निर्धारित दिनांकास वेळेतच दर्शनरांगेत प्रवेश करणे आवश्यक आहे.

online.sai.org.in या वेबसाईटद्वारे सशुल्क दर्शनपास आरक्षणाची सुविधा आरक्षण तारखेपासून पुढील ०५ दिवसांसाठी तसेच मोफत दर्शनपास आरक्षणाची सुविधा आरक्षण तारखेपासून पुढील ०२ दिवसांसाठी उपलब्ध असेल. (यात दर्शनाचा दिवस अंतर्भूत नाही.)

online.sai.org.in या वेबसाईटद्वारे दर्शनपास आरक्षण करतेवेळी साईभक्तास स्वत:चा फोटो व फोटो / ओळखपत्र प्रणालीमध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे. दर्शनासाठी येतांना साईभक्तांना सदरचे फोटो आयडी बरोबर बाळगणे बंधनकारक राहील. (फोटो /ओळखपत्र अहस्तांतरणीय)

दर्शनासाठी आलेल्या साईभक्तांना फोटो /ओळखपत्र पडताळणीअंती दर्शनपास वरील नमुद वेळेतच दर्शनासाठी प्रवेश देणेत येईल.

सलग सुट्टीचे कालावधीत (उदा. गुरूवार, शनिवार, रविवार व इतर शासकीय अथवा धार्मिक महत्वाचे दिवसांचे दिवस इत्यादी) श्रीराम पार्कींग येथील मोफत दर्शनपास वितरण काऊंटरवर उपलब्ध असल्यास दुस-या दिवसाचे मोफत दर्शनपास सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत वितरीत करणेत येतील.

तथापि, वरील सुट्टयांचे दिवशी बुकींग झालेले दर्शनपास याचा विचार करून, दर्शनाचे मोफत दर्शनपास उपलब्ध असतील तरच संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थान येथील मोफत दर्शनपास काऊंटरवर सकाळी ५.०० ते रात्री १०.०० या वेळेतच वितरीत करणेत येतील.

टिप-

१. १० वर्षाच्या आतील मुले व ६५ वर्षापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींनी कोव्हीड-१९ चे पार्श्वभूमीवर दर्शनासाठी येण्याचे टाळावे.

२. कोव्हीड-१९ चे पार्श्वभूमीवर निवासव्यवस्था मर्यादित असल्यामुळे संस्थानचे निवासस्थानांमध्ये रुम घेऊ इच्छिणा-या भक्तांनी online.sai.org.in वेबसाईटद्वारे रुमचे आगाऊ बुकींग करुनच निवासव्यवस्थेचा लाभ घ्यावा.

३. दर्शनपास उपलब्ध नसतील तर मात्र पास वितरण काऊंटर बंद करावे लागतील.

४. दर्शनपासचे उपलब्धतेबाबत प्रकटन दररोज तारीख निहाय वेळोवेळी संस्थानचे सर्व प्रवेशव्दारावर, सर्व साईभक्तनिवास, वेबसाईट, वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांवर प्रकाशीत करणेत येईल.

उपरोक्तप्रमाणे जाहीर प्रकटन स्थानिक वर्तमानपत्र, संस्थानचे वेबसाईट, व वृत्तवाहिन्यांवर प्रसारीत करणेत येणार आहे. उ परोक्तप्रमाणे प्रकटन मा.तदर्थ समितीचे माहीती व अवलोकनार्थ व निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५८३** **कोव्हीड-१९ चे पार्श्वभूमीवर सलग सुट्टयांचे काळात गर्दीचे नियोजन व साईभक्तांना सुलभ दर्शन व्हावे म्हणून करणेत येणा-या उपाय-योजना बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावात नमुद केल्यानुसार सर्व भाषिक भक्तांना प्रकटन अवगत व्हावे म्हणून ते मराठी, हिंदी व इंग्रजी वृत्तपत्रात अनुक्रमे मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये जाहिरात स्वरुपात प्रसिध्द करण्यास व त्यासाठी येणारे अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदर जाहीर प्रकटन संस्थानचे वेबसाईट व वृत्तवाहिन्यांवर देखील प्रसारीत करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.५३६ ते ५८३ घेण्यात आले.**
**यानंतर दुपारी ०२.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

**स्वाक्षरीत/-**
**(भानुदास ह. पालवे)**
**अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

**स्वाक्षरीत/-**
**(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**